नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका



विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर,
ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१५

॥ भालचंद्र नेमाडे विशेषांक ॥

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्‌मयीन नियतकालिक

युगवाणी

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर,
ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१५



चित्र : संतुक गोलेगावकर


अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर
ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१५

संपादक
प्रा. अजय देशपांडे



मुखपृष्ठ मलपृष्ठ व आतील रंगीत चित्रे
संतुक रामराव गोलेगांवकर
फ्लॅट ६, सी -२, शांतीनिकेत सोसायटी, आदित्य गार्डन सिटी शेजारी, वारजे, पुणे ५२
भ्रमणभाष ९८६०१८४३८९

रेखाचित्रे
विजयराज बोधनकर
२०३-१-१, ब्रह्मांड हौ सोसायटी,आझाद नगर, घोडबंदर रोड,ठाणे (प.)
भ्रमणभाष ९९२०४११८२८

मांडणी, सजावट, अक्षरजुळवणी व मुद्रण
ॲक्टिव्ह कॉम्प्युटर, वणी, जि.यवतमाळ

मूल्य शंभर रुपये

वार्षिक वर्गणी २०० रुपये


ISSN - 2319-6092

प्रकाशक
डॉ. विलास चिंतामण देशपांडे
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
नागपूर ४४००१२
दूरध्वनी ०७१२-२५२३९२९, २५५३७६७, ९९६००३११४८

वर्गणी व अंकासंबंधी चौकशीकरिता दूरध्वनी ०७१२-२५४००१४

संपादकीय पत्रव्यवहार
प्रा.अजय देशपांडे
वामनघाट मार्ग, हनुमान नगर,वणी ४४५३०४, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी ९८५०५९३०३०
ई-मेल srushti_ajay@rediffmail.com, yugwanivss@rediffmail.com

www.yugwanivss.com
www.facebook.com/yugwani.ank@gmail.com



संपादकीय

■

अखिल भारतीय पातळीवरचा साहित्यातील सर्वोच्च असा ज्ञानपीठ पुरस्कार भालचंद्र नेमाडे यांना लाभला. ही घटना मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचा गौरव करणारी आहे. भाषा, संस्कृती व साहित्य या क्षेत्रात कार्य करणाऱ्या प्रत्येक मराठी माणसासह, वाचक, लेखक, कलावंत आणि या भाषेच्या एकूणच सांस्कृतिक पर्यावरणाशी नाते असणाऱ्या प्रत्येक माणसाला आनंद व अभिमान वाटावा अशी ही घटना आहे.

कविता, कादंबरी, समीक्षा, भाषा, संतसाहित्य आदी क्षेत्रांत नेमाडे यांनी मौल्यवान अशी कामगिरी केली आहे. भाषा, संस्कृती, साहित्य या क्षेत्रातले त्यांचे योगदान थोर आहे. कविता आणि कादंबरी लेखनाच्या माध्यमातून नेमाडे यांनी कलाकृत्तीच्या आकार, शैली, रचना यांसह विषय, आशय, अभिव्यक्ती आणि भाषा आदींच्या रूपस्वरूपातही मौलिक बदल घडवून आणले. मराठी कादंबरीच्या क्षेत्रातले त्यांचे योगदान अपूर्व आहे आणि मराठी भाषकांसाठी अभिमानास्पदही आहे. भाषा, संस्कृती, साहित्य याविषयी त्यांनी वेळोवेळी केलेले चिंतन, संशोधन, लेखन, मतप्रकटीकरण हे सारे फार मोलाचे आहे. कादंबरीसारख्या वाङ्मयप्रकारास नवे परिमाण देणाऱ्या नेमाडे यांनी मराठी समीक्षालेखनासही पृथगात्म दृष्टी दिली आहे. भाषा, साहित्य, संस्कृती, समीक्षा, संशोधन या साऱ्या गोष्टींच्या अभ्यासाचे निकष नेमाडे यांनी पार बदलवून टाकले आहेत. देशीवाद, लेखकाची नैतिकता या संकल्पनांची त्यांनी केलेली मांडणी जेवढी अभिनव तेवढीच मौल्यवानही आहे.

ज्ञानपीठ पुरस्काराच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात नेमाडे यांना ज्ञानपीठ पुरस्कार लाभला. हे जसे महत्त्वाचे आहे तसेच हे देखील महत्त्वाचे आहे की अभिव्यक्तीस्वातंत्र्याची गळचेपी मोठ्या प्रमाणात होत असतानाच्या काळात त्यांना हा पुरस्कार लाभला. भाषा, संस्कृती, कला, साहित्य यावरच गंडातर येऊ पाहात असताना आणि नैतिक मूल्यांची पडझड होत असतानाच्या काळात नेमाडे यांनी लोकशाही मार्गाचा स्वीकार करीत आपले विचार अत्यंत स्पष्टपणे व निर्भीडपणे मांडले आहेत. लेखकाच्या प्रतिभेचा, विचारांचा, सृजनशीलतेचा मृत्यू व्हावा म्हणून अमानुष प्रयत्न केले जाण्याच्या काळात नेमाडे लेखकाची नैतिकता सांभाळून अत्यंत संयमीपणे, ठामपणे त्यांच्या विचारांचे प्रकटीकरण करीत आहेत. सांस्कृतिकदृष्ट्या पडझडीच्या काळात नेमाडे यांचे हे निर्भीडपण मोठे आशादायी आहे.

अनुक्रमणिका


भालचंद्र नेमाडे यांच्या साहित्याची चिकित्सा मराठीत मोठ्या प्रमाणात होत आहे. 'कोसला' 'बिढार', 'हूल' 'जरीला' 'झूल' आणि 'हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ' या सहा कादंबऱ्या, 'मेलडी' आणि 'देखणी' हे कवितासंग्रह, 'साहित्याची भाषा' 'टीकास्वयंवर' हे ग्रंथ यांसह त्यांची भाषणे, मुलाखती याविषयी सतत चर्चा होत असते. १९६३ पासून म्हणजे 'कोसला'च्या प्रकाशित होण्यापासून आजतागायत नेमाडे यांच्याबाबत अनुकूल प्रतिकूल चर्चा होत आहे. वेगवेगळ्या दृष्टिकोनातून त्यांच्या साहित्याबाबत, समीक्षेबाबत व मतप्रकटीकरणाबाबत सातत्याने लिहिले-बोलले जात आहे. नेमाडे यांच्या लेखनाच्या आवाहनक्षमतेच्या सामर्थ्याचाच एक प्रत्यय होय. नेमाडे भारतीय भाषांतील लोकप्रिय आणि महत्त्वाचे लेखक आहेत. 'कोसला'पासून मराठीत 'नेमाडेयुग' सुरू झाले आहे, असेही म्हटले जाते.

नेमाडे यांनी नेहमीच कला आणि साहित्याला समाजाचे अंतरंग निरोगी ठेवण्याची माध्यमे मानले आहे. साहित्य हे समाजाच्या अंतस्तरावर सूक्ष्म पण टिकावू बदल घडवत असल्यामुळे कोणत्याही समाजात साहित्याला मध्यवर्ती स्थान दिले गेले पाहिजे, अशी भूमिका मांडताना भारतासारख्या देशात पुस्तकांचा दुष्काळ आहे, ही चिंतेची बाबही ते अधोरेखित करतात. निरोगी वाङ्मयीन संस्कृतीबाबतचे त्यांचे विचार समाजाला अजूनही समजलेले नाहीत. ''लेखनावरची श्रद्धा साहित्याशी एका विस्तृत समाजशास्त्रीय अर्थाने संबद्ध असायला हवी. एक व्यवस्था किंवा प्रणाली म्हणून साहित्य हे अनेक परस्परोपयोगी उपव्यवस्थांचं बनलेलं असतं, यातल्या काही उपव्यवस्था नीट कार्यरत नसतील तर निरोगी वाङ्मयीन संस्कृती निपजण्याची शक्यता दुरावते. आतापर्यंत अज्ञानापोटी आम्ही असं समजत आलो की, साहित्यात प्रामुख्याने किंवा फक्त पुस्तकांचाच अंतर्भाव होतो. कधीकधी लेखकांच्या आणि त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांच्या सूचीलाच आम्ही साहित्य समजतो. आपल्या साहित्याच्या इतिहासाची सगळी पुस्तकं जरी पाहिली तरी हेच दिसून येतं. साहित्याबद्दल इतक्या संकुचित कल्पना जोवर आपल्यात राहतील तोवर आपल्या आणखी काही पिढ्या तरी वर्तुळातच गोल गोल फिरत राहतील. लेखक, टीकाकार, शिक्षक आणि योजनाकार या नात्यांनी आम्ही इतर उपव्यवस्थांना सर्जनाच्या व्यवस्थेइतकंच महत्त्व देणं आवश्यक आहे. ग्रंथ किंवा ग्रंथलेखक हे साहित्याचे उपविभाग स्वयंपूर्ण होण्याइतके स्वायत्त नाहीत. प्रकाशक, मुद्रक, ग्रंथविक्रेते, ग्रंथालये, जाहिरातदार, समालोचक, टीकाकार, संपादक, शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञ हे सर्व साहित्यव्यवस्थेचे महत्त्वाचे घटक आपल्या देशात अत्यंत दुबळे आहेत. या विनिमय साखळीच्या अगदी शेवटच्या टोकावर वेगवेगळ्या उद्योगधंद्यांमधले, त्या त्या भाषिक विभागाच्या कोन्याकोपऱ्यात विखुरलेले वाचक असतात. या संपूर्ण पटाचा अंतर्भाव एकूण साहित्य व्यवहारात होतो. या सर्व उपव्यवस्थांचा जोमदार सहभाग आणि क्रिया-प्रतिक्रिया यांमधूनच निरोगी वाङ्मयीन संस्कृती निर्माण होऊ शकेल.'' असे प्रतिपादन १९९३ मध्ये नेमाडे यांनी केले होते. मराठी वाङ्मय व्यवहाराने या प्रतिपादनातील विचार व वास्तव कथन समजून घेण्याची गरज आज वीस वर्षांनतरही कायम आहे.

अत्यंत गंभीरपणे आणि विचारपूर्वक लेखन करणाऱ्या, अभ्यासपूर्ण मत निर्भीडपणे मांडणाऱ्या भालचंद्र नेमाडे यांना संकल्पित लेखन, संशोधन पूर्ण करण्यासाठी मनःपूर्वक सदिच्छा.

नेमाडे यांच्या साहित्याबाबत चर्चाचिकित्सा करणारे डॉ. किशोर सानप, डॉ. सतीश बडवे, डॉ. महेंद्र कदम, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. हेमंत खडके, डॉ. केशव साळ्वे, डॉ. अण्णा वैद्य, श्री. विनायक येवले यांचे लेख या अंकात आहेत. नेमाडे यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयीचा इंद्रजित भालेराव यांचा एक लेख या अंकात समाविष्ट केला आहे. चित्रकार संतुक गोलेगांवकर यांनी काढलेले मुखपृष्ठ व रंगीत चित्रे, चित्रकार विजयराज बोधनकर यांची रेखाटने या अंकात आहेत. या सर्वांनी सहकार्य केले म्हणून हा अंक प्रकाशित होत आहे, या सर्वांचे मनःपूर्वक आभार. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. मनोहरराव म्हैसाळकर, उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांचेसह केंद्रीय कार्यकारिणीचे पदाधिकारी व सभासद, ग्रंथालयातील व कार्यालयातील कर्मचारी या सर्वांनी या अंकासाठी सहकार्य केले, या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

। अजय देशपांडे



अनुक्रम

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
युगवाणी
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर
ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१५



युगवाणी: जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर-ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१५

अनुक्रमणिका

ज्ञानपीठकार भालचंद्र नेमाडे
साहित्य, संकल्पना आणि मूल्यविचार

डॉ. किशोर सानप

■

ज्ञानपीठकार भालचंद्र नेमाडे साठोत्तरी मराठी व आधुनिक भारतीय साहित्यविश्वात अग्रगण्य आणि क्रांतीकारक लेखक मानले जातात. मराठीतील अवास्तववादी साहित्य आणि सांस्कृतिक व्यवहारवादापासून ते नेहमीच स्वतःला अलिप्त ठेवत आलेले आहेत. गेल्या पन्नास वर्षांपासून नेमाडे मराठीत लेखन करीत आहेत. एक व्रतस्थ लेखक म्हणून कमालीचे लेखन सातत्य राखले आहे. लेखनाशी आणि लेखनाच्या मूल्यविचारांशी त्यांनी आपली बांधिलकी सांगितलेली आहे. नेमाडेंनी आपल्या पन्नास वर्षांच्या लेखनव्यवहारात एक निश्चित असे साहित्यनिर्मितीचे सूत्र स्वीकारले आहे. जीवन आणि साहित्य यांचा एकास एक संबंध मानून, साहित्य निर्मिती केली. कोणत्याही भाषेतील साहित्य आपल्याच देशीय परंपरेत अर्थपूर्ण असते. हाच देशीयतेचा विचार त्यानी आपल्या लेखनातूनही रूजविला आहे. नेमाडेंच्या संबंध साहित्य लेखनात एकरूपता आणि एकसूत्रता आढळते. कविता, कादंबरी, समीक्षा ह्या तिन्ही वाङ्मय प्रकारात एकात्मपणे अभिव्यक्त होणारः हा एकमेव आधुनिक मराठी साहित्यिक आहे. वास्तववाद आणि देशीयवादाचे खंबीर पुरस्कर्ते म्हणूनही नेमाडेंकडे पाहिले जाते. साठोत्तरी कालखंडातील नव्या लेखकांची एक मोठी पिढी घडविण्याचे थोर वाङ्मयीन कार्यही नेमाडेंनी केलेले आहे.

नेमाडेंच्या लेखनातील टोकदारपणा, तिरकसपणा, आकर्षक शैली, परंपरेची मोडतोड करणारी ऐतिहासिक संमिश्र शैली, समाजाने मानलेल्या थोरामोठ्यांचा उपहासपूर्वक उल्लेख, कोणत्याही विधानामागे त्यांची असलेली विचक्षण चिकित्सक दृष्टी, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यात त्यांनी मांडलेला मूल्यविचार अशा अनेक वैशिष्ट्यांसह नेमाडे गेल्या पन्नास वर्षांपासून अखंडपणे मराठी आणि मराठीच्या बाहेरही भारतीय साहित्यविश्वात अत्यंत लोकप्रिय असलेले वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व आहे. पुरस्काराचे राजकारण, साहित्यसंमेलनाचे राजकारण, वाङ्मयीन वादसंवादातील अड्डेबाजी, प्रसारमाध्यमांचा लळा, वगैरेंपासून नेमाडे नेहमीच अलिप्त राहिले आहेत. त्यांच्या 'कोसला' ह्या श्रेष्ठ कादंबरीला कोणताही पुरस्कार मिळालेला नाही. पुढच्याही कादंबऱ्यांना कधी कोणता मौलिक असा पुरस्कार मिळालेला नाही. तब्बल तीस वर्षेपर्यंत नेमाडे वाङ्मयीन क्षेत्रांतल्या मानसन्मान पुरस्कारांपासून वंचितच राहिलेले आहेत. त्यांच्या 'टीकास्वयंवर' या समीक्षा ग्रंथासाठी पहिल्यांदा साहित्य अकादेमीचा अत्यंत प्रतिष्ठेचा मानला जाणारा पुरस्कार १९९२ मध्ये मिळाला. खरेतर त्यांची ओळख तोपर्यंत कादंबरीकार म्हणूनच होती. परंतु समीक्षा ग्रंथाला पुरस्कार मिळाल्यामुळे मराठी वाङ्मयीन संस्कृतीला पहिल्यांदाच, नेमाडे हे ताकदीचे समीक्षक आहेत, याचे भान आहे. खरेतर नेमाडे किंवा कुण्याही प्रतिभावंत साहित्यिकाचे

अनुक्रमणिका

लेखन हे कधीच पुरस्काराच्या मापदंडाने जोखता येत नाही.

सन १९६३ मध्ये भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' कांदबरी प्रकाशित झाली. कोसलाने आशय आणि रूपबंधाच्या संरचनेत क्रांती करून, मराठी कादंबरीत नवयुगाची-नवकादंबरीची सुरुवात केली. 'कोसला'तील पांडुरंग सांगवीकर हा तरुण पिढीचा महानायक बनला. महाराष्ट्रीय मराठी संस्कृतीवर प्रेम करणाऱ्या युवा प्रतिमेचे आदर्श प्रारूप नेमाडेंनी कोसलात उभे केले. कोसलातील आशय, भाषा, पात्रे महाराष्ट्रातील मराठी समाजाच्या समकालीन सांस्कृतिक अवकाशाचे प्रतिनिधित्व करणारी आहेत. अस्सल देशीय शैलीच्या अवकाश 'कोसला'तून साकार झाल्यामुळे, तरुण मराठी मनाच्या शाश्वत जीवनशैलीचे चिरंतन रूप कोसलातून समोर आले. आजही 'कोसला' ही मराठी मनाला अस्वस्थ करणारी कादंबरी असून ती अक्षरकृती मानली जाते.

मेलडी (१९७०) हा त्यांचा पहिला कवितासंग्रह. देखणी (१९९१) हा दुसरा कवितासंग्रह. कोसला (१९६३), बिढार (१९७५), हूल (बिढारचा दुसरा भाग २०००), जरीला (१९७७), झूल (१९७९), हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ (२०१०) ह्या कादंबऱ्या. हिंदूचेच पुन्हा तीन मोठे कादंबरीचे खंड येत्या काळात यथावकाश प्रकाशित होणे अपेक्षित आहे. साहित्याची भाषा (१९८७) , टीकास्वयंवर (१९९०), तुकाराम (इंग्रजी १९८०), दी इंफ्ल्यूअन्स ऑफ इंग्लिश ऑन मराठी अ सोशिओलिंग्विस्टिक अँड स्टाइलिस्टिक स्टडी (१९९०), देशीवाद (इंग्रजी) हे समीक्षाग्रंथ. भालचंद्र नेमाडे यांची भाषणे, मुलाखती इतरही काही ग्रंथ अलिकडच्या काळात प्रसिद्ध झाले आहेत. 'कोसला' या कादंबरीचे हिंदी, गुजराती, कन्नड, असामिया, पंजाबी, उर्दू, उडीया, इंग्लिश, बंगाली आदी भाषांमध्ये भाषांतरे प्रकाशित. इतरही पुस्तकांची विविध भारतीय भाषांमधून अनुवाद प्रसिद्ध झाले आहेत. नेमाडेंच्या वाङ्मयीन कारकीर्दीत त्यांना ह. ना. आपटे पुरस्कार (१९७६), यशवंतराव चव्हाण-कराड पुरस्कार (१९८४), कुरुंदकर पुरस्कार (१९८७), मराठी अभ्यास परिषदेचा महाबँक पुरस्कार (१९८८), रा. श्री. जोग पुरस्कार (१९९०), साहित्य अकादमी पुरस्कार (१९९१), कुसुमाग्रज पुरस्कार (१९९१), ना. धों. महानोर पुरस्कार (१९९२), साहित्यातील योगदानाबद्दल महाराष्ट्र फाउंडेशन संस्थेचा जीवन गौरव पुरस्कार (२०१४), भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार (२०१५) असे व इतरही विविध मानसन्मान नेमाडेंना प्राप्त झालेले आहेत.

नेमाडेंनी तरुणाईचं मन आणि मानसिकता ओळखली ती अनुभवाच्या आधारे. खरेतर ही भारतीय तरुणाच्याच मनाची ठेवण आहे. जी आजही विशेषत्वानं बदललेली नाही. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर क्रांतिकारकांची पिढी आटोपली. पुढे नैतिकता खोट्या शिक्क्यांसारखी समाजात वापरली गेली. खोटी नाणी-खोटी मूल्ये समाजात रुजली. समाजाची अवस्था वरून केवळ बारक्याशा दिसणाऱ्या परंतु आत मात्र विशालकाय असणाऱ्या हिमनगासारखी झाली. दिसणारी वरवरची अवस्था कितीही नैतिक असली तरी आतली अवस्था कमालीची स्वार्थी-मतलबी बनली. समाजात मूल्यनिर्मितीचे कार्यच थांबले. भारतीय मन आळसावले आणि कर्तृत्व गाजवण्यासाठी हवी असलेली क्षेत्रे उरली नाहीत. मग जी क्षेत्रे जीवन जगण्यासाठी उरली त्यांना आतून कीड लागली. कुण्याही तरुण मनाला समाजाचं हे कीडलेलं रूप अस्वस्थ करतं. काल जसं पांडुरंग सांगवीकरला ते अस्वस्थ करणारं होतं तसंच ते आजच्या चांगदेव पाटलाला-नामदेव भोळे आणि खंडेराव विठ्ठललाही अस्वस्थ करणारंच आहे. नेमाडेंचा पांडुरंग हा ज्या तरुणाईत जगतो ती तरुणाई जीवनातल्या वास्तवाकडे आणि अपेक्षाभंगांकडे पांडुरंगी दृष्टीनं पाहू लागते. जगण्याच्या उच्च स्थितीत परिवर्तीत होताना, जीवनाकडे-समाजाकडे पांडुरंगी-चांगदेव-खंडेरावी तिरकस चौकस दृष्टीने पाहणे अनिवार्यच ठरते. दुसरा पर्याय उरत नरही. दुसरा पर्याय शोधायला गेलोच तर खोट्या कथा-कादंबऱ्यांची निर्मिती होताना दिसते. जी मराठी साहित्यात आजवर भरपूरच झालेली आहे. का. बा. मराठे म्हणतात तशी, मराठीत नावलांची कीड भरपूर प्रसवली गेली.

कोसलाचा कोष : तरुणपिढीचा नायक पांडुरंग

'कोसला' ही कादंबरी पांडुरंगच्या शरणागत अवस्थेशी थांबते. पांडुरंग बापाला कंटाळून-बापाशिवाय जगण्याचा आर्थिक पर्याय उपलब्ध नसल्यामुळे, बापसत्तेला शरण जातो- आपण सगळं करू. हे म्हणतात वगैरे ते सगळं...जगण्याचा समाजमान्य पर्याय स्वीकारण्याचं मन तयार करून, नेमाडेंनी कोसलाचा शेवट केला. कोसलातील पांडुरंग सांगवीकर हा तरुण असल्यामुळे जगण्यातलं थ्रील तो अनुभवू शकला. परंतु तरुण जेव्हा प्रौढावस्थेत जातो, तेव्हा केवळ जगण्याचं थ्रील किंवा वास्तवाशी समांतर जावून त्याला लौकिकात जगणं अशक्य होतं. समाजाशी आणि कुटुंबाशी हातमिळवणी करूनच त्याला जगण्याचे नवे नवे पर्याय स्वीकारवे लागतात. त्यात तडजोडीच अधिक असतात. स्वातंत्र्य नसते. पारतंत्र्यच अधिक असते. परंतु इलाजही नसतो. कारण पांडुरंगचं तरुण वय आणि त्याची संवदेनशीलता याला काळाच्या आणि जीवनाच्याही अनेक मर्यादा असतात. म्हणूनच नेमाडेंनी

पांडुरंगचं नायकत्व कोसलापुरतं मर्यादित ठेवून, पांडुरंग सांगवीकरचा कोसलाध्याय-साता उत्तराची कहाणी सफल सुफळ केली. पुढे पांडुरंगचे प्रौढ रूप उभे करतांना त्यांनी चांगदेव पाटील हा नवनायक साकार केला.

प्रौढत्व आल्यावर अनेक जबाबदाऱ्या येतात. भोवतालच्या अपेक्षांचं दडपण येतं. जीवनाचाही दाब सुसह्य नसतो. आर्थिक आणि लैंगिक समस्यांनी माणसाचं मन चित्रविचित्रपणे घडत जातं. जीवनाचा खुला बंध आणि बहु पर्याय स्वीकारणारा, परंतु समाज वास्तवाशी समांतर मार्ग आखून, आपलं स्वतःचं संवेदनशील अंतःविश्व जपणारा चांगदेव पाटील, नेमाडेंनी पुढील लेखनात साकार केला. चांगदेव पाटील सुद्धा कृतीपेक्षा विचारानं झगडणाराच नायक असतो. कृतिशीलता ही काळाची मागणी बघून चांगदेव पाटीलची एक अंधारी बाजू नेमाडेंनी, 'झूल' कादंबरीत नामदेव भोळेच्या रूपानं अधिक उजळ केली. तात्पर्य असे की, कोसला ही तरुण मनाची चिरंतन संवेदनशीलता आणि तरुण मनाचं जिवंत वास्तव मांडणारी कृती असल्यामुळे आणि तितकीच देशीय ढंगाच्या अनौपचारिक-आकर्षक शैलीतून ती साकार झाल्यामुळे, 'कोसला' ही एक वाचकप्रिय-एतद्देशीय अक्षर कृती ठरली. कोसलाचे हे महात्म्य नीट समजून घेतले की नेमाडेंच्या पुढील कादंबऱ्यांची महत्ता आपोआपच ध्यानात येवू लागते. कोसलाकारने कोसला या कांदबरीतून उभा केलेला पांडुरंग सांगवीकर पुढे चांगदेव पाटीलच्या व्यक्तिमत्त्वात परकाया प्रवेश करून, 'बिढार' 'जरीला' -'हूल' 'झूल' या कादंबऱ्यांतून वाचकांना भेटतो, पांडुरंग सांगवीकरचा आत्मा असलेला आणि जीवनाविषयी नैतिक दृष्टिकोण बाळगणारा चांगदेव घडवतांना, नेमाडेंनी 'कोसला'ची शैली जाणीवपूर्वक टाकली. कारण जगण्याच्या सर्व अवस्थेत पांडुरंगच्या ढंगाने आणि शैलीने जगता येत नाही, चांगदेव पाटील हा प्रौढ युवा नायक करतांना नेमाडेंनी कादंबरीचा सैल आणि खुला रूपबंध स्वीकारला. खरेतर 'कोसला' ते 'झूल' ते 'हिंदू', एका नायकाचाच हा विविधवस्थेतील सलग असा जीवनप्रवास आहे. हा प्रवास अर्थातच सुखावह नाही, दुःखदायक आणि क्लेशदायकही आहे. 'कोसला'ची शैली जबरदस्त देशीय-अस्सल-अनुभवनिष्ठ-नैतिक मूल्यांच्या कालोचित वापर करणारी असल्यामुळे वाचकांच्या मनात कोसलाची शैली घर करून बसली. कोसलाची शैली झपाटून टाकणारी-चेटूक करणारी - मंत्रमुग्ध करणारी-भूतासारखी मानगुटीवर बसणारी असल्यामुळे वाचक-लेखक-समीक्षक अजूनही 'कोसला'च्या कोषातून बाहेर पडल्याचे चित्र दिसत नाही. परिणामतः 'बिढार' ते 'हिंदू' या कादंबऱ्यांचा व्हावा तितका सकारात्मक विचार अजूनही मराठी कादंबरी समीक्षेत झाल्याचे दिसत नाही. भारतीय मन प्रभावात गुरफटणारे आणि अंधश्रद्ध असल्याचे एवढे मोठे साक्षात उदाहरण मराठी साहित्यक्षेत्रात क्वचितच सापडण्यासारखे आहे. आता असे म्हणावेसे वाटते की, 'कोसला' हा नेमाडेंच्या भोवती वाचकांनी-समीक्षकांनी निर्माण केलेला मायावी कोष आहे. समीक्षक-मांत्रिकांनी कोसलाच्या कोषात वाचकांना बांधून ठेवले आहे. आजही नेमाडेंची 'कोसला' हीच एकमेव श्रेष्ठ कादंबरी असून, तेवढेच त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचे लेणे आहे, असेच लोक मानतात. परंतु नेमाडेंच्या लेखनाचं हेच एकमेव सत्य किंवा रहस्य नाही.

'कोसला' ते 'हिंदू' : जगण्याची समृद्ध अडगळ

'कोसला' ते 'हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ' हा खरेतर एका समाजमनस्क आणि लेखकाची नैतिकता पणाला लावून लेखन करणाऱ्या एका महाकादंबरीकाराच्या महाकाव्यसदृश्य महाकादंबरीचा सृजनाचाच निरंतर प्रवास आहे. कादंबरी हा सामाजिक दस्तऐवज असतो आणि कादंबरीकाराला सांस्कृतिक संवर्धनाची भूमिका पार पाडावी लागते. नेमाडेंचा कादंबरी लेखनाचा आजवरचा प्रदीर्घ प्रवास याच भूमिकेतून झालेला आहे. नेमाडेंच्या इतर कादंबऱ्यांची तुलना कोसलाशी करून वाचक आणि समीक्षक समाजात भ्रामक समजूती निर्माण करतात. कदाचित नेमाडेंच्या कादंबरी कर्तृत्वाला सीमित करण्याच्या डावपेचाचाही हा एक भाग असू शकतो. परंतु वाचकांनीही समीक्षकांशिवाय कादंबरीकार-लेखकाच्या वाङ्मयीन कर्तृत्वाची आणि लेखकाच्या सामाजिक उत्तरदायित्वाची तटस्थ पारदर्शक चिकित्सा करून निर्णय घेणे सुदृढ वाचन संस्कृतीच्या सवर्धनासाठी गरजेचं असतं. जगण्याचं वास्तव आणि समाजाचं अनुभवाला आलेलं वास्तव अद्‌भुत पद्धतीने-कलारूपात साकार करताना रंजक शैलीचं माध्यम न स्वीकारता जगण्याची वास्तव शैली, मग ती अवाचनीय असो की वाचकांचा अपेक्षाभंग करणारी असो, लेखकाच्या नैतिकतेशी कुठलीही तडजोड त्यांना कधीच कराविशी वाटत नाही. वास्तव कसंही असो, ते जगल्याचं सुंदरच होतं, हे कलात्मक भान आमच्या मराठी वाचकांना आणि समीक्षकांनाही अजून यायचं आहे.

'हिंदू' ही कादंबरी एका विद्वान चिंतनशील लेखकाच्या आयुष्यभराचं चिंतन आहे. कोसला ते झूल पर्यंतचा प्रवास पांडुरंग-चांगदेवच्या जगण्यातल्या समृद्ध अडगळी मांडण्याचा होता. पांडुरंग सांगवीकर ते चांगदेव पाटील असा जगण्याचा एक स्वतंत्र परंतु समाजाला समांतर मार्ग नेमाडेंनी आपल्या कादंबऱ्यातून अधोरेखित केला. कलाकृतीची प्रमाणित तत्त्वे

झुगारून देणाऱ्या कलाकृतींचा विचार तिने निर्माण केलेल्या नवनिर्मित कला मूल्यांच्या दृष्टिकोणातूनच करायला हवा, ही सवय आपल्यात अजूनही रुजलेली नाही. म्हणून सांस्कृतिक आस्वादाने नेहमीचे होणारे घोळ मिटलेले नाहीत. असे प्रयत्नही सांस्कृतिक विश्वात वावरणाऱ्यांनी केलेले नाहीत. तब्बल छत्तीस वर्ष हिंदूच्या निर्मितीत गुंतलेल्या नेमाडेंनी सन २०१० मध्ये हिंदू चतुष्ट्यांपैकी तब्बल सहाशे पानांचा पहिला भाग वाचकांसमोर ठेवला आहे. उरलेले तीन भाग एवढ्याच जाडीचे पानांचे असू शकतात, म्हणून हिंदू ही कादंबरी जवळपास दोन हजार पृष्ठांच्याही वर असेल. कादंबरीचा प्रदीर्घ अवकाश आणि महाकाव्यसदृश्यता लक्षात घेतली तर, हिंदू ग्लोबल व्हिलेजच्या काळातलं हिंदूंच्या जीवनाचं महाकाव्य आहे, असंही म्हणता येईल. सन १९९१ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'देखणी' कविता संग्रहातील निरोप या कवितेततील काही ओळी हिंदू कादंबरीत अवतरणादाखल आल्या आहेत. नेमाडे प्रत्येक कृतीत अवतरणातून लेखनांच सूत्र मांडू पाहतात.

ह्या विश्वभानाच्या घोंघावत्या समुद्रफेसात निरर्थक न ठरो
आपल्या आयुष्याचा सुरम्य सप्तरंगी बुडबुडा, न ढळो
हे पहाटी पांघरलेले दाट झाडांतून डोकावणारे रोशन सूर्य
ह्या खिन्न विनाशतत्त्वाच्या झपाट्यात दरवळो
अकाली महामेघानं उठवलेली जमिनीतली उग्रगंधी धूळ,साचो
घर भरून जगण्याची समृद्ध अडगळ...

हिंदूची मुळं ही अशी नेमाडेंच्या लेखनातील पूर्वसुत्रांना खोलवर अर्थ देणारी आहेत. विनाशतत्त्व हा सृष्टीचा स्थायीभाव आहे. माणूसही त्याला अपवाद नाही. विनाशतत्त्वाची जाणीव ही मुनष्याला सृष्टीतल्या चराचराशी निगडित करणारी असते. गूढ अशी ही अनुभूती अणूरेणूया थोकडा तुका आकाशा एवढा, या परम अनुभूतीपर्यंत नेणारी असते. खरेतर या कवितेत नेमाडे संसारावर भाष्य करतात. संसारातून सृष्टीच्या संसाराकडे, असा हा यातनामय प्रवास असतो. सृष्टी ही जशी विनाशतत्त्वानं चालते तशीच ती भौतिकदृष्ट्या जगण्याचीही समृद्ध अडगळच असते. सृष्टीचं जगणंच समृद्ध अडगळींचं असतं. माणसाच्याही कृती-विकृती-भाव-विभाव ह्या अडगळीचीच अपत्ये असतात. सर्व काही स्वाभाविक आणि नैसर्गिक असलं तरी माणसाच्या जाणिवा आणि भावना ह्या जगण्याच्या समृद्ध अडगळीला संपन्न करीत असतात. ह्या अडगळींना खिन्नत्वाची एक सूक्ष्म किनार असते. दुःखाचे कढ असतात. मृत्यूची-विनाशतत्त्वाची जाणीव संतत्त्वापर्यंत नेणारी असते. बुद्धाच्या करुणेचेही ते उगमस्रोत असते. ज्ञानोबा-तुकोबादी महानुभाव चक्रधर-गोविंदप्रभू आदींच्याही जाणिवा-भावना ह्याच सृष्टीच्या विनाशतत्त्वाच्या तीव्र जाणिवांतून प्रस्फुटित झालेल्या. संत-स्थिती किंवा स्वामी चक्रधरोक्त स्थिती हा जगण्याच्या अडगळींवरचाच उतारा असतो. जगण्याची समृद्ध अडगळ ही अशी देशीय महानुभाव संतादिंच्या जगण्यानं-त्यांच्यातल्या संतत्त्वानं सांस्कृतिक होत होत, संस्कृतीचं संचित बनली. तोच देशीय-वारसा नेमाडे कादंबरी लेखनातून पुढे नेतात. सृष्टीच्या जगद्व्याळ रूपाला समजून घेणारा हा कादंबरीकार माणसाच्या जगण्याचं वास्तव आणि सत्य मांडू पाहातो. माणूस हेच नेमाडेंच्या लेखनाचं मध्यवर्ती केंद्र आहे. निरनिराळ्या परीने नेमाडे भोवतालात जगणाऱ्या माणसांना समजून घेतात. माणसांची सुष्टदुष्ट कालातील रूपही वर्तमानाच्या परिपप्रेक्ष्यात जगण्याचे निरनिराळे पर्याय म्हणून मांडतात. कालातील मानुषतेची देशीय परंपरेच्या संदर्भात उदाहरणे देतात. खरंतर माणसाच्या समग्रतेचा शोध घेणारा हा कादंबरीकार आहे.

हिंदूः जगण्याच्या समृद्ध अडगळींचा सांस्कृतिक कोश आहे. हिंदूच्या जगण्याच्या समृद्ध अडगळींचा शोध घेताना आणि त्यावर आपलं भाष्य करताना नेमाडे जगण्याची अनेक सूत्रे मांडतात. अनुभवांना सूत्ररूपात व्यक्त करताना सूत्रांच्या मधला अवकाशही अनुभवांनी भरून काढतात. ही सूत्रे मग तत्त्वज्ञानात्मक होत नाहीत तर साक्षात जगण्याची शाश्वत सत्येच जाणवू लागतात. उदाहरणार्थ, जाणिवांना स्थळांच्या आणि काळाच्या पलिकडेही अस्तित्व असते, मानवी मेंदूतली रहस्यमय केंद्र बाहेरच्या कुठल्यातरी ऊर्जेशी जोडलेली असतात. लैंगिकदृष्ट्या मुक्त झाल्याशिवाय बायकांना निधडेपणा येणार नाही, हिंदू पुरुषच आपल्या बायकांच्या मागासलेपणाला जबाबदार असतात, हिंदू लोक काहीही फेकून देत नाहीत, सिंधुकाळापासून सगळी अडगळ तळघरात जपून ठेवलेली आहे, वास्तव कसंही असो, ते जगल्यानं सुंदरच होतं, चित्तात जिथे विचार उत्पन्न होतात, तिथेच क्षोभही निर्माण होतो, दाट चिंतनात शिरणं म्हणजे कोण्या अज्ञाताचं कर्ज फेडण्याचाच प्रकार, गतकाळ आपल्याला नेहमीच हळवं करून टाकतो, जगणं ही प्रक्रिया आहे, तिच्यात भाग घेणं एवढंच खरं असतं, मराठ्यांनी देशभर पेंढारी संस्कृती जोपासली, गावातली ही सगळी हजार प्रकारची माणसं एकमेकांवर प्रेम, विखार दोन्ही करत करत मुंग्यांच्या वारूळासारखी एकोप्यानं राहायची, गरिबी वाईट नसते, मागासलेपणाही वाईट नसतो, गरिबांना पिळणं वाईट असतं, ह्या गरीब लोकांचं केंद्र म्हणजे घर. प्रत्येकाला एक बायको, एक गाडं, बैलजोडी, खेडी म्हणजे शेती, शेती म्हणजे थंडी, ऊन, धूळ आणि काबाडकष्ट, जन्मभर एवढं नैतिकतेचं ओझं वाहत आल्यानं तर हे लोक जगात

हास्यास्पद ठरले नसतील?

हिंदूची निवेदनशैली बहुपेडी आहे. आत्मपर तटस्थ स्वगतपर - तृतीयपुरुषी - लेखक - नायक - निवेदक - वाचक संवादपर अशी विविधांगी आहे. लेखकाचा प्रोटॅगॉनिस्ट सदैव वाचकांना स्तिमित करतो. हादरे देतो. चिंतनसन्मुख करतो. आतला आवाज जागा करतो. माणसातल्या श्रेयस मूल्यांना आवाहन करतो. उदा. खंडेरावची स्वगतं. खंडेराव तुझे महिने महिने लायब्रीत खर्ची गेले. अशा भानगडींमुळे खंडेराव, तुझी पीएचडी वेग घेत नाही आहे... खंडेराव, तू आयुष्यभर प्रिय डेबरीला विसरू नकोस. कुठेही जा, काहीही हो, पण जेवतांना एकदा आपल्या डेबरीची केव्हातरी याद कर... खंडेराव, तू मोठा झाल्यावर ही आनुवंशिकता कशी बदलतात, याचा कोर्स घेऊन ये... त्याच रस्त्यावर खंडेराव तू अजून तिथेच तसाच मागे पाहत उभा आहेस... खंडेराव, तू शेती करायचं ठरवलंस तर नवरा होऊ नकोस किंवा लग्न करायचं ठरवलंस तर शेतकरी होऊ नकोस. दोन्हीपैकी एकच कर. बोला कुंडलीक हारीविठ्ठल... खंडेराव तुझ्या आजीनं किती सोसलं, किती सोसलं, तुला सांगून पटणार नाही...

'कोसला' ते 'झूल'पर्यंत पांडुरंग-चांगदेवनं बापाविरुद्ध उभा दावा मांडलेला असतो. पांडुरंग-चांगदेव प्रमाणेच खंडेरावचंही आपल्या बापाशी जमत नव्हतं. वडील म्हणायचे, सोड त्या भानगडी, आपली शेती केवढी मी त्यांच्याशी उद्धटपणे बोलायचो, उद्धटपणेच वागायचो, त्या त्या पिढीच्या मर्यादा असतात. एवढंही शहाणपण मला वडील असेपर्यंत आलं नाही. आपण मंदबुद्धी, मूर्ख. कितीवेळा वडलांना न समजून घेता आपण दुराग्रहच जोपासत आलो? खंडेराव, तूच निर्दय, दुष्ट... पांडुरंग-चांगदेवनं पिढीचं अंतर म्हणून बापाशी उभा दावा पुकारणाऱ्या नायकांच्या प्रवासातील खंडेरावला मात्र वडील मृत्यूशय्येवर असल्याची तार आल्यावर गावी निघतानाच्या प्रवासात वयोनिष्ठ शहाणपण येतं. कुटुंबापासून वेगळं होत स्वसंबधु त्याज्यपर्यंत ह्या सर्व नायकांची वाटचाल असते. परंतु कालावकाशात वयाच्या एका परिपक्व स्थितीत खंडेरावला आपल्या बापाचं जगणं निरर्थक नव्हतं, स्वाभाविक होतं हे पटू लागतं. तो म्हणतो, आता वाटतं, आपण चुकलो होतो. वडील बरोबर होते, पण तेव्हा खंडेराव मनाशी गाठ बांधत होता की, ''अशा माणसाच्या छत्राखाली आपण जगू शकणार नाही. वगेळा मार्ग शोधून काढू. खंडेराव, तू एवढा क्षुद्र होतास, याच्यावर आता तुझा विश्वास बसतो? यांच वेळी वडलांना राक्षस समजून तू मारेगाव सोडायचा निश्चय केला होतास. आणि बी.ए. झाल्याबरोबर तडकाफडकी तू वडलांना न सांगता घरून निघून गेला होतास... खंडेरावच्या आतली ही नाजूक जखम, वडलांना अंत्यसमयी भेटीला निघाल्यावर प्रवासात अशी भळभळून निघते. आयुष्यभर बापाला दुषण देण्याचं ओझं, शेवटी खंडेरावला कालावकाशात हलकं करावं लागतं. कालसंवदेना कालासापेक्ष होत होत हळव्या होतात. जगण्याच्या अवकाशात हे असं वाटणं-जाणवतं अस्वाभिक नसतं. भूतकाळ माणसात काठोकाठ वाहत असतो? भूतकाळाच्या ह्या अफाट नदीत तरंगणारा फेस एवढाच तर वर्तमानकाळ नसतो? बायडे, हा खंडेराव अजून तिथे तसाच लोडाला टेकून बसला आहे. या सगळ्या आनंदी गलबलाटात मी माझ्या प्रिय रेनीचे सुंदर हात शोधत असतो... आर्य लोकांचं मूळस्थान अफगाणिस्तान ते सप्तसिंधु असून इकडूनच आर्य भाषा युरोपभर पसरली...ह्या भूमीतून कमळासारखे आपोआप एकेक पंथ उमलत आले. चुकून त्यांना नंतर अडाणी इंग्रजांनी धर्म असं नाव देऊन वेगवेगळं केलं. इथले सगळे धर्म म्हणजे इंद्रधनुष्यासारखे एकात एक शिरलेले आहेत, हे त्यावेळी अतिथी प्राध्यापकांनी पटवून दिलं होतं... खंडेराव असा घडत जातो. पुरातत्त्वीय संशोधनात खंडेरावला एक कंकाळ सापडतो. खंडेरावच्या जगण्याची चिंतन दिशा तो व्यक्त करतो. खरं रहस्य खंडेराव हे की, तुला तो सबंध कंकाळ सापडल्यापासून ते खरा पुन्हा ठिकाणावर आलास. त्या सलग आडव्या हाडांच्या जटिल सुसंघटित रचनेत तुला हरवलेलं स्वास्थ्य सापडलं. कवटीतल्या डोळ्यांच्या आरपार भोकांमधून पलीकडचं जे काहीच नसतं ते तुला अखेर सापडलं. हा तुझा सगळ्यात मोठा शोध. पुरातत्त्वाचं संशोधन ते दुय्यम आहे. परातत्त्वाचा स्पर्श तो मुख्य हस्ती है न कुछ अदम है गालिब, आखिर तू क्या है, ऐ, नही है। अस्तित्वही नाही आणि नास्तित्वही नाही, तूही नाहीच आहेस. आणि जरी तू म्हणशील आहे, नाही आहे हरचंद कहें के है, नही है। प्रत्येकाच्या आयुष्याची कमाई हीच तो मरतो... खंडेराव हा पुरातत्त्व संशोधक असतो आणि पुरातत्त्वाचा युगसंस्कृतीशी आणि भावनांशी तो संबंध जोडतो. जो पुरातत्त्व विद्वांनाना मान्य नसतो. खंडेरावच्या संशोधनाचं हे नवं प्रमेय असतं. पुरातत्त्वाचा संबंध युगजाणिवांशी असतो आणि संस्कृतीचं दर्शन त्यातून घडतं. कालसंबद्ध संवेदनांना नवे अर्थ देण्याचे सामर्थ्य पुरातत्त्व संशोधनात असून भूत-वर्तमानाचा सांधा जोडून मानवी जगण्याला कालसापेक्ष संवेदना प्रदान करण्याचंही सामर्थ्य पुरातत्त्वात असतं. खंडेराव म्हणतो, जुन्या अश्मयुगातलं ह्या सांगाड्याशिवाय माणसाचं काय राह्यलं? जे काही त्या युगात असेल, त्याची कल्पनासुद्धा येत नाही. हा एवढाच आपल्याशी त्या युगाचा स्पर्श-हा एवढाच त्या युगाचा अर्थ. इथेच ते युग

अनुक्रमणिका

सुरू झालं, इथेच ते युग सुरू झालं, इथेच ते संपलं. कुठल्याही संस्कृतीचा शेवट हाच असतो-एक संपल्याची अतीत फडफड. आपली आजची संस्कृतीही लवकर फडफडो. की सगळं शांत... खंडरावचं पुरातत्त्वीय संशोधन त्यांच्या सांखळिया सरांना पटणारं नसतं. इतिहासाच्या सटाऱ्या वाचून वाचून खंडेरावचं चुकीचं कान्सप्ट्रयुअलायझेशन झालं, असं त्यांचं मन असतं. कालसंबंद्ध संवेदनांचा हा व्याकुळ करणारा आणि आतल्या आत दुःखाची सूक्ष्म शिरशिरी शरीरभर पसरवणारा आणि त्यातूनच स्वतःसह समाजाकडे तटस्थपणे पाहणारा एक आऊटसायडर म्हणून खंडेराव आपल्याला संबंध संहितेत भेटतो. तो अस्तित्ववादी नायकासारखा विक्षिप्त नाही किंवा जगणं निरर्थक ठरवून मोकळा होणारा नाही. तो जगण्याशी दोन हात करून जगणं अर्थपूर्ण करणारा-मानवाप्रती करुणा आणि कळवळा मनात बळगणारा, नैतिक उंची गाठणारा एक सभ्य सुसंस्कृत नायक म्हणून आपल्याशी मनःसंवाद साधतो.

तिरकस आणि चौकस देशीय प्रतिक्रिया देणे हा नेमाडेंच्या शैलीचा आजवरचा विशेष पैलू मानला जातो. लेखक निर्भीडपणे आपल्या प्रतिक्रिया देतो. 'हिंदू'च्याही रूपबंधात अनेक जागा अर्थपूर्ण तिरकस प्रतिक्रियांनी तर कधी खाजगी आवडीनिवडींनी व्यापलेल्या आहेत. उदा. हल्ली रिकामचोट श्रीमंती लोकांना जसं टूरिझम, तसा त्या वेळी लष्करी पेशा फार तेजीचा उद्योग समजला जाई, मुलुखगिरीतच तब्येत उत्तम राही, युरोपी संवदेनवर्चस्वामुळे आलेली रोगट स्वच्छता-साबण, पावडरी, छानछोकी?, साधेपणाला युरोपातले लोक दारिद्र्य म्हणतात, खंडू, ही पुस्तकं इंग्रजांशी इमान राहणाऱ्या आपल्याच भाडू लोकांनी भाड्यानं लिहिलेली असतात. इंग्रज लोक जहाजं भरभरून लूट नेतात, हे तर दिसतंच की नाही? तेवढं जरी त्यांनी नाही केलं, तरी मोठी सुधारणा होईल... आपल्या देशाला आता स्वातंत्र्य मिळालं आहे. सर्वाआधी हा शहरं आणि खेडी यांच्यातला भेद नष्ट केला पाह्यचे... इंग्रज माणूस केवढा मोठा क्रूर सिनेमा करू शकतो? स्वतःचा देश नीट सुरक्षित ठेवून? जगाच्या इतिहासातला एक क्रूर वेस्टर्न सिनेमा... इंग्रजांच्या सुधारणावादी दृष्टिकोनावर हा खडा देशीय हल्लाच मानावा लागेल.

खंडेराव, हा जगण्याच्या समस्यांचा शोध घेणारा आणि त्यातून मार्ग शोधणारा देशीय हिंदू नायक आहे. तो हिंदुत्ववादी नाही किंवा अधोगामी वगैरेही नाही. वर्तमानाचे दाब न मानता तो जगण्याच्या अस्सल मानवी प्रेरणांचा शोध घेणारा नायक आहे. आठवणींची जंत्री, भोवतालची हजारो जगणारी आणि जगून गेलेली माणसं. असं हे विशाल जीवनाशय मांडणारं आशयविश्व नेमाडेंनी जाणीवपूर्वक कादंबरीतून मांडलं आहे. त्यांचं लेखन कोणतंही असो ते दीर्घकाळाच्या खोलवर चिंतनाचं आणि अनुभवांचं फळ असतं. जीवनांच उघडंनागडं सत्य असतं. वास्तव आणि वास्तवाच्या सीमांना भेदणारं अद्भूत वास्तव असतं. मराठे- राज्यवाड्यांना ज्या अद्भूत वास्तवाची अपेक्षा कादंबरीकाराकडून होती, त्याचा मराठीतला वस्तुपाठ म्हणजे नेमाडेंची हिंदू कादंबरी होय. जीवन आणि साहित्याचा रक्तसंबंध, अनुभवाला आलेल्या जीवनाला साहित्यकलेत आणणं, लेखनाची समंजस जाण, दुःखाची तीव्रता अनुभवण्याची सोशिक वृत्ती, वारकरी-महानुभाव-जुन्या गद्यशैलींचा संमिश्र वापर, समृद्ध भाषिक जाण, देशीयता, वास्तववाद, नैतिकता आणि लेखकांची निर्भयता आदी गुणवैशिष्ट्यांनी नेमाडेंच्या कादंबऱ्यानी महाकाव्याशी समकक्षता साधली आहे. कादंबरी ही ज्ञानशाखा असावी काय? याचं उत्तर म्हणजे नेमाडेंच्या कादंबऱ्या होय.

कवी नेमाडे : 'मेलडी' ते 'देखणी'

नेमाडेंचा मूळ पींड हा कवीचा आहे. महाविद्यायीन जीवनात त्यांनी कविता लेखन केलेले आहे. त्यांच्या काही चांगल्या कविता सुरुवातीला पुण्याचा फर्ग्युसन कॉलेजच्या नियतकालिकात प्रकाशित झाल्या होत्या. नेमाडेंच्या वाङ्मयीन कारकिर्दीची सुरुवात फेब्रुवारी १९५६ पासून झाल्याचे दिसते. निळे मनोरे ही त्यांची पहिली कविता फर्ग्युसन कॉलेजच्या नियतकालिकात प्रथम प्रकाशित झाली होती. नंतर १९५८ ते १९६८ च्या दरम्यान छंद, रूप, अथर्व, रहस्यरंजन, प्रतिष्ठान, मराठवाडा, युगवाणी अशा महत्त्वाच्या वाङ्मयीन नियतकालिकातून नेमाडेंच्या कविता प्रकाशित झाल्या. नेमाडेंचे काव्यलेखन संख्येने मात्र अत्यंत कमी आहे. पहिल्या सतरा कविता नेमाडेंनीच सुरू केलेल्या वाचा प्रकाशनातर्फे १९७० मध्ये 'मेलडी' या कविता संग्रहात प्रकाशित झाल्या. ह्या कविता लघुपत्रिकाचळवळीतल्या जोशात लिहिलेल्या आहेत. लघुपत्रिका चळवळीची सैद्धांतिक पायाभरणी करणारे चळवळे म्हणून, अशोक शहाणे आणि भालचंद्र नेमाडे हे दोन मुख्य लेखक मानले जातात. लघुपत्रिका चळवळीत मर्ढेकरकुलोत्पन्न कवींनी मोठ्याप्रमाणावर सैरभैर काव्यनिर्मिती केली. लघुपत्रिकावाल्यांचा भर संत आणि देशी परंपरेवरच होता असे म्हणत म्हणत, ह्या कवींनी युरोपियन आशयमूल्यांचा आणि रचनाप्रकारांचाच जास्त आविष्कार केला. कवितेला अनुकूल नसलेल्या मुक्तछंद कवितेच्याच निर्मितीत हे सारे कवी रमले. नेमाडेंची कविता ही धामधुमीतून स्वतःचे स्वतंत्र देशीय अस्तित्व निर्माण करणारी ठरली, ही एक महत्त्वाचीच घटना

अनुक्रमणिका

मानली पाहिजे. सन १९६८ ते १९८७ पर्यंत नेमाडेंनी बव्हंशी तर्काधिष्ठित गद्य व सामाजिक वगैरे उद्योग केल्यामुळे कविताच त्यांना सोडून गेली होती. परंतु पुन्हा वीस वर्षांच्या खाड्यानंतर सन १९८७ ते १९९१ पर्यंतच्या काळातील एकूण २० कविता नेमाडेंनी गोव्याच्या वास्तव्यात लिहिल्या. कोकणातील पोर्तुगीज संपर्कातून त्या निर्माण झाल्यामुळे तिथल्याच संस्कृतीत महत्त्वाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या 'देखणी' या शीर्षकाने, ह्या कवितासंग्रहात समाविष्ट केल्या. कवितेच्या भाषेच्या अंमली द्रव्याखाली आपले सगळे व्यक्तिमत्त्व अटीतटीने उभे करून नेमाडेंनी ह्या कविता लिहिल्या आहेत. एकूण दोन्ही कवितासंग्रहात ३७ आणि सहासात अन्यत्र प्रकाशित झालेल्या मिळून, एकूण ४४ कवितांचे नेमाडे धनी आहेत. जीवन आणि साहित्याच्या संबंध केंद्र मानून आणि प्रखर वास्तववादी आणि देशीयवादी दृष्टिकोन समोर ठेवूनच नेमाडेंनी काव्यलेखन केल्यामुळे, आधुनिक मराठी नवकाव्यात नेमाडेंच्या कविता वैशिष्ट्यपूर्ण ठरल्या आहेत. नेमाडे जगण्याचे मूल्य सर्वोच्च मानतात. तोच मूल्यविचार आपल्या देशीय भाषिक परंपरेत नेमाडेंनी कवितेतून मांडला. दुःख आणि कारुण्य ह्या दोन्ही मानवी जाणिवा नेमाडेंच्या कवितेतून प्रकटल्या. नेमाडेंच्या कवितेत भाषिक आणि रचनात्मक अंगाने काही चांगले प्रयोग आढळतात. त्यांची कविता ही आधुनिक आणि मर्ढेकरी कवितेपासून फटकून वागताना दिसत असली तरी काहीशी ती दुरान्वयाने नातेही सांगते. आपल्या देशी संत आणि लोकपंरपरेशी मात्र नाळ जोडतांना दिसते.

सांगवीत रांगलो खान्देशानं फांदा मारला सत्राव्या वर्षी दिला खांदा
जाळलो पुण्यात साही वर्षं उण्यत गेलो बापपुण्याई खरचत दरमहा केला वांधा.

'आत्मचरित्र' या कवितेत नेमाडेंनी आपल्या छत्तीस वर्षांचा जीवनालेख मांडला आहे, तो मोठा लक्षणीय आहे. मुंबई पासून सुरू केलेली ही भटकंती. शेवटी जीवाची मुंबई करत साठा उत्तरी अडलो आणि एकच जागा उरलीय म्हणून ह्या आत्मचरित्राच्या फंदात पडलो, अशी प्रामाणिक कबुलीही नेमाडेंनी दिलेली आहे. नेमाडे लेखकाची नैतिकता मानणारे लेखक आहेत. परंतु कवीची नैतिकता ही सैल असते, असे त्यांना वाटते. त्यांच्या ह्या भूमिकेशी तसे सहमत होता येत नाही. कारण कवी आणि लेखक अशा लेखकाच्या दुभंगलेल्या प्रतिमा मानून कवींना अधिक स्वातंत्र्य देता येत नाही. कारण खुद्द नेमाड्यांचीच कविता हा त्यांच्या नैतिक मूल्यविचारांचाच एक अपूर्व आविष्कार आहे.

समीक्षक नेमाडे : 'टीकास्वयंवर' ते 'देशीयवाद'

नेमाडे कोसलाच्याही आधी समीक्षा लिहीत होते. त्यांचा पहिला सडेतोड समीक्षा लेख निरस्तपादपे देशे श्री. के. क्षीरसागर यांचा वादसंवाद हा रहस्यरंजनच्या ऑक्टोबर १९६१ च्या अंकात प्रसिद्ध झाला. टीकाविवेककार श्री. के. क्षीरसागरांचे समीक्षक म्हणून वाङ्मयीन अस्तित्वच नेमाड्यांनी ह्या लेखामुळे धोक्यात आणले. वयाच्या तेविसाव्या वर्षाच्या एका पोरसवदा लेखकाने अचानक मराठीतल्या दिग्गज असलेल्या समीक्षकालाच उखडावे, ही बाब नव्या पिढीसाठी चिंतनीय ठरली. लघुपत्रिका चळवळीचाही तो नुकताच प्रारंभ होता, लघुपत्रिकावाल्यांनी अनेक वाङ्यीन महात्मे पहिल्या चेंडूतच बाद करण्याचा जोरदार सुरू केला. नेमाडेंनी दुसरासमीक्षेचा बॉंब टाकला तो आपल्याच वाचा या लघुपत्रिकेत हल्ली लेखकाचा लेखकराव होतो तो का? या समीक्षा लेखातून. त्यांनी मराठीतील लहानमोठ्या सर्वच समाकालीन लेखकांच्या ननैतिक वाङ्मयीन व्यवहारांवर परखडपणे टीका केली. ती अनेकांना खान्देशी मिरचीसारखी झोंबली. एकूण १९६० ते १९९० पर्यंतच्या तीस वर्षांत नेमाडेंनी जे काही स्फुट रूपात टीकालेखन केले, त्याचा गंभीर परिणाम विसाव्या शतकातील साठोत्तरी मराठी वाङ्मयीन संस्कृतीवर झाला आणि नेमाडेंया मूल्य आणि शैली प्रभावात पुढे टीकालेखनाचीही एक मोठी पंरपरा मराठीत निर्माण झाली. इतिहासाचार्य राजवाड्यांच्या कठोर आणि आक्रमक शैलीचा जोरदार प्रभाव नेमाडेंच्या टीकाशैलीवर दिसून येतो. नेमाडेंच्या टीकालेखनाचीही शैली ही देशीय भाषाशैलीशीच नाते जोडणारी आहे.

कादंबरीविषयीचा मूल्यविचार, देशीय भाषाविषक मूल्यविचार, साहित्यातील देशीयता, लेखकाची नैतिकता आणि बांधिलकी, लेखकाच्या सांस्कृतिक संवर्धनाचे आणि उत्तरदायित्वाचे विश्लेषण, वारकऱ्यांची शैली चिकित्सा, इंग्रजीचा मराठीवरील प्रभाव, दलित साहित्यविषयक विवादास्पद मते, भारतीयांचे इंग्रजी लेखन, अनुवादित कविता आणि अनुवादकाचे दुभंगलेले व्यक्तिमत्त्व, अशा अनेक विषयोपविषयांसह नेमाडंनी दिलीप चित्रे, अरुण कोलटकर, ना. धों. महानोर, नारायण सुर्वे, विंदा करंदीकर, इंदिरा संत, पु. शि. रेग अशा अनेक मोठ्या दिग्गजांवर आणि आपल्या समकालीनांवर परखडपणे टीका लेखन केले. मराठीत समीक्षाही नाही, सौंदर्यशास्त्रही नाही आणि जे समीक्षक आहेत ते शेंबडे आहेत, अशीही टोकदार टीका नेमाडेंनी ह्याच ग्रंथात केलेली आहे. शिवाय प्रसार माध्यमे ही निर्बुद्ध लोकांच्या हाती

असून त्यांना आपल्या कर्तव्याने भान नसल्याचेही नेमाडेंना वाटते. लघुकथा हा आपल्या मराठी केवळ वर्तमानपत्रे आणि मासिकांचे रकाने भरणारा क्षुद्र वाङ्‌मय प्रकार आहे, असे नेमाडेंचे मत प्रसिद्ध आहे. अशी अनेक टोकदार आणि चमत्कृतीजन्य टीकामते प्रचलित आणि प्रसिद्ध असल्यामुळे नेमाडेंचा समीक्षक आणि विचारवंत म्हणून मराठीच्या समीक्षा क्षेत्रातच नव्हे तर संपूर्णच मराठीच्या वाङ्‌मयीन व्यवहारावरही दबदबा आहे. उपयोजित आणि सैद्धांतिक अशा दोन्ही पातळ्यांवर मराठी साहित्याची चौकस आणि चिकित्सक मीमांसा करणारा एक अत्यंत महत्त्वाचा समीक्षा ग्रंथ म्हणून 'टीकास्वयंवर' चा उल्लेख करावा लागतो. आज नेमाडे म्हणजे मराठी साहित्याचा एक 'बाप माणूस' म्हणून मानले जातात.

देशीयवाद : संकल्पना व व्याख्या

देशीयवाद ही एक विचारसरणी आहे. मूल्य संकल्पना आहे. देशीयवाद ही संकल्पना मानववंशशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय असून, तिचा संबंध हा सांस्कृतिक अस्मिता आणि अस्तित्वासाठी आग्रही दृष्टिकोन बाळगणे आणि साक्षात चळवळीतून समाजात आपला सांस्कृतिक आणि अस्मिताविषयक अस्तित्वविचार सिद्ध करणे असा असतो. देशीयवादाची विचारसरणी मांडतांना काही संज्ञांचा वापर केला जातो. देशीयवाद ही मुख्य संकल्पना मानली तर त्यात देशीयतेचा मूल्यविचार केंद्रस्थानी असतो. म्हणून देशीयवाद आणि देशीयता मूल्यविषयक संकल्पना मानायला हव्या. ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मूल्ययुक्त पारिभाषिक शब्दांना स्पष्ट करणाऱ्या संज्ञांचे प्रतिसादनही करणे अगत्याचे ठरते.

देशी-देश्य : वस्तू, कला, साहित्य, संस्कृतीची ओळख आणि अस्तित्व सिद्ध करणारी ही संज्ञा आहे. जसे, खेड्यातली चंची, डोक्यावरचे पागोटे, धोतर, लुगडे, चोळी आदी. अजिंठा चित्रशैली, भारतीय संगीत, आदिवासी कला, रामायण-महाभारत, हिंदुस्थानची बहुसांस्कृतिकता, संस्कृतीची आध्यात्मिक आणि नैतिक बैठक.

देशीपणा देशी-देश्य वस्तू, कला, साहित्य, संस्कृती ह्यात देशीपणा असतो. देशीपणा हीच देश्य असण्याची खूण असते. म्हणून देश्य, देशी आणि देशीपणा ह्या पूरक संज्ञा आहेत. देशीपणा हा स्वाभाविक आणि नैसर्गिक म्हणून ती गुणात्मक संज्ञा नाही. देशीपणा हे एक सर्वसामान्य असे स्वाभाविक आणि नैसर्गिक तत्त्व आहे.

देशीकरण : आपले देश्यत्व, देशीपण कायम ठेवून जेव्हा एखादी संस्कृती परसंस्कृतीच्या मौलिक घटकांना आपल्या प्रमाणकांच्या मुशीत जोखून स्वीकारते, तेव्हा देशीकरणाची प्रक्रिया स्वाभाविकपणे पार पडत असते. अर्थात आपले सत्त्व शाबूत ठेवूनच ही प्रक्रिया पूर्णत्वास जाते.

देशीयता ही गुणात्मक संकल्पना आहे. कारण देशीयतेत मूल्यव्यूह अध्याहृद असतो. देशीयतेचा मूल्यव्यूह हा बहुमुखी आणि बहुगुणी असतो. त्यात भूमी, भौगोलिकता, मातृभाषा, संस्कृती, परंपरा, लोकजीवन आदींचा एकत्रितपणे विचार अपेक्षित असतो.

देशीवाद आणि देशीयवाद देशी या शब्दाशी वाद जोडला की देशीवाद होतो. केवळ देशी असणे आणि देशीपणाचा वाद निर्माण करणे, हा अर्थ संदिग्ध आहे. म्हणूनच नेटिव्हिजम-देशीवाद या शब्दांचा वापर नेमाडेंनीही टाळला असावा. देशीयतेचा आग्रही मूल्यविचार मांडणारी संकल्पना म्हणजे देशीयवाद होय, असा अर्थ अधिक संयुक्तिक आहे. म्हणून प्रस्तुत लेखकाने सर्वत्र देशीयवाद ही संकल्पना वापरली आहे. इतरांचे संदर्भ मात्र तसेच कायम ठेवले आहेत. देशी या शब्दाला Country असा इंग्रजी पर्याय असला तरी Native असाही एक पर्याय वापरला जातो. देशीयता या शब्दाला मात्र Nativecity तर देशीपणाला Nativity असा इंग्रजी पर्याय वापरला जातो. देशीवाद या संज्ञेसाठी इंग्रजीत Nativism असा पर्याय वापरण्याचा प्रघात आहे. फादर कामिल बुल्के यांच्या इंग्रजी-हिंदी शब्दकोषात तर Nativism या इंग्रजी शब्दाचा हिंदी पर्याय म्हणून देशीयता असा शब्द दिला आहे. याशिवाय या शब्दाचे, देशीय पक्षपात, सहजज्ञानवाद, सहजवाद, साहजात्य, असेही पर्याय दिले आहेत. Nativity या शब्दाला मात्र जन्म, जन्मोत्सव, उत्पत्ती, उद्‌भव असे पर्याय असून त्यात **देशीयता** हा शब्द पर्यायी म्हणून दिलेला नाही. या शब्द मात्र शब्दकोषांत आढळत नाही.

Native या शब्दाला सहज, स्वाभाविक, सहजता, जन्मजात, जन्म, मूल निवासी, देशी (य), देशज, प्राकृत, प्राकृतिक, देशी, आदिवासी, जन्मभूमी, स्वदेश, जन्मस्थान, सहज बुद्धी असे पर्याय दिलेले आहेत. बुल्के यांनी देशी, देशीय, जन्मभूमी, जन्म, स्वदेश असे महत्त्वाचे अर्थ Native या शब्दाचे दिलेले आहे. नेटिव म्हणजे केवळ मूळनिवासी नाहीत तर त्यांच्यासह अनेक त्या त्या भूमीवर जन्मलेलेही, असा अर्थ हिंदुस्थालातल्या नेटिव देशी लोकांच्या संदर्भात घ्यावा लागतो. म्हूनच देशीवाद शब्दाचा Nativism इंग्रजी पर्याय हिंदुस्थानी देशीवाद या शब्दाला पुरेसा समर्पक ठरत नाही. १९ व्या शतकात उत्तर अमेरिकेत ज्या तिथल्या मूळ रहिवाशांनी

आपल्या अस्तित्वासाठी चळवळी उभ्या केल्या होत्या, त्यांच्या आधारे राल्फ लिंटनने सन १९४० नंतर त्यांचा आढावा घेण्यासाठी Nativistic Movement वर एक लेख लिहिला होता. तेव्हापासून Nativism असा इंग्रजी शब्द देशीवादाला पर्याय म्हणून वापरला जाऊ लागला. उत्तर अमेरिकेतून सिद्ध झालेली नेटिव्हिजम ही संज्ञा तिथल्या मूळ रहिवाशांच्या देशीवादी चळवळींचे प्रतिनिधत्व करते. तिथे निग्रो विरुद्ध गोरे असा सरळ सरळ संघर्ष होता आणि नेटिव ही काळ्यांना दिली जाणारी शीवी होती.

नेटिव या शब्दाचा ऑक्सफर्ड शब्दकोषात, ''नेटिव एखाद्या देशाचा मुळचा वा नेहमीचा रहिवासी, जो परकीय आणि पददेशी लोकांपासून वेगळा समजला जातो, हल्ली विशेषतः बिनयुरोपीय आणि कमसंस्कृत अथवा असंस्कृत रानटी वंशाचा, काळसर (कलर्ड) किंवा काळा माणूस. असा जो अर्थ दिला आहे तो, मूळ रहिवाशांना युरोपात आणि जगातही रानटी, आदिवासी, मागासलेले, काळे म्हणून हिणवण्यासाठी आहे. हा वंशवादी अर्थ भारतातल्या देशी लोकांना लागू होणार नाही. कारण भारतात मूळ रहिवाशी कोण? हा विवाद्य प्रश्न मानला जातो. खरे तर हिंदुस्थानात शेकडो धर्म, वंश, भाषा, संस्कृती, परंपरा असलेले करोडो लोक गुण्यागोविंदाने राहतात. हिंदुस्थानची देशीय परंपरा आणि संस्कृती संपूर्ण जगाच्या पाठीवर कुठेही आढळणार नाही. अशा विशाल संस्कृतीचे आणि हिंदुस्थानातल्या हिंदुस्थान्यांचे-हिंदूचे (हिंदुस्थानात राहणारे सर्व जातीधर्माचे लोक) सर्वसमावेशक रूप व्यक्त करण्यासाठी म्हणूनच नेटिव हा शब्द जसा अपूरा ठरतो, तसेच नेटिव्हिजम हा शब्दही हिंदुस्थानी देशीयवादाचे स्वरूप स्पष्ट करण्यास समर्पक ठरत नाही. तेव्हा हिंदुस्थानी देशीयवादाची मूल्यव्यवस्था निर्देशित करण्यासाठी जी संज्ञावली-देशीयवाद, देशीवाद, देशीयता, देशी-देश्य, देशीकरण, देशीपणा आर्दीसाठी इंग्रजीत वापरायची असल्यास, ह्याच हिंदुस्थानी संज्ञांना इंग्रजीत लिहिले पाहिजे आणि इंग्रजांनाही आपल्याच संज्ञा वापरण्यास भाग पाडले पाहिजे. जसे, देशीयवाद या शब्दासाठी Deshiyawad असाच इंग्रजी पर्याय वापरला पाहिजे. हाच खरेतर देशीयतेचा अस्सल बाणा असतो. त्यातूनच देशीयवादी आग्रही भूमिका पुढे येते. ह्याच पद्धतीच्या विचाराला देशीयवादी म्हणता येईल. देशीयवादात अस्मिता आणि अस्तित्वाचा आग्रही दृष्टिकोन बाळगला जातो. देशीयवाद हा अशाच आग्रही अंगाने सिद्ध करावा लागतो. देशीयता ही जशी स्वयंसिद्ध संकल्पना असते तशी देशीयवाद ही स्वयंसिद्ध संकल्पना नाही. ती आग्रही दृष्टिकोनातून, चळवळींतून, अस्मिता-अस्तित्वाच्या आत्मतेजातून वर येणारी विचार प्रणाली असते. ती सिद्ध झाल्याशिवाय तिला मूल्यविचारांचे रूप प्राप्त होत नाही. मध्ययुगीन स्पेन साहित्यात Picaro म्हणजे गाव सोडून भौतिक सुखांसाठी, नीतिनियम धाब्यावर बसवून खोटं, लांडीलबाडी करून, फसवणूक करून भटकंती करीत जगणारा, असा अर्थ असला, तरी अठराव्या शतकातील जर्मन समीक्षकांनी Native व Picaro या संज्ञा साहित्यात वापरल्या. त्या Navtive ला रोमँटिक ठरविले गेले तर Picaro ला क्लासिकल ठरविले गेले. वसाहतवादी वृत्तीने Picaro ला युरोपचे मॉडेल ठरविले. एकोणिकसाव्या शतकात Navtive या संज्ञेचे Nativism च्या कल्पनाप्रणालीत रूपांतर झाले. पुढे इटलीत या चळवळींना राष्ट्रवादी म्हटले तर आयर्लंडमधील साहित्यिक चळवळींना पुनरुज्जीवनवादी ठरविले. नेटिव या शब्दाचा नेटिव्हिजम या कल्पना प्रणाली पर्यंतचा प्रवास हा असा आहे. भारतीय साहित्यात मात्र देशीयवादाची संकल्पना ही विसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकांत चर्चेत आल्याचे दिसते. तर मराठीत मात्र ही संकल्पना नेमाडेंनी साठोत्तरी मराठी साहित्यविश्वात चर्चेतून-टीकालेखांतून-भाषणांमधून रुजवली आहे. त्यानंतर भारतभर देशीभाषा साहित्यांत देशीयवादाची संकल्पना रुढ झाली. आजवर अनेक चर्चासत्रे, ही संकल्पना नीट समजून घेण्यासाठी गल्लीपासून दिल्ली-नागपूरपर्यंत आयोजित केली गेली. परंतु अनेक विद्वानांनी देशीवादाचा वैचारिक गोंधळच निर्माण करून ठेवला. विशेषतः संघटित मूलतत्त्ववादी, सनातनी राष्ट्रवादी, परिवर्तनवादी आणि पुरोगाम्यांनीही देशीयवादाची मूळ भूमिका समजून न घेता, देशीयवादाला संघटितपणे आणि जाणीवपूर्वक विरोध केला. कार्हीनी नेमाडेंना जातीयवादी-फॅसिस्टही ठरविले. आंदोलने आणि धमक्याही झाल्या. सहिष्णुता आणि असहिष्णुतेचाही जोरदार आखाडा राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रांत लढवला गेला. खरंतर देशीयता किंवा देशीयवाद ही जीवनात प्रत्यक्षात आचरणात आणण्याचीच बाब आहे. देशीयताच आपल्या देशाची आणि संस्कृतीची ओळख जगाला करून देणारी नैसर्गिक आणि स्वाभाविक स्वयंसिद्ध बाब आहे. साहित्याचे मूल्यमापन करणारे देशीयता हे एक मौलिक तत्त्व वाटल्यास मानता येईल. कोणत्याही देशाचे साहित्य देशीयतेच्याच परिघात निर्माण होत असते. देशीयतेमुळेच साहित्याला आपली स्वतःची भूमी मिळत असते. नेमाडेंनी 'टीकास्वयंवर' मध्येही देशीवादाबाबतची भूमिका स्पष्टपणे मांडलेली आहे.

देशयता हे मानवी अस्तित्व सिद्ध करणारे अत्यंत मौलिक असे तत्त्व आहे. भालचंद्र नेमाडे यांनी देशीयतेची संकल्पना स्पष्ट केली आहे. ''देशी असणे म्हणजे एकंदर भूमितत्त्वाचे

भान, त्यातील सर्व जाती, वंशांचे समूह, संप्रदाय, धर्म, परंपरा, स्थकालाचे उभे आडवे छेद या सर्वांसकट येणारे एकजिनसीपणाचे भान होय.'' अर्थातच देशीपणाचे हे भान साहित्यिकाला असावे लागते. जगात प्रसिद्ध असणारे सर्वच साहित्य हे त्यातल्या देशीय मूल्यांच्या भक्कम अधिष्ठानामुळेच जगभर प्रसिद्ध असते. ''देशीपणा ही अत्यंत स्वयंभू, झाडाझुडुपांसारखी सोशिकपणे आपापल्या जागेवर उगवणारी व टिकून राहणारी संकल्पना आहे.'' आपले देशीपण टिकवून ते समृद्ध करण्याची जबाबदारी ही साहित्यिकांची असते. भारत हा बहुकेंद्री देश असल्यामुळे इथले भूमिसातत्यही बहुअक्षी आहे. इथे अनेक धर्म, जाती, पंथ, संप्रदाय आहेत. ह्या सर्वांनी सामावून घेणारे देशीपण, भूमी आणि तिथल्या वैविध्यपूर्ण जीवन जाणिवांनी सिद्ध होते. वैश्विकता ही देशीपणाच्या विरोधी संकल्पना नसून भिन्न भिन्न ठिकाणच्या देशीय शैलींचा भिन्न भिन्न स्थितीमध्ये आस्वाद घेणे देशीयतेला विरोध ठरत नाही. परंतु आपली देशीय प्रमाणके मजबूत ठेवूनच परकीय मूल्यांचा विचार करायला हवा. एकूणच आधुनिक मराठी साहित्याची तपासणी ह्या अंगाने करण्याची आज गरज आहे.

आजचं युग हे ग्लोबल व्हिलेज बनलेलं आहे. ह्या युगाच्याही काही अनुत्तरित समस्या सबंध जगालाच भेडसावत आहेत. दहशतवाद आणि धर्मांधतेची पाळेमुळे जमिनीत खोलवर रुजलेली आहेत. केवळ आपल्याच देशात नव्हे तर सबंध जग एका अमानुष आणि भयावह चक्रव्युहात सापडलं आहे. देशीयतेचं मूल्य जपतांना कलावंतांना ग्लोबल व्हिलेजमधल्या लहानशा वर्तुळात जगणाऱ्या माणसांचा विचार करावा लागणार आहे. सोबतच सर्वहारा माणसाच्या जीवनातले जगण्याचे प्रश्न सुटलेले नाहीत. जग संगणक-महाजालाच्या सूक्ष्म धाग्यांनी बांधलं जावून सामान्य माणसाच्या जगण्याचे प्रश्नच आपल्या महाजालातून गायब करीत आहे. काहीशा विकासाच्या आणि काहीशा नागरिकरणाच्या जगात जागतिकीकरणातले जगण्याचे प्रश्न सोडविण्याच्या चिंतेतच सरकार आणि समाज गुंतलेला आहे. देशीयतेचा विचार आज करण्याची अत्यंत गरज आहे, असे लेखकांना वाटायला हवे. कारण सांस्कृतिक आणि भाषिक संक्रमणांना आणि आक्रमणांना केवळ देशीयतेच्या सकारात्मक स्वीकारातूनच उत्तरं देता येतात. ''देशी असणे ही कुठल्याही साहित्यकृतीचीही प्राथमिक गरज आहे. सर्व कलांना मिळणारा वैश्विक प्रतिसाद हा मानव जातीच्या मूलभूत देशीपणाची साक्ष समजला जातो.'' एकूणच देशीयता हे सहित्याचे मूलतत्त्व आहे. मनुष्य ज्या समाजात, संस्कृतीत, मूल्य व्यवस्थेत आणि भौगोलिक पर्यावरणात जगत असतो-त्याच वातावरणात आकार घेणाऱ्या सांस्कृतिक मूल्यांना अखेर साहित्यात महत्त्व असते. परंतु आधुनिक मराठी साहित्यातील पहिल्या दीडशे वर्षांच्या रंजनवादी कृत्रिम साहित्यात देशीयतेच्या मूल्यांचा अभाव होता. म्हणूनच पुढे देशीयतेच्या मूल्याची नव्याने चर्चा करणे भाग पडल्याचे दिसते.

तात्पर्य, साठोत्तरी मराठी साहित्यातील एक द्रष्टा लेखक म्हणून आज ज्ञानपीठकार डॉ. भालचंद्र नेमाडेंचा जागतिक स्तरावरही विचार केला जातो. गेल्या पन्नास वर्षांपासून व्रतस्थपणे कविता लेखन, समीक्षा लेखन, कादंबरी लेखन, साहित्याची-भाषा-शैली विषयक लेखन करीत असतांनाच, नेमाडेंना राष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक आणि वाङ्मयीन क्षेत्रातील दिग्गज आणि तज्ज्ञ, विद्वान मानले जाते. जर्नल ऑफ कन्टेम्पररी थॉट-इलिनॉय या त्रैमासिकाच्या विंटर २००० च्या अंकात तसेच वर्ल्ड लिटरेचर टुडे या त्रैमासिकाच्या १९९८ च्या समर अंकात जॉन ऑलिव्हर पेरी या समीक्षकाने गेल्या पन्नास वर्षांत भारतातून नवं वैचारिक काय आलं आहे याचा निर्देश करतांना, देशीवाद आणि भालचंद्र नेमाडे एवढाच सुस्पष्ट निर्देश केलेला आहे. मराठी साहित्यविश्वात वाङ्मयीन क्रांती करणारा समकालीन लेखक म्हणून एकविसाव्या शतकातही डॉ. भालचंद्र नेमाडेंचा विचार आज सर्वत्र केला जातो...

संदर्भ :

१. 'कोसला' 'बिढार' 'जरिला' 'हूल' 'झूल' 'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ' (कादंबरी).

२. 'टीकास्वयंवर' व इतरही टीका, भाषिक लेखन, संत तुकारामादी लेखन.

३. अत्यंत निचेच्या गोष्टी/(मराठवाडा दिवाळी, १९७३, कथासदरात प्रकाशित) कादंबरीतलं गाळलेलं की टाळलेलं प्रकरण असावं की काय? परंतु लघुकथा हा क्षुद्र वाङ्मय प्रकार हाताळल्यावरच गुरुर्जींनी, मराठी लघुकथा हा क्षुद्र वाङ्मय प्रकार आहे, हे विधान काळजीपूर्वक केलं असावं.

४. भालचंद्र नेमाडे यांची कादंबरी / किशोर सानप, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९६

५. भालचंद्र नेमाडे यांची कादंबरी / किशोर सानप, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००३

६. भालचंद्र नेमाडे यांची कादंबरी / किशोर सानप, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००५

७. हिंदू:जगण्याची समृद्ध अडगळ, अनुष्टुभ्, मुंबई, मार्च-एप्रिल २०११.

८. श्री रंगनाथ पठारे, जागतिकीकरण आणि देशीवाद, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००३

९. भालचंद्र नेमाडे यांच्यावर आजवर नियतकालिकातून प्रकाशित झालेले प्रस्तुत लेखकाचे विविध लेख, नोंदी, टिपणं आदीही.

। डॉ. किशोर सानप

कमला नेहरू शाळेजवळ,
रामनगर, वर्धा - ४४२००१
भ्रमणभाष : ९३२६८८०५२३, ९४२२८९४२०५

अनुक्रमणिका



भालचंद्र नेमाडे

इंद्रजित भालेराव

■

महाविद्यालयीन जीवनात वसमतला असताना केशव बा. वसेकर यांनी भालचंद्र नेमाडे यांची 'बिढार' माझ्याकडून बळे बळे वाचून घेतली तेव्हा वाटलं होतें भालचंद्र नेमाडे हे भलतंच बोअर प्रकरण आहे. परंतु पुढे वाचनाचं वळण बदलल्यानं म्हणजे सुधारल्यानं नेमाडे यांची 'कोसला' प्रचंड आवडली. आज माझी मालकीची पुस्तकं अमाप आहेत. परंतु पहिल्यांदा पैसे खर्च करून स्वतःच्या नावाची पावती फाडून विकत घेतलेलं पुस्तक म्हणजे 'कोसला' कोसला आवडण्याचं त्या वयातलं कारण भलतंच वेगळं होतं. ते म्हणजे त्यात पात्र म्हणून आलेले महानुभावाचे उल्लेख आणि त्या पाठोपाठ आवडला होता तो म्हणजे बापाविषयी लिहिलेली विरोधी मजकूर. तेव्हाची वाङ्मयीन समज अशी होती की 'कोसल्या'तला मी म्हणजे शंभर टक्के लेखक. तो शंभरातील नव्याण्णवापैकीच एक आहे हे नंतर कळलं.

'कोसला' वाचून महाविद्यालयीन जीवनात भालचंद्र नेमाडे या नावाविषयी भलतीच उत्सुकता निर्माण झाली होती. म्हणून इकडून तिकडून त्यांच्याविषयी जी माहिती गोळा केली होती, ती भलतीच विचित्र होती. हा माणूस फारच विक्षिप्त आहे. विद्यापीठात इंग्रजी शिकवतो. त्यांची केबिन कायम बंद असते. तो बिड्या म्हणजे अक्षरशः छोटामजूर ओढतो. केबिनभर धूर पसरलेला असता छताकडं विचित्र नजरेनं पाहत बसलेला असतो. कुणी गेलं तर त्याला हाकलून देतो किंवा काहीतरी विक्षिप्त बोलून पाणउतारा करतो. अंथरुण-पांघरुणाची वळकटी तिथेच असते. रात्रभर एकटाच कधी कधी केबिनमध्ये भुतासारखा झोपून राहतो. असं काही काही ऐकलं होतं. हे कुणी सांगितलं, कुणी पाहिलं याचा शोध मला अजून लागलेला नाही. परंतु एवढं सगळं ऐकूनही मी त्यांना पहिल्यांदा भेटलो, तो अनुभव भारावून जाण्यासारखाच होता.

विद्यापीठात शिकायला गेलो तेव्हा म्हटलं एकदा पाहावंच या माणसाला. त्या आधी विद्यापीठात फिरताना एखादा विक्षिप्त-विचित्र दिसणारा माणूस पाहिला की वाटायचं हेच असतील नेमाडे. काही दिवस नुसत्याच इंग्रजी विभागातील त्यांच्या केबिनसमोरुन चकरा मारल्या. दार लोटावं म्हणून उभा राहायचो आणि दराला हात लावताच काळीज धडधडाचं. हात परत घ्यायचो, कुणी पाहिलं नाही असं पाहून तसाच पुढं निघून जायचो. वाटायचं हाकलून दिलं तर काय खरं आहे? पण एके दिवशी धीर करून आत गेलोच. दार लोटावं लागलं नाही. कारण अर्ध उघडंच होतं.

''सर, आत येऊ का?''

''हं'' उरात धडकी! आता काय बोलावं?

''सर मी इंद्रजित भालेराव, इथं मराठीत एम.ए. करायला आलो. तुमची सगळी पुस्तकं वाचलीत. तुमचं आवडतं

लीळाचरित्रही मला पाठ आहे. सर मी महानुभाव आहे. तुम्हाला सहज भेटायला आलो. वेळ आहे का तास आहे आता?''

''बैस'' मी बसलो. कुठलीतरी फाईल चाळीत सर बोलू लागले.

''कोणतं गाव तुझं?''

''रिधोरा, सर, परभणी जिल्ह्यात आहे.''

''प्रवेश, वसतिगृह सगळं व्यवस्थित झालं का?''

''हो सर!''

''जेवणाची काय व्यवस्था केलीस?''

''मेस सर.''

''तुला मेसची सवय आधीची आहे?''

''नाही सर.''

''तुम्हा गावाकडून आलेल्या मुलांना मेसचं जेवण जमणार नाही. काहीतरी वेगळी व्यवस्था करावी, मित्राच्या रूमवर वगैरे बाई लावून. नाहीतर आजारातच सगळा वेळ जातो.''

अशा आणखी कितीतरी गोष्ट बोललोत. आमच्या नेमक्या प्रश्नाला हात घालून सरांनी जे मायपण दिलं त्यामुळे मनावरचं दडपण कायमचं निघून गेलं. पण त्यांच्या वाङ्मयीन मतांचा मनावरचा धाक अजूनही आहे.

मग नेहमीच सरांकडे जाऊ लागलो. काही विचारू लागलो. काही सांगू लागलो. सरांना वाचायला पुस्तकं मागू लागलो. केबिनच्या कोपऱ्यात सरांच्या खुर्चीच्या पाठीमागे एक लहानसं टेबल होतं. त्यावर अनेक पुस्तकाचे ढीग रचून ठेवलेले होते. सर खुर्ची सरकवून वाट करून देत व मलाच पुस्तक निवडून घ्यायला सांगत. तेव्हा वाटे वाघाच्या गुहेत या उंदरानं नुसता प्रवेशच मिळवला नाही तर तो वाघाच्या अंगाखांद्यावर खेळू लागलाय.

अजूनपर्यंत सरांना, मी कविता लिहितो असं सांगायचं धाडस झालं नव्हतं. माझ्या एका मित्रानं सरांना वही दाखवली होती. त्याला सरांनी तू कविता लिहू नकोस असं स्पष्ट सांगितलं होतं. तर एका संग्रह काढणाऱ्या मित्राला आणखी दहा वर्षं पुस्तक काढू नकोस असं सांगितलं होतं. हे सगळं ऐकून माझं काळीच दडपून जात होतं. आधीच्या दंतकथा विरता विरता नव्याच दंतकथा तयार होत होत्या. पण इथंही आश्चर्य घडलं.

एके दिवशी सर इंग्रजी विभागाचा जिना उतरून खाली येत होते आणि मी ह्युमॅनिटीज बिल्डिंगच्या प्रवेशद्वारातून मराठी विभागाकडं चाललो होतो. मी सरांना नमस्कार केला तर उभं राहून सर म्हणाले,

''आत्ताच 'कवितारती'चा अंक आलाय. त्यातल्या तुझ्या कविता वाचल्या चांगल्या आहेत,'' आणि सर निघून गेले. त्यांच्याकडून मिळालेली अनपेक्षित प्रतिक्रिया ऐकून मी खूपच आनंदी झालो. मराठीचे तास करताना कायम सरांना कवितेतलं काय आवडलं असावं याचा विचार करू लागलो. कारण 'कवितारती'मध्ये आलेल्या त्या कविता म्हणजे 'पीकपाणी'तले पहिले सहा बापावरचे अभंग. नेमाडेसर तर बाप संस्कृतीच्या विरोधातले आणि मी तर त्या अभंगात बापाला देव केलेलं. मग सरांना कसं काय आवडलं? अर्थात हा विचार तेव्हाचा, जेव्हा लेखकाला त्याच्या कादंबऱ्यातला नायक समजण्याच्या काळातला. काही का असेना पुन्हा एकदा मनावरचं दडपण कमी झाल्यावर सरांना आता कवितेची वही दाखवण्याचा धीर मला झाला. आणि मी सरांना माझी कवितेची वही दाखवली. चार दिवसानंतर भेटायला गेलो तेव्हा त्यांनी वह्या वाचून ठेवल्या होत्या. म्हणाले, ''काही कविता चांगल्या आहेत. काही कविता पुन्हा लिहाव्यात. कविता लिहिली म्हणजे लगेच प्रकाशित करण्याची घाई करू नये. कारण एकदा कविता छापून आली म्हणजे तिच्या विकासाच्या शक्यता संपतात. तेव्हा पुन्हा एकदा फार दिवसानंतर आपणच वाचून पाहाव्यात आणि रीराइट कराव्यात. पुस्तक वगैरे काढण्याची घाई करू नकोस.'' सरांनी ज्या कविता आवडल्या असं सांगितलं होतं त्याच मार्गानं मी माझी कविता पुढं नेली आणि मला माझं आत्मतत्त्व सापडलं.

मी जरी व्यवस्थित वाचन करतोय, असं लक्षात आल्यावर सर मला पुस्तकं सुचवू लागले, पुरवू लागले, चर्चा करायला वेळ देऊ लागले. एकदा तर सरांनी मला पुण्याहून आणलेलं दुर्मीळ असं 'पुणे वर्णन' हे पुस्तक देऊनच टाकलं. म्हणाले, एक प्रत तुझ्यासाठीच आणलीय. घेऊन जा. पुस्तक घेतानाही सरांना माझी आठवण झाली हे पाहून मला आणखी आनंद झाला. इतकंच नाही तर औरंगाबाद सोडून गोव्याला जाताना सरांनी मला त्यांच्या पुस्तकाच्या ढिगाऱ्यातून वाट्टेल ती पुस्तकं निवडून घ्यायला सांगितलं. म्हणाले, ''मी हे एवढं ओझं कुठं नेणार आहे. तुला काय पाहिजे ते घेऊन टाक. बाकीचं मी वाचनालयाला देऊन टाकणार आहे.'' तेव्हाही मला अनेक महत्त्वाची पुस्तकं मिळाली.

अजून मी सरांच्या घरी गेलो नव्हतो. धीरही होत नव्हता.

अनुक्रमणिका

सरांना मूलबाळ काय हे माहीत नव्हतं. सरांचा मुलगा एकदा मेरिटमध्ये आला तेव्हा त्यांना मुलगा असल्याचं आणि तो बारावीला असल्याचं समजलं होतं. 'झूल'चं मुखपृष्ठ ह्याच मुलाचं होतं. सरांना लहान मुलांची चित्रं आवडतात. कारण त्यांनी 'बिढार'च्या दुसऱ्या आवृत्तीवर असंच एक लहान मुलानं काढलेलं गोगलगाईचं चित्र टाकलं आहे. सर विद्यापीठाच्या एलो क्वार्टरमध्ये राहत असत. वसतिगृहातून गावात जाताना आम्ही उत्सुकतेनं तिकडं पाहायचो. खिडकीत किंवा खाली सर दिसतील म्हणून. पण घराजवळ ते कधीच नजरेला पडले नाहीत. एकदा मी आणि श्रीकांत त्यांच्या दुसऱ्या मजल्यावरच्या घरी गेलो होतो. तर त्यांच्या दारावर मराठीत भालचंद्र नेमाडे असं लिहिलेलं आणि दोन स्टीकर चिटकवलेले. एक 'माझी मुलं मराठी शाळेत जातात, तुमची?' आणि दुसरं 'शिव्या द्या, पण मराठीत' दार वाजवलं तर बाईंनी दार काढलं. पहिल्यांदा पाहत होतो. म्हणाल्या सर जेवतायत, बसा. आम्ही बसलो. सर जेवून आले. आम्ही काय बोललो ते तपशीलवार आठवत नाही. पण 'हिंदू' कादंबरीविषयी झालेली चर्चा अजून आठवते. सर म्हणाले, ती कच्च्या स्वरूपात बरी लिहून झालेली आहे. पण पुढं अनेक व्याप मागं लागले. बेकारीच्या आठ महिन्याच्या काळात जे काय लिहिलं तेच. नोकरी लागली की थांबलं सगळं. ग्रेस यांच्या आग्रहावरून म्हणजे ते असं म्हणाले की मी जर 'युगवाणी'च्या दिवाळी अंकाला काहीच दिलं नाही तर घराच्या छतावरून उडी टाकून जीव देईन. मग ती 'हिंदू'ची सुरुवातीची काही पानं फेअर करून पाठवली. ती 'युगवाणी'च्या दिवाळी चौऱ्याहत्तरच्या अंकात छापून आलीत. मग आम्ही विद्यापीठाच्या लायब्ररीत जाऊन 'युगवाणी'चा तो अंक शोधून काढला आणि त्यातली ती 'हिंदू'ची सुरुवात वाचली. तर तेही भलतंच आवडून गेलं. मग हा पत्ता माझ्या अनेक मित्रांना लागला आणि त्यांनी सर्वांनीच जाऊन ती पानं वाचली. पुढं महिनाभर आम्ही याच विषयावर चर्चा करत होतो.

पाहता पाहता एक वर्ष निघून गेलं. माझं एम. ए. चं प्रथमवर्ष संपलं. सुट्ट्या संपून दुसऱ्या वर्षासाठी विद्यापीठात गेलो. सरांना भेटलो तेव्हा त्यांनी निकालाविषयी विचारलं. मला फारच कमी म्हणजे फक्त पन्नास टक्के गुण मिळाले होते. सर म्हणाले, 'हे काही खरं नाही. गुण भरपूर मिळाले पाहिजेत. पोटाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. आणि तुमच्या बुद्धीच्या काय उपयोग मग? काही योग्यता नसलेले कुणीही लफंगे प्राध्यापक होऊन बसतात आणि पिढ्याच्या पिढ्या बरबाद करतात. तेव्हा यावर्षी नीट अभ्यास करावा. वाटल्यास इतर वाचन कमी करावं. सरांचं म्हणणं पटलं आणि खूप अभ्यास केला. दुसऱ्या वर्षी सरांना अपेक्षित असलेले गुण मला मिळाले.

बेगमपुऱ्यात आक्रम हॉटेल आहे. तिथं नेमाडे सर नेहमी बसतात, असं आम्ही ऐकलं म्हणून आम्हीही तिथं जायचो. पण सर कधी दिसले नाहीत एकटे. पण एकदा श्याम मनोहर आणि एकदा उत्तम क्षीरसागर यांच्याबरोबर तिथं पाहिलं. अर्थात सरांनी परिचय करून दिला म्हणूनच हे अमूक आहेत हे समजलं. सरांचं 'टीकास्वयंवर' हे पुस्तक आधी पॉप्युलरवाले काढणार होते. तशी जाहिरातही दहा वर्षांपूर्वीच त्यांनी केली होती. इकडं बाबा भांड यांनीही मराठी कादंबरी या नावानं त्यांची जाहिरात केली होती. दोघांपैकी कुणीतरी बराच मजकूर टाईपसेटही केला होता. त्याच्या कॉप्या सरांच्याकडं आल्या होत्या. सरांनी तो सगळाच सेट रद्द केला आणि पुस्तक छापू नका असं सांगितलं. एकदा मी सरांनी मी न वाचलेल्या त्यांच्या लेखाचा तपशिल विचारला आणि ते कुठं मिळतील ते विचारलं. तर सरांनी त्या सगळ्याच कॉप्या मला देऊन टाकल्या होत्या. मी त्या अजून जपून ठेवलेल्या आहेत. त्यावर सरांनी हातानं पेन्सिलने केलेल दुरुस्त्या आहेत.

पाहता पाहता दुसऱ्या वर्षाचाही निम्मा भाग संपला आणि समजलं की नेमाडेसर विद्यापीठ सोडतायत. कसलीच पूर्वकल्पना नव्हती. सरांनी एकाएकी कसा काय हा निर्णय घेतला ते समजायला मार्ग नाही. कुणी म्हणत विद्यापीठात त्यांना त्रास होत होता. परंतु मला तरी वाटतं सतत भटक्या सरांना बारा वर्ष एकाच ठिकाणी म्हणजे फारच अवघड गेलं असणार. आणि त्यांनी गोव्याची निवड केली असणार. सरांना भेटून विचारलं तर ते खरं होतं. पंधरा-वीस दिवसात सर सगळं सोडणार होते. त्या आधी गोव्याला जाऊन सगळी व्यवस्था करून आले होते.

सरांचा विद्यापीठातला शेवटचा दिवस आठवतो. मी हिंदी विभागाच्या पायऱ्या चढून वर जात होतो आणि सर केबिन बंद करून सील लावत होते. मला गलबलून आलं. परतावं वाटलं पण धीर करून वर आलो. सरांना नमस्कार केला. सरांनी वर पाहिलंच नाही. मी म्हणालो कोणत्या गाडीनं जाणार. एवढंच म्हणाले, ''बाबा भांड आणि मी त्यांच्या स्वतंत्र गाडीनं जाणार. पत्र वगैरे पाठव. तुझा बदलता पत्ताही नेहमी कळवत चल.'' आणि सर निघून गेले. सरांना गलबलून आलं होतं हे मला जाणवलं. कशामुळं ते माहीत नाही. माझ्या निरोपामुळं की चौदा वर्षांच्या सोबती केबिनच्या निरोपामुळं.

सर गोव्याला गेल्यावर फार दिवसांनी मी सरांना पत्र लिहिलं. सरांचं लगेच उत्तर आलं.

''तुझे ७ नोव्हेंबर ८७ चे पत्र मी बडोद्याहून यूजीसी

अनुक्रमणिका

इन्स्टिट्युटमधले शिकवणे आटोपूर इथं आल्यावर १९ तारखेला मिळाले. तुझे एम्. फीलचे काम नीट चालले असेलच. खरे तर पीएच.डी साठीच नोंदणी करून एवढ्यात काम सुरू करायला पाहिजे होते. पण एम्.फीलही वाईट नाही. मात्र नंतर तातडीने पीएच.डी. ची सुरुवात करून टाकावी. नोकरीची फारशी काळजी करू नये. केव्हातरी मिळेलच.

निदान पत्ता बदलल्यावर तरी जरूर कळवत जावा कारण अचानक गरज वाटते तेव्हा हाताशी पत्ता असला पाहिजे. कविता लिहून ठेवत जाव्या. पुढे केव्हातरी आपल्याला स्वतःचा सूर सापडतो. त्यानंतर त्यांचे पुनर्लेखन करावेसे वाटते. प्रसिद्ध झाल्यावर ही शक्यता राहत नाही. म्हणून शक्यतो प्रसिद्ध करणे तूर्त टाळावे.

'साहित्याची भाषा' हे इंट्रोडक्टरी पुस्तक आहे. पुढे (?) शैलीविचार प्रसिद्ध करून त्यात सर्व लेख फुले इ. सर्वांच्या शैलीवर सलग येतीलच.

इकडे सर्व काही उत्तम आहे. मात्र मायेची माणसे तिकडे राहिली एवढेच वाईट वाटते. हाही आयुष्याचाच एक भाग. सर्व मित्रास स. न.

आपला,

भालचंद्र नेमाडे

गोव्यात गेल्यावर सरांची भेट दुर्मीळ झाली. मध्येच एकदा पैठण गेटवर सर स्कूटरवर दिसले. स्कूटर बाजूला घेऊन बोलले. विचारपूस केली. दरम्यान, आकाशवाणीवर चंद्रकांत पाटलांनी घेतलेली त्यांची मुलाखत ऐकायला मिळाली. त्यात इतर अनेक गोष्टींबरोबर सर कविताही लिहीत आहेत, ते समजले तेव्हा मी हरखून गेलो. 'कवितारती'नेही नेमाडेंच्या नवीन कविता छापणार अशी जाहिरात केली. पण त्या आल्याच नाहीत. त्यांच्या कविता एकदम 'मेलडी'तील कवितांसह निघालेल्या त्यांच्या 'देखणी' या कवितासंग्रहात एकदाच वाचायला मिळाल्या. सध्या हा कवितासंग्रह म्हणजे माझ्यासाठी एक आनंदाचा ठेवा झाला आहे.

माझ्या 'पीकपाणी' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला तेव्हा त्यांना मी तो मुद्दाम पाठवून दिला. त्यावर सरांचं सविस्तर पत्रं आलं.

३० ऑगस्ट ८९

प्रिय,
रा. इंद्रजित

तुझे ६ ऑगस्टेच पत्र आणि सोबत 'पीकपाणी' हा संग्रह मिळाला. कविता सर्वच आवडल्या. कव्हर उत्कृष्ट आहे. मात्र कव्हरवरची अक्षरे बरोबर नाहीत. वरचा हिरवा पट्टाही अनाठायी आहे. असो. कविता बाहेर आल्या हे बरेच झाले. परंतु ही सुरुवात समजावी. बहुतेक कवीचा पहिला संग्रह हा शेवट ठरतो. तुझी भाषा अस्सल असल्याने तुला ती भीती नाही. परंतु हीच भाषा फार दिवस म्हणजे फार विस्तृत अनुभवासाठी उपयुक्त ठरणारी नाही. नामदेवापासून चालत आलेली भाषा आत्मसात केल्याशिवाय काही खरे नाही म्हणून भाषेचा विस्तार करणे आवश्यक आहे. शिवाय सुरुवातीची ८-१० माणसं खनपटीला बसली आहेत. त्यांनाही उतरवून आपापला मार्ग चालला पाहिजे. इतरही वाचन-अभ्यास चालू ठेवावा. इकडे आल्यास भेटावे. तुझी एम.फील. आटोपली असल्यास विद्यापीठात अर्ज करावा किंवा पीएच.डी सुरू करून टाकावे. आमच्याही विद्यापीठात दोन-तीन जागा होत्या. पुन्हा होतील.

कवितासंग्रहाबद्दल अभिनंदन. प्रत पाठवल्याबद्दल आनंद झाला. कळावे.

आपला

भालचंद्र नेमाडे

वरील पत्रातून त्यांचा एक दृष्टिकोन आपणाला दिसून येतो. त्यांचा स्पष्ट विचार आणि रोखठोकपणा टीका सहन करूनही परवडणारा आहे. म्हणून मला लिहिलेल्या प्रत्येक कवितेवर त्यांचं मत अपेक्षित असतं. मी लिहिलेल्या 'आम्ही काबाडाचे धनी' या प्रदीर्घ कवितेचं हस्तलिखित त्यांना पाठवलं होतं. त्यावर त्यांचं एक साधं पोस्टकार्ड आलं. तरीही ते मला परिपूर्ण वाटलं.

१२ डिसेंबर ९०

प्रिय,
रा. इंद्रजित

तुझे २३ नोंव्हेंबरचे पत्र व ओवीतली दीर्घ कविता गेल्या आठवड्यात मिळाली. इथे कामामुळे वाचायला उशीर झाला. वाचून झाल्यावर (एका बैठकीत) उत्तम वाटली. दीर्घ कविता 'परिपूर्ण' ठरवणे कठीण असते. छंदाच्या एकसुरीपणामुळे कवितेवर बऱ्याच मर्यादा पडलेल्या वाटतात. दीर्घ कवितेला हा छंदाचा प्रश्न आधी सोडवावा लागतो. मला वाटते आहे या

अनुक्रमणिका

परिस्थितीती जरी ती छापली तरी उत्तम आहे. परंतु फारशी घाई न करता तू स्वतःच आणखी काही महिन्यांनी हा छंदच थोडाफार लवचीक करून पाहिल्यास अधिक चांगले ठरेल. छापायची घाई न केलेली बरी. छंदासंबंधी प्रत्यक्ष चर्चा कलेली बरी. मी नक्कीच औरंगाबादला २६ ते २९ डिसेंबरला आहे. त्यातल्या २८ तारखेला बहुधा बाहेरगावी जावे लागेल. तिथे जमल्यास भेट. नाहीतर पुढे केव्हातरी चर्चा करू. कविता उत्तम केलीस, अभिनंदन. भेट चुकल्यास तुझी वही प्रा. किंबहुने यांच्याकडे ठेवली जाईल.

- भालचंद्र नेमाडे

सरांची भेट झाली नाहीच. शेवटी चुकामूकच झाली. खूप हुरहूर वाटली. कारण त्या दिवशी मी औरंगाबादेतच होतो. पण पत्र इथे परत आल्यावर मिळाले. सरांची 'लोकप्रभे'त रमेश राऊत यांनी मुलाखत घेतली. त्यात त्यांनी आवर्जून परभणीची भाषा कशी कवितेसाठी पोषक आहे ते लिहिले आहे. माझा गोड गैरसमज आहे की माझी कविता वाचूनच त्यांनी हे विधान केले आहे.

विश्वास वसेकर यांचा 'बांडगुळे' हा कवितासंग्रह मला त्यातील नेमाडेंच्या 'नेमडी'या एका कवितेमुळे आवडलेला नाही. नेमाडे सरांवरची ही कविता मला बिलकूल आवडली नाही. म्हणून मी नेमाडे सरांवर एक कविता लिहिली. खरं तर एखाद्या मूळ कवितेवर विडंबन केलं जातं पण ही कविता विडंबनाचं उत्तर आहे.

बरेच दिवस ही कविता फक्त लिहून ठेवली. कुणालाही दाखवली नाही. दरम्यान, सरांना सहज पत्रात लिहून पाठवली. तर त्यांचं काहीच उत्तर नाही. साहजिकच होतं. त्यांना स्तुती आवडली नसावी. ही कविता मी एका संपादकाच्या पत्रानुसार दिवाळीसाठी पाठवून दिली. दिवाळी अंक तयार व्हायच्या आत वाळव्याला संपादकाची भेट झाली. त्यांना विचरलं कविता मिळाली का' म्हणाले हो, पण अशी कविता काय पाठवली तुम्ही. नेमाडे काय कवितेचा विषय आहे. दुसरी एखादी चांगली कविता पाठवा.

कवितेचा विषय काय असावा हे आम्ही ठरवू. तो तुम्ही ठरवायचा नाही. तुम्हाला कविता पसंत नसेल तर तसं सांगा, मी म्हणालो.

ते म्हणाले, अहो एक नेमाडपंथी, माझा बॉस आहे. त्यानं मला काय त्रास दिला ते तुम्हाला काय माहीत? आणि त्या ग्रुपमधल्या एका माणसावर लिहिलेली कविता मी छापू?

मी गप्प बसलो. मला त्यांचे वाङ्मयीन निकष लक्षात आले होते. नंतर पुन्हा मी कुठेही ही कविता पाठवली नाही. वाटले असेच अनेकांचे गैरसमज असणार. नेमाडे काय कवितेचा विषय आहे असेच लोकांना वाटणार. परंतु पुन्हा एकदा ती कविता फेअर करून 'उगवाई'ला पाठवली. आतापयंत पाठवलेल्या कविता छापून येत. अंक येत असे. पाचे, प्रतिक्रिया काही नाही. नेमाडेसरांवरची कविता पोचताच हातकणंगलेकरसरांचं दोन ओळीचं पत्रं आलं. त्यात त्यांनी कविता खूप आवडल्याचं आणि लगेच अंकात टाकत असल्याचं लिहिलं. ती कविता अशी -

काय कुणीची योग्यता
किती कोणाला पुसावं
बाजारूंचे बाजारात
तुम्ही ठरविले भाव

फोलपट पाखडोनी
केले वेगळे निखळ
बाजारूंचे बाजारात
झाले पांढरे उखळ

भडभुंज्याच्या गर्दीत
नाही मिरवला तुम्ही
आणि चेहरा स्वतःचा
नाही हरवला तुम्ही

लेखकाला हवीतशी
उग्र आदिम प्रतिमा
थोडीफार उभी झाली
तुमचाच तो महिमा

अहंतेची मुळे आधी
उपडिलित सकंदी
आणि आता रुजविली
देशीत्वाची नवी फांदी

नेमाडे सर गोव्यात असताना मनात असूनही सरांना भेटायला जाणं झालं नाही. तसा योगही आला नाही. नंतर मी पुष्कळ वेळा गोव्यात गेलो. सरांनी नोकरी केली ते गोवा विद्यापीठही पाहून आलो. नेमाडे सरांचे तेव्हाचे मित्र, गोवा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख सोमनाथ कोमरपंत यांच्या विद्यापीठातल्या निवासस्थानीच मी दोनतीन दिवस मुक्कामाला होतो. तेव्हा निघालेल्या बिढारच्या नव्या आवृत्तीच्या ब्लर्बवर नेमाडे सरांनी याच कोमरपंत सरांचा अभिप्राय छापला

होता. म्हणजे दोघांचं चांगलंच जुळून होतं. कोमरपंतांनी मला नेमाडे ज्या निवासात राहत ते निवासस्थान दाखवलं. नेमाडे ज्या इंग्रजी विभागाचे प्रमुख होते, तो इंगजी विभागही दाखवला. नेमाडे तिथं कसे वावरत असतील याची मनातल्या मनात कल्पना करून पाहिली. नंतर कोमरपंतसरांनी नेमाडे ज्या निर्जन समुद्रकिनारी फिरायला जात त्या समुद्रकिनाऱ्यावरून फिरवून आणलं. याच परिसरात नेमाडेंना 'देखणी'तल्या कविता सुचल्या होत्या. कारण इथं संपूर्णपणे अजूनही पारंपरिक जीवन जगणाऱ्या कोळ्यांच्या वस्त्या होत्या. त्यांचं पारंपरिक संगीत आणि लोकगीत होतं. जे नेमाडेंनी 'देखणी'त उतरवलं.

हा सगळा परिसर पाहून आल्यावर 'देखणी'तल्या गोव्यात लिहिलेल्या कविता पुन्हा वाचल्या. त्या वाचताना त्यांचा वेगळाच आनंद मिळाला.

कशी उदकात लिपौन पाय उभी बळाद
तुजी नदर माज्यावर बसली जालो काबाद
दोळे तुका शोधून सोधून नसुजले येता केन्ना
आगे नारी बेगिन यो वेळ लावुना, माजी ॲना

नेमाडेंच्या कवितेच्या संदर्भात 'या सर्व सचेतन प्रतिमांमधून जीवनदायी प्रेरणांचा स्रोत ओसंडून वाहताना दिसतो' या प्रकाश देशपांडे केजकरांच्या म्हणण्याचा प्रत्यय या कविता पुन्हा वाचताना येत होता. 'देखणी'तल्या सर्वच कविता ही नेमाडेंनी गोव्याविषयीच लिहिल्या असे नाही. त्यात सांगवी, पुणे आणि औरंगाबादही भरपूर आहे. पण या कविता लिहायला निमित्त ठरले ते नेमाडेंचे गोव्याल झालेले स्थलांतर. नेमाडेंना गोवा आवडलं होतं, असा त्याचा अर्थ होतो. कारण तिथं गेल्यावर ते कवितेच्या अमली रसायनाखाली आले. हेच रसायन फार दिवस टिकेल असं वाटलं होतं पण तसं झालं नाही.

मागीर गोव्याच्या शिव्या खाल्ल्या
चार वरसां बांबोलीन् बोंबो मारल्या
अरबी समुद्र फेणीत डुबायला मरे
पुन्हा केलिना मुंबई जिवाची
संपली गोष्ट शेवटी साण उरारी घडलो

असं म्हणत बांबोली पठारावरचं गोवा विद्यापीठ सोडून नेमाडे मुंबईच्या कलिना कॅंपातल्या विद्यापीठात आले. आणि कविता पुन्हा त्यांना सोडून गेली. ते पुन्हा समीक्षा आणि कादंबरीकडं वळले. ज्ञानपीठ मिळाल्यावर त्यांनी पुन्हा जाहीर केलं की, 'हिंदू' ही माझी शेवटची कादंबरी, आता मी आयुष्यभर केवळ कविता आणि कविताच लिहिणार. नाहीतरी कविता हाच सर्वश्रेष्ठ वाङ्मय प्रकार हे त्यांनी आधीच जाहीर केलेले आहे.

गोव्यात असतानाच एकदा नेमाडे औरंगाबादला आले होते. तेव्हा त्यांचा औरंगाबादच्या मसापमध्ये कार्यक्रम झाला. प्रकट मुलाखतही झाली. त्या मुलाखतीत नागनाथ कोत्तापले आणि श्रीधर नांदेडकर सोबत मीही सामील झालेलो होतो. त्यांच्या निवडक मुलाखती या पुस्तकात ती मुलाखत समाविष्ठ आहे. मी काय प्रश्न विचारले ते आता आठवत नाही. पण वेड्यासारखे काहीतरी विचारले एवढेच आठवते. पण नेमाडे सरांनी दिलेल्या उत्तरामुळे माझे वेडे प्रश्नही शहाणे ठरले हे मात्र खरे. ही मुलाखत बरीच वादग्रस्त झाली. स्त्रीसुधारणेची शहरी चळवळ चालवणाऱ्या महिलांना उद्देशून नेमाडेंनी टवळ्या हा शब्द वापरल्या मुळे अनेक बायका निषेध करून उठून गेल्या होत्या. दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रांनी हा विचार रसभरीत करून छापला होता.

मसापच्या याच कार्यक्रमात माझ्या 'आम्ही काबडाचे धनी' या दीर्घकवितेच्या पुस्तकाचं प्रकाशन झालं होतं. नेमाडेंनी ती कविता आवडली होती, म्हणून मी त्यांना तसं विचारलं. त्यांनी होकार दिला आणि तो कार्यक्रम पार पडला. त्याआधी आणि त्यानंतरही मी कधी असा पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रम केला नाही. पण तेव्हा माझे हे पुस्तक प्रकाशित करणरे प्रकाशक दीपक हवालदार यांच्या प्रकाशनाचं ते पहिलंच पुस्तक होतं. त्यांची फार इच्छा दिसली म्हणून मी तयार झालो. माझ्या तयार होण्यापेक्षा नेमाडे तयार झाले हे जास्त आश्चर्याचे होते. पण मी भाग्यवान कवी आहे एवढेच खरे.

जालन्याचा साहनी परिवार आणि जयराम खेडेकर हे 'कवितेचा पाडवा' म्हणून एक फार चांगला कार्यक्रम करतात. एका कवीच्या सन्मान आणि कविता सादरीकरणाचा एक कार्यक्रम असे त्याचे स्वरूप असते. एका वर्षी श्रीकांत देशमुख यांना त्यांनी पुरस्कार दिला होता आणि बहिणाबाईंच्या कवितांच्या सादरीकरणाचा कार्यक्रम त्यांनी ठेवला होता. पुरस्काराचं वितरण नेमाडे सरांच्या हस्ते होतं आणि कवितांचं सूत्रसंचालन माझ्याकडे होतं. त्या रात्री आम्ही एकत्रीत जेवलो तेव्हा फार दिवसानंतर खूप खूप गप्पा झाल्या. श्रीकांत देशमुख, सदानंद देशमुख, मी आणि सर अशा खूप खूप गप्पा रंगल्या संयोजक असल्यामुळे खेडेकर येत जात होते. गप्पात अधून मधून सहभागी होत होते. याच गप्पात त्यांनी मला 'लळा' हे माझं ललित गद्याचं पुस्तक आवडल्यांच सांगितलं होतं. पण मी त्याची कादंबरी न करता ललितगद्य लिहून ते

मॅटर वाया घालवलं असंही त्यांचं म्हणणं होतं. मी त्यांना त्या आधी दोनतीन वर्षापूर्वी पुस्तक पाठवलं होतं. सरांची काहीच प्रतिक्रिया न आल्यामुळं त्यांना पुस्तक पोचलं नवावं असं मला वाटलं होतं. पण ही चर्चा करताना लक्षात आलं की त्यांना ते पोचलं आणि त्यांनी ते मन लावून वाचलं देखील होतं.

मुंबई विद्यापीठ सुटल्यावर निवृत्तीनंतर नेमाडे सरांनी दहीसरला घर केलं. एकदा वसंत पाटणकरांनी दहिसरला असलेल्या त्यांच्या शिक्षण संस्थेच्या शाळेत मला कार्यक्रमासाठी बोलावलं. तेव्हा मुद्दाम नेमाडे सरांच्या दहिसरच्या घरी जाऊन आलो. तिथलं त्यांचं घर पाहून आलो. सर तेव्हा कुठंतरी बाहेर गेलेले होते. प्रतिभावहिनी घरी होत्या. थोडं बसून त्यांच्याशी बोललो आणि परत आलो. त्याआधी सर विद्यापीठात असताना त्यांच्या तिथल्या निवासस्थानीही जाऊन आलो होतो. विद्यापीठातून काहीतरी कार्यक्रम होता. तेव्हा अरुण म्हात्रे आणि मी सरांच्या घरी गेलो होतो. त्याआधी सर आमच्या कार्यक्रमातही थोडावेळ डोकावून गेले होते. कार्यक्रमापूर्वी मी सरांच्या घरी गेलो होतो. पण सर झोपलेले होते. मी आल्याचा आणि माझा असा असा कार्यक्रम असल्याचा निरोप ठेवून मी परत आलो होतो. त्यामुळे कार्यक्रमातून जातांना मला घरी येण्याचा निरोप ठेवून ते गेले होते. त्यामुळे कार्यक्रम संपल्यावर काही कविमित्रांसह मी पुन्हा सरांच्या भेटीला गेलो. नेमाडे सरांची भेट ही सर्वांसाठीच नवलाईची गोष्ट होती. सर कार्यक्रमात येवून गेल्याचे कळल्यावरच आम्ही सगळे कवी हुरळून गेलेलो होतो.

मधल्या काळात निवृत्तीनंतर सरांनी साहित्य अकादमीच्या कामात स्वतःला बरेच गुंतवून घेतले. मराठी भाषेच्या संदर्भात राष्ट्रीय पातळीवर काही काम करता येईल हाच त्यापाठीमागचा उद्देश असावा. सर तिथे गेल्यामुळे साहित्य अकादमीच्या पुरस्काराचे परिमाणच बदलून गेले. गेल्या दहापंधरा वर्षात मराठीला मिळालेल्या अकादमी पुरस्कारांकडे पाहिले की हे लक्षात येते. पण त्यामुळेच नेमाडे सरांच्या शत्रूत भयंकर वाढ झाला हेही खरे. पण अंगावर आलेल्याला शिंगावर घेण्याची तयारी तर सरांनी नेहमीच ठेवलेली असते.

पुष्कळवेळा सरांनी मला वेगवेगळ्या निमित्ताने अकादमीच्या कामात सहभागी करून घेतले. सरांच्या प्रेमापोटी मीही ते काम प्रेमाने करीत आलो. इतरत्र अशी कामे मी कटाक्षाने टाळली. कुठल्याही कमिट्या समित्यावर काम करायचे नाही असे मी ठरवूनच टाकलेले आहे. सरांचा सहवास मिळण्याच्या लोभाने अकादमीतली असली कामं मात्र मी केलेली आहेत. असल्या कामातलं सरांचं गांभीर्य पाहून माझी मलाच लाज वाटली. समोरच्या विषयाची टिपणासह सर जी तयारी करून येत ती पाहिली की कर्तव्यात कणभरही कसूर करायचा नाही हा सरांचा गुण प्रकर्षानं लक्षात येतो.

२०११ च्या जून महिन्यात अनुभव मासिकाने 'आधुनिक मराठी कवितेतला विठ्ठल' या विषयावर माझ्याकडॅन लिहून घेतले. जून महिण्यात निघणाऱ्या दिंड्या हे त्यापाठीमागचे कारण होते. तो लेख सरांच्या वाचण्यात आला. सिमल्याच्या राष्ट्रपती निवासातून त्यांनी मला त्या लेखावर सविस्तर प्रतिक्रया कळवली. सर नॅशनल फेलो म्हणून तिथं रहायला गेले होते. 'हिंदू'चा पहिला खंड नुकताच प्रकाशित झालेला होता. उर्ववरीत खंडाच्या लेखनाचं काम सर तिथं राहूनच करीत होते. एवढ्या व्यापातही सरांनी लेख वाचून मला सविस्तर पत्र लिहिले.

२३ जुलै २०११

प्रिय,
रा. इंद्रजित

काल पुण्याहून इकडे आलेल्या वाडेकर नावाच्या फेलोने तुझा तुकारामावरचा लेख असलेले महाअनुभव मासिक दिले. तुझा लेख उत्तम आहे. तुझे 'लळा' नावाचे पुस्तक मी इकडे आणले आहे. तसा लेखनप्रकार तुला फार उत्तम येतो. तू मराठीचा प्रोफेसर म्हटल्यावर असे तुकारामावरील लेखासारखा प्रकारही तुला उत्तम येईल, मात्र त्याला थोडीतरी संशोधनपद्धती पाळावी लागते. उदाहरणार्थ अरुण कोलटकरने १९६४ च्या सुमारास संतांच्या अभंगांची भाषांतरे डिलॉनर नामक इंग्रजी मासिकात छापली होती. दिलीप चित्रेला १९८० नंतरच तुकाराम माहीत झाला. मी स्वतः ह्या दोघांचीही सुरुवात पाहिली आहे. त्याआधी हे दोघेही इंग्रजी/युरोपी कवीच प्रामुख्याने वाचत असत. दिलीप चित्रेला माझ्या 'तुकाराम' (साहित्य आकादमी १९८०) ह्या पुस्तकाचा रिव्ह्यू इंडियन एक्सप्रेस ह्या दैनिकासाठी लिहिता आला नव्हता, त्यामुळे दुसऱ्या कोणाला रिव्ह्यूसाठी द्यावे अशी इंडियन एक्सप्रेसच्या संपादकाने विचारणा केली होती. अरुण कोलटकरचा बळवंतबुवा १९६० पासून लिहिणे चालू आहे. दिलीप चित्रेला तुकारामाचे महत्त्व फार उशिरा १९८१-८२ नंतरच कळले. आणि वाचण्यास उशीर झाल्याची भरपाई त्याने बराच गाजावाजा करून भरून काढली. त्याची इंग्रजी भाषांतरेही नाट नाहीत. चुकीचीही आहेत.

इथे IIAS मध्ये एकजण अशा भाषांतरावर

हिंदी/इंग्रजी/मराठी संशोधन करतो आहे. त्याच्याही मते अरुण कोलटकरची भाषांतरे उत्तम व दिलीपची मध्यमप्रतीची आहेत.

बाकी तुझे ठीक चालले असेल. तूर्त मी इथली कामे सांभाळून 'हिंदू' दुसरा भाग सुरू करायचा मुहूर्त शोधतो आहे. असो. आनंदात राहा.

कळावे, आपला
भालचंद्र नेमाडे

दरम्यान २०११ साली सरांची 'हिंदू' आली. आम्ही उत्सुकतेनं वाट पहात होतो. मोठ्या उत्कटतेनं मी ती वाचली आणि भारावल्या अवस्थेत त्यातल्या खंडेरावांशी संवाद करणारी तीन पानं लिहून सरांना पाठवून दिली. तो मजकूर असा होता,

खंडेराव

खंडेराव,
कुणब्याचं सगळं जगच उष्ट केलं की राव
आता पुढीलांसाठी काय ठेवलय लिहायचं
हे नवं महाभारत, तू नवा व्यास
तुझ्या तोंडीच शोभून दिसतो हा घास
तुझ्या ग्रंथी समर्थ पचवायला विष
म्हणून तुझ्या पेशित हा अमृताचा संचय

चकवा देण्यासाठी सशानं सोडावा गंध
आणि कुत्र्यानं घुटमळत रहावं चुकीच्या जागी
तसंच झालं की खंडेराव हे सगळं
तुझी धाव वेगळी तुझी हाव वेगळी
तुझा भावही निराळा आणि तुझा गावही निराळा
ते धोपटत राहिले फरकंडीला

तुझं लिहिणं म्हणजे कळसुबाईचं शिखर
प्रत्येक गिर्यारोहकाला सर करावसं वाटणारं
म्हणून प्रत्येकानं येंघला तुझा कडा
शाबूत हाडांचा हिशोब करीत घेतली माघार
तरी प्रत्येकानं मारल्या फुशारक्या
आसर चेहऱ्यावरचा लपवीत

भावही आणि गीत ही नसलेल्या यांच्या गाण्यानां
तू कितीही सुचवलीस नोटेशन्स
तरिही हे आपल्या अभिरुचीचा मोडका गाडा
संपन्न म्हणून चालवत राहतीत

तू कितीही फुलवलास पिसारा
आणि गेलास यांच्या समोरून
तर हे मानभावीपनानं तिसरीकडंच पाहतील

तास कोणतं, आडतास कोणतं, पाटा कोणता
हे कुणबाऊ ज्ञान नसणारांना
काळाच्या पटलावरचं तुझं आडवं तिडवं फिरणं
म्हणजे काळाचा विक्षेप वाटला

तू उगाच जाता जाता टपली मारलीस
आणि तुझा अपेक्षित यवताळ
चोहीकडून तुझ्या अंगावर आला
डहूळलेला डोह स्थिर होईल
आणि तुझा नितळपणा सिद्द होईल

काळाचा विशाल पट
आणि त्याच्याशी चाललेली तुझी झटापट
ओळख स्वतःची, समाजाची आणि सृष्टीची
तुझे बाहू बलदंड तुझी झेप विलक्षण
तुझा संयम निश्चयी

आपले रेडीमेड सिंद्दांत
तुला लावून तुझं माप घेता येत नाही
म्हटल्यावर वैतागलेल्या विद्वानांनी
कावेबाज कांगावा केला
तेल आधीच गेलं होतं त्यांचं
आता तूपही जातंय म्हटल्यावर
यांचं डोकंच चालेना
शेवटी तुझ्यावर आपटून त्यांनी ते फोडून घेतलं

किती किती आया बाया
त्यांच्या जगण्याचे किती किती लोळ
घोळ खोवून जेव्हा त्या उभ्या राहतात
तेव्हा उंटमाऱ्याच काय हत्ती माऱ्या आला तरी
त्याला ठेचायला त्या समर्थ असतात
वेश्येपासून आईपर्यंत तत्त्वाच्या बाया
सत्वाचं जिणं जगतात
त्यांचं महत्त्व खंडेराव
किती छान अधोरेखीत केलंस

कोणी कोणास कुणाच्या
बंधनातून मुक्त केले हा सनातन सवाल
एक खुबसुरत मोड देवून
आपो आपच सुटत असतो खंडेराव

अनुक्रमणिका

पीडाही जाते आणि खांडूकही फुटतं
असा दुहेरी निचरा होत असतो कधीकधी

आपणाला जे काही वाटतं आणि पटतं
ते ठासून मांडण्याची
आणि कुणाच्याही बापाला न भिण्याची
निर्भीडता अंगात बाणवण्यासाठी
गावाकडच्या प्रत्येक मुलाच्या हातात
'हिंदू'च द्यायला हवी
त्यांचं त्यांनाच ठरवू द्यायला हवं
शेती करायची की शेतीतून बाहेर पडायचं

मला उत्सुकता होती सरांची प्रतिक्रिया काय असेल याची योगायोगाचा भाग असा की ज्यादिवशी नेमाडे सरांनी सिमल्याहून लिहिलेले पत्र मला मिळाले त्याच दिवशी माझा हा मजकूर नेमाडे सरांना मिळाला होता. कारण पत्रावरील सिमल्याच्या फोनवर मी संपर्क केला तर नेमाडे मुंबईतच आहेत असं समजलं. मुंबईतल्या घरी फोन केला तर सर घरीच होते. त्यांच्याशी छान बोलणं झालं. त्यांचं पहिलंच वाक्य होतं, तुझा 'हिंदू'वर लिहिलेला कवितेसारखा मजकूर मिळाला. म्हणूनच मी वरच्या लेखनाला कविता न म्हणता मजकूर म्हटलं. व त्याचा समावेश या लेखात केलेला आहे.

'हिंदू' येण्यापूर्वी प्रकाशकांनी जी जाहिरात केली आणि नेमाडे सरांनीही त्यात सहभाग दिला ते नेमाडे सर्वस्वी नवे होते. अनेकांना ते आपल्या भूमिकेशी विसंगत वागताहेत असे वाटले. मला मात्र तसे वाटले नाही. उलट आनंद आणि कौतुक वाटले. त्यामुळे पुस्तक खूप दूरपर्यंत पोचले. दूरदर्शन सारख्या नव्या माध्यमाचा लेखक प्रकाशकांनी योग्य उपयोग करून घेतला.

प्रकाशनपूर्व नोंदणी करणाऱ्या वाचकांना नेमाडेंच्या सहीसह 'हिंदू'ची प्रत मिळणार होती. म्हणून पाच हजारची पहिली आवृत्ती प्रकाशनपूर्व नोंदणीतच संपली. लगोलग दुसरी आवृत्ती प्रकाशित करावी लागली. आणि आता चार वर्षेही झाली नाहीत तोपर्यंत सहा आवृत्त्या प्रकाशित कराव्या लागल्या आणि आता तर ज्ञानपीठ मिळाल्यामुळे सततच आवृत्त्या प्रकाशित होत राहणार. आता त्याची गणतीच न केलेली बरी. नेमाडे आता आधुनिक मराठी साहित्यातला सर्वश्रेष्ठ लेखक ठरला आहे.

'हिंदु'ची प्रकाशनपूर्व नोंदणी अगदी खेड्यापाड्यातून झालेली होती. आमच्या संस्थेतल्या जिंतुरसारख्या कॉलेजमधून पंचवीस प्रती नोंदवल्या गेल्या. आणखी दुर्गम खेड्यापाड्यातून लोकांनी 'हिंदू' विकत घेतली. वाचली. त्यावर चर्चा घडवून आणल्या. काही ठिकाणी नेमाडे स्वतः गेले. पण नंतर वादळ उठलं. लोकांनी विरोधी सूर लावले. काही ठिकाणचे कार्यक्रम होवू दिले नाही. काही ठिकाणी आधीच कार्यक्रम रद्द झाले. त्यातला एक कार्यक्रम परभणीतही होणार होता. वादाला भिवून संयोजकांनी तो रद्द केला. वाद शमल्यावर हाच कार्यक्रम जळगावात झाला.

जेवढे वाद वाढत गेले तेवढीच 'हिंदु'ची लोकप्रियताही वाढत गेली. आपल्या स्वभावाप्रमाणे कुठल्याच वादला किंवा दहशतीला नेमाडे सरांनी मुळीच भीक घातली नाही. मुद्दे आणि गुद्दे अशी दोन्ही प्रकारची दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. पण नेमाडे हिंमत हारले नाहीत. दोन्ही पातळ्यावर लढत राहिले. प्रतिस्पर्धी खालच्या पातळीला उतरले तरी सरांनी पातळी सोडली नाही. ते आपली उंची राखूनच लढत राहिले. 'हिंदु'वर सगळीकडे लिहून आले. त्यातले विश्राम गुप्ते. विनय हर्डीकर आणि सदानंद मोरे यांचे लेख मला फार फार आवडले. 'हिंदु'वर इतका सुंदर लेख लिहिणाऱ्या हर्डीकरांनी नंतर नेमाडेंनी ज्ञानपीठ परत करावा अशी दुराग्रहाची भाषा केली. 'कोसल्या'च्या वेळी हुकलेल्या किंवा उशिरा मिळालेल्या सर्व गोष्टी 'हिंदू'च्या वेळी मात्र अगदी वेळेवर मिळत गेल्या. अर्थात नेमाडेंना कशाचीही अपेक्षा नव्हती. पण समाजानेच ठरवले की कोसलाच्या वेळी झालेल्या चुका परत व्हायला नकोत. मानसन्मानाच्या संदर्भात बऱ्याचदा योगायोग काम करत असतात. 'हिंदू'च्या वेळी सर्व योगायोग चांगले होते एवढे निश्चित. आता राहता राहिलं ते नोबल. नेमाडे सरांना असं काही लिहिलं. बोललेलं आवडत नाही, पण काय करणार? मराठी भाषेला हा सन्मान दुसरं कोण मिळवून देऊ शकेल? नेमाडे सरांना नको असलं तरी आम्हा मराठी भाषकांना ते हवय.

ज्ञानपीठाआधी भारतीय पातळीवरचे महाराष्ट्राबाहेरचे अनेक पुरस्कार नेमाडे सरांना मिळालेले होते. महाराष्ट्रातलेही दोन मोठे पुरस्कार त्यांना मिळाले होते. त्यातला एक नाशिकचा कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान आणि पुण्याच्या समता परिषदेचा समता हा दुसरा. दोन्ही ठिकाणची त्यांची भाषणे वादग्रस्त झाली. प्रत्येकवेळी काहीतरी आश्चर्यचकित करणारा नवाच मुद्दा ते शोधून काढतात. या दोनही ठिकाणी त्यांनी पुष्कळ नवेच मुद्दे मांडले. लोक नंतर पुष्कळ दिवस त्यांच्या बोलण्याचे संदर्भ शोधत, अर्थ लावत, वाद घालत बसले. नेमाडे सरांनी मागे फिरून पाहिले नाही. ते पुढे पुढेच चालत राहिले. तुटलेला हार सावरत त्यांनी स्वीकारलेल्या

जमस्थान पुरस्काराची दृश्य मी दूरदर्शनवरून पाहिली तेव्हा मला खूप हसू आलं होतं. मजाही वाटली होती. गेल्या काही दिवसापासून मराठी वाहिन्यांनी नेमाडे सरांना बऱ्यापैकी जागा दिल्यामुळे लोकांना नेमाडे सदेह पाहता आले. नाहीतर पूर्वी त्यांचा फोटोही दुर्मीळ असायचा.

मी जेव्हा जेव्हा सरांना भेटायला गेलो तेव्हा तेव्हा त्यांनी मला खूप प्रेमानं वागवलेलं आहे. इतकंच नाही तर माझं नाव सांगून कुणी माझा मित्र किंवा विद्यार्थी गेला तर त्यालाही त्यांनी तेवढंच प्रेमानं वागवलेलं आहे. एकदा माझा परभणीचा चित्रकार मित्र कुलदीप कारेगावकर याच्या चित्रांचे प्रदर्शन मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीत होते. त्याची इच्छा होती आर. आर. पाटील आणि नेमाडे सर त्याला उद्‌घाटनासाठी उपलब्ध व्हावेत. आणि त्यासाठी मी प्रयत्न करावेत. मी दोघांशीही संपर्क केला. कुलदीप दोघांनाही भेटायला गेला. आबांचे शक्य झाले नाही पण नेमाडे सर मात्र आले. मनःपूर्वक बोलले. कुलदिपच्या चित्रांचे त्यांनी कौतुक केले. कुलदीप भारावून गेला. नेमाडे सर कुलदीपच्या चित्रप्रदर्शनाच्या उद्‌घाटनाला आले याचा इतर मोठमोठ्या चित्रकारांनाही हेवा वाटला. खेड्यापाड्यातून धडपडणाऱ्या मुलांना सर नेहमीचा असा प्रतिसाद देत आलेले आहेत. त्यांनी आपल्यातला सांगवीकर अजूनही जिवंत ठेवलेला आहे. म्हणूनच नेमाडे सर लेखक म्हणून जितके मोठे आहेत त्यापेक्षाही माणूस म्हणून आणखीच मोठे आहेत. त्यांच्यातल्या माणूसपणाने मला कायमच त्यांच्याशी बांधून ठेवलेले आहे.

दोन वर्षापूर्वी एकदा अचानक नेमाडे सरांचा फोन आला. त्यांनी घरी फोन केला तर मी घरी नव्हतो. कॉलेजला गेलेलो होतो. माझ्याजवळ मोबाईल नसतो. त्यांनी मी ज्यांच्या सोबत रहातो त्या जोंधळे सरांचा मोबाईल नंबर घेवून त्यावर फोन केला. मी तासावरून आल्यावर जोंधळे सरांनी मला नेमाडे सरांचा फोन येवून गेल्याचा निरोप दिला आणि लगेच नेमाडे सरांना फोन लावून दिला. नेमाडे सरांनी प्रथम अभिनंदन केले आणि जैन एरिगेशनच्या वतीने दिला जाणारा बालकवी पुरस्कार मला देण्याचा निर्णय पुरस्कार निवड समितीने घेतल्याचे मला सांगितले. मला तसा तो आश्चर्याचा धक्का होता. कारण त्याआधी तो पुरस्कार डहाके, अरुण काळे, नामदेव ढसाळ यांना मिळालेला होता.

सरांनी पुरस्कार वितरणाची तारीख सागितली ६ सप्टेंबर २०१३. कांताबाई जैन यांचा तो स्मृतिदिन. मला फोन आला तो महिना होता मार्च तेराचा. मी सरांना म्हणालो, सर तारीख तर खूप लांब आहे, समितीने इतक्या लवकर निर्णय कसा काय जाहीर केला? यावर सरांनी जे उत्तर दिलं ते माझी दांडी उडवणारं होतं. सर म्हणाले, अरे तुझी तारीख मिळत नाही ना! म्हणून समितीने लवकर निर्णय घेवून तुझी तारीख आरक्षित केलेली आहे. आमच्यासाठी तारीख राखीव ठेव. कुणा इतरांना ही तारीख देवू नकोस! सरांचा टोमणा माझ्या लगेच लक्षात आला. मी फार कार्यक्रम करत फिरतो हे त्यांच्या कानावर गेले असणार. फार कार्यक्रम करू नकोस. जरा निवांत लिहीत-वाचत बैस. असं म्हणण्याऐवजी त्यांनी वरील प्रकारे माझी दांडी उडवून ही गोष्ट माझ्या लक्षात आणून दिली होती.

गो. मा. पवार, मधु मंगेश कर्णिक, ना. धों. महानोर अशी दिग्गज मंडळी परिक्षण समितीत होती. नेमाडे सर स्वतः समितीचे अध्यक्ष होते. सरांच्या अध्यक्षतेखालील समितीने या पुरस्कारासाठी माझी निवड करण्याइतकी माझ्यासाठी आणखी गौरवाची बाब दुसरी कोणती असणार होती? मी हरखून गेलो आणि तरंगत रहिलो.

पुढं यथावकाश कार्यक्रम पार पडला. स्वतः नेमाडेसरांच्या हस्तेच तो पुरस्कार मला मिळाला. भवरलाल भाऊंच्या नेतृत्त्वाखाली आयोजन मोठं देखणं होतं. त्यादिवशी माझ्यासोबत आलेल्या माझ्या सर्व विद्यार्थ्यांना नेमाडे ज्या आत्मीयतेने भेटले, त्यांच्याशी बोलले, त्यामुळे माझे विद्यार्थीही भारावून गेले. माझे सर आणि माझे विद्यार्थी आत्मीयतेनं एकमेकांना बोलतानाचं दृश्य मी दूर उभं राहून काळजात साठवून घेत होतो.

। इंद्रजित भालेराव
एकनाथनगर,
परभणी - ४३१ ४००१
दूरध्वनी ०२४५२२२५५८५



अनुक्रमणिका



सामाजिक मूल्यऱ्हास आणि चांगदेव चतुष्ट्य

डॉ. सतीश बडवे

■

१९६० नंतरच्या पहिल्या दशकात भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' कादंबरी चर्चेत आली आणि साहित्यविश्वाच्या केंद्रस्थानांना तिने डळमळीत केले. एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या दशकातच त्यांच्या 'हिंदू' कादंबरीचा पहिला भागही वाचकांच्या हाती आला. या दोन्ही साहित्यकृतीविषयी उलट सुलट चर्चा झाल्या. नेमाडे नावाच्या कादंबरी लेखकाचा प्रभाव किंवा ठसा जावण्याइतका ठळक होता. परिणामी त्यांच्या कादंबरी लेखनाविषयी कधी जाणतेपणाने तर कधी हेटाळणीने मूल्यमापन केले गेले. या टोकदार चर्चेमुळे नेमाडे यांचे कादंबरीलेखन जाणकार व अभ्यासकांचा चिंतनाचाही विषय बनले. काही अपवाद वगळता चांगदेवचतुष्ट्य तसे दुर्लक्षित राहिले. त्यावर चर्चा झालीच नाही असे म्हणता येणार नाही. पण 'कोसला' जशी बहुचर्चित ठरली किंवा 'हिंदू'च्या निमित्ताने जशा टोकदार प्रतिक्रिया उमटल्या तसे मात्र नेमाडे यांच्या चतुष्ट्याबाबात मोठ्या प्रमाणात घडलेले दिसत नाही. वस्तुतः कादंबरीकार नेमाडे जाणून घेण्यासाठी 'बिढार', 'हूल' 'जरीला' 'झूल' या चतुष्ट्याचा गांभीर्याने विचार करावा लागतो. मराठी कादंबरीला स्वतःच्या रूपाचे भान नाही किंवा मराठी कादंबरीने ते प्रकट केलेले नाही असे दस्तुरखुद्द भालचंद्र नेमाडे यांचे म्हणणे आहे. ''गेल्या पन्नास वर्षात मर्ढेकर - रेगे यांच्यापासून आजपर्यंत मराठी कवींनाच तेवढी रूपाची जाण असल्याचे दिसते, मात्र कादंबरीकारांना कितीही बरे दिवस आले तरी साधी रूपाची जाणीवही दिसत नाही. हे मराठी कादंबरीचे दुर्दैव आहे... कुरूप गोष्टी स्वीकारून, त्या सुंदर करण्याचे सामर्थ्य टिकवणे, वाढविणे आणि उद्याच्या समाजाची दिशा दाखवणे हे आजच्या कादंबरीकाराने केले तरच तो टिकू शकेल''[१] याची परखड नोंद विसाव्या शतकाच्या अखेरच्या वर्षात त्यांनी केलेली दिसते. कादंबरीला सशक्त करणाऱ्या रूपबंधाची दिशा दाखवण्याची त्यांची भूमिका इथे लक्षात येते. विशेष म्हणजे ही भूमिका मांडण्यापूर्वी त्यांनी कादंबरीलेखनाचे प्रयोग केल व मगच हे म्हणणे मांडले. 'आधी केले मग सांगितले' या उक्तीचा प्रत्ययही त्यांनी दिला. 'टीकास्वयंवर' मधील कादंबरीविषयी त्यांची मतेही याच प्रकारची आहेत. तिथेही नैतिकता, नवनैतिकता यांचे अधोरेखन त्यांनी केले आहे. आता या निमित्ताने 'कोसला' व 'हिंदू'चा पहिला भाग विचारात न घेता चांगदेवचतुष्ट्याला डोळ्यासमोर ठेवून सामाजिक मूल्यऱ्हासाचे दर्शन त्यात कसे घडते हे या लेखाच्या केंद्रस्थानी ठेवण्याची भूमिका आहे. 'कोसला' ते 'हिंदू' यातही एक आंतरिक संगती आहे. किंबहुना मूल्यऱ्हास होणाऱ्या समाजाची चिंता हा नेमाडे यांच्या चिंतनाचा विषय 'कोसला'पासूनच दृष्टिपथात आलेला दिसतो. हे विसरता येत नाही.

कादंबरीकार नेमाडे यांचा दृष्टिकोन लक्षात घेतला तर हे

चतुष्टय म्हणजे एक बृहद कादंबरी ठरेल. प्राचीन-मध्ययुगीन मराठी लेखन परंपरेतील प्रदीर्घ लेखनाची परंपरा त्यांनी जोपासली असे म्हणता येते. चार कादंबऱ्यांचा सुटासुटा विचार करणे जसे शक्य आहे, तसाच चतुष्टय म्हणूनही त्याचा एकत्रित विचार करता येते. भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्यांचे मुक्त रूप रचनेच्या दृष्टीनेही ध्यानात घेता येतो. आपल्या कादंबऱ्यांच्या गाभ्याचे सूत्र प्राचीन परंपरेतील एखादे वचन सांगून व्यक्त करण्याची त्यांची पद्धतीही अनोखीच मानता येईल. 'झूल' ही चतुष्टयातील अखेरची कादंबरी. इथे लीळाचरित्राच्या पूर्वाधातील एक वचन बघता येईल. ''सर्वज्ञे म्हणीतले बाई हा अवघा डोंगरू पोकळ असे कोन्ही एथीचे रिंगणेनिगणे जाणे नाः'' यातून ध्वनित होणारा अर्थ सूचक आहे. म्हणजे असे की, 'बिढार' ते 'झूल' हा एक सलग प्रवास आहे. तो नुसता प्रवास नाही तर ती एक शोधयात्रा आहे. समाजाला दिशा देणाऱ्या शिक्षणव्यवस्थेवर नेमाडे यांचा रोख आहे. या व्यवस्थेतील सडलेपण, या व्यवस्थेत सामील होणारे विविध स्तर, त्याच्या विकृत मनोवृत्ती आणि व्यक्तिमत्त्व घडविणाऱ्या संस्थांमधून होत चाललेला मूल्यांचा ऱ्हास यावर नेमाडे यांचा कटाक्ष आहे. समाजातील नागरिक घडविण्याऱ्या शिक्षणक्षेत्रातील ऱ्हासशीलता इथे प्रातिनिधिक आहे. ती एकूण समाजव्यवस्थेचा विचार करण्यास प्रवृत्त करते. या शोधयात्रेच्या अखेरच्या टप्प्याच्या प्रारंभी हाती येणारा निष्कर्ष हा अवघा डोंगरू पोकळ असे हा आहे. या शिक्षणक्षेत्राचा डोलारा दिसायला मोठा असला तरी तो पोकळच राहिलेला आहे आणि त्याचे मुख्य कारण सामाजिक मूल्यऱ्हास हे आहे. समाजाच्या मूल्यऱ्हासाविरुद्ध येथील मध्ययुगीन संतपरंपरेने आपले म्हणणे लोकभाषेतून व्यक्त केले होते. 'दया तिचे नाव भूतांचे पाळण । आणिक निर्दाळण कंटकांचे' अशी एखाद्या संकल्पनेमधील अनेकार्थता या चतुष्टयामधूनही मांडली जाते. इर्थ 'दया' या संकल्पनेचे दोन अर्थ सूचित होतात. एक अर्थ सर्वसामान्य माणसाच्या उत्थानाशी निगडित आहे तर दुसरा समाजकंटाकांवर प्रहार करण्याच्या कृतीशी निगडित आहे. भालचंद्र नेमाडे या चतुष्ट्यात मूल्यऱ्हासावर काठी उगारतात पण त्यांची मूळ भूमिका ऱ्हासशीलतेवर प्रहार करून ती नष्ट करण्यावर व सज्जनांची समर्थता वाढवण्यावर आहे. संतपरंपेशी बांधलेली नाळ तोडून नेमाडे विचार करीत नाहीत. श्री. व्यं. केतकर यांनी संत हे मूळात लोकशिक्षक होते व त्यांची भूमिका नीतिशिक्षकाची होती असे प्रतिपादन केले आहे. संतांनी नैतिकतेचा पुरस्कार केला होता आणि तो त्यांच्या जीवनाशी संबंधित भाग होता. जगण्यात आणि लिहिण्यातही त्यांनी नैतिकताच जपली होती. हाच नैतिकतेचा धागा चांगदेव चतुष्टयात उजळून निघतो. परिणामी चतुष्टयातील नायकांची नावेही सूचक ठरतात. चांगदेव व नामदेव हे दोघे यातले नायक. त्याचा प्रारंभ कोसलातल्या पांडुरंगाशी निगडित आहे. पांडुरंग हा मराठी समाजाच्या 'जीवाचे जीवन' असणारा. अभिजन आणि बहुजनांच्या परंपरेला आपलासा वाटलेला. चांगदेव हा प्रकांड पंडित तर नामदेव चळवळ्या, विद्रोही आणि संघटकही. कोसलातल्या पांडुरंगाचा चांगदेवाच्या शरीरातला प्रवेश आणि नामदेवाशी त्याचा जडलेल्या स्नेह यातूनही ही सूचकता व्यक्त होते. वसाहतवादी मनोवृत्तीच्या प्राबल्यामुळे तुटत चाललेल्या या सत्त्वशील पूर्वपंरपरेचे धागे चांगदेव चतुष्ट्यात पुन्हा जोडण्याची दृष्टी नेमाडे यांच्या लेखनातून प्रकटते. स्वाभाविकच या उदारमतवादी व सहिष्णू दृष्टीला जाणवणाऱ्या वास्तवाचे तपशील त्यात येतात. फरक फक्त काळाचा आहे. आधुनिक जगण्यातील कुरुपता इथे ठळकपणे नोंदवली जाते. या कुरुपतेला सुंदर बनविण्याचे स्वप्न त्यातून पुढे येते. आत्माविष्काराचे हे प्रगटीकरण अनेक वास्तव प्रश्नांना भिडते. हे वास्तव तपशील गडद करण्यासाठी त्यात एक प्रकारचा पसरटपणा येतो. हाच काहींना आक्षेपार्ह भाग वाटतो. इथे कादंबरीकाराची संरचना मराठी कादंबरी लेखनाचा परंपरागत साचा मोडण्याचा प्रयत्न करते. समाजशास्त्रीय चिकित्सा करण्यासाठी या वास्तवाचे उभे आडवे धागे पूरक ठरणारे असतात. त्यातूनच चुतुष्ट्याचे रूप निर्धारित होत जाते. हे रूप 'कोसला' आणि 'हिंदू' या दोन्हींपेक्षा भिन्न आहे. पांडुरंग जसा आहे तसा चांगदेव नाही. पांडुरंग योगसामर्थ्याने चांगदेवच्या शरीरात प्रवेश करतो योगनंदाच्या गोष्टीसारखा. पांडुरंगने चांगदेवच्या रूपात अवतरणे हा चतुष्टयाचा प्रारंभ आहे. पांडुरंगामधील नवथरपणा चांगदेवात असेलही पण तो आता परिपक्वतेच्या दिशेने निघालेला प्रवासी आहे. 'कोसला'चे एक स्वतःचे रूप आहे. पण 'कोसला'नंतर बऱ्याच अवकाशाने 'बिढार' आली. नंतरच्या काळात तिचेच दोन भाग होऊन 'हूल' आली. पुढे 'जरीला' आणि 'झूल' ही आल्या. या सर्वांमध्ये एक समान सूत्र आहेच. पण 'कोसला'ची संरचना बदलून आलेल्या या चार कादंबऱ्या रचनेतील लवचिकतेला सामोऱ्या जातात. म्हणूनच त्यांचा स्वतंत्र विचार करता येतो. मुख्य म्हणजे शिक्षणक्षेत्राविषयी यात नेमाडे काही सुचवू पाहतात.

मराठी कादंबरीविषयी चिकित्सक आणि परखड मत नोंदविणाऱ्या का. बा. मराठे यांनी १८७२ लाच 'नावलांची कीड फार झाली' असा अभिप्राय व्यक्त केला होता. कादंबरीचे सामर्थ्य वाढविण्यासाठी कादंबरीकाराने कोणते गुण आत्मसात करावेत हे १९२८ ला वि. का. राजवाडे यांनीही नोंदविले होते.

कादंबरीच्या कोतेपणावर त्यांनी बोट ठेवले होते. आपल्या मतांची स्वच्छ व स्पष्ट नोंद करून कादंबरी लेखनाविषयीच्या अपेक्षा त्यांनी व्यक्त केल्या होत्या. प्रश्न असा आहे की, त्यानंतर तरी मराठी कादंबरी या दिशेने गेली का? साने गुरुजींसारख्या कादंबरीकाराचा अपवाद बाजूला केला जर जाज्वल्य मनोवृत्ती, श्रेष्ठ विद्या, विस्तृत वाचन, मोठा प्रवास, तीक्ष्ण निरीक्षण, कडक परीक्षण, थोर औदार्य, गाढ सहानुभूती हे राजवाडे यांनी सांगितलेले कादंबरीकाराचे गुण कोणत्या कादंबरीकारात सहजपणे दिसू शकतात? भालचंद्र नेमाडे यांच्या चांगदेव चतुष्ट्याचा विचार केला तर मराठी कादंबरीला त्या वाटेवर नेण्याचा समर्थ प्रयत्न त्यांनी केल्याचे दिसते. समाजाच्या मूल्यऱ्हासाचे दर्शन या चतुष्ट्यातून प्रत्ययाला येते. त्यांच्या तपशीलात मतभेद नोंदण्याच्या काही अपवादात्मक जागा निघू शकतील. पण एकूणच मराठी कादंबरीचा पट विस्तीर्ण करण्याची भूमिका आणि तिचे वाङ्मयीन रूप अधिक सकसपणे वाचकासमोर मांडण्याची दृष्टी लक्षवेधी ठरली. ''चांगदेव चतुष्टय स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राचा ऐतिहासिक असा सामाजिक दस्तऐवज आहे. घरादाराचे उरलेलसरले बंध तोडून चांगदेवच्या भ्रमंतीला सुरुवात होते आणि ह्या सगळ्या भ्रमंतीत सच्चेपणाने जगण्याचा अखंड प्रयत्न, ही चांगदेव चतुष्टयाची मध्यवर्ती धारा होऊन जाते. महाराष्ट्राच्या उभ्या-आडव्या भौगोलिक, सामाजिक, शैक्षणिक, जातीय, राजकीय जीवनशैलीचा आणि पर्यायाने वर्तमानाचा छेद घेणारे मुख्य आशयसूत्र आणि इतर अनेक उपआशयसूत्रे यांची प्रचंड मोठी गुंतवळ उभी करून चांगदेव चतुष्ट्य विशाल व्यापक पट धारण करते. हे करत असताना मराठी कादंबरीच्या गाठी, निरगाठी, सेंद्रीय एकात्मतेसह सगळ्या अंगभूत करकचून गळफास लावणाऱ्या मर्यादा ओलांडून हे चतुष्टय खुल्या, विस्तीर्ण, अनंत क्षितीजाचा वेध घेते. हे चतुष्ट्याचे वाङ्मयीन रूप म्हणून महत्त्व अभ्यासकांना सतत खुणावणारे आणि विचारप्रवण करणारे आहे.[३]'' हे राजन गवस यांचे प्रतिपादन लक्षात घेतले तरी मराठी कादंबरीच्या पटाला नेमाडे यांनी अधिक व्यापक कसे बनविले हे ध्यानात घेणे सुकर होईल. असे असले तरी 'कोसलात लेखकाला जे साधले ते नंतरच्या कादंबऱ्यांत साधले नाही' अशी एक समान प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केलेली आढळेल. आशय अभिव्यक्तीचे पारंपरिक साचे उध्वस्त करणारी नेमाडे यांची पहिली कादंबरी आणि त्यानंतर तेरा वर्षानंतर प्रत्यक्षात अवतरलेले चांगदेवचतुष्टय, यांनी रचनेच्या अंगाने व साम्यस्थळांच्या दृष्टीने करण्याचे प्रयत्न झाले. नेमाडे यांनी स्वतःच कोसलाचे रचनातंत्र न स्वीकारता चांगदेव चतुष्टयात नव्या जाणिवा प्रसृत केल्या. आत्मचरित्रात्मक लेखनाचे एक सूत्रही अधिक प्रकर्षाने चतुष्टयात प्रकट केले. १९७५ ते १९७९ एवढ्याच कालावधीत हे चतुष्टय पुढे आल्याने भालचंद्र नेमाडे याच्या कादंबरी लेखनाचा विकास लक्षात घेण्यासही चतुष्टयाची भूमिका महत्त्वाची ठरणारी आहे. नवी नैतिकता, सामाजिक वास्तव व कृतिशीलता यादृष्टीनेही हे चतुष्टय बरेच काही सांगणारे आहे. प्रगल्भ नैतिक जाणिवेचा आविष्कार म्हणूनही या कादंबऱ्या लक्षवेधी ठराव्यात. नैतिकता ही संज्ञा वैयक्तिक मूल्यविचार यादृष्टीने नेमाडे वापरतात. ऱ्हासशील समाजात बरेचजण आपला वैयक्तिक मूल्यविचार टिकवून ठेवण्यासाठी धडपडतात. हा मूल्यविवेक जगण्यातल्या अनुभवातून मिळतो. आत्मचरित्रात्मक लेखनाचा घाट निवडून जीवनातल्या अस्सल अनुभवांना सर्जक कल्पनाशक्तीच्या आधारे मांडणारी कादंबरी लिहिण्यातून नेमाडे यांचा मूल्यविचार दिसतो. व त्यांचीच नैतिक भूमिकाही प्रत्ययास येते. जगण्याची आणि वाङ्मयातून प्रकट होण्याची ही भूमिका चतुष्टयातून व्यक्त होते. जगण्यातला मूल्यविवेक जपणारे नायक, नायिका, मूल्यविवेक असणारी पात्रे, मूल्यविवेक न पाळणारी पात्रे यांचे दर्शन नेमाडे घडवतात. वैयक्तिक मूल्यविचार टिकवणारी माणसे त्यांच्या मानवतावादी भूमिकेसह उठून दिसतात. मूल्यांचा ऱ्हास होत जाणाऱ्या भोवतालच्या वास्तवात मूल्यप्रधान कृतिशीलता जपणारी पात्रे नेमाडे यांनी निर्माण केली आहेत. मूल्यऱ्हासाच्या विरोधात उभी राहणारी ही माणसे हेच चतुष्टयातील कथानकाचे बलस्थानही ठरू शकेल.

चांगदेव चतुष्ट्यातील मूल्यऱ्हासाचे स्वरूप नेमाडे समकालीन शिक्षणक्षेत्राशी संबंधित आहे. या क्षेत्रातही भयावह आणि बिकट परिस्थिती व त्याचबरोबर तेथील मूल्यऱ्हासाची वस्तुस्थिती 'बिढार', 'हूल' 'जरीला' व 'झूल' या चारही कादंबऱ्यांमधून पुढे येते. हे सूत्रच चतुष्टयाचे कथानक आशयघन व अर्थपूर्ण बनवते. चांगदेव पाटील या इंग्रजीच्या प्राध्यापकाच्या तृतीय पुरुषी निवेदनातून आणि त्याच्याच नजरेतून मुंबईतील साहित्यिक चळवळ, शिक्षणक्षेत्र यांचे वास्तव दर्शन घडविण्यावर नेमाडे यांचा भर आहे. मुंबई, अहमदनगर, धुळे, औरंगाबाद अशी एक स्थळयात्रा चतुष्टयात बघता येते. इथे स्थळं महत्त्वाची नाहीत. माणसांच्या प्रवृत्ती महत्त्वाच्या आहेत. ही मानसिकता महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातली आहे. वेगवेगळ्या थरातल्या व्यक्तिरेखा, त्या त्या ठिकाणचा समाज, रुढ असणाऱ्या समाजव्यवस्था, व्यक्तींच्या क्रियाप्रतिक्रिया, या व्यवस्थांची येणारी जाण, त्यातून मुक्त होण्याचा केलेला प्रयत्न, त्यासाठीचा संघर्ष या सर्वांमधून एका वास्तव जगाची निर्मिती होत जाते. हे जग कसे आहे यांचा

अंदाज विविध प्रसंगांमधून येत जातो. चांगदेव चतुष्टयाचा कोणता आशय कादंबरीच्या केंद्रस्थानी येत जातो, हे बघितले तर महाराष्ट्रामधील उच्चशिक्षित क्षेत्रातील घटनाघडामोडी मध्यवर्ती सूत्र बनत जातात. स्थळे वेगवेगळी आहेत त्याअर्थी शिक्षणसंस्था भिन्न भिन्न आहेत. विविध शिक्षणसंस्थांचे हे चित्रण तेथील व्यक्तींच्या व घडणाऱ्या प्रसंगांच्या माध्यमातून उभे केले जाते. तेच या चतुष्ट्याचे आशयद्रव्य आहे. मूळ शैक्षणिक माध्यमातून उभे केले जाते. तेच या चतुष्टयाचे आशयद्रव्य आहे. मूळ शैक्षणिक उद्दिष्टये कागदावर ठेवून प्रत्यक्ष व्यवहारात या उद्दिष्टांशी फारकत घेणाऱ्या संस्था, एखादी चौकडी सोबत घेऊन एकाहाती सत्ता ठेवून केला जाणारा दमनशक्तीचा वापर, अधिकार आणि सत्ता टिकवण्यासाठी महाविद्यालय, विद्यापीठ, शासन या वेगवेगळ्या स्तरावरून स्वतःचे अस्तित्व टिकविण्याचा केलेला आटापिटा, आपला अधिकार गाजवण्यासाठी भिन्न भिन्न जातींचे गट आधारासाठी घेऊन शैक्षणिक संस्थांमधील गटबाजीला मिळणारे प्रोत्साहन, एकमेकांवर केल्या जाणाऱ्या कुरघोड्या, जातीपातीची गणितं. मांडून केले जाणारे राजकारण आणि या सर्वांमधून अनैतिकतेची बोकाळलेली प्रवृत्ती स्वार्थी मतलबाच्या पलीकडे जात नाही. चतुष्टयात चांगदेवाला भेटलेली बहुतांशी माणसे अशी आहेत. अनैतिकतेचा संदर्भ आचरणाशी आहे. आपण कोणती मूल्ये मानतो त्यात माणसांचा आत्मसन्मान, भेदरहित समाजरचना, सामाजिक परिवर्तन, स्वातंत्र्य, समता बंधुत्व यांच्याशीही या मूल्यविचाराचा संबंध येतो. सगळेच भ्रष्ट नसतात. स्त्रीपुरूष नातेसंबंध, आर्थिक भ्रष्टाचार याच्याही पलीकडे सहसंवदेनेचे विश्व असते. सहअस्तित्व विचार असतो. केशव सद्रे यांनी ही भूमिका नेमकेपणाने मांडली आहे. ''चांगदेव पाटीलचा आणि त्याच्या समविचारी सहकाऱ्यांचा जो काही मूल्यविवेक आहे त्याचे प्रत्यक्ष रूप म्हणजे या कादंबऱ्यांतील घटनाप्रसंग आणि त्यांच्या प्रतिक्रिया. हा विशिष्ट आशय आणि त्याला अनुरूप अशी निवदेनपद्धती निवडण्यातून नेमाडे परिस्थितीवर जे भाष्य करतात, जीवनविषयी त्यांची जी जाण व्यक्त होते. ती त्यांची नैतिक भूमिकाही स्पष्ट करणारी आहे. नेमाडे गेली ३६ वर्षे विद्यार्थी व प्राध्यापक म्हणून ज्या शिक्षणक्षेत्रातशी संबंधित आहेत, त्यातल्याच ऱ्हासशीलतेचे चित्रण त्यांच्या कादंबऱ्यांतून झाले आहे. विशेष म्हणजे हे शिक्षणक्षेत्र एकूण समाजजीवनापासून वेगळे काढता येणार नाही. जुन्या परिभाषेत ब्रह्मांडी ते पिंडी आणि पिंडी ते ब्रह्मांडी असे एकूण समाज आणि शिक्षणक्षेत्र व त्यातील व्यक्तींचे नाते आहे. अशावेळी शिक्षणक्षेत्रात व एकूण समाजात चालू असलेली जातीयता, धर्मांधता, भ्रष्टाचार, शोषणादि पापांमध्ये ज्यांना सहभागी व्हायचे नाही, ज्यांच्या नैतिकतेमध्ये यातल्या कोणत्याही गोष्टी बसत नाहीत. त्यांनी काय करायचे हा मूलभूत प्रश्न शेवटी जगायचे कसे आणि कशासाठी या अस्तित्वाच्या मूळ प्रश्नाशीच जाऊन भिडतो. जीवनातील हा मूलभूत प्रश्न त्यांच्या स्पष्ट अस्पष्ट संदर्भचौकटींनिशी नेमाडे या कादंबऱ्यांमधून मांडतात''[१] सद्रे यांची ही मांडणी गांभीर्याने विचारात घेतली तर चांगदेव पाटीलच्या कहाणीतील अनेकविध तपशीलांचे अर्थ उलगडत जातात. कोल्हापूरला केसकर नावाच्या ब्राह्मण समजून ते त्याला 'आपला' मानतात. इतरांना कल्चर नाही असे म्हणतात. त्यातून ऱ्हासाकडे वळणारी मानसिकताच प्रत्ययाला येते. याउलट सुलतानच्या फलाटीवर भाईचारा दिसतो. महाविद्यालयात जाणवणारी जातीय मानसिकताही इथे लक्षात येते. अशा वातावरणात मुलांना शिकवणे एवढीच कृती चांगदेव किंवा नामदेवच्या हाती राहते. खरे तर ऱ्हासशील समाजात कुठलीही कृती अनैतिकच ठरत जाते. लड्डा नावाच्या गुंड पोराला मारून स्टाफरूममध्ये आल्यानंतर आपण सगळे मिळून एकत्रित घरी जाऊ असे अन्य प्राध्यापकांचे मत पडते. पण अशाप्रसंगी एकट्याने या प्रसंगाला तोंड देण्याची भूमिका चांगदेव स्वीकारतो. चांगदेवच्या वैयक्तिक मूल्यविवेकावर यातून प्रकाश पडतो. दिवसेंदिवस समाज रोगट होत आहे. त्यावर खात्रीशीर इलाज सापडत नाही. पण समाजसन्मुख राहून, समाजसापेक्ष राहून या ऱ्हासशील व्यवस्थेत तग धरण्याची उमेद चांगदेव-नामदेव नैतिकतेच्या बळावर टिकवून ठेवताना दिसतात. आपल्या या नायकांच्या बरोबरीने अन्य व्यक्तिरेखांचे जागणेही छोट्या छोट्या गोष्टीतून ध्यानात घेता येते. नळांना मोटारी बसवून सगळे पाणी आपल्यासाठीच खेचून घेणारे मारवाडी, वर्षानुवर्षे एकच पेपर शिकवणारे व छोटे वर्ग आपल्याकडे घेणारे प्राध्यापक, बायकोकडून चांगदेववर विम्याच्या प्रवेशाच्या प्रपोजलचा प्रयोग करणारा सहकारी, भरपूर लाच खाऊन झाल्यावर जास्त वेळ देवपूजा करणारा व बायकोला सरकारी जीप वापरायला देणारा इंजिनियर, सारंगची पहिली कादंबरी प्रकाशित करून गोडावूनमध्ये ती दाबून टाकणारा प्रकाशक, एकच लेख काही काळानंतर पुन्हा छापून विचारवंत म्हणविणारा संपादक ही सारी व्यक्तिकेंद्रित सामाजिक मूल्यऱ्हासाचीच उदाहरणे आहेत.

या साऱ्या मूल्यऱ्हासाच्या पसाऱ्यात नैतिकतेची व मूल्यविवेकाची चाड असणारी माणसेही भेटतात. 'बिढार'मधल्या रामरावांची विधाने यासंदर्भात पुरेशी बोलकी आहेत. ''तुम्हाला कुणालाच काही सिरिअसनेस नाही. नुसते

अनुक्रमणिका

कोरड्या बुद्धीच्या गप्पा मारता. तुम्हाला कुणाला आईबापांची काळजी नाही, कुणाला बहिणींची लग्नं करण्याची जबाबदारी नाही. निव्वळ तर्कावर खेळत राहायचं. बाहेर किती जातीयता. प्रांतीयता, वशिलेबाजी किती घाण आहे? तुम्ही ते सगळं टाळून निव्वळ काल्पनिक जगात वावरता. (बिढार) रामरावांची ही विधाने चांगदेवसारख्यांच्या मनावर परिणाम करू शकणारी आहत. भोवतालच्या वास्तवात चांगल्या व्यक्तीही भेटतात. पवार, शिरसीकर, शब्बीर, पाटील, चिपळूणकर, गोपाळ देशपांडे वगैरे. ही मंडळी वेगवेगळ्या जातीधर्माची आहेत. हे सत्य असूनही जातीयतेची कीड, जातीयतेचा चिखल सर्वत्र पसरलेला आहे. या किडलेपणाबरोबर चांगदेवला संघर्ष करण्याशिवाय पर्याय राहत नाही. समविचारी सज्जनांचे समर्थ संघटन करता येते का, त्यांच्याशी आपली नाळ जोडता येते का? या दिशेने त्याची वाटचाल होत राहते. सामाजिक व शैक्षणिक मूल्यऱ्हास या मांडणीतून पुढे येत राहतो. चांगदेवचे वेगवेगळ्या निमित्ताने व्यक्तींशी येणारे संबंध आंतरव्यक्तीय परिमाणांमधील सामाजिकतेचा विचार करण्यास प्रवृत्त करतात. भोवतालच्या मूल्यऱ्हासात स्वतःचे अस्तित्व टिकवणे ही अग्नीपरीक्षाही असते आणि सत्त्वपरीक्षाही. कामपीडित गुप्तेबाईंकडे जायचे की नाही याचा निर्णय करताना चांगदेवला तिच्याकडे जावेसे वाटत नाही. ट्रान्सफार्मरचा स्फोट झाल्यानंतरच्या काळोख्या रात्रींमध्ये जर चिठ्ठी आली असती तर वेगळे काही घडले असते. का? याचे उत्तर आपल्यालाच शोधावे लागते. पिसाळलेल्या कुत्र्याला ठार मारण्याचा एक प्रसंग झूल मध्ये येतो. कुत्रे पिसाळले म्हणून त्याला ठार मारलेच पाहिजे असे नामदेव व चांगदेव ठरवतात. या प्रसंगाला प्रतीकात्मक विचारही करता येतो. पिसाळलेल्या कुत्र्याचे अस्तित्व इतरांना घातक ठरू शकते, नगरपालिकेचे लोक तर बेपर्वा असतात. चांगदेव लाकडाचे दोन फटके मारीत त्याला आडवे करून त्याच्या डोक्यात दगड घालतो. समाजातील पिसाळलेपणाची मनोवृत्ती व मानसिकता अशीच नष्ट करावयाच हवी, याचेही सूचन त्यातून होते. पण त्याचबरोबर जगण्यात अनेक चांगल्या गोष्टी आहेत याचे कितीतरी दाखले चांगदेवच्या 'बिढार' व 'हूल' मधील चिंतनातून जाणवतात. त्याचा तपशील इथे देण्याची आवश्यकता नाही.

शैक्षणिक क्षेत्रातल्या अपप्रवृत्तींचा विचार चतुष्ट्यामधून अगदी टोकदारपणे पुढे येतो. शिक्षणव्यवस्था अशी की, तिथे अशैक्षणिक व मूल्यहीन वातावरण आहे. सामाजिक मूल्यऱ्हासाचे चित्र याच क्षेत्रात बघण्यास मिळते. नैतिकतेची बाधिलकी न स्वीकारणे शिक्षक ज्या शिक्षणक्षेत्रात आहेत, तिथून बाहेर पडणारे उद्याचे नागरिक तरी कोणत्या दर्जाचे असणार? या अपप्रवृत्तींचा धुडगूस, संस्थाचालकांची फॅसिस्ट वृत्ती, सदोष परीक्षा पद्धती, पाट्या टाकणारे अध्यापक, कॉप्या, मोर्चे, गोंधळ, मुलामुलींच्या भानगडी... एकूण सारा विसंवाद. ''रोज घराबाहेर पडताना आपण काही तरी अमंगळ काम करायला निघालो आहोत अशी भावना व्हायची.'' हे चांगदेवच उद्‌गार या अमंगळ व ऱ्हासशील संस्कृतीतील नैतिक जाणीव कसोशीने सांभाळणाऱ्यांचे प्रतिनिधिक उदगार ठरतात. स्वार्थ, संधीसाधूपणा, दृष्टीहीनता. अडाणीपणा याचे असंख्य दाखले शिक्षणक्षेत्रात कसे दिसतात ते या चतुष्टयातून लक्षात घेता येते. संस्थेची दहशत, अनैतिक प्राध्यापकांची चलती, पगारापुरते शिवणारे शिक्षक, संस्थाचालक पुढाऱ्यांचे लांगूलचालन करीत प्रमोशन लाटणाऱ्या प्रवृत्ती ही आत्मवंचना करणारी नपुंसक, भेकडवृत्ती ऱ्हासशीलतेचे प्रत्यंतर देते. या शिक्षणक्षेत्रातल्या बकालपणाला नेमाडे यांनी समोर कॅमेरा धरून टिपले आहे, हे मॅटर ऑफ फॅक्ट आहे असे भाऊ पाध्ये म्हणतात ते खरेच आहे.

सामाजिक मूल्यऱ्हास या दृष्टीने चांगदेव चतुष्टयाला विचार करताना जातीयवादाचा मुद्दाही विचारात घ्यायला हवा. आपली संस्कृती बहुजिनसी असल्याने एकोप्याने राहण्याची परंपराही अस्तित्वात आहे. तेथील संतपरंपरा, सुधारकांची परंपपरा यांनीही या एकोप्याचेच समर्थन केले आहे. चतुष्टयामध्ये जातिव्यवस्थेसंबंधी नेमाडे लिहीत नसून जातीयतेविरुद्धची मांडणी करीत आहे हे लक्षात येते. आपण कुणाशी बांधील नाही. आपल्याला घरदार नाही. जातीधर्म नाही. कोणतेही खुंटदावे नाहीत. आईबापांचा. स्वग्रामाचा, स्वसंबंधीचा आपण त्याग केला आहे, अशी जातिधर्मनिरपेक्ष भूमिका घेत चांगदेवची वाटचाल होते. या व्यवस्थेतील प्रतिगामीपणावर चांगदेवच्या रूपाने नेमाडे प्रहार करतात. विविध व्यक्तिरेखांची सुनियोजित मांडणी, घडवून आणलेल्या चर्चा आणि विविध प्रसंगांतून दिसणारी त्या त्या पात्रांची वर्तणूक यांच्या आधारे चतुष्टयातील जातीयतेसंबंधीचा विचार व्यक्त होतो. प्रतिगामी प्रवृत्ती आणि त्यातील सूक्ष्म स्तर यांचे दर्शन त्यातून प्रत्ययास येते. ''नेमाड्यांनी बिढार ते 'झूल'पर्यंतच्या प्रवासात जातीयवादाची कठोर आणि चिकित्सक परंतु तितकीच समतोल मांडणी करून जातीव्यवस्थेचे नवे आकलन-मांडले आहे. नेमाड्यांच्या वास्तवादी प्रवृत्तीचे हे महत्त्वाचे आविष्कारतत्त्व ठरावे.''[१] हे किशोर सानप यांचे आकलन महत्त्वाचे वाटते. चांगदेव एक प्राध्यापक असला तरी तो एक सामान्य माणूस आहे. त्याच्यावर महानुभाव, वारकरी विचारांचे संस्कार आहेत. या

अनुक्रमणिका

सत्त्वशील परंपरेशी त्याची नाळ घट्ट बांधलेली असल्याने तो सर्व जातीधर्माच्या लोकांमध्ये समविचारी माणसाचा शोध घेताना दिसतो. माणूस केंद्रस्थानी ठेवून जगण्यातली सार्थकता शोधण्याची त्याची वृत्ती असल्यानेच अनैतिक गोष्टींविरुद्ध तो त्याच्यापरीने कृती करतो. आडनावावरून व नातेसंबंधांवरून जातीचा शोध घेणारे लोक चांगदेवला भेटले आहेत. साहित्याचे क्षेत्रही त्यापासून अलिप्त नाही हा त्याचा अनुभव आहे. जात बघूनच विद्यार्थीही कुणाला त्रास द्यायचा हे ठरवतांना त्याला आढळतात. ही जातीयता केवळ उच्चवर्णीयांमध्येच आहे, असेही नाही. बहुजनातही त्याची लागण झाल्याचे तो पाहतो. असे असूनही आपण जातीभेद कसे मानत नाही हे दर्शविण्याचा बेगडीपणाही चांगदेवला आपल्याभोवताली दिसून येतो. जातीयतेची ही घाण, त्यातल्या छुप्या प्रवृत्ती, बेगडी व दुटप्पीपणाचे वर्तन, 'जातीसाठी माती खावी' या म्हणीला जागणारे लोक यातून तयार झालेली जातीयतेची घाण म्हणजे सामाजिक मूल्यऱ्हासाचे ठळक उदाहरण आहे. 'झूल'मध्ये प्रकर्षाने त्याचे दर्शन घडवले जाते. जातीयतेला थारा मिळू नये असे मानणारे चांगदेव, नामदेव भोळे, चांगला देशपांडे जातीय प्रवृत्तीच्या व्यक्तींबरोबर चर्चा करताना दिसतात. आपली भूमिका चर्चेतून मांडताना दिसतात. ब्राह्मण-मराठा-मुस्लिम-दलित अशा चौकोनी जातधर्म वास्तवातून हा मूल्यऱ्हास माणसामाणसांमध्ये कसे अंतर पाडतो आहे, याची मांडणी नेमाडे यांनी केलेली आढळते. या 'जातीयतेला विरोध करणाऱ्यांची एक नवी जात आहे' व ती वाढवली पाहिजे असे नामदेव भोळेंना वाटते. तो मेघेंना ते बोलूनही दाखवतो. समाजशास्त्रीय चिकित्सेची नामदेवची भूमिका परिवर्तनाच्या दिशेने विचार करायला वाचकांना प्रवृत्त करते. जातीच्या भिंती तोडणारी ही प्रवृत्ती 'भेदाभेद भ्रम अमंगळ' या सत्त्वशील परंपरेच्या धाग्याचे उन्नयन करणारी आहे. नामदेव-मेघे यांच्या संवादातील एक भाग मूल्यऱ्हासाच्या विरोधात उभे राहणाऱ्यांची मानसिकता व्यक्त करणारा आहे. हा संवाद असाः ''तुम्ही तुमच्या स्वतःच्या जातीपलीकडे पाहायलाच तयार नाही. मला स्वतःला धनगर म्हणून किती अपमान सहन करावे लागले हे तुम्हाला सांगू काय? म्हणून मी फक्त माझ्याच जातीसाठी झगडावं याच्यासाठी आणखी कोणती जातीयता आहे? आपण सगळेच मुक्त होत आहोत. दलितांना मुक्त करणं जितकं आवश्यक आहे तितकंच ब्राह्मणांना, तितकंच मराठ्यांनाही मुक्त करणं आवश्यक आहे असं तुम्हाला वाटत नाही? ही प्रक्रिया आपल्या पिढीतच सुरू झाली आहे. शहरातून ते होतच आहे थोडंफार. हळूहळू होत आहे. खेड्यातून काहीतरी जोरात केले पाहिजे.'' (झूल, पृ. ८६) बुद्धिवाद्यांनी अशाप्रकारची भूमिका घेऊन ती आपल्या अध्यापनातून रुजविण्याची आवश्यकता चांगदेव चतुष्टयातून पुढे येते. महानगरे, निमशहरी गावे, तालुके, इथे जाणवणाऱ्या जातियतेचे चटके अनुभणाऱ्या चांगदेवला नामदेवाची मिळालेली जोड आणि त्याची वास्तवाभिमुख चिंतनशील वृत्ती यामुळे चातुष्टयाला एक अर्थपूर्णता लाभते. सामाजिक मूल्यऱ्हासाच्या विरोधात जाऊ पाहणाऱ्यांचे वर्तन प्रवाहविरूद्ध पोहणाऱ्यांसारखे असते. चांगदेव-नामदेव व समविचारी मित्रांचा कंपू त्याच दिशेने जाण्याचा प्रयत्न करतो. मूल्यधिष्ठित प्रवृत्तींचा, अनैतिक प्रवृत्तींविरुद्धचा संघर्ष भालचंद्र नेमाडे यांनी चांगदेव चतुष्टयातून साकारला आहे. त्यांचे कालसापेक्ष लेखनाचे व चिंतनाचे भान त्यातून प्रकटते. सामाजिक मूल्यऱ्हासाची इतरही उदाहरणे चांगदेवचतुष्टयातून शोधता येतील. त्याचे कारण चतुष्टयाची रचना चर्चात्मक स्वरूपाकडे जाणारी आहे. त्याचे अनेक स्तर आहेत. त्यात खूप बारीकसारीक मुद्दे आहेत. उदा. शेजवलकरांचे पेशवाईवरचे लेखन, साहित्य परिषद, संगीत, चित्रपट, भाषेची शुद्धाशुद्धता, संतपरंपरेचे जातीय प्रवृत्तीने मूल्यमापन, तमाशा इ. विषयीची त्यांची मते चतुष्टयातून व्यक्त होतात. सामाजिक मूल्यऱ्हासाचे चित्रण त्यातून होते व त्यावरच्या उपयायोजनांमधील एक मार्गही त्यातून सूचित होतो.

कलावंत द्रष्टा असतो असे म्हटले जाते. चांगदेव चतुष्टयाची निर्मिती १९७५ ते १९७९ मधील आहे. पण त्यातील चिंतनाचा धागा साठोत्तरी समाजवास्तवाशी निगडीत आहे. आपल्या समकालीन जीवनाला थेट भिडण्याची ताकद या चारही साहित्यकृतींमध्ये आढळते. पुरोगामी-प्रतिगामी या संकल्पना आज तरी अस्पष्ट झालेल्या दिसतात. डावे आणि उजवे यातील योग्य कोण? हा आजघडीला पडणारा प्रश्न आहे. बहुजनांमध्ये अभिजन तयार होत जाण्याची प्रक्रियाही वेगाने पुढे जात आहे. स्वातंत्र्योत्तरकालीन समाजवास्तवाला १९८० नंतर छेद गेला. नव्वदीनंतरचे वास्तव चंगळवादी संस्कृतीत परिवर्तित झाले. जातीयतेचे प्रश्न अजूनही शिल्लक आहेत. भालचंद्र नेमाडे यांच्या समकालीन असणाऱ्या शिक्षणक्षेत्रातील वास्तव अधिक भेसूर झाले आहे. भालचंद्र नेमाडे या द्रष्ट्या साहित्यिकाने आपल्या कादंबरीतून या भयाण वास्तवाची दाहकता दाखवून दिली. सामाजिक मूल्यऱ्हासाची धोक्याची घंटा नैतिकेच्या विचारव्यूहातून पुढे आणली. पण आपली एकूण व्यवस्थाच अशी की, एखाद्या धक्का देणाऱ्या कादंबरी बहुअंगी चर्चा करून तिचे मोठेपण सिद्ध करायचे आणि त्यानंतर मूलभूत विचार मांडणाऱ्या त्या लेखकाच्या

अनुक्रमणिका

निर्मितीतील नंतरच्या मूळ गाभ्याला हद्दपार करीत त्याची निर्मिती अनुल्लेखाने मारायची. नेमाडे यांचे भाग्य थोर की, चतुष्ट्याविषयी काही उलटसुलट प्रतिक्रिया तरी व्यक्त झाल्या. शिक्षणव्यवस्थेतून काही प्रबंधांची ही निर्मिती झाली. काहींनी त्याचा गंभीरपणे विचार करून त्याविषयी गंभीर मांडणी करण्याचा प्रयत्न केला. जर ज्या काही थोड्याफार गोष्टी झाल्या त्याचे कारण भालचंद्र नेमाडे यांनी ऱ्हासशीलतेविरूद्ध घेतलेल्या नैतिक भूमिकेला देता येईल. त्यांच्या लेखनाचे मूल्यमापन होताना केवळ एका कादंबरीपुरता विचार करून थांबता येईल असे वाटत नाही. सामाजिक मूल्यऱ्हास हा सर्वसामान्यांचा प्रश्न आहे. नेमाडे यांचे कादंबरी लेखन साहित्य निर्मितीला मूल्यांच्या पातळीवर नेऊन जबाबदारीने केलेला प्रगल्भ आविष्काराचा प्रयत्न होता. त्यांनी काळाचा कानोसा घेतला होता, काळाची पावले ओळखून सकस निर्मितीकडे वाटचाल केली होती. चतुष्ट्यातील चर्चा वांझोट्या नव्हत्या त्यातून एक सजग वास्तवाला आव्हान दिलेले होते. ते सामाजिक मूल्यऱ्हासाचे कुरूप चित्र पुसून टाकण्याचे स्वप्नही या चतुष्टयाने दाखवले. या ऱ्हासशीलतेचे अधिक गडद रूप आज आपल्यासमोर आहे. पण हे यापूर्वीच भालचंद्र नेमाडे यांनी दाखविले होते. म्हणून तर ते दृष्टे कादंबरीकार ठरावेत. पण त्यांच्या देशीयतेच्या भूमिकेला पुनःरुज्जीवनवादी ठरवीत एक विधायक विचारांची दिशा कुंठित करण्याची भूमिकाही काही तथाकथितांनी स्वीकारली आणि चांगदेव चतुष्टयाला पुरेसा न्याय मिळू शकला नाही. मराठी कादंबरीला आशयद्रव्य, तंत्राविष्कार, सर्जनशीलतेचा भाषेच्या माध्यमातून वापर, सामाजिक मूल्यविचार, नैतिकता, सामाजिक बांधिलकी अशा चहुअंगाने रूप देण्याचा प्रयत्न भालचंद्र नेमाडे यांनी केला. सकारात्मक च विधायक अशा सामाजिक मूल्यांच्या आधारे विवेकाचे भान जागे ठेवून सकस अभिव्यक्ती करता येते, हे त्यांनी चांगदेव चतुष्ट्याच्या लेखनातून दाखवून दिले. कादंबरीकार समाजाला सतत अस्वस्थ करीत जागे ठेवत असतो, जी नेमाडे यांची धारणा चतुष्ट्यातही प्रत्ययाला येते. सामाजिक मूल्यऱ्हास हा चतुष्ट्याचा गाभा असल्याने ही धारणा अधिक पक्की होत जाते. लेखकाचे समकालीन वास्तव, सामाजिक घडामोडी आणि विधायक विचारसरणी यांच्याशी तादात्म पावणारे हे चतुष्ट्य सामाजिक मूल्यऱ्हासाविरुद्ध उभे राहून पुढील काळातील त्याविरुद्धच्या संघर्षासाठीच्या नव्या शक्यता खुल्या करीत जाते, याविषयी खात्री बाळगायला हवी.

संदर्भ :

१) नेमाडे भालचंद्र, 'कादंबरीकार आणि रूपाचे भान', नवभारत (सप्टेंबर २०००), वर्ष ५३.


२) गवस राजन, चांगदेव चतुष्टयासंबंधी (२००१), पृ. १४.

३) सद्रे केशव, नेमाडे यांचे साहित्य एक अन्वयार्थ (१९९३), पृ. ३२.

४) सानप किशोर, भालचंद्र नेमाडे यांची कादंबरी एक चिकित्सा (१९९६), पृ. १५८.

। डॉ. सतीश वडवे

विभाग प्रमुख,
भाषा व वाङ्मय विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.
औरंगाबाद
भ्रमणभाष ९१५८९९७७९७, ९८९०९६५५७६



वसंत आबाजी डहाके विशेषांक

(जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१२)

।। सहभाग ।।

प्रा. रा. ग. जाधव, प्रा. वसंत आबाजी डहाके, डॉ. प्रभा गणोरकर, प्रा. माणिक कानेड, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, डॉ. आशा सावदेकर, डॉ. प्रमोद मुनघाटे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. मोना चिमोटे, रवींद्र इंगळे चावरेकर, संजय गणोरकर.

पृष्ठ १००, किंमत ५० रुपये.


ग्रेस विशेषांक

(जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०१२)


।। सहभाग ।।

डॉ. प्रभा गणोरकर, रामदास भटकळ, डॉ. निशिकांत मिरजकर, वीणा आलासे, डॉ. द.भि.कुळकर्णी, प्रा. नारायण कुळकर्णी कवठेकर, डॉ. माधवी वैद्य, डॉ. सतीश बडवे, प्रा. वसंत पुरके, शुभा गोखले, कुमार गोखले, डॉ. मनोज तायडे, डॉ. आशा सावदेकर, डॉ नंदकुमार मुलमुले, डॉ विमल भालेराव, डॉ. तीर्थराज कापगते, हेमंत कर्णिक, डॉ. माधवी देसाई, शशिकांत सावंत, डॉ. शुभांगी पातुरकर, प्रा. देवानंद सोनटक्के, गो. ना. मुनघाटे, माधवी ग्रेस, मनोज कुलकर्णी, अनिल कुलकर्णी, स्मिता लाळे, अॅड्. वासुदेव विधाते.

पृष्ठ १८०, किंमत १०० रुपये.



संपर्क सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, नागपूर ४४००१२
दूरध्वनी ०७१२-२५२३९२९, २५५३७६७



पांडुरंग ते खंडेराव व्हाया चांगदेव

प्राचार्य डॉ. महेंद्र कदम

■

''कादंवरी हे फक्त वास्तवाचा शोध आणि त्याच्या दिशेची ओळख याचं आख्यान नाही. ते शक्यतांच्या शोधांचे आख्यानसुद्धा आहे. समकालीन मर्यादांच्या आकलनातून त्यापल्याड जाण्याची आकांक्षा कादंवरीत असते. ती भविष्यलक्ष्यी असल्याने त्यातून दुनियेच्या मांडणीचाही प्रयत्न होत असतो'' - मॅनेजर पांडेय

'कोसला' (१९६३) ते 'हिंदू' (२०१०) या नेमाड्यांच्या कादंबऱ्यांनी तब्बल पंचावन्न ते साठ वर्षांचा कालखंड पाहिलेला आहे. या कालखंडात त्यांच्या सहा कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. पैकी 'कोसला' नंतर 'बिढार' 'हूल' या १९७५ मध्ये, 'जरीला' १९७७ मध्ये, 'झूल' १९७९ मध्ये आणि 'हिंदू' २०१० मध्ये प्रकाशित झाल्या आहेत. या काळाचे समग्र भान कादंबरीत व्यक्त होताना नेमाड्यांनी जे प्रतिनायक, नायक उभे केले, त्यांची विचारधारा, विकासाची सरणी काय स्वरूपाची होती याचा शोध घेताना हे नायक समकालाला कसे सामोरे गेले, याचाही विचार येथे अभिप्रेत आहे.

'बाई मृताचे धर्मः जिवंता प्रतिः कैसे निरुपावे' असे म्हणतच 'कोसला' मधील पांडुरंग सांगवीकर आपली काहाणी वयाच्या पंचविसाव्या वर्षी सांगायला लागतो. या व्यवस्थेने आपल्याला कोसल्यात कसे बंद केले आहे याचे आख्यान तो रचतो. हाच पांडुरंग कथासरित्सागरातील योगानंदाच्या गोष्टीतील इंद्रदत्ताप्रमाणे चांगदेवाच्या शरीरात प्रवेश करून 'बिढार' पाठीवर घेऊन पुन्हा गाव सोडतो. मुंबईत येऊन लिहण्या-वाचण्याच्या, मासिक काढण्याच्या काही चळवळी करतो. एकदा मोठ्या आजाराजून मृत्यूलाच 'हूल' देऊन वाचल्यामुळे प्राध्यापक होतो. पण वर्षभरात त्यातली गंमत नाहीशी होते. तरीही पर्याय नाही म्हणून गांव बदलत आपला 'जरीला' होऊ नये म्हणून धडपडतो. परंतु ही व्यवस्था त्याला दाबून टाकून 'जरीला' बनवते. म्हणून मग 'हा अवघा डोंगरू पोकळ असे' असे मनाशी पक्के करून 'झूल' पांघरून घेतो. पण शेवटी 'आतून' पार मोडून पडतो. पांडुरंग आणि चांगदेवची वाढ संपूर्णपणे खुंटल्यावर ते दोघे मिळून खंडेरावच्या शरीरात प्रवेश करतात. आणि जगण्याच्या समृद्ध अडगळीत आपल्या 'हिंदू' असण्याचा शोध येऊ लागतात.

'कोसला'तला पांडुरंग हा साठच्या दशतकातला आहे. नुकतंच महाराष्ट्र स्वतंत्र राज्य म्हणून घोषित झाल्याच्या आणि शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर पांडुरंग उभा आहे. तो ज्या गावातून आला आहे, त्या गावाला असणारी वारकरी आणि महानुभाव परंपरा पांडुरंगला आकर्षित करीत आल्यामुळे या परंपरेचा तो धांडोळा घेत वर्तमान वास्तव आणि वाङ्मयीन पर्यावरणातील रोमंटिक प्रवृत्तीला विरोध करतो.

अनुक्रमणिका

साठपूर्वीच्या मराठी साहित्याची जी कलावादी भूमिका होती तिचा उपरोधातून आणि उपहासातून पांडुरंग खरपूस समाचार घेतो. 'पिपांत मेले ओल्या उंदीर' या ओळीचे 'ओल्या पिपांत मेले उंदीर' असं सुलभीकरण करून तो मर्ढेकरांच्या कवितेतील न्यून उघडे पाडतो. याच पद्धतीने तो फटके खांडेकरांच्या अलंकारिक आणि रोमॅंटिक भाषेचाही उपहास करीत राहतो. मुळात शेती परंपरेतून आलेला, शोषणाच्या परंपरा नीटपणे कळू लागलेल्या पांडुरंगला मराठी साहित्य फार खुजे वाटू लागते. त्याच्या प्रत्येक कृतीतून साहित्यातली ही संघर्ष-निरगाठ, उत्कंठा-उकल प्रवृत्ती सातत्याने चव्हाट्यावर येत राहते. प्रमाण आणि अलंकारिक भाषेच्या बळावर उभी राहू पाहणारी वाङ्मयीन संस्कृती नाकारतानाच पांडुरंग प्रत्यक्ष जगण्याच्या पातळीवर दावेगिरीही नाकारत जगतो. यामुळेच तो स्वार्थी बापासह अनेक मित्रांना वेळोवेळी फटकारत स्वतःच्या पद्धतीने जगू पाहतो.

व्यक्तिमत्त्व कमावणे, उत्तम गुण मिळवणे, उत्तम कलावंत होणे या ज्या मध्यमवर्गीय शहरी मानसिकता अवती-भोवती वाढू लागल्या होत्या त्या सर्व मानसिकता किती उथळ आणि भंपक आहेत, याची प्रभावी मांडणी पांडुरंगच्या माध्यमातून 'कोसला'त होत राहते. 'घरून वडलांचं पत्र आलं, तू मूर्ख आहेस, ज्ञानेश्वरीच वाचायची तर कॉलेजात कशाला जायला हवं? घरी आम्ही वाचतोच की नाही? पण मला हे बरं वाटलं. निदान बी. ए. ला मराठीचा अभ्यास म्हणजे ते ज्ञानेश्वरी ती समजतात. जर आम्हाला अभ्यासाला केशवसुत, मर्ढेकर आणि ना. सी. फडके सुद्धा आहेत हे त्यांना कळलं असतं. तर ते इकडे येऊन म्हणाले असते. सामान भरून घरी चला.' (१०३) किंवा 'पण रमी ग्रेट. वर्गात नोट्स वगैरे भानगडी नाहीत. लयब्रीत तर कधीच नसते. कुठे खेळात नाही. सभेला-बिभेला तर कधीच नाही' (१०६). किंवा 'माणसानं सगळं व्हावं, पण मास्तर होऊन नये. एकानं दुसऱ्याला शिकवणं, हे अगोदरच किती भयानक' (१०९) किंवा ''खानोलकर विचारायचा-माधव जूलियनांना फर्ग्युसन कॉलेजमधून काढून टाकलं, तेव्हाचा त्यांचा इंग्रजी राजीनामा मी कुठेतरी वाचला आहे. किंवा राजकवी तांबे यांची घरी गरिबी होती का? किंवा जॉर्ज इलियट हा टी. एस. इलियटचा कोण?'' (१६९) किंवा हा देशच भिकारी आहे. इथल्या तरुणांना करायला काहीच नाही. सगळं म्हातारं आहे. आणि इथले तरुण पण माझ्यासारखे. चटकन म्हातारे तरच काही समाधानाची आशा (२०६).

एकूणच सभोवतीच्या सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन वास्तवाची अशी उपहासात्मक टीका सर्वत्र पहावयास मिळते. पांडुरंग तसा उपहास आणि उपरोध करण्यात जितका माहीर आहे, तितकाच तो आपल्या 'स्वत्वा'च्या भानाशी सजगपणे बांधलेला आहे. म्हणून तर मनीच्या मृत्यूनंतर तो आपल्या व्यक्तिगत सजगपणे बांधलेला आहे. म्हणून तर मनीच्या मृत्यूनंतर तो आपल्या व्यक्तिगत दुःखाचे बुद्धाच्या दुःखात आणि करुणेत विसर्जन करतो. आणि आई पुन्हा पुन्हा मनीचे दुःख उगाळू लागते तेव्हाही माणूस मेलं की गेलं यांची जाणीव तो आईला देतो.

परात्मता आणि एकाकीपण यावर मनस्वीपणे प्रेम करणारा पांडुरंग दुसरीकडे मात्र महानुभाव परंपरेशी नाते जोडू पाहतो. म्हणूनच गिरधराचा विहंगम मार्ग त्याला अधिक जवळचा वाटतो. पण तो त्या वाटेने जाऊ शकत नाही. गिरधरची किंमत त्याला तो गेल्यावर कळते म्हणून तो म्हणतो, ''आपल्या आयुष्यातही वैताग आहेच, पण वांझोटा'' (२६४). मनासारखं काहीच करता येत नाही. गावकडच्या अडाणी कल्पना आणि शहरातल्या भिकारचोट भंपक दिखाऊगिरीच्या संकल्पना यात पांडुरंगचा 'स्व' कोठेच सामावत नाही. म्हणून मग तो मुकाटपणे खुंट्यावर येऊन थांबणे पसंत करतो. सभोवतालच्या स्थितिशील वर्तमानाची सर्वांगीण चिकित्सा करताना तो स्वतःच कधी परात्म होत गेला हे त्यालाच कळले नाही. परंतु ही परात्मता म्हणजे सर्वस्व नव्हे, याचे भान ठेऊनच हा पांडुरंग पुढे चांगदेवच्या रूपात 'बिढार'मध्ये अवतीर्ण होतो. हे अवतीर्ण होणं अर्थपूर्ण होण्यासाठी चांगदेव एका मोठ्या आजाराच्या दिव्यातून योगायोगानेच बाहेर येतो.

पांडुरंगचा चांगदेव होताना निवेदनही तृतीयपुरुषी बनते. आणि सगळ्या वास्तवाचा उपहास करता-करता स्वतः निष्क्रीय झालेला पांडुरंग चांगदेवच्या शरीरात प्रवेश करतो तेव्हा आलोच आहोत या जगात तर जगून बघूया या भूमिकेतून जगण्याला भिडताना उच्च शिक्षणाच्या सगळ्या परीक्षा नीट देतो. लिहिण्याच्या भानगडीत पडतो. कायम लिहिणं चांगदेवला विनोदी वाटत असल्यामुळे तो अधून-मधून कविता-लेख लिहीत राहतो. आणि वाङ्मयीन अनियकालिकं मित्रांसोबतीनं प्रकाशित करीत राहतो. हे करतानाही शक्य तेवढा पारदर्शीपणा, सचोटी आणि ढोंगाला शिव्या हा सगळ्याच मित्र मंडळीचा आवडता छंद बनतो. या सगळ्या निमित्ताने 'बिढार' मधला चांगदेव लेखक, प्रकाशक, संपादक, वाचक, विक्रेता या सगळ्यांची उलट तपासणी करीत राहतो. या उलट तपासणीत पुन्हा मध्यमवर्गीय वाचकाभिरुची आणि वाङ्मयीन मानदंड कसे कुचकामी तीव्र उपहासाचे रूप घेते भाद्रपदात नवनवी कुत्री प्रयत्न करीत असतात एखाद्या

कुत्रीवर, तेवढ्यात एखादं म्हातारं आडदांड निब्बर कुत्रं मध्ये घुसून ताव मारून निघून जातं. तसं प्रधानचं झालं! खरं म्हणजे सगळीकडे म्हातारी कुत्री बोकाळलीयेत. साहित्य परिषदांत तीच, रेडिओवर बक्षिसांत तीच, साहित्य अकादमी, साहित्य संमेलनात, सगळीकडे हेच बाप्ये मानमुराद. तिकडे नेहरू आणि इकडे साले हे (४१). पण हाच उपहास चांगदेव एक मोठ्या आजारातून बाहेर पडतो तेव्हा काव्यात्म रूप घेतो मी ह्याआधी अत्यंत उमदेपणानं दुःख भोगलं आहे, आता उमदेपणानं हेही आयुष्य तसंच जगू. जीवनाशी संबंध तोडू नको, ते घट्ट बिलगलेलं असतं. आणि प्रत्येक गोष्ट जर प्रचंड खराबी आहे तर मग सगळंच आता खराब समजून आनंदानं जगावं. पूर्वी मृत्यूचा विकार आत्यंतिक होता. आता जगायचा विकार आत्यंतिक म्हणून करायचा. दोन्ही टोकं भानावर राहून पाहून होतील. युद्धाचे दिवस संपले. आनंदोत्सव (९१). चांगदेवची ही स्वीकारशील वृत्ती कादंबरीचे रूप बदलून टाकते. सगळंच नाकारताना येणारी परात्मता आणि खराबीसकट सगळं स्वीकारताना येणारी हतबलता हा मुख्य फरक पांडुरंग आणि चांगदेवमध्ये दिसून येतो.

चांगदेवचे हे स्वीकृतीचे तत्त्व पुढे प्रत्येक गोष्टीत त्याला रस घ्यायला भाग पाडते. पण त्यामुळे तो सक्रीय होतो आणि सर्वच प्रकारच्या अपप्रवृत्तीवर हल्ला करू लागतो. वाङ्‌मयीन पर्यावरण दुरुस्त करण्यासाठी ही सगळी मंडळी वेगवेगळी नियतकालिकं प्रकाशित करतात. लेखक, कलावंत होण्याची आणि झटपट प्रथितयश लेखक होण्याची मनीषा बाळगणारांना फटकारताना चांगदेव म्हणतो, 'भडव्यांनो कसलं एका फटक्यात कलावंत होता. चुलीत घाला साल्यांनो तुमचा घाट आणि आविष्कार. माणसंची माणसंच कशाचा तरी घाट होऊन बसतात. कशाचा तरी आविष्कार होऊन बसतात. बोला. हे बाहेरचे घाट जसेच्या तसे उचलून घालता आले पाहिजेत' (११९) त्याची माणसांकडे पाहण्याची ही वृत्ती सहानुभाव वाढवू लागते. म्हणूनच दारिद्र्य झाकण्यासाठी माणुसकी अंथरणाऱ्या माणसांविषयी त्याला जिव्हाळा वाटू लागतो. कोसल्यातून बाहेर आलेल्या फूलपाखरासारखं तो स्वतःचे रंग नव्याने न्याहळू लागतो. आणि मग आपोआप त्याला जगण्याचे सगळे स्तर कळू लागतात. नारायण हा त्याचा मित्र मध्यमवर्गीय झाल्यावर बदलून गेल्याचे पाहून तो अस्वस्थ बनतो. नारायणच्या रूपाने मध्यमवर्गीय नागरी असुरक्षित कृत्रिम जगण्याचा धांडोळा घेत चांगदेव मुंबई सोडतो. ती सोडताना साहित्य, समाज, संस्कृती यांच्यातही शहरी कृत्रिमता उपहासात्मक रीतीने अधोरेखित करून जगण्याची नवी सहानुभावाची मूल्यव्यवस्था मांडू पाहतो.

मरणाला आणि मुंबईला 'हूल' देऊन तो प्राध्यापक म्हणून एका शहरवजा गावात रूजू होतो आणि त्याचा दुसरा अध्याय सुरू होतो. इथून पुढे मग चांगदेव साहित्याकडून समाजाकडे आणि शैक्षणिक व्यवस्थेकडे झुकून जातो. अर्थात हे झुकणे म्हणजे प्रत्येक वेळी प्रत्येक माणसाला आणि घटनेला चांगदेव वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या दृष्टिकोणात ठेऊन पाहतो आणि मगच त्या-त्या गोष्टी-घटनांची चिकित्सा करतो. इथली शिक्षणव्यवस्था आणि समाजव्यवस्था किती सडली आहे, याचे दर्शन तो घडवतो. जिल्हयाच्या गावाचे चित्रण किती भयंकर आहे त्याचा नमुना

''इथे सगळा अडाणी कारभार आहे. अर्ध गाव मुसलमान आणि मारवाडी. मारवाडी लोक बेटे घरं भाड्यानं देतच नाहीत. त्यांना काय करायचाय पैसा? मुसलमानांना घरंच नसतात. ब्राह्मणांना दुसरे कोणी चालत नाही. मराठ्यांना घरं नीट बांधून पैशे कमवावे ही ब्राह्मणांसारखी विद्या नाही. असं एकूण आहे. पण एकूण सगळ्यांना असं वाटतं की कारा मुलगा घरात आला की आपल्या पोरीच्या निऱ्यांनाच हात घालतोय'(१७९)

एकूणच गावाचा धार्मिक आणि जातीय इतिहास किती चुकीच्या प्रमेयावर उभा आहे, याचे भान चांगदेव सातत्याने आपणांस देत जातो. ब्राह्मण, संघ, गांधीवादी, सावरकरवादी, ख्रिश्चन, बौद्ध, महार, हिंदू अशा सगळ्याचा उभा-आडवा छेद घेत तो पुढे निघाला आहे. प्रत्येकजण आपपला चौकोन सांभाळून आहे. आणि प्रत्येकजण दुसऱ्याकडे बोट करून आपली जात, धर्म लपवून जगतो आहे. चांगदेवला या सगळ्यांचा राग आहे. चुकीच्या गोष्टींना विरोध करणारा चांगदेव जरा विचारही उलटाच करतो. जनगणमन सुरू असताना थेटरमधून का बाहेर आलात असं पारूची बहीण विचारते तेव्हा तो म्हणतो, ''एकवेळ आपण देशासाठी फासावर जावू, पण ही दर सिनेमात देशाभिमानाची शिक्षा नको'' (२०७).

चांगदेव शिकवण्याची गोष्ट मन लावून करतो. पण पोरं मात्र त्याला नीट शिकवू देत नाहीत. एकीकडे हा वैताग आणि दुसरीकडे कॉलेजमधला घाणेरडा जातीयवाद यामुळे तो कायम अस्वस्थ असतो. सगळी व्यवस्थाच बिघडत चालल्याचा त्याला साक्षात्कार होतो. एकमेकांना पोसणारे बांडगूळ सभोवती असल्याने शिक्षणव्यवस्था कशी सुधारणार? असा प्रश्न त्याला पडतो. पण यातच जगत राहण्याशिवाय शहाणपण नाही हे लक्षात आल्यावर तो शिक्षणव्यवस्थेविषयी जे चिंतन करतो. ते

अनुक्रमणिका

फार विचार करायला लावणारे आहे

''शिक्षणाचं हे क्षेत्र असं आहे की, मानवी समाजाच्या पायाशी असलेल्या मूलभूत अज्ञानावरच ते उभं आहे. कारण प्रत्येक मानवी अपत्य हे अज्ञानी म्हणून जन्मत राहणार... आणि जास्तीत जास्त आपल्याच पोरांना मिळावं म्हणून ह्या शर्यतीला जगभरचे सुखवस्तू लोक बांधलेले असणार. तेव्हा असल्या ज्ञानदानाच्या परंपरेला खंड नाही. आपण त्यातल्या अगणित पायऱ्यांवर एक आहोत. आपण खालून आलेलं ओझं वरच्याला देऊन आपलं काम संपवत रहायचं. बस्स. हे खूप झालं'' (२१३).

शिक्षण व्यवस्थेचं हे वास्तव हा या कादंबरीच्या विचाराचा पाया आहे. एकूणच मानवी जीवनावर परिणाम करणारा घटक म्हणजे शिक्षण आहे. तरीही या व्यवस्थेचा नीट विचार होत नाही, या मुद्यावर चांगदेव सातत्याने बोट ठेवत आला आहे. 'हूल'मधला चांगदेव केवळ याच मुद्यावर चिंतन करीत नाही. तो स्त्री-पुरूष संबंध, काऱ्या लोकांचे आणि विवाहित लोकांचे जगण्याकडे पाहण्याचे दृष्टिकोन यावरही चिंतन करतो. तो बिगरलग्नाचा असल्यानेच पारू सावनूरमध्ये अडकत जातो. आणि लग्न, शिक्षण यानुषंगाने तो धर्मव्यवस्थेवर विचार करताना म्हणतो, ''हिंदू मुर्ख आहेत म्हटल्यावर आझम खूष झाला, पण मुसलमानही सुधारणं आवश्यक आहे असं म्हटल्यावर उसमैं कोई शक नही असं फक्त तो म्हणत राहिला'' (२७२). चांगदेव असा प्रत्येक गोष्टीकडं वेगळ्याच आणि वास्तव भिंगातून पाहत राहतो. म्हणून त्याला सभोवती एकीकडे आहे त्यापेक्षा जास्त घाण दिसते आणि दुसरीकडे इतरांना न जाणवण्याइतपत सहानुभावी संवदेनशीलता दिसते. या दोन टोकांच्या मध्ये चांगदेव कायम लटकत राहिला आहे. म्हणून तो सिनेमा, संगीत, प्रेम अशा सगळ्यांमध्ये स्वतःला टाकून पाहत राहतो. तो जसाजसा सभोवताल स्वीकारत जातो. तसतसा त्या गावातून बाहेर पडण्यासाठी धडपडतो. आणि दुसरी नोकरी मिळते तेव्हा तो जे चिंतन करतो ते फार महत्त्वाचे आहे. तो म्हणतो.

''कॉलेजातला गोंधळ, अपुरी झोप, विचित्र गाव, नवखा परकेपणा, मित्र, गावातल्या पोरींच्या भानगडी, मोठ्ठीची मोठ्ठी खोली, रातकिडे, माळरानावरचं गवत,मशिदी, चर्च, रेडिओ, गाणी, सूर आणि ह्यातून उभार पारू, पारूमुळे दुसऱ्या कशातच उठाव येत नाही इतंक गर्विष्ठ रूप, तोरा. सगळा वर्तमानकाळच भूतकाळ होऊन उभा. अशानं वर्तमानकाळ वेगळा, सजीव जगताच येणार नाही. वर्तमानकाळाची पकड ताडकन् सुटते आणि भूतकाळ मनात चिरेबंद व्यापून उठतो. वस्तूंच्या तीनच बाजू पहायची सवय झाल्यानं उरलेल्या कितीतरी बाजू अज्ञात राहून परिणाम करत राहतात तेव्हा अश्मीभूत वर्षांमुळं जाणवतं. एरवी रोज हे जगताना कळत नाही. एका निर्णयात या सगळ्या बाजू आपल्या भुवया उंचावून जरब बसवतात. तो निर्णय आपल्या हाताबाहेरचा असतो'' (३५४-५५).

अशा हाताबाहेर गेलेल्या परिस्थितीमुळे चांगदेवला वर्तमानावर पकड घट्ट करावयाची असल्यामुळे पुन्हा नवे चेहरे, नव्या घटनांसाठी गाव सोडून नवं गाव बघतो, आणि तो, 'जरीला' कादंबरीच्या रूपाने पुन्हा नव्या गावात प्राध्यापक म्हणून रुजू होतो. पण सुरुवातीलाच मागच्या गावापेक्षा त्याला इथे जातीचे संदर्भ ठळकपणे जाणवू लागतात. त्यामुळे चांगदेव आपोआपच ह्या गोष्टींची चर्चा-चिकित्सा तपशिलात जाऊन करून पाहतो. पण त्याहीपेक्षा तो येथे शिकवण्यावरच अधिक भर देण्याचे ठरवतो. यासंदर्भात तो म्हणतो, ''या धंद्याची किल्लीही सापडली. मुलांना खूप विचार करायला लावायचं. खूप माहिती द्यायची आणि दिवसातला सगळ्यात उत्साही भाग मुलांवर खर्च करायचा. फालतू चिंता मनात येऊ द्यायच्या नाहीत. नेहमी बाहेरबाज गोष्टींचं पक्कं कॉंक्रीट मेंदूवर घालून स्वतःच्या निरुपयोगी भावभावना उगू द्यायच्या नाहीत हे धोरण ह्या गावात बरोबर सापडलं'' (३८)

चांगदेव येथे शिकवण्यात उत्साह वाढवतो. त्याचवेळी जात-धर्म-व्यवस्थेच्या पलीकडे असलेले माणूसपण शोधण्यावर तो भर देतो. ते शोधताना राजेश्वरीबरोबरचे संवाद असोत. चांगदेवच्याच सायकलचा धक्का लागूनही गप्प राहणारा गरीब माणूस असो, चांगदेवची कपडे शिवणारा शिंपी असो, पवारचे कुटुंबीय असो, शेख असो, वर्गातली गरीब पोरं असोत या सगळ्यांकडे चांगदेव वेगळ्या सहानुभूतीने पहाताना दिसतो. या चांगुलपणावर विश्वास ठेवणारा चांगदेव शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्ट, दिशाहीन, जातीयवादी राजकारणावर मात्र सातत्याने बोट ठेवतो. हा जातीयवाद फक्त ब्राह्मणच करीत नाहीत. तर सगळेच तसे वर्तन करू लागतात. राजपूत सर म्हणतात की, छोट्या-छोट्या जाती एक झाल्या तर सगळे मराठे कुठल्याकुठे गायब होतील. तीसपस्तीस टक्के तर आहेत पण ते होत नाही. चांगदेव या सगळ्यांचा सततचा साक्षीदार राहिला आहे. पण तो त्याची सेक्युलर भूमिका सोडत नाही. त्याची जातही तो कोणाला कळू देत नाही. म्हणूनच भारत-पाक युद्धाच्या पार्श्वभूमीवर जेव्हा देशपांडेबाई कॉमन लॉ मुस्लीमांना नको असतो तेव्हा चांगदेव म्हणतो, तो त्यांना नको

असला तरी संसद तुमचीच आहे, तेव्हा करून टाका ना कॉमन लॉ बिल पास. कुणाची वाट पाहताय? असा प्रश्न विचारणारा चांगदेव सतत सभोवतालच्या बाजूंमधले वैगुण्य उघडे पाडत राहतो. चांगदेव आणि त्याच्याबरोबरचे काही प्राध्यापक बिनलग्नाचे (कारे) असल्याने चांगदेव प्रेम, लग्न, कुटुंबसंस्था, स्त्री-पुरुष शरीरसंबंध, लैंगिक जाणिवा अशा गोष्टींविषयीही मोकळेपणाने पण तिरकसपणाने चर्चा करीत राहतो. चौकटीत बांधलं गेलेलं कोणतंही स्थितिशील जीवन त्याला मंजूर नाही.

नेहमी उलट्या पद्धतीने विचार करणारा चांगदेव रूटीन गोष्टींमधला फोलपणा सतत उघड्यावर आणतो. शिकवता येत नव्हतं म्हणून अस्वस्थ होणारा चांगदेव इथं लगेच नीट शिकवायला येऊ लागलं म्हणूनही अस्वस्थ होतं. हे त्याला स्थितिशील वाटू लागतं. नवरा-बायको संबंध असो, जात-धर्म संबंध असो, विद्यार्थी-प्राध्यापक-शिक्षण संबंध असो, या सगळ्यातली शिथिलता आणि स्थितिशीलता नाकारत तो जगत असल्याने कायम एकाकी बनतो. उलट त्याचा हा एकाकीपणा आणि सतत उलटतपासणी करताना स्वतःमध्ये डोकावण्याची वृत्ती चांगदेवच्या व्यक्तिमत्त्वाला अधिक समृद्ध करीत जाते. त्याची ही जी स्वीकार-नकाराची, भिडण्या-भेदण्याची, उत्साह-मरगळीची वृत्ती आहे ती त्याला प्रत्येक घटनेकडे वेगवेगळ्या अंगाने पहायला लावते आणि त्यामुळे त्याला दरवेळी अधिकचे काही दिसत जाते. त्याच्या सामान्यत्वात दडलेले असामान्यत्व सातत्याने प्रत्ययास येत राहते. दर टप्प्यावर त्याला जाणवणारी दिखावू, स्वार्थी, फायद्याची वृत्ती त्याला फारशी भिडत नसल्यामुळे तो पारू, बिनी, गुप्ते बाई यांच्यापासून पण सतत जाणीवपूर्वक लांब जातो आणि स्वतःच्या आतला कोपरा सतत सांभाळून ठेवतो. त्याची ही गतिशील वृत्ती निर्मितीच्या अंगाने आणि कादंबरी समृद्ध करण्याच्या दिशेने जाणारी आहे.

सगळे प्रयत्न करूनही ही व्यवस्था चांगदेवला 'जरीला' बनवते. म्हणून तो पुन्हा गाव सोडून नव्या गावी प्रवेश करतो तेव्हा प्रवासातच त्याला फुलेवादी प्रा. नामदेव भोळे भेटतो. रेल्वेत त्यांच्या गप्पातून नामदेव म्हणजे चांगदेवचाच एक भाग वाटायला लागतो. तरीही आता 'झूल' पांघरुण जगायचे ठरवून चांगदेव 'अत्यंत बैलासारखं राहायचं. त्यात जास्त कसोटी आहे' असं मनाशी पक्क ठरवतो. चांगदेवच्या आत एक मनस्वी क्रांतिकारी तरुण दडला आहे. पण तो त्याला फार बाहेर पडू देत नाही. पण चुकीच्या गोष्टींना तो जसा पाठिंबा देत नाही तशा चुकीच्या गोष्टीही तो करीत नाही. मात्र तो सातत्याने सभोवतालाविरुद्ध 'भाषिक कृती' सतत करीत आला आहे. आणि चांगदेवच्या या भाषिक कृतीला समांतर अशी 'प्रत्यक्ष कृती' नामदेव भोळे करताना दिसतो. नामदेव बहुजनसमाजवादी असून तो फुलेंना मार्क्सच म्हणतो. तो इथल्या जात आणि धर्मव्यवस्थेविरुद्ध सातत्याने संघटितपणे काम करीत आला आहे. तो कायम इथल्या ब्राह्मणवादाला आणि हिंदुत्वाला विरोध करीत राहतो. पारू आणि आता चांगदेवला भेटलेल्या राजेश्वरीच्या रूपाने चांगदेव आणि नामदेव स्त्रीच्या एकूण परिस्थितीची फार प्रभावी चिकित्सा करतात. इथल्या चांगदेवचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकसित होत चाललेला दिसतो. गर्भपात कायदेशीर करावा, हुंडाबंदी करावी असं नामदेव म्हणतो. तर चांगदेव म्हणतो, 'दर ऋतुस्रावाला स्त्री पुन्हा पुन्हा पवित्र होते, शुद्ध स्त्रीत्व नदीसारखं वाहतं असावं द्रौपदी, हेलन याच खऱ्या स्त्रिया (३४) एकूणच चांगदेव वगैरे मंडळी इथल्या मातृसत्ताक परंपरेच्या दिशेने चर्चा करताना दिसतात. आणि चांगदेवची अत्यंत निर्णायक स्थिती येथे भेटते. तो सगळ्या गोष्टींकडे फार आत्मीयतेने पाहताना कोसळून पडणारं दुःख खोलवर जपत राहतो आणि यशवंतराव चव्हाणांची टिंगल करणाऱ्या ब्राह्मणांवर तोंडसुख घेणाऱ्या नामदेवला तो म्हणतो,

''मला तुमच्यासारखा प्रयत्नवाद जमत नाही. बरा वाटत नाही. प्रयत्नवादी माणूस. अनेक मूल्यांचं भेंडोळे करत शेवटी त्याच्यातच फसत जातो. दया, क्षमा वगैरेपासून तर राष्ट्रीयता, युद्ध सगळं असल्या बुद्धिवादातून निर्माण होतं. सगळे मानवी समान ह्या भोवऱ्यात सापडले आहेत असंत तुम्हाला वाटत नाही? तटस्थ राहून पाहणारे हल्ली उरलेच नाहीत. महाकाव्यातल्या लढणाऱ्यांपेक्षा काठावर उभं राहून पाहणारे व्यासहोमर मला अधिक शूर वाटतात. लढायला काही फार शौर्य लागतं असं मला वाटत नाही. कुठलाही भित्रा माणूस लढायला तयार होतो असं हल्ली वातावरण आहे'' (३८)

चांगदेवची ही भूमिका नामदेवला फार पटत नाही. तरी पांडुरंगपासून या चांगदेवपर्यंतचा जो प्रवास आहे तो येथे अधिक ठळक व्हायला लागतो. अमेरिकन स्त्री-पुरुष स्वातंत्र्यापेक्षा इथले ऊसतोडी लमाणांचे स्त्री-पुरुष स्वातंत्र्य चांगदेवला आत्यंतिक उच्च आणि महत्त्वाचे वाटते. त्यांच्याकडे तो वेगळ्याच अँगलने पाहतो. आयुष्यभर केवळ काबाडकष्ट करावे लागणाऱ्या या वर्गाच्या शोषणाविरुद्ध नामदेव आवाज उठवतो. पण चांगदेव त्याकडे वेगळेच पाहतो. ती नोंद मुद्दाम येथे करायली हवी :

चांगदेव म्हणाला, आता तुम्ही जरा वेगळ्या दृष्टीनं ह्याच

जीवनाकडे पहा. ते कायम निसर्गचक्रात स्वतःला विसरून जाणं, हिरव्या जमिनीचा स्पर्श, कापताना गवताचा येणारा हिरवा वास, मेंढरांचे उपजत बुद्धीला चालना देणारे अर्थपूर्ण आवाज, पान्ह्याला देणारी वासरं, जोराची भूक लागणं, जोराची तहान लागून पाण्याची मूळ चव अंगात पसरणं, टवटवीत स्त्रीया, जोरकस पुरूष, प्राणिजगाची सगळी सुखं भोगणं अंगात पसरणं, टवटवीत स्त्रिया, जोरकस पुरुष, प्राणिजगाची सगळी सुखं भोगणं, कच्ची फळं खाणं, निवाऱ्यापुरतं घराकडं पाहणं, गायींची थानं दाबून फेसाळ दूध काढणं... चंद्रावरून वेळ ठरवणं, थंडगार झाडाच्या सावलीत पडून राहणं-ह्याच्या इतकं आयुष्य सार्थकी लागणं आणखी कोणतं असणार? हेच खरं जगणं. आपण किती ज्ञानेंद्रियविरहित यंत्रासारखे जगत असतो ? दुर्दैव हेच ही आपल्याला याच्यातून सुटका नाही. याच्यातच कसं स्वातंत्र्य मिळेल हेच शोधून काढणं आता आपल्याला शक्य आहे (४०)

तरीही नामदेव चांगदेवच्या या भूमिककेत विरोध करतो. आपणालाही हे चिंतन, प्रतिगामी, स्थितिशील वाटतं. पण खुद्द नेमाडे यांची जगण्याकडे पाहण्याची जी देशीवादी धारणा आहे, तिचा येथे प्रत्यय येतो. ही भूमिका स्थितिशील नाही तर प्रत्येक घटनेला चारी बाजूंनी पाहणे, स्वतःला प्रत्येक वेगवेगळ्या ठिकाणी आणि स्थितीत ठेऊन पाहुन विचार करणे, शोषणाचे संदर्भ नव्याने पाहणे, अडगळतील समृद्धी शोधणे ही जी लेखक म्हणून नवी नैतिकता नेमाडे यांची आहे, ती येथे पाहावयास मिळते. प्रत्येक गोष्टीकडे श्रेणी आणि शोषण म्हणून न पाहता नैसर्गिक न्यायाने पाहायला शिकवणारा हा चांगदेव येथे महत्त्वाचा वाटतो. पण म्हणून तो समाजव्यवस्थेतील विषमता मान्य करतो असे नाही. येथे तो अधिकाधिक कडवट बनत जातियता, ब्राह्मण्य आणि हिंदुत्वाला जोरदार विरोध करतो. पण हा विरोध भाषिक आहे, हे त्यालाही मान्य आहे, म्हणून तो म्हणतो, ''आपली पिढी नुस्ती विचारात बंडखोर आहे. आता पुढची पिढी कृतीनं बंडखोर निघाली तर बरं होईल'' (६९).

चांगदेवची ही वैचारिक जडणघडण विस्तारत चालली आहे. तो जसं नैसर्गिक जगणंही महत्त्वाचं मानतो. तसं शोषणही नाकारतो. संस्कृती म्हटलं की डावं-उजवं राहणारच. म्हणूनच कदाचित बुद्धानं समाजाच्या बाहेरच्या संन्यासाचा मार्ग काढला असावा. दलित शोषितांनी उच्चवर्गीय पांढरपेशे होऊन जावं. शहरात यावे, जातीयता मोडून टाकावी असं विचार करणारा चांगदेव म्हणतो, ''जात जर मोडणारच नसेल तर ती स्वीकारून दुसऱ्या मार्गांनी तिच्यातले दोष काढता येतील. सगळ्या जातींना एका पातळीवर आणून हे करता येईल. वरच्या जातींना खाली ओढून खालच्या जातींना वर नेऊन सोडून यावं म्हणजे कॉलिडोस्कोपसारखा समाजही काही वाईट दिसणार नाही. अनेक जातींनी अलीकडे आपला दर्जा वाढवून हे सुरूच केलं आहे. चिरंतन चांगल्या गोष्टी हळूहळूच होतात असं माझं मत आहे'' (१०१)

जात आणि धर्मव्यवस्थेची आत्यंतिक गहन आणि टोकांची चर्चा या कादंबरीत आली आहे. मुसलमानांचे मागासलेपण, ब्राह्मणांचा कडवेपणा, दलित-धनगर आदींना ब्राह्मण-मराठ्यांबद्दल वाटणारा द्वेष या सगळ्यांची चर्चा येथे चांगदेव आणि मंडळी करताना दिसतात. चांगदेवच्या या हळूहळू परिवर्तनाला मेघे जोराचा विरोध करतात. हळुहळूचा काळ किती? हा प्रश्न यातून शिल्लकच राहतो. पण तरीही चांगदेव आपलं म्हणणं कायम रेटतो. जातीच्या बळावर फक्त त्याला जातीतले निर्बुद्ध लोक फक्त वर गेले उदारमतवादी बाजूलाच आणि मागे राहिले. तेव्हा आंबेडकरांचा हवाला देऊन चांगदेव म्हणतो, ''हिंदू कायम हार खात जगत आले. मानानं लढणारे समाज कधीच खतम झाले? कायम जिवंत रहात आलेला व राहील असा हा समाज नाही, तर कायम मरू घातलेला हा समाज आहे! कुठल्याही हिंदूला लाज वाटावी असं हे हिंदू संस्कृतीचं टिकून राहणं आहे'' (११८). तेच मोडून काढण्याची गरज सगळेच व्यक्त करतात. चांगदेवही त्यात आहे. पण ब्राह्मणांना ते हवं आहे म्हणून ही व्यवस्था टिकून असल्याचा निष्कर्ष हे काढताना दिसतात. या सगळ्या ब्राह्मणी जातीयतेचा उबग येऊन तो स्वतःला आतल्या-आत बंद करून टाकतो. स्वतःपुरतंही नीट जगता येत नाही. ही व्यवस्था त्याला जगू देत नाही. शिक्षणातला भ्रष्टाचार, विद्यापीठातले जातीय राजकारण या सगळ्यांमधून बाहेर पडण्यासारठी तो निसर्गाकडे आकृष्ट होतो. पण तिथेही त्याला असमाधानच लाभते. प्रत्यक्ष कृती करू पाहणाऱ्या नामदेवची हतबलता तो पाहत राहतो. समाजाचा हा अवघा डोंगर पोकळ झाला आहे. त्यात जगण्यासारखं काही उरलं नाही असं मानून चांगदेव ''ह्या संकुचित खंडित समाजजीवनामध्ये मला संपूर्ण आस्तित्व ओतता येत नाही. मी कोणाला बांधलेलो नाही. मला घरदार नाही. जातिधर्म नाही. खुंटदावे नाही. आईबापांचा, स्वग्रामाचा, स्वसंबंधियांचा मी त्याग केला आहे. हे घनघोर उग्र सृष्टितत्त्वा, मला शुद्ध जीव कर की जेणेकरून मी निखळ जीवसत्त्व होईन'' (२११). असे म्हणून स्वतःचे विसर्जन करतो.

चांगदेवचे ही विसर्जन बुद्ध-चक्रधराशी नाते सांगणारे आहे. त्याच्या या विसजनात आणि नामदेवच्या कृतिशीलतेत

अनुक्रमणिका

खंडेरावजी जन्म सहजपणे दिसून येतो आणि या विसर्जन आणि कृतिशीलतेमधून आपली 'हिंदू' म्हणून नेमकी काय ओळख आहे, याचा शोध घेण्यासाठी खंडेराव जन्म घेतो. 'मी कोण?' असा स्वतःला प्रश्न विचारणारा खंडेराव या प्रश्नावर अनेक शतकांची जी स्तब्ध सामझूम आहे, ती काय आहे, याचा शोध घेण्यासाठी जन्म घेतो. हा खंडेराव पुन्हा विद्यार्थी झाला आहे. परंतु पुरातत्त्व या विषयावर संशोधन करणारा, तो विद्यार्थी आहे. प्रारंभीच तो आपली ओळख शोधण्यासाठी जो भूसांस्कृतिक नकाशा तयार करतो तो अफगाणिस्तानातल्या यरयु नदीपासून राजस्थानातल्या सरस्वतीपर्यंत पसरला आहे. हा जो प्रचंड मोठा विस्तार आहे. या विस्तारावर आपली ओळख शोधण्याचा तो प्रयत्न करीत आहे. या सप्तसिंधू प्रदेशावरील आपली ओळख शोधणे हा खंडेरावच्या संशोधनाचा विषय आहे.

खंडेरावच्या शोधाची पार्श्वभूमी काय असू शकते, याचा पुरावा पुढील विधानावरून आपणाला मिळतो. ते विधान असे.

''आमची सिंधू संस्कृती लयाला गेल्यापासून या उपखंडात आणि जगात अन्यत्र सुद्धा भाषा सार्वभौम होत गेली. मंत्र म्हटल्याशिवाय तुमचा जन्म झाला हेही सिद्ध होत नाही की विवाह ही सामाजिक संस्था होत नाही. आणि अंत्यकर्माचे मंत्र पुटपुटले गेले नाहीत. तर तुम्ही भुतंखेतं होणार असता. अशा रीतीने श्रमाला केंद्रस्थानी ठेऊन नैसर्गिक पिकांनी पृथ्वीची ज्ञान वाढवणारी आत्ममग्न स्वायत्त कृषिसंस्कृती हळूहळू परावलंबी होत गेली. याउलट भाषेला केंद्रस्थानी ठेऊन शोषण करणाऱ्या नागरी ऐतखाऊ औद्योगिक, व्यापारी, कोळसा-पेट्रोलची खनिजांवर धावणाऱ्या शोषण संस्कृतीची (४). यावरून कृषी आणि नागर यातील भेदाचा शोध आणि मी कोण? याच्या मूळांचा शोध घेण्याचा प्रवास म्हणजे खंडेरावच्या संशोधनाचा खरा विषय आहे. आणि हा शोध म्हणजे हिंदू असण्याचा शोध आहे. खंडेरावचे हिंदू असणे हे तथाकथित हिंदूत्वावादी नाही, ते सिंधूसंस्कृतीतलं हिंदूपण आहे, हे नीट समजून घेतल्याशिवाय पुढे सरकता येत नाही. कारण या हिंदूपणात इथलं अत्यंत गुंतागुंतीचं, विशाल असं भूसांस्कृतिक वास्तव आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर खंडेराव जो जाणिवांचा इतिहास मांडू पाहत आहे, तो अत्यंत महत्त्वाचा आहे. शोषणाच्या परंपरा नागरी समाजाने कशा उभ्या केल्या, याचा तो शोध घेत आहे. हा शोध घेताना नागरी परंपरेचे समर्थक आर्य-ब्राह्मण आणि कृषिपरंपरेचे अवैदिक द्रविड बहुजन हिंदू यांच्यातील ही लढाई शोधताना खंडेराव फार मोठी जोखीम पत्करीत आहे. कृषिपरंपरेतील बहुजनत्व अधोरेखित करताना इथल्या जात-परंपरा, समूह आणि त्यांचे सांस्कृतिक वेगळेपण, कला, निसर्ग या सगळ्यांमधून ती करताना बुद्धापासून महानुभावापर्यंत अनेक पुरोगाम्यांना चर्चेच्या केंद्रात घेऊन बहुजन हिंदूपणाची आत्मटीकाही करतो. ही आत्मटीकाच नेमकी खंडेरावला हिंदुत्ववादी (प्रतिगामी) प्रतिमा उभी करण्यासाठी वापरली जातेय. पण ती तशी नाही. इथे अडगळ आहेच. ती टाकावी लागेल. पण टाकताना त्यातली समृद्धी स्वीकारावी लागेल. अडगळ टाकताना आत्मटीका आवश्यक असते. ती तशी खंडेरावाने सगळ्याच जात-धर्माबाबत करण्याचा आणि त्यातील वास्तव टिपण्याचा प्रयत्न केला आहे. तो नीट समजून घेतल्याशिवाय पुढे जाता येत नाही.

हरिपुरा आणि मोरगाव अशा दोन गावांभोवती खंडेराव आपली मांडणी करताना दिसतो. हरिपुरा हे आर्यपूर्व जातिविरहित समतेचं गाव आहे. ते असं. काही कोणी वरचा खालचा नव्हता की भेदाभेद नव्हता. एकाच जातीचे हे लोक. ब्राह्मणबी नव्हते. शूद्रही नव्हते. घनदाट वनात लहान्या लहान्या वाड्यामंधार हे लोक राहत (१०) ही मूळची सिंधू संस्कृती पुढे बदलली कशी याचा नमूना म्हणजे मोरगाव आहे. हे आर्योत्तर गाव आहे.

''एकंदरीनं बाहेरून आलेले सगळे गावातल्या समाजात वेगवेगळ्या प्रकारे सामावून गेले. रक्तानं, रोटीबेटी व्यवहारांनी, अंतर ठेऊन, विरोध ठेऊन, रितीभाती, खाणंपिणं वेगळ्या म्हणून दूर राहून, उदासीन, तटस्थ, बेपर्वा, बेदरकार, निरपेक्ष सगळ्या प्रकारचे संबंध ठेऊन तरी एक समाज म्हणून राहणारी ही जातिव्यवस्था, रंगीबेरंगी फुलासारखी पाकळ्यांवर जिथे जागा सापडेल तिथे आपलं स्वतंत्र अस्तित्त्व सांभाळत एकमेकांना राखणारे अंतरसमूह. डौलानं पिढ्यान् मागून पिढ्या हे लोक एकोप्यानं राहत आले'' (११०). ही गावव्यवस्था पुढे कशी बदलत आली याचा शोध खंडेराव घेत आहे. हा शोध खूप जिकिरीचा, तापदायक आणि संशयास्पद वाटावा असा आहे. कारण वैश्य वर्णात जन्मलेला, शूद्र वर्णातील दुधावर पोसलेला आणि क्षत्रियत्व अंगी बाणलेला खंडेराव ज्या पद्धतीने सगळ्या वास्तवाला भिडू पाहत आहे, ते अत्यंत विलक्षण आहे. म्हणूनच ते संशयास्पद वाटावे इतके अकल्पितही आहे. आणि येथेच त्याचे वेगळेपण आहे. त्याचा नीट अंदाज बांधणे आताच कठीण आहे. तो हरिपुरा आणि मोरगाव या दोन्ही संस्कृती कवेत घेऊन कृषिसंस्कृतीचा म्हणजे सिंधू हिंदूपणाचा शोध घ्यायला निघाला आहे. त्याच्या शोधाचा हा पहिला टप्पा आहे. असे आणखी तीन टप्पे आहेत. ते काय असतील हे आताच

सांगता येणार नाही. पण या पहिल्या टप्प्यात खंडेरावने हिंदूपणाच्या समृद्धीच्या आणि अडगळीच्या जागा दाखवता दाखवता स्वतःभोवती संशयाचं वलय तयार करून ठेवलं आहे. ते वलय निश्चितच हिंदुत्ववादी नाही. पण तो जेव्हा मोरगावचं समर्थन कतो, तेव्हा पुढे कसा जाणार आहे याची उत्सुकता आणि संशय सगळ्यांनाच आहे. पण एक मात्र नक्की हा खंडेराव त्रैवर्णिक आहे, हेही लक्षात ठेवावं लागणार आहे. तो शोषितांचा प्रतिनिधी आहे. तो शोषक नाही, एवढे सूतोवाच मात्र 'हिंदू' मधे त्याने करून ठेवले आहे.

म्हणून खंडेराव हा महत्त्वाचा नायक आहे. जातींच्या संबंधांची अत्यंत तीव्र चिकित्सा करताना त्याने ब्राह्मणांबरोबर दलितांनाही अंगावर घेतले आहे. पण त्या मागच्या त्याचा त्रैवर्णिक जन्म आणि सहानुभाव नीटपणे तपासला जायला हवा. त्यावर कोणीच आता निर्णायक बोलत नाही. पण पुढचे खंड आणि त्यातला खंडेराव शोषणाच्या विरोधात असणार याच्या शक्यता या खंडेरावने सूचित केल्या आहेत.

पांडुरंग ते खंडेराव म्हणजे एका अर्थाने विठोबा ते खंडोबा असा जो हा नेमाड्यांच्या नायकाचा प्रवास आहे तो विलक्षण गतिशील आहे. सतत नवं-नवं शोधणारा, आपल्या मूल्यांचा शोध घेणारा, वाईटावर प्रहार करताना परंपरेचं सत्व समजून घेणारा आणि समजावून सांगणारा हा प्रवास निश्चितच मराठी साहित्यातला महत्त्वाचा आणि संबंध साहित्याला नवी दिशा देणारा ठरला आहे. अनुकूल-प्रतिकूल टीकेच्या शक्यता अधोरेखित करणारा हा खंडेराव पुढे कसा येतो, हे वाट पाहणे उद्बोधक असणार आहे.

। प्राचार्य डॉ. महेंद्र कदम

विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय,
टेंभूर्डी, ता. माढा,
जि. सोलापूर - ४१३ २११
भ्रमणभाष ९४२३३३७२१६
९०११२०७०१४



स्वतःविषयी

संतुक रामराव गोलेगांवकर

■

संतुक रामराव गोलेगांवकर

बी. ए.

कंधार, जि. नांदेड.

सध्या वास्तव्य -

फ्लॅट ६, सी -२, शांतीनिकेत सोसायटी, आदित्य गार्डन सिटी शेजारी, वारजे, पुणे - ५२

ई मेल - santuk.g@gmail.com

भ्रमणभाष ९८६०१८४३८९

पुणे येथे एका ॲडव्हर्टायझींग कंपनीत 'कला दिग्दर्शक' लहानपणापासूनच चित्रकलेची आवड, पुढे त्याचेच व्यवसायात रूपांतर. शालांत स्पर्धातून तसेच पुढे राज्यस्तरीय 'भित्तीचित्र' स्पर्धातून अनेक पुरस्कार प्राप्त.

बेकारीच्या काळात वाचनाची गोडी लागली व त्यातून मिळणाऱ्या प्रेरणेतून चित्रकलेसाठी मदत झाली, मग मिळेल ती पेंटींगंची कामे केली, साईन बोर्ड, बॅनर्स, निवडणुकीतील भिंती रंगवणे, व्यावसायिक उत्पादनांच्या भिंतीवरील जाहिराती, स्क्रिन प्रिंटींग, गणपती उत्सवाच्या काळात गणपती बनवणे इत्यादी.

व्यावसायिक कामाच्या व्यतिरिक्त आजपर्यंत अनेक प्रकाशनांसाठी रेखाचित्रे, मुखपृष्ठ रचना, कॅलिग्राफी इ. कामे केली व चालू आहेत.

अनुक्रमणिका



भालचंद्र नेमाडे यांची कविता

डॉ. रणधीर शिंदे

■

भालचंद्र नेमाडे यांचे साहित्य नेहमीच चर्चेचा विषय राहिलेले आहे. या साहित्यासंबंधी विविध आकलने वेगवेगळ्या काळात होत आलेली आहेत. जुन्या पिढीपासून ते आजच्या पिढीतील कवी, समीक्षक, वाचकांचा त्यांच्या साहित्याला प्रतिसाद मिळालेला आहे. त्यांच्या कादंबरी व समीक्षालेखनाबद्दल स्वतंत्र व संपादित स्वरूपाचे जसे समीक्षाग्रंथ प्रकाशित आहेत, तसेच त्यांच्या कवितेसंबंधीही बरीचशी समीक्षा लिहिली गेली आहे. किशोर सानप यांचे भालचंद्र नेमाडे यांची कविता, जयश्री शास्त्री यांचे 'देखणीतील काव्यविश्व' शोभा नाईक यांचे 'देखणी जगण्याचे ऊर्ध्वपातन' असे स्वतंत्र ग्रंथ प्रकाशित आहेत. तसेच या कवितेवरील विविध लेख, आकलने, परीक्षणे, विश्लेषणे यांचा समावेश असणारा 'देखणीसंबंधी' (संपा. नीलकंठ कदम) हा संपादन ग्रंथही प्रकाशित आहे.

१९६० नंतरच्या मराठी कवितेत अनेक केंद्रे आढळतात. एकाच वेळी विविध तऱ्हेचे आणि महत्त्वाचे कवी या काळात लिहीत होते. चित्रे, कोलटकर आणि लघुनियतकालिकांतील कवी हे आधुनिक जीवनजाणिवांचे प्रभावी प्रकटीकरण करताना दिसतात. नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ आणि दलित कवी वंचितांना समूहस्वर तीव्रपणे मांडताना दिसतात. या संपन्न व बहुविध आवाजांच्या गजबजाटात अनेक कसदार कविता लिहिणारे कवी या काळात होते.

भालचंद्र नेमाडे कविता या प्रकाराकडे फार सजग आणि डोळसपणे पाहतात. कविता हे आपले पहिले प्रेम असल्याचे ते सांगतात. कवितेतील शेवटचा शब्दही अंतिम स्वरूपाचा शब्द असतो. त्यानंतर निव्वळ शांतता असते, अशी त्यांची कविताविषयक धारणा आहे. दररोजच्या जगण्याचे ऊर्ध्वपातन होऊन निदान कवितेची एखादी ओळ लिहिता यावी, अशी अभिलाषा बाळगणाऱ्या कवींपैकी ते एक आहेत. कादंबरी हा प्रकार जसा त्यांनी सातत्याने, कष्टपूर्वक, व्यासंगपूर्वक हाताळला तसे कविता या प्रकाराबाबत त्यांच्याकडून घडले नाही. त्यांनी कविता फार कमी लिहिल्या, त्याही वेगवेगळ्या टप्प्यांत. कवितेचा सूर जुळून यायला आपला भवताल आणि आतंरिकता यांचे सूर जुळायला पाहिजेत, असे त्यांना वाटते. आपल्याकडून कविता फारशी लिहून होत नाही, याची खंत त्यांनी एका मुलाखतीत बोलून दाखविली आहे. कवितेचे जे काही रसायन असते ते जुळून यायला ती ती भावस्थिती महत्त्वाची ठरते, असे नेमाडे यांना वाटत आले आहे. विशेषतः आपण ज्या काळात वावरतो आहोत तो काळ आणि भवताल कविता लिहायला फारसा पोषक नाही, अशी त्यांची भावना आहे. भारमभार प्रचंड कविता लिहिण्याच्या काळात केवळ सदतीस कविता लिहून आपल्या कवितेची इयत्ता नेहमीच त्यांनी वरची ठेवली आहे.

नेमाडे यांच्या समकाळात महानगरीय संवेदनेची कविता मोठ्या प्रमाणात लिहिली जात होती. व्यक्तिलक्ष्यी जाणिवेचे प्रकटीकरण तीमधून मोठ्या प्रमाणात होत होते. या जाणीवकेंद्राच्या प्रकटीकरणाला लघुनियतकालिकांतील कवितेनेही मोठा हातभार लावला. भालचंद्र नलेमाडे यांचा या चळवळीशी जवळचा संबंध होता, मात्र त्या जाणीवकेंद्राच्या वाटेने ती कविता गेली नाही किंवा एक विशिष्टच संवेदनकेंद्राची घडण तिने केली नाही. त्याचवेळी केवळ तकलादू वास्तव रिफ्टेक्ट करणाऱ्या तथाकथित ग्रामीण कवितेच्या वळणाने ती गेली नाही. या दोन्ही संस्कृतींची विभिन्न केंद्रे तीमधून साक्षात झाली आहेत. काही कवींच्या कवितेत जाणिवांची तीच ती केंद्रे व्यक्त होतात. किंवा एखाद्या केंद्रवर्ती जाणीवविश्वाची आवृत्ती पुनःपुन्हा त्यांच्या कवितेमधून व्यक्त होते. मात्र नेमाडे यांच्या संवेदनेचे एकच एक संवेदनकेंद्र नाही. तिचा एकच एक अक्ष नाही. या कवितेतून अनेकविध संवेदनकेंद्रे अभिव्यक्त झाली आहेत.

नेमाडे यांच्या कवितेतून भारतीय संस्कृतीतून झिरपणाऱ्या आणि वाहणाऱ्या जीवनदायी प्रेरणांचा जसा आविष्कार झाला आहे तसाच तो आधुनिक काळातील नागर संवेदनांचाही आविष्कार झाला आहे. ती केवळ ग्रामीण सांस्कृतिक विश्वाचेच प्रकटीकरण करते असे नव्हे. तर व्यक्तिमनातील आधुनिक जीवनजाणिवांचाही ती आविष्कार करते. अस्तित्वलक्ष्यी जाणिवेच्या छटांपासून निरर्थकतेच्या जाणिवेपर्यंतचा प्रवास तीमध्ये आहे. कोऱ्या, सड्या तरुणाच्या मनातील कामभावाच्या तृष्णेची मानसिक क्षणचित्रे या विश्वात आहेत. गाणे, माड, रस्ता, नदी, ऊर, जागा, बसत नाहीत एकमेकींवर ह्या गोष्टी स्त्रीपुरुषांसारख्या फिट्ट अशी असोशी तीमध्ये आहे. मी गळत ब्रह्मचर्याचा प्यासा असून तिसेक वर्षे पुरेल ताठा, असे भावदर्शन तीमध्ये आहे.

भटकंतीचं रूपक नेमाडे यांच्या कवितेत पुनःपुन्हा आवृत्त झाले आहे. नायकाच्या विशिष्ट काळातील स्थलांतरांना इथे फार महत्त्व आहे. ही स्थलांतरे विशिष्ट अशा सामाजिक, सांस्कृतिक अवकाशाने बद्ध आहेत. त्या अवकाशातल्या प्रवासाच्या संस्काराच्या या खुणा आहेत. रस्ते नवनवेच त्याला भेटत राहतात आणि आपल्याच वाटेने जाणाऱ्या दिवसाची सोबत त्याला करावी लागते. अशाच एका नव्या रस्त्यावरून तो एक वर्ष एका गावात येऊन पोहचतो. तिथली संध्याकाळ अस्तित्व हादरवून टाकणारी. ते वर्ष होतं की कोळ्याचं जाळं असा त्याला प्रश्न पडतो. स्वप्न होतं पडक्या किल्ल्याच्या गावाचं या पार्श्वभूमीवर त्याच्या वाट्याला निराशा, उदासीनता आणि एकटेपण येते. 'हे लांब लांब रस्ते' मधूनही ती जाणीव ध्वनीत झाली आहे. जीवनातल्या विविध गोष्टींनी मन संभ्रमित होते. त्याची दिशाभूल झाली आहे. अशा आधुनिक जीवनातील माणसाचे मनोगत इथे सांगितले आहे. हे सारे निमूटपण माणसाच्या वाट्याला आलेले आहे. विचित्र रस्त्यांची सोबत त्याला आहे. कोलाहलाशिवाय इथं दुसरं काहीच नाही. या साऱ्या कोलाहलात मानवी सत्व नाहीसे करणाऱ्या वास्तवाला सामोरे जाण्याचे बळ नव्या माणसात येवो अशी प्रार्थना तीमध्ये आहे. उपरोधाने ही जीवनजाणीव व्यक्त झाली आहे. तंबाखू खाण्यासाठी मजबूत दात असो जगावर थुंकण्यसाठी, सिगारेटसाठी मजबूत फुफ्फुस आणि दातासाठी पक्की लिव्हर. निरर्थक नसो बाळाची नाळ, बाहेर काळ मोठा कठीण आहे अशी जाणीव तीमध्ये आहे. आधुनिक जगातील व्यक्तिमनातील मूल्यांची जाणीव या कवितेत आहे. आधुनिक काळातल्या माणसाची निराश, वैफल्यग्रस्त, ओढग्रस्त वाटचालीबरोबच जीवनाची अपरिहार्यता तीमधून व्यक्त झाली आहे. शरीर या भांडवलाचा व्यापार करून नोकरीत दरमहा बुद्धी गहाण ठेवणाऱ्यांचे हे विश्व आहे. त्याचबरोबर याच काळात आपल्याला या सर्व घडामोडींना सामोरे जात त्याचा स्वीकार करणेही अपरिहार्य आहे. या अटळ अशा अपरिहार्यतेचा समंजस असा स्वीकार या संवेदनविश्वात आहे. जैविक व्यवहारात प्राप्त रोजच्या जेहादला सामोरे जाण्याची जाणीव त्यांच्या कवितेत आहे.

नेमाडे यांच्या कवितेतून स्त्रीविषयक जाणिवेचे विश्व मोठ्या प्रमाणात व्यक्त झाले आहे. स्त्रीसंवेदनेची ही वेगवेगळी रूपे आहेत. बहुतांश मराठी कवितेत स्त्रीची रोमँटिक अशीच रूपे प्रकट झाली आहेत. एका बाजूला स्त्रीची प्रीतिभावनेची पुरुषी मानसिकतेची रूपे प्रकटली आहेत, तर दुसऱ्या बाजूस मातृत्त्वाचे उदात्तीकरण करणारी रूपे प्रकटली आहेत. नेमाडे यांच्या कवितेत भारतीय परंपरेतील स्त्रीयातनांच्या दुःखाची रूपे आहेत, तर दुसऱ्या बाजूला स्त्रीसर्जनाची रूपे आहेत. स्त्रीविषयीचा सद्‌भाव आहे. प्रागतिक अशा जीवनजाणिवेचा भाग तीमध्ये आहेत. नेमाडे यांनी कोसला व चांगदेवचतुष्टय मधून स्त्रीत्वाचा अवकाश काहीसा झाकून ठेवलेला होता किंवा त्या कादंबऱ्यांच्या आशयसूत्राची अपरिहार्यता म्हणून कारेपणाच्या जगाशी संबंधितच तेवढे स्त्रीजग आलेले आहे. या दाबून ठेवलेल्या स्त्रीजगताला, भावविश्वाला कवितेतून मोठ्या प्रमाणात मोकळे करून दिले आहे. त्यामुळे स्त्रीत्वाचे इतके विविध तऱ्हेचे संपन्न भावविश्व त्यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहे.

'पाठीशी भिंत तुझ्या' आणि 'झिमझिम उन्हे' या दोन कवितांची आधुनिक काव्यपरंपरेत श्रेष्ठ कविता म्हणून गणना केली जाते. नेमाडे यांनी स्त्रीत्वामधील सर्जनाचे व नवनिर्माणाचे रूप या कवितांमधून शोधले आहे. स्त्रीमधील सनातन अशी वंशसातत्याची प्रेरणा आणि तिचे अक्षयत्व टिकून राहण्याची भावना तीमधून व्यक्त केली आहे. स्त्रीमधील देहमनाचा आविष्कार लक्षणीय, वेधक आणि संदिग्ध भाषारूपातून व्यक्त झाला आहे. एका तरुण स्त्रीचे मूल नुकतेच मरण पावलेले आहे. त्या अपत्यविरहाच्या दुःखाची संथ लय या कवितेत आहे आणि या दुःखातून तिने बाहेर पडावे आणि तिच्यातील नवनिर्माणाची आस पुन्हा जागृत व्हावी. रिकामेपणातून, रितेपणातून भरलेपणाकडचा हा प्रवास आहे. तिथे पुन्हा नव्याने कामाला लागावे. भिंतीला पोतेरे घेणे, ही नित्यनूतनाची जाणीव आहे तर डोळ्यांचा भार 'पदराला नको बाई, तुझ्या पदराचे पोत टिको' असा सद्भावं तीमध्ये आहे. स्त्रीमधील निर्माणशक्तीचाच हा आविष्कार आहे. धुमारा, अंकुर फुटण्याची सद्भावरूपी ही प्रार्थना आहे. तर 'झिमझिम उन्हे' या कवितेतही एका तरुण गर्भवती स्त्रीची प्रसन्न मनमुद्रा प्रकट झाली आहे. झिमझिम उन्हाचे आणि खांद्यांचे, लाडीगोडीचे, भिनलेल्या हळदुनाचे हे विश्व आहे. नव्या जन्माच्या आगमनाच्या सूचनेमुळे तिला फुटलेल्या फांद्या-फांद्यांच्या क्षणगुणगुणीचे ध्वनी तीमध्ये आहेत.

'ताईबाईच्या नावानं' आणि 'आजी' या कवितांत भारतीय परंपरेतील स्त्रीसंस्थेच्या दुःखाची, नात्यांची जाणीव व्यक्त झाली आहे. या दोन सलग एका पाठोपाठ आलेल्या कवितांमधून आपल्या कुटुंबसंस्थेतील स्त्रीचे नसणे व्यक्तीला परांगदा करून टाकते याची जाणीव आहे. बालपणीच मरण पावलेल्या बहिणीविषयीचे, तिच्या आठवणीचे स्मरण या कवितेत आहे. तिचे अस्तित्व या निवेदकाचा पाठलाग करते आहे. चाळीस वर्षे न दिसता तिने केलेले पिसेपण आहे. सृष्टीने तडीपार केलेल्या जिवाची साठवणूक यामध्ये आहे. तिच्या रिणाची, सोडवणुकीची जीवघेणी धडपड आहे. 'आजी' कवितेतही शोकात्म, दुःखद मरणाचा भाव आहे. आजीचा आधारवड असणे सगळ्यांचे पोषण, कष्ट, पहिला श्वास भरून जीवनारंभ करून देण्याचा, सुखःदुखातील आधाराचे आणि तिच्या उपेक्षेची रूपे व्यक्त झाली आहेत. आयुष्याच्या अंतकाळी तिच्याकडे कुणी पाहात नाही. तिचे नाहीसे होणे हे तीव्र शोकात्म स्वरूपाचे आहे. नेमाडे यांच्या कवितेतील हा दुःखद स्वर निव्वळ व्यक्तिनिष्ठ राहत नाही. मानवी मरणाच्या दुःखद स्थितीचे व उपेक्षेचेही चित्रण करते. त्यामुळे कवितेतील अनुभवाची कक्षा विस्तारीत होते. पुन्हा स्त्रीच्या कामाने संबंध मानवी जीवन आनंदी व वाहते झालेले आहे. प्रेममय, पालनकर्त्या, आधारवड स्त्रीचीच ही रूपे आहेत. या लोभस नात्यांपासून विलग झाल्याची जाणीव आहे. गुंतलेपण, जखडलेपण आहे. त्यांच्यासाठी काही करता आले नाही, याची दुखरी सल आहे. त्यामुळेच तुझा तळतळाट लागो माझ्या अपेशी कपाळाला किंवा बयो, तुझं रीण फेडल्याशिवाय ह्या जन्मी सुटका नाही आणि माझे अंगण पांढरे झाले तुमच्या रांगोळ्यांनी असे प्रागतिक, समंजस आणि उन्नत भावदर्शन ती साक्षात करते.

याशिवाय नेमाडे यांच्या कवितेतून स्त्रीरूपाचा निरंतर असा शोध आहे. अंधारगुहेत त्यांच्याकडे अबोध, अंध, दगडी डोळ्यांनी तिचे पाहणे आहे. एका अर्थाने आदिमत्वाशी केलेला हा संवादच आहे. जन्मजन्मांतरीचा भाव तीमध्ये आहे. तिच्या सान्निध्यात लामण दिव्याभोवतीचा अभंग अभंग इंद्रधनुष्याचे वाद्यवृंद साक्षात होतात. तर गतकाळातील तिच्या सुटलेल्या सहवासाची आठवण आहे. खुणेचे झाड हरवून बसल्याची भावना आहे. मीलनाचे अपूर्णत्व आहे. सनईचा ठेका आणि सर्व्या रानात चुकलेल्या सूराचा आठव आहे, पोरी आता माझे डोळे सोड अशी भावना आहे.

जीवन अधिक आनंदमय आणि सुखदायी करणाऱ्या स्त्रीत्वाचा साक्षात्कार पुन्हा गोव्याच्या भूमीत त्यांनी ज्या कविता लिहिल्या आहेत त्यात आहे. 'आकाशी रुसला गो चंद्र', 'सेरनाद जनेलासकयल' 'सेरनाद आडवाटेक' व 'सेरनाद - आदेऊस करतना' या कवितांमधून हे संवेदनविश्व साकार झाले आहे. कोकणी बोलीच्या प्रवाही भाषारूपातून हे स्त्रीपुरुषातील मनोमीलनाचे संपन्न भावविश्व प्रकट झाले आहे. वैशिष्ट्यपूर्ण निसर्गाच्या सान्निध्यात व बहुमिश्रित संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर प्रकट झालेला आविष्कार आहे. डोळ्यात भरलेल्या बावल्या ॲनाची ही चित्रे आहेत. तुका सोधून सोधून डोळे सुजल्याची भावना तीमध्ये आहे. चाफ्यानं अंगण भरलेल्या बाईचा सहवास या विश्वात आहे. दर्याच्या उधानाबरोबरच रानभरी झालेली ही प्रेमकथेची ताटातूट आहे. आणाभाका तुटतात. समृद्ध आठवणीबरोबर त्याला तिचा आणि तिच्या प्रदेशाचा निरोप घ्यावा लागतो. पापणी पाणवते, लाट फुटते आणि हा प्रीतसंगम विलग होतो. ''धरारा पावसात सुटलो गो गाव तुजो, पुसली रेतीतली पावलां गो बाई पुसली रेतीतली पावला'' अशी निरोपाची भाषा या विश्वात आहे. या विरहार्त निरोपाच्या प्रसंगीही तिचे सांत्वन आहे. आसू ढाळू नको ची भावना आहे. मान गडे तोडी काळ त्या कोण जोडी अशी काळाची अपरिहार्यता तीमध्ये आहे.

अनुक्रमणिका

एकंदरीतच नेमाडे यांच्या कवितेत स्त्रीविषयक संवेदनेचा मोठा अनुभवप्रांत व्यक्त झाला आहे. तिच्यात एक सलग मालासूत्रबद्धता आहे. स्त्रीविषयक विविध रूपांनी साकार झालेले एक सूत्र यामध्ये आहे. स्त्रीत्वाबरोबर आदिमभाव आहे, गुंतलेपण आहे आणि साऱ्या जीवनाला तिचे व्यापून उरणे आहे. मीलनाची, प्रीतीभावनेची, तृप्ततेची, आनंदमयतेची, पोषणाची रूपे आहेत. प्रसन्न साहचर्याची व मानवी जगाला पूर्णत्व प्राप्त करून देण्याची रूपे आहेत. तुटलेपणाची जाणीव आहे. तर दुसऱ्या बाजूस स्त्रीमधल्या सर्जनाचा व नवनिर्माणबद्दलचा सद्भाव आहे. संस्कृतीला वाहते करणाऱ्या जीवनदायीपणाच्या गुणांचा समृद्ध आविष्कार आहे, तर त्यांचे जाणे संस्कृतीला कसे बाधक ठरते त्याच्या यातना आणि क्रमशः या व्यवस्थेत त्यांचे झिजणे व नाहीसे होत जाणे हा शोकात्मभाव आहे. या स्त्रीच्या, अखिल स्त्रीच्या रिणाची कृतज्ञता आणि जबाबदारीचे भान त्यामध्ये आहे. एका अर्थाने हा साऱ्या मानवी जीवनाला व्यापून असणाऱ्या स्त्रीत्वाचाच हा शोध आहे. तिच्या सहाय्य अवस्थेबद्दलची करुणा व सहानुभाव आहे. पुरुषमनातील स्त्रीतृष्णा आहे. या तृष्णेची रूपे पुनःपुन्हा आवृत्त झाली आहेत. स्त्रीत्वाच्या संगतीने उजळणारी, प्रकाशमान होणारी ही रूपे आहेत.

स्थलांतर वा भटकंती हे नेमाडे यांच्या समग्र साहित्याचे एक महत्त्वाचे आशयसूत्र आहे. मी च्या विविध स्थलांतरांना व तेथील संस्कारठशांना त्यांच्या साहित्यात महत्त्वाचे स्थान आहे. मानवी जीवनाच्या वाटचालीचे प्रवासाचे रूपक म्हणूनही ते येते. ते जसे कथात्म साहित्यात येते तसे कवितेतही मोठ्या प्रमाणात आले आहे. 'देखणी'मधील अनेक कवितांमधून या रूपकजाणिवेचा विस्तार झालेला आहे. 'रस्ते नवेनवेच हेच यायचे होते', 'आपल्या वाटेने जाणारे दिवस' 'ते वर्ष होतं की कोळ्याचं जाळं', 'हे लांब लांब रस्ते' 'स्थलांतराचे गाणे', 'फर्ग्युसन कॉलेजात पुन्हा', 'रातराणी आणि आत्मचरित्र' या कवितांमधून या स्थलांतरित जाणिवेची रूपे व्यक्त झाली आहेत. ''फांद्या धुंडत फिरलो रान, कोठे दिसेनाच मधाचे पोळ. होती धुळपावलेच, होते सावल्यांचा फेर पाहाणेच''

रस्ते नवेनवेच हेच यायचे होते. मेलडीचे पंख लावून होऊन जाणे असे ते रूप होते. तर कधी आपल्या वाटेने जाणारे दिवस भेटतात. ते वर्ष होतं की कोळ्याचं जाळं या कवितेतही हे स्थलांतरण प्रभावीरित्या प्रकट झाले आहे. ह्या गावात उतरलो तेव्हा जवळ फक्त दोन चड्ड्या होत्या आणि दोन सदरे अशी सुरुवात आणि शेवट कपडे केले. मित्र केले पाचपंचवीस, तेवढ्यात गाव सुटलं. नमस्कार पडक्या किल्ल्याच्या गावाला. ''हे लांब लांब रस्ते कधी जुने होत नाही की बदलत नाही या कवितेततही स्थलातंराशी संबंधित मानसिक अवस्थांतरांची रूपे प्रकट झाली आहेत. त्याच त्याच पुन्हा वैरी झालेल्या रस्त्यांची सोबत, मान फिरवली आणि जाण्यायेण्याचे रस्ते टाळले, गावं सोडली, तरी मोकळे होणार नाहीत, तरीसुद्धा रस्ते. विचित्र असतात रस्ते विचित्र असतात'' विशिष्ट सामाजिक जीवनाशी व व्यक्तीच्या मानसिक अवस्थांतरनाशी निगडीत ही रस्त्याची रूपे आहेत. 'आत्मचरित्र' आणि 'रातराणी' या कवितातही स्व शी संबंधित विविध स्थळावकाशातील स्थलांतरणे आहेत. ही स्थलांतरणे केवळ प्रदेशाचे तपशील पुरविणारी नाहीत, तर या स्थलांतरणाच्या जाणिवेत मानवी चिंतनाचा संदर्भ आहे. सृष्टीतील भवतालाची प्रवासाची क्षणचित्रे आहेत. तसेच त्या त्या प्रदेशाच्या गुणवैशिष्ट्यांचा मी वर झालेला संस्कार आहे. जन्मापासून ते साठा उत्तरीपर्यंतचा प्रवास तीमध्ये आहे. एवढे असूनही आपण जिथल्या तिथेच तर, बसून आहोत, आपलं मृगाजिन झालं नाही याची खातरी करत आपण पायउतार झाल्याची भावना तीमध्ये आहे. या स्थलांतरणाचे प्रतीक म्हणून रस्ता या रूपकाला तीमध्ये महत्त्व आहे. हा रस्ता प्रतीक रूपाने नेमाडे यांच्या कवितेत पुनःपुन्हा आवृत्त झाला आहे. तर त्रिखंडाला लगाम घालून जगभर स्वार होणाऱ्या अरबी, झराणी मनोराज्यांचे प्रकटीकरणही या कवितेत आहे.

संस्कृतिसंकरावर व त्यांच्या गळामिठीवर नेमाडे यांचे मनःपूर्वक प्रेम आहे. संस्कृतिसंपर्काचे व परस्परांतील साहचर्याचे व सहिष्णुसंवर्धनाचे हे प्रेम 'त्रिखंडाला लगाम घालून' आणि 'प्यारी' या कवितेतून व्यक्त झाले आहे. या कवितांना सामाजिक, राजकीय परस्पर मिसळणीचे तत्त्व आहे. विसाव्या शतकाच्या मध्यावरील हा निवेदक आपल्या पूर्वसंचिताकडे, इतिहास टप्प्यावरील एका घटनेकडे पाहतो आहे. एका बाजूला त्रिखंडाला लगाम घालून असलेली संस्कृती आणि दुसऱ्या बाजूला हिंदभूमीतील किरटे, कुबडेपण धुमसणेपणाच्या पार्श्वभूमीवरील आठ शतकाच्या करंट्या इतिहासाच्या या भावच्छटा आहेत.

मोहोबत जडत गेली-तुझा अबलख घोडा ऐटबाज शिरपेच दरबारी ऐष

मिठी जुबान ताज तख्त ठुमन्यागझला सतारशहनाया वतनासाठी कुर्बानी

आमचे होश उडत गेले हारत गेलो हरवक्त चोहो बाजूंनी

रुमालानं हात बांधून ऐ प्यारी, आम्ही तुझ्या कबजात गेलो

असे परस्परमिसळीचे, तीविषयीच्या आकर्षणाचे संदर्भक्षेत्र या संवेदनकेंद्राला आहे.

मरणभानाचे एक प्रमुख असे सूत्र 'देखणी' मधील कवितेतून प्रकट झाले आहे. जीवसृष्टीतील मरणभानाने व्यापलेली ही कविता आहे. ती मानवी सृष्टीतील जशी आहे तंशीच मानवेतर सृष्टीतीलही आहे. एक प्रकारचे मरणाच्या शोकात्म, दुःखद संवेदनेचे एक प्रमुख केंद्र या कवितेत आहे. 'ताईबाईच्या नावानं' 'आजी' 'आत्महत्यारी' 'हरिहरि गेला बिचारा बापुला' 'गुरुवर्य' 'कत्तलखाना' व 'पसायदान' या कवितांमधून हे मरणभानाचे विश्व प्रकटलेले आहे. वडील, आजी, बहीण या आपल्या संबंधातील व्यक्तींच्या जाण्याचे दुःख तीमध्ये आहे. त्या दुःखाचे गडद भावनिक संस्कार आहेत. 'हरिहरि गेला'मध्ये वडिलांच्या जाण्याचे दुःख आहे. त्याचे कष्ट, विठ्ठलाशी असणारे त्याचे सख्य आणि आता तो यातून मोकळा झाल्याची जाणीव आहे. या दुःखामुळे तो त्या व्यवहाराकडे एका तटस्थ, अलिप्ततेच्या नजरेतून पाहतो आहे. मात्र अस्थिविसर्जनाच्यावेळी तो ज्यावेळी पंढरपुरास येतो आणि संशयी नजरेने ते विश्व न्याहळतो. ज्यावेळी तो विठ्ठलाची मूर्ती पाहतो त्यावेळी त्याचा संशय मावळतो आणि हरपली बुद्ध मख्ख झालो अशी जाणीव त्याला होते. वडिलांच्या जाण्याने वंशवृक्षाच्या पारंबीला विठू चिकटल्याची जाणीव त्यास होते आणि त्या वंशवृक्षाची पारंबी आपण असल्याची जाणीव त्याला होते. एका अर्थाने विठ्ठलाचे गुंतलेपण, जखडलेपणाची ही जाणीव आहे. नेमाडे यांची कविता झपकन कशी उंचीवर जाते, याचे हे उदाहरण आहे. ती केवळ परंपरानिष्ठ अथवा आधुनिकत्वाचा उच्चार करीत नाही, तर या संस्कृतीविषयीचे विधान ती करते.

'ताईबाईच्या नावानं' व 'आजी' याही कवितांत स्व शी संबंधित व्यक्तींच्या मृत्यूच्या घटनेचा तीव्र ओरखडा मनावर उमटलेला आहे. त्याचा संस्कार या कवितेमधून नोंदविलेला आहे. या दोघींच्या जाण्याने आपण अनाथ झाल्याची भावना आहे. अपूर्णत्वाची, अभावाची जाणीव आहे. अपराधाची ही दुखरी सल आहे. बहिणीचे अकस्मिक नाहीसे होणे. ताईबाईच्या अनाम, अज्ञात हाकांनी चाळीस वर्षे त्याला पिसं केल्याची भावना आहे. तिच्याशिवाय सगळ्या गोष्टींचं मसण झाल्याची भावना तीमध्ये आहे. सृष्टीनं तडीपार केलेला तिचा जीव त्याचे स्वतःत दडवून ठेवला आहे. तर आजीच्या जाण्याची व आधारवड नाहीसा झाल्याची भावना आहे.

गुरुवर्य कवितेतही भाषा-संवादशास्त्र शिकविणारे आपले शिक्षक आयुष्यभर कसे एकाकी राहिले आणि एकाकीच गेल्याची भावना व्यक्त झाली आहे. 'आत्महत्यारी' कवितेत या मरणाची वेगळी रीत व्यक्त झाली आहे. कोणातरी अनाम पोरीने केलेल्या आत्महत्येची मीमांसा आहे. आपल्या समाजव्यवस्थेतील तिचे पिचलेपण आणि तिने संपविलेली देहयात्रा याचे प्रकटीकरण आहे. तिच्या जैविक पराभवाच्या 'मूठभर' कारणांचा शोध नंतर समाज घेईल. असं हे आपलं मर्त्यत्व हेच जगण्याचा मुख्यार्थ आहे, याचे सूतोवाच करणारी ही कविता आहे. 'कत्तलखाना' या कवितेत म्हाताऱ्या, वृद्ध, डंगर झालेल्या बैलाची रवानगी कत्तलखान्यात केली जाते. या कत्तलखान्यात बैलाला कोरडेपणाने कापण्याचे, तोडण्याचे, नाहीसे करण्याच्या हिंस्रतेचे वर्णन आहे. ज्या बैलाने आपले आयुष्य कुणासाठीतरी व्यतीत केलेल असते आणि त्याचे याप्रकारे होणे हे जास्त करुणार्त ठरते, हा भाव प्रकट झाला आहे.

नेमाडे यांच्या कवितेला देशीयतेचे प्रखर असे भान आहे. त्यांच्या कवितेतून इथल्या भूमीतील जीवनदायी प्रेरणांचा व मूल्यांचा आविष्कार होतो. तीमध्ये भूमिसातत्याचे भान कुठेही ढळत नाही. मानवी जगण्याला चैतन्ययुक्त ठरणारा, पोषक ठरणारा हा मूल्यांचा आविष्कार आहे. आधुनिक काळातील एक मन या परंपरेतील मूल्यभावाकडे पाहते आहे. समृद्ध अडगळीतील मूल्यभान सतत या कवितेला आहे. या मूल्यभानाची विविध रूपे त्यांच्या कवितेतून साक्षात झाली आहेत. ही जीवनदायी मूल्ये जशी मानवी जीवनातील आहेत तशीच ती सृष्टीविषयी देखील आहेत. ती माणसांनीच तयार केली आहेत. अशा चांगुलपणाची, सद्भावाची रूपे या कवितेतून प्रकटलेली आहेत. याचाच भाग म्हणून हा मी, निवेदक, सबंध जगाकडे एका सहानुभावाच्या, जिवंत आस्थेच्या आणि करुणेच्या भावनेने पाहतो आहे.

स्त्रीत्वाच्या कृतीबद्दलचा कमालीचा ममत्त्वभाव व कृतज्ञताभाव या विश्वात आहे. बहीण, आजी व गर्भवती स्त्रीच्या रूपातून हे दर्शन घडविले आहे. आजीला उद्देशून लिहिलेल्या कवितेत माझ्यावेळी सुईण तूच होतीस तूच माझ्या तोंडात पहिला श्वास भरला आणि ह्या आयुष्याचं शिंग फुंकलं, सटी घातली, कान टोचले, बाशिंग बांधलं या प्रकारचा सद्भाव आहे. तर 'पाठीशी भिंत तुझ्या' या कवितेत एक तरुण स्त्री आपल्या बाळाच्या जाण्याने दुःखी आहे. तिला उद्देशून भिंतीला पोतरे घे आणि तुझ्या पदराचे पेत टिको असे म्हटले आहे. यात पोतरे घेणे यात नूतनीकरण आहे. नवेपण आहे. तर पदराचे पोत टिको असे म्हणण्यात वंशवृद्धीचा आशीर्वाद आहे. एकूण भारतीय संस्कृतीतील स्त्रीबद्दल लोकमानसात वसत असलेल्या

अनुक्रमणिका

उदात्त भावाचा व तिच्यातील निर्माणशक्तीचा उच्चार या कवितेत आहे. बयो, तुझं रीण फेडल्याशिवाय ह्या जन्मी सुटका नाही असा स्त्रीबद्दल मूल्यभाव आहे.

सामान्य माणसाबद्दल सहनुभाव व करुणा नेहमीच नेमाडे यांच्या साहित्याचा विषय राहिलेला आहे. कवितेतूनही ती जाणीव आविष्कृत झाली आहे. उदा. हे लांब लांब रस्ते मधील प्रार्थनारूपी पुढील ओळी पाहुयात.

चांगली माणसं मोजण्यासाठी हाताला हजार बोटं असोत
लक्षात राहत नाहीत् बिचारी. त्यांना दीर्घायुष्य लाभो
ते चुलीपुढे बसून ताटात वाढलेलं मुकाट्यानं खातात
त्यांचे सदरे फाटके असतात आणि मुडपून टीप घातलेली असते
धोतराला कुठेतरी-छिद्र असतात नेहमी, नेहमी झोपतसुद्धा
ते कधी स्वतःचं अस्तित्व जाणवून देत नाहीत...
झोपलेले असताना किती बिचारे दिसतात
पोरांना सडकेच्या काठावर ठेवून खडीडांबर टाकत असतात
किंवा कुणी काहीही म्हटले तरी ते हो हो म्हणतात.

मानवतेर सृष्टीविषयीही सहानुभाव हा इथल्या संस्कृतीचा विशेष होय. या मूल्यजाणिवेचे प्रकटीकरण नेमाडे यांच्या कवितेत आहे. कत्तलखाना या कवितेत बैलाविषयीचा सहानुभाव व आस्थेवाइक जिव्हाळा व्यक्त झाला आहे. वृद्ध बैलाला हिंस्र पद्धतीने नाहीसे केल्याचे फार करुणपणे चित्र आलेले आहे. तटस्थ, कोरड्या तपशीलांतून हे भावदर्शन उभे केले आहे.

सोड दोर ओढ पोरा मुकाट्यानं येतोय रे यडा जीव मागं मागं
हरि! हरि! केवढा होता, कुठे गेला हो? गरीब बिचारा, परोपकारी जीव
मेल्यावरसुद्धा सबंध शरीराचा अपराध पोटात घाला म्हणणारा

असा बैलविषयीचा करुण कृतज्ञताभाव आहे. प्रतीकात्मताही आहे. भूमितत्त्वाचे इथल्या सत्वाचे भानही या कवितेला आहे. लंडनशी भांडण झालं पॉवेलसाहेब चावेल म्हणून वर्षाअखेर गाठलं विमान काळ्या कातडीनिशी मान ठेवत ताठ (आत्मचरित्र) असा खास मराठी बाणाही तिच्यात आहे.

'भगताची वही' या कवितेतून या भूमीतील सद्‌भावाचा लक्षणीय आविष्कार झाला आहे. जीवनाच्या, सृष्टीच्या आनंदाचे, भरलेपणाचे हे गाणे आहे. भूमी, मातीविषयीची कृतज्ञता तीमध्ये आहे.

नातं नाही तोडू मातीचं मातीचं माह्या देवा
उगोयलं रे कोंब लाडानं लाडानं दारी तुह्या
घा.. मांडव रुदू नको दीऊ नको कुडीले पीडा लावू, हो ऽ मुंज्या
÷ (अरे बोल भाई बोल)
अरे ऊसात साकर भरू दे भरू घागर दह्यादुधानं

हा सद्‌भाव या कवितेते आहे. नेमाडे यांच्या कवितेचे रूपही वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. आपल्या कवितेमध्ये समृद्ध असा जीवनाशय पुरवणाऱ्या त्यांच्या कवितेची भाषाही फार रेखीव अशी आहे. काव्यभाषेला इतके डोळस सजगपण प्राप्त करून देणारे कवी अपवादभूतच असतात. कवितेच्या वाटेला ते फारसे गेलेले नाहीत. याचे कारण भाषेतसुद्ध शोधावे लागते आणि त्यांच्या एकूण काव्यविषयक धारणेतही. देखणी च्या छोटेखानी प्रास्ताविकात त्यांनी म्हटलेले इथे ध्यानात घेतले पाहिजे

''अबोध मनात भाषेच्या अंतस्तराखालीच कवितेच्या ध्वनिस्तरांचाही उगम होत असतो. ह्या स्थितीत आपले संपूर्ण भान भाषेसाठी पणाला लावता आले नाही तर कवितेच्या द्रव्याची हवा होऊन जाते, असा माझा दीर्घ अनुभव आहे. कवितेच्या भाषेच्या ह्या अंमली द्रव्याखाली आपले सगळे व्यक्तिमत्त्व अटीतटीने राहू देण्याचा तुकारामकथित युद्धाचा प्रसंग प्रत्येक लिहिणाऱ्याला अत्यंत मोलाचा वाटणे साहजिक आहे, कारण ह्या अंमली भाषेच्या कमी जास्त स्पर्शावरच एकंदर साहित्याच्या भाषेची मदार असते''

विचार, भावना आणि संवेदनांचा अपूर्व आणि दाट असा प्रत्यय देण्याचे सामर्थ्य नेमाडे यांच्या शब्दकळेत आहे. ती एकच निव्वळ आत्यंतिक गडद अशा भावनात्मकतेचा ठसा उमटविते. मात्र तो उमटवीत असताना वर्तमानाचा निवेदकाच्या तटस्थतेचा पदर ती कुठेही ढळू देत नाही. ती निव्वळ गहिवरपंथी, हळवी, दुःखसंवेदनी होत नाही. तिला विचारांचे व नेमक्या संप्रेषणाचे भान असते. त्यांची देवघेव व ये जा यांचे ते बेमालूम मिश्रण करतात. सदानंद देशमुख हे नव्या

पिढीतील महत्त्वाचे लेखक एका भाषणात म्हणाले होते, ''नेमाडे यांची कविता वाचून आमच्या काळजाचा कातरकाळा होऊन जातो. भावनांची आत्यंतिक कालवाकालव होते. असा भाग या शब्दसंवेदनेतून ते घडवितात. केवळ गच्च असा भावनिक शोकात्म भावसंस्कार उमटविणे एवढे तिचे कार्य नसते, तर त्याबरोबरच विचारांचा मोठा संस्कार हे शब्दरूप घडविते''

काव्यभाषा वापरावेळी नेमाडे कवी म्हणून फार दक्ष असतात. कवितेतील भाषावापराचे स्वतंत्र असे भान त्यांना आहे. भाषारूपे केवळ चिन्हे नसतात तर ती समाजसंस्कृतीची वाहक असतात. नेमाडे शब्द फार तावून सुलाखून वापरतात. शब्द उच्चारातून, ध्वनींच्या उच्चारांतून घडविलेले अर्थयुक्त स्फोट आणि त्यातील परस्परसंबंध यातून एक सौंदर्यात्म रूपसिद्धी होत असते. या बाबतीत नेमाडे यांच्या काव्यशैलीवर काहीसा पु. शि. रेगे यांचा संस्कार आहे. कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त अर्थ ठासून भरणे, तो गच्च भरणे, घनदाट करीत जोणे, त्याचा आशयसमृद्ध विस्तार करणे हा त्यांच्या काव्यशैलीचा विशेष आहे.

शब्दाशब्दांमध्ये व ध्वनींच्या स्फोटामागे असणाऱ्या नादशक्तीची व सुरावटीची वेधक अशी जाणीव आणि त्याचा विशिष्ट संस्कार घडविणे, हा नेमाडे यांच्या शब्दशैलीचा विशेष आहे. भाषावापरातून व्यक्त होणाऱ्या सुरावटीचे भन्नाट असे वेड नेमाडे यांच्या शब्दशैलीला आहे. सृष्टीतील विविध घटनांमधून आविष्कृत होणाऱ्या लयीचे आकर्षण नेमाडे यांच्या संवेदनकेंद्राला आहे. ती लय विशिष्ट नादबंधयुक्त शब्दांमधून नेमाडे यांनी व्यक्त केली आहे. निसर्गातील विविध तत्त्वांमधून प्रकटणाऱ्या तसेच दैनंदिन जीवनातून वाहणाऱ्या लयींचा आविष्कार नेमाडे यांच्या कवितेतून होतो. नेमाडे यांनी जसा प्रमाणभाषेतील नादयुक्त शब्दबंधांचा लयीच्या वृद्धीसाठी उपयोग घडवून आणला, तसा मोठ्या प्रमाणामध्ये लोकपरंपरेतील बोलीरूपातील लोकलयींचा आविष्कार घडवून आणला आहे. खानदेशातील वही, गोव्यातील पोर्तुगीज व मूळच्या संस्कृतीच्या मिश्रणातून निर्माण झालेल्या लोकलयीचा आविष्कार तीमध्ये आहे. लोकगीतातील ध्वनीबंध, संबोधने, धृवपदे, शब्दांची आवृत्ती यांचा अत्यंत सर्जक असा आविष्कार नेमाडे यांनी केला आहे.

खूप कमी कवींच्या कवितेतील वाक्यबंधाला अवतरणक्षमता प्राप्त होत असते. अशी वाक्ये दीर्घकाळ या वाङ्मयीन परंपरेत टिकून राहात असतात. तुकारामांच्या अभंगांतील ओळींचे आव्हान शतकानुशतके मराठी भाषिक परंपरेत टिकून आहे. तशा प्रकारचे सामर्थ्य चांगल्या साहित्याचे लक्षण मानावे लागेल. नेमाडे यांच्या कवितेमध्ये या प्रकारची अवतरणक्षमता आहे, जिच्यामध्ये सामूहिक मनाला आवाहन करण्याचे सामर्थ्य आहे. उदा. 'दुःखाचा अंकुश असो सदा मनावर', 'हलाहल पचवल्याबद्दल माथ्यावर चंद्र असो' किंवा 'चांगली माणसं मोजण्यासाठी हाताला हजार बोटं असोत' किंवा 'जमेल तितकी बंधनं तोडली, राहतील तेवढी मानली' 'खंत वाटणाऱ्या गोष्टीचा दररोज ताळेबंद केला' या प्रकारच्या सुभाषितपर ओळी मात्र ज्यामधून चांगली अर्थ, वैचारिकता प्रकट होते अशी वाक्ये, कडवी नेमाडे यांच्या कवितेमध्ये आहेत.

भालचंद्र नेमाडे यांची कविता केवळ भावनांचे अथवा संवेदनांचे प्रकटीकरण करीत नाही. या साऱ्या एकात्म रूपाला चिंतनाचा, विचारांचा परीघ हा मोठा आहे. मानवी संस्कृतीशी संबंधित व मानवी जगाच्या चिंतनाचा फलक तीमधून मोठ्या प्रमाणात व्यक्त झाला आहे. तो काही केवळ सुट्या स्वरूपाच्या एखाद्या विचासूत्राच्या तुकड्याचे प्रकटीकरण करीत नाही, तर विविध ठिकाणांहून मानवी मनामध्ये झिरपलेल्या व रुजलेल्या मानवी कल्याणाची चिंतनरूपे या कवितेतून साक्षात झाली आहेत.


नेमाडे शब्दांचा फार नेमका वापर करतात. कवितेतील अनुभवकेंद्राच्या परिणामकारकतेसाठी विविध शब्दांची जुळणी, त्यांचे साहचर्य व घडणीतून नेमका परिणाम घडवून आणतात. यासाठी शब्दांच्या निवडीसाठी व योजनेसाठी ते शब्दाशब्दांवर क्राफ्ट करतात. अर्थाचा तोल न जाऊ देता त्याचा अत्यंत रेखीव उपयोग ते काव्यसंहितेत घडवून आणतात. अर्थाला इकडे तिकडे ढळण्याचे स्वातंत्र्य या काव्यसंहितेत नसते. तसेच त्या त्या भाषिक परंपरेतील शब्दांची घडण काव्यभाषेच्या सौंदर्याची वृद्धी करणारे फार्शी, इंग्रजी भाषेतील शब्द तसेच शब्दांना नवे अर्थ प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य त्यांच्या शब्दशैलीत आहे. ते वाक्यसंबंधाच्या अधेमध्ये शब्द नेमके मिसळून ठेवतात. 'ताईबाईच्या नावानं' या सबंध कवितेचे केंद्र हे शोकभावनेच्या तीव्र संस्काराचे आहे. या कवितेतील जगण्याच्या निबिड सन्नाट्यात फक्त तुझी गुरगुर ऐकणं आलं या ओळीतील 'गुरगुर' या शब्दाला झर्रकन वेगळा अर्थ प्राप्त होतो. अर्थाची कक्षा विस्तारते. दुःखाची, वियोगाची भावना आणि त्याचा निरंतर पाठलाग याची गाज या शब्दबंधातून प्रकट झाली आहे. तर 'झिमझिम उन्हे' या कवितेत 'भिनलेले हळदुन' असा वैशिष्ट्यपूर्ण शब्दप्रयोग त्यांनी केलेला आहे. तरुण गर्भवती स्त्रीची प्रसन्न आणि

टवटवीत मनमुद्रा आणि तिच्या देहमनाचे दृश्यरूप या प्रतिमेतून साक्षात केले आहे. हळद आणि कोवळे ऊन या दोन शब्दांच्या एकत्रीकरणातून असा नवा शब्द घडविला आहे. भारतीय परंपरेत हळदीला विशेष महत्त्व आहे. विशेषत्वाने स्त्रीच्या निर्मितीशी, सर्जनाशी त्याचा जवळचा संबंध आहे. आणि कोवळे ऊन नव्या अंकुरण्याचे, कोवळीकतेचे, नवारंभाचे, उगवण्याचे सूचन म्हणून येते. आपल्या देहमनातील पालट आणि स्थित्यंतर प्रकट करण्यासाठी एका बाजूला शरीरावर निर्माण झालेली कांती आणि कोवळे ऊन यांचा संदर्भ 'हळदुन' या शब्दाला आहे.

एकंदरीत भालचंद्र नेमाडे यांची कविता ही आधुनिक मराठी कवितेच्या टप्प्यावरील महत्त्वाची कविता आहे. विविधलक्ष्यी जाणीवकेंद्रांबरोबरच रूपाचे तिला स्वतंत्र भान आहे.

। डॉ. रणधीर शिंदे
फ्लॅट नं. २०४, प्रथमेश अपार्टमेंट,
राऊत कॉलनी, अंबाई डिफेन्स परिसर,
कोल्हापूर.
भ्रमणभाष ९८९०९१३०३१

अनुक्रमणिका



लेखिका संमेलन विशेषांक

(ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१३)

।। सहभाग ।।

डॉ. सुधीर रसाळ, डॉ. प्रभा गणोरकर, डॉ. मंगला वरखेडे, डॉ. रमेश वरखेडे, डॉ. प्रतिभा कणेकर, मन्नू भंडारी, चंद्रकात भोंजाळ, साधना बहुळकर, अनुराधा पाटील, कविता महाजन, नीरजा, कल्पना दुधाळ, भाग्यश्री पेठकर, वैशाली नवघरे, डॉ. चित्रा म्हाळस, चित्रगंधा सुतार.

पृष्ठ ८४, किंमत ८० रुपये


नामदेव ढसाळ विशेषांक

(जानेवारी ते जून २०१४)


।। सहभाग ।।

प्रा. रा. ग. जाधव, डॉ. गंगाधर पानतावणे, सतीश काळसेकर, शरणकुमार लिंबाळे, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, डॉ. सतीश बडवे, डॉ. प्रमोद मुनघाटे, डॉ. महेंद्र भवरे, डॉ. अरुणा देशमुख, डॉ. गोविंद काजरेकर, चित्रगंधा सुतार, श्रीधर अंभोरे, प्रा. राजेंद्र मुंढे, अजेय गंपावार, भगवान फाळके, अनिल कुलकर्णी.

पृष्ठ ८४, किंमत १०० रुपये.



संपर्क सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, नागपूर ४४००१२
दूरध्वनी ०७१२-२५२३९२९, २५५३७६७



युगवाणी

एप्रिल-मे-जून २०११

॥ सहभाग ॥

डॉ. मधुकर वाकोडे, प्रा. वसंत आबाजी डहाके, बाबाराव मुसळे, प्राचार्य डॉ. मदन धनकर, डॉ. शशिकांत लोखंडे, डॉ. किशोर सानप, डॉ. सुखदेव ढाणके, डॉ. केशव सखाराम देशमुख, प्रशांत असनारे, प्राचार्य सदानंद बोरकर, सुदाम राठोड, निवृत्ती बावणे, प्रा. विजय रुद्रकार.

पृष्ठ ६८, किंमत ४० रुपये


युगवाणी


जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०११

॥ सहभाग ॥

डॉ. सुधीर रसाळ, डॉ. सुरेश भृगुवार, प्रा. वसंत आबाजी डहाके, इंद्रजित भालेराव, सदानंद देशमुख, अशोक कौतिक कोळी, श्रीकृष्ण राऊत, डॉ. अण्णा वैद्य, रमेश राऊत, सुचित्रा कातरकर, बालाजी मदन इंगळे, संदीप जगदाळे, भूषण रामटेके, प्राचार्य सदानंद बोरकर, प्रा. योगेश आडकिने, प्रा. प्रवीण ढेंगे, सुनील भर्रे.

पृष्ठ ६८, किंमत ४० रुपये





युगवाणी

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०११


॥ सहभाग ॥

डॉ. सुरेश भृगुवार, श्रीकांत देशमुख, डॉ. माधव पुटवाड, डॉ. मोना चिमोटे, डॉ. केशव सखाराम देशमुख, प्रा. देवानंद सोनटक्के, शशिकांत हिंगोणेकर, प्राचार्य सदानंद बोरकर, कृणाल माकोडे, अभिषेक तरोणे.

पृष्ठ ६८, किंमत ४० रुपये

संपर्क सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, नागपूर ४४००१२
दूरध्वनी ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

अनुक्रमणिका



भालचंद्र नेमाडे यांचे काव्यचिंतन काही नोंदी

डॉ. हेमंत खडके

काव्याचा निर्मितीच्या, अस्तित्वाच्या आणि आस्वादाच्या अंगाने केलेला विचार म्हणजे काव्यविचार होय. संस्कृत काव्यशास्त्रात यालाच काव्याचा कविमुखाने, काव्यमुखाने आणि रसिकमुखाने केलेला विचार म्हटले आहे. काव्यविषयक विचार, मते, शोध, चिंतन, चर्चा, निर्णय सिद्धांत या सर्वांचा समावेश 'काव्यविचार' या संकल्पनेत करता येतो.

रा. भालचंद्र नेमाडे यांनी असा 'काव्यविचार' सलगपणे स्वतंत्रपणे कुठे एका ठिकाणी व्यक्त केला आहे का? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल. त्यांच्या साहित्यमीमांसेत आणि समीक्षेत कादंबरी या वाङ्मयप्रकारावर जसे दीर्घ, सलग व विस्तृत चिंतन आले आहे तसे काव्य या प्रकारावर आलेले नाही. मात्र त्यांचे एकंदरीत लेख, भाषणे, मुलाखती, प्रस्तावना यांतून प्रसंगोपात्त असा काव्यविषयक विचार व्यक्त झालेला आहे. तो खंडित स्वरूपात असला तरी महत्त्वाचा आहे. त्यांची एकत्र मांडणी करण्याचा प्रयत्न या टिपणातून केला आहे.

नेमाडे यांच्या साहित्याविषयक चिंतनावर अगदी सुरुवातीला म्हणजे १९६० च्या कालखंडात मर्ढेकरांचा प्रभाव असावा असे दिसते. 'निरस्पपादशे देशे...' या लेखात श्री. के. क्षीरसागर यांच्यावर घणाघाती टीका करताना नेमाडे यांची टीकेची काही लक्षणे सांगितली आहेत. ''टीका ही इतर कलांच्या तोलानेच साहित्यासहि मोजते हा महत्त्वाचा मुद्दा प्रोफेसर मजकुरांस अजून पावेतो कळलेला नाही. आमच्या टीकावाल्यांस हे कसें कळत नाही कीं, साहित्य ही कला इतर चित्रसंगीतादि कलांपासून केवळ माध्यमान्वये वेगळी होते... (नेमाडे, २००१, पृ. १६-१७) या ठिकाणी साहित्यकलेची (म्हणून काव्यकलेचीही) दोन लक्षणे नेमाडे मान्य करताना दिसतात. एक म्हणजे सर्व कलांचे तत्त्व एकच आहे हे व दुसरे म्हणजे साहित्य ही कला केवळ भिन्न माध्यमामुळे इतर ललित कलांपासून वेगळी पडते. ही दोन्ही लक्षणे आपल्याला सर्वप्रथम दिसतात ती मर्ढेकरी मीमांसेमध्ये. मात्र पुढे कधीही नेमाडे यांनी या लक्षणांचा पुनःरूच्चार केलेला दिसत नाही. याचे कारण असे की मर्ढेकरांची एकूण मीमांसा ही वाङ्मयकृतीचे इतर सर्व म्हणजे सामाजिक-सांस्कृतिक-ऐतिहासिक संदर्भ छाटून केवळ तिच्या लयबद्ध रचनेला महत्त्व देणारी आहे. ती कलाकृतीकेंद्री आहे. नेमाडे कलाकृतीचा विचार तिला केंद्रस्थानी ठेवून करीत नाहीत. विशिष्ट सामाजिक-सांस्कृतिक-ऐतिहासिक पर्यावरणाला ते महत्त्व देतात. ''आपल्याकडे लेखकांपासून समीक्षकांपर्यंत हा भ्रम आहे की, अमुक लेखक मोठा झाला म्हणजे त्याचं वाङ्मय शुद्ध वाङ्मयीन निकषांनुसार निर्माण झालेले असावं. हे एक पुन्हा समीक्षेला खोडून काढावं लागेल की पुस्तकं किंवा लेखक हे

आपण होऊन कधीच मोठे नसतात. ते मोठे केले जातात. शुद्ध असे वाङ्मयीन महात्मतेचे निकष कोणत्याही साहित्यात सापडल्याचा पुरावा नाही. प्रत्येक संस्कृतीचे, प्रत्येक काळाचे, साहित्यकृती श्रेष्ठ ठरवण्याचे वेगवेगळे निकष असतात. आणि त्यानुसार ग्रंथ किंवा लेखक थोर केले जातात.'' (नेमाडे, २००९, पृ. १४२) असे त्यांनी सांगितले आहे. हे वाचताना, 'जनता हे काव्याचे शेवटचे न्यायासन आहे' असे मानणाऱ्या श्री. व्यं. केतकरांची सामाजिक दृष्टी आठवल्याशिवाय राहात नाही.

काव्य : शुद्ध वाङ्मयप्रकार

नेमाडे काव्याला शुद्ध, केंद्रीय आणि सर्वोत्कृष्ट वाङ्मयप्रकार मानतात. त्यांच्या मते, काव्यलेखनात कवीचे व्यक्तित्व पणाला लागते. काव्यलेखन करताना निर्मितीप्रक्रियेची शुद्धता लेखकाला प्रतीत होते. कवितेत आशय, माध्यम आणि फॉर्म ह्यांच्यातून मार्ग काढणे एक आव्हान असते. या प्रकारात शैली कसोटीला लागते. कवितेसाठी व्यावहारिक अवधाने बाजूला ठेवून वेडे व्हावे लागते. बहिर्मुख वृत्ती टाळून अंतर्मुख व्हावे लागते. काव्यनिर्मिती कवीचे संपूर्ण व्यक्तित्त्व व्यापून टाकणारी गोष्ट आहे. नेमाडे पुढे असेही म्हणतात की अबोध मनात भाषेच्या अंतःस्तराखालीच कवितेच्या ध्वनिस्तरांचाही उगम होत असतो. कवितेच्या भाषेच्या या अंमली द्रव्याखाली सगळे व्यक्तित्व अटीतटीने पणाला लावावे लागते. कारण या अंमली भाषेच्या कमी-जास्त स्पर्शावर एकंदर साहित्याच्या भाषेची मदार असते. यामुळेच कविता ही सर्व साहित्यप्रकारांना केंद्रीय असते. भाषेच्या अंतस्तरात गाडून घेऊन जगण्याची प्रत्येक घडी लढवणाराच चांगली कविता लिहू शकतो. हाच कवीसाठी 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' असतो. या तुकारामकथित लढाईत आपले संपूर्ण भान भाषेसाठी पणाला लावता आले नाही तर कवितेच्या द्रव्याची हवा होऊन जाते. कलेच्या शुद्धाशुद्धतेचे वर्गीकरण मर्ढेकरांनीही केले आहे. एका संवेदनेवर आधारित ती शुद्ध कला (संगीत), अनेक संवेदनांवर आधारित ती कमी शुद्ध कला (शिल्प) आणि संवेदनांच्या प्रतिमांच्या खिचडीवर आधारित ती भ्रष्ट कला (साहित्य) अशी मर्ढेकरांची मांडणी आहे. काव्य-नाट्य-कथन यांच्यातील श्रेष्ठ-कनिष्ठता मर्ढेकरानी सांगितली नाही.

कवीचे व्यक्तिमत्त्व : आदिलेखकाची उग्र प्रतिमा

नेमाडे यांच्या मनात आदिलेखकाची एक उग्र प्रतिमा आहे. ते या लेखकाला वन्य पशूच्या रूपात पाहतात. त्यांच्या मते हा आदिलेखक जीवनाचे स्वरूप विवस्त्रपणे पाहात असतो. जीवनाची मूल्ये आणि वाङ्मयाची मूल्ये यांच्यात तो फरक करत नाही. ''दिवसाकाठी रोजच्या जगण्याचे उर्ध्वपातन होऊन त्याची निदान एक ओळ व्हावी.''(नेमाडे, २०००, प्रस्तावना) असे त्यांनी लिहूनच ठेवले आहे. प्रतिष्ठा, उपजीविका, पैसा ही प्रलोभने नाकारून जीवन आणि साहित्याशी प्रामाणिक राहाणे हे आदिलेखकाचे ब्रीद असते. मागणी तसा पुरवठा करणारी धंदेबाजी तो आपल्या निःस्पृह, निःस्वार्थी आणि तेजस्वी वर्तनाने नाकरतो. त्याच्याजवळ स्वतःची नैतिकता असते. जितकी त्याची स्पष्ट आणि व्हर्टिकल असेल त्या प्रमाणात त्याला यातना (सफरींग) होतात. ''प्रत्येक काळातला साहित्याचा कस त्या त्या काळातल्या दुःख सोसण्याच्या पातळीवर ठरतो. (नेमाडे, २००१, पृ. ३९१) अशी नेमाडे यांची भूमिका आहे.

नेमाडे यांच्या मते कवीने भोगलेल्या दुःखानुभवावरच त्याचे मोठेपण अवलंबून असते. असा कवी मूल्यांची निर्मिती करत असतो. भाषेलाही पुढे नेत असतो. या कसोट्यांवरच नेमाडे तुकारामाला मराठीतला सर्वात मोठा कवी मानतात. मर्ढेकरांनीही कवीचे व्यक्तित्व वेगळे मानले. पण नेमाडे यांच्यापेक्षा त्यांची भूमिका वेगळी आहे. नेमाडे कवीच्या व्यक्तित्वातील नैतिकतेला, प्रामाणिकपणाला, निःस्पृहतेला, तेजस्वितेला, सोशिकतेला, संवेदनशीलतेला महत्त्व देतात. त्यांच्या दृष्टीने ही कवीची जीवनमूल्येही आहेत, आणि काव्यमूल्यांशी त्यांचा विरोध नाही. मर्ढेकर कवीच्या व्यक्तित्वातील वेगळेपणाला महत्त्व देतात. त्यांच्या मते ''जीवनातील निरनिराळ्या भावनांचा अनुभव घेत असताना निरनिराळ्या भावनांचा एक तऱ्हेचा साचा व्यक्तिमात्राच्या मनात तयार झालेला असतो. सामान्य जनांच्या मनातील या साच्याची आंतरिक व्यवस्था कुठल्याही तत्त्वावर अधिष्ठित नसते, तर ती केवळ योगायोगानुसारी असते... याउलट कवीच्या मनातील साच्याची आंतरिक व्यवस्था ही विशिष्ट तत्त्वानुसारी असते. पहिल्या प्रकारच्या साच्यात भावनानुभूती त्या त्या भावनेपुरती मर्यादित असते, ती घटकात्मक असते, तर दुसऱ्या प्रकारच्या साच्यात ती संघटनात्मक असते... कवीच्या मनातील भावना-घटकांचे परस्पर संबंध साम्यभेद, सुसंवाद, विरोध, समतोलपणा या सौंदर्यतत्त्वांनी प्रेरित अशी जी लयबद्धता तिने गुंफलेले असतात.''(मर्ढेकर, १९८७,१६८-१६९). कवीच्या अनुभूतीत नेहमी दोन पदे असतात तर अकवीच्या अनुभूतीत एकच पद असते असाही फरक मर्ढेकर

अनुक्रमणिका

यांनी करून ठेवला आहे. नेमाडे कवीला जीवनाशी प्रामाणिक राहायला सांगतात आणि असाच कवी कवितेशी प्रामाणिक राहू शकतो असा त्यांचा विश्वास आहे. मर्ढेकर कवीच्या द्विदल अनुभूतीशी प्रामाणिक राहण्याला महत्त्व देतात. यालाच त्यांनी वाङ्मयीन आत्मनिष्ठा म्हटले आहे. मात्र या वाङ्मयीन आत्मनिष्ठेचे नाते मर्ढेकर कवीच्या नैतिक वर्तनाशी जोडत नाहीत.

'कविलोक' या कवितेतून (देखणी.पृ.३१) नेमाडे यांनी कवीच्या चिवट, संघर्षशील आणि जीवनासक्त वृत्तीबद्दल भाष्य केले आहे. वारंवार उडविल्यानंतरही मधमाशा नवे पोळे बांधून मध गोळा करण्याचा आपला निसर्गदत्त व्यवहार थांबवत नाहीत. तसाच कवीही समाजासाठी उरात मधुर उषःकालाची स्वप्ने बाळगत आपली निर्मिती करीत राहतो. प्रस्थापित वर्ग त्याला हुसकावून लावण्याचा किंवा त्याने गोळा केलेल्या मधावर डल्ला मारण्याचा प्रयत्न करतो. तरीही कवी कण-कण गोळा करून पोळे भरण्याचा उद्योग सुरूच ठेवतो. लिहिताना जीवनाची आसक्तीच मनात एवढी भरून असते की कुठल्याही वाङ्मयीन वादाच्या चौकटी त्यांच्या निर्मितीला बांध घालू शकत नाहीत. जीवनाच्या मदमस्तपणामुळे प्रेरित होऊन तो लिहीत असतो. आपली राणीमादी कोण याचीही निश्चिती नसते. पण जगण्याचा माज अनावर असतो. त्याचे लिहिणे, जगणे यांनी एका युद्धाचे रूप धारण केलेले असते, नुसते युद्धाचे नव्हे तर धर्मयुद्धाचे!

देशी जाणिवा

नेमाडे यांनी साहित्याच्याच नव्हे तर सर्वच कलांच्या संदर्भात देशी जाणिवांना महत्त्व दिले. त्यामुळे काव्याच्या संदर्भातही देशी जाणिवा, मूल्ये, प्रमाणके, मानदंड, रूपबंध, शैली, परंपरा यांना त्यांच्या काव्यविचारात महत्त्व मिळणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. नेमाडे यांच्या मते जगातल्या श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या संस्कृतीमध्ये भारतीय उपखंडातील संस्कृतीचा समावेश होतो. या संस्कृतीच्या स्वतंत्र सौंदर्यव्यवस्था आहेत. त्यामुळे दुसऱ्या कोणत्याही संस्कृतीतील प्रमाणकांनी आपल्या कलाकृतींचा दर्जा ठरवता येणे शक्य नाही. कारण एका संस्कृतीतील मानदंड दुसऱ्या संस्कृतीला लागू पडू शकत नाहीत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय अशी मानकेही मानण्याची गरज नाही. आमचा तुकाराम-कबीर आम्हाला मोठा वाटत असेल तर हीच आमची मानके मान्य केली पाहिजेत आणि यातूनच आमचे मानदंड निश्चित केले पाहिजेत, अशी नेमाडे यांची आग्रही भूमिका आहे आंतरराष्ट्रीय मानके मान्य करणे हा वसाहतवादी गुलाम विचारसरणीचा प्रभाव आहे, अशी मीमांसाही त्यांनी केली आहे. ''माणसाला किंवा साहित्याला आपापल्या भूमीवरच, आपापल्या भाषिक समूहातच डौलाने उभे राहता येते.'' (नेमाडे, २००२, पृ.१०७) अशी देशीवादी भाषा ते आग्रहाने वापरताना दिसतात.

परंपरेवर भाष्य

मराठी काव्याच्या सातशे वर्षांच्या बुलंद परंपरेबद्दल नेमाडे जागोजाग अभिमान व्यक्त करताना दिसतात. ज्ञानदेव, नामदेव, जनाबाई, चोखोबा, एकनाथ, तुकाराम या वारकरी संप्रदायातील संतकवींबद्दल त्यांनी पराकोटीचा आदर व्यक्त केला आहे. वारकरी चळवळीच्या आविष्कार शैलीतील अस्सल देशी घटकांची नेमाडे यांनी बारीक छाननी केली आहे. शाहिरी कवितेचेही महत्त्व त्यांनी मान्य केले आहे. केशवसुत-बालकवींच्या भावकवितेचा नवाचार बदलत्या मराठी समाजाला आवडला मात्र चंद्रशेखर-तांबे यांचे मोलही तितकेच महत्त्वाचे आहे. परंपरेत राहून स्वकेंद्रित भावकवितेला छेद देण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले असे भाष्य ते करतात. रविकिरण मंडळातील कवी १९५० पर्यंत पु. शि. रेगे-मर्ढेकर-अनिल-मनमोहन यांनाही स्फूर्ती देत नंतर हास्यस्पद झाले. हे जरी खरे असले तरी रविकिरण मंडळाची हास्यास्पद परंपरा आजही बोरकर-बापट-पाडगावकर-आरती प्रभू इत्यादी अनेकांमध्ये अप्रत्यक्षरित्या कायम आहे अशी टीकाही त्यांनी केली आहे. (नेमाडे, २००१, पृ. १२)

मर्ढेकर आणि पु. शि. रेगे हे दोन कवी एकाच कालखंडात लिहीत होते ही घटना नेमाडे यांना उपकारक वाटते. युरोपातील नवी आविष्कारतंत्रे आणि नव्या शहरीकरणाच्या औद्योगिकरणाच्या प्रक्रियांची जाणीव मर्ढेकरांनी जुन्या ओवी-अभंगाला जोडली, तर पु.शि.रेग्यांनी ह्या प्रयोगांच्याही पुढे सुरू होणारे परंतु ह्यांनाच पूरक असे, विविध स्पंदने शब्दांच्या सीमित संहितेत शिल्पित करणारे सर्वस्वी नवे प्रयोग केले. दोघेही प्रयोगशील असल्याने कवितेची भाषा जबाबदार करून आणि कवितेची संहिता आधुनिक करून त्यांनी मोठे कार्य केले असे नेमाडे मानतात. नंतरच्या कालखंडात नामदेव ज्ञानदेवांची परंपरा बाजूला ठेवली गेली. त्यामुळे गोंधळाचे वातावरण दिसते. मात्र तरीही मनमोहन, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, मुक्तिबोध, सुर्वे, ना.घ., बहिणाबाई, महानोर यांनी मात्र चांगली कामगिरी पार पाडली, असे त्यांचे मत आहे.

कवितेची भाषा

नेमाडे यांच्या मते कवितेत भाषेचा जास्तीत जास्त सर्जक आणि प्रयोगशील वापर केलेला असतो. इतर

वाङ्मयप्रकारांमध्ये बव्हंशी साधन असलेली भाषा भावकवितेत मात्र माध्यमाची जागा घेते, तरीही साहित्यकृतीत पूर्णांशाने काव्यात्म भाषेचा वापर करणे शक्य नसते. कित्येक कवितांमध्ये कमीजास्त अंशांनी व्यवहारी भाषा वापरावी लागते. यानंतरच्या काळात प्रमाण मराठीत चांगली कविता होणे कठीण होईल उलट खानदेशी-कोकणी अशा प्रादेशिक बोलीभाषा कवितेला जवळच्या राहतील असेही भाष्य नेमाडे यांनी केले आहे.

संस्कृत काव्यशास्त्रात वाच्यार्थ, लक्ष्यार्थ आणि व्यंगार्थ यांच्या व्यापारांविषयी जी मांडणी झाली त्याबद्दल नेमाडे लिहितात, ...संस्कृत व्याकरणकार व साहित्यमीमांसक यांनी अत्यंत मूलगामी आणि शास्त्रीय पद्धतीने भाषेचा अर्थव्यापार विशद केला आहे. आधुनिक भाषाशास्त्रज्ञ त्याच्या फार पुढे जाऊ शकले नाहीत.'' (नेमाडे, १९९८, पृ.२७) नेमाडे पुढे आपल्या विवेचनात वाच्यार्थाला 'वाच्यार्थ'च म्हणतात पण लक्ष्यार्थ्याला त्यांनी 'सूचितार्थ' आणि व्यंग्यार्थाला 'संहितार्थ' म्हटले आहे. संस्कृत काव्यशास्त्रातील शब्दार्थव्यापर जर नेमाडे यांना मान्य आहे तर त्यांनी ही भाषा का बदलावी हे कळत नाही. कारण संस्कृत काव्यशास्त्रात व्यंग्यार्थालाच 'सूचितार्थ' म्हटल्याने नेमाडे लक्ष्यार्थासाठी जेव्हा 'सूचितार्थ' ही संज्ञा वापरतात तेव्हा अभ्यासकांचा गोंधळ होतो.

साहित्यभाषेतील 'रूपक', 'प्रतिमा' आणि 'प्राक्‌कथा' यांचेही विश्लेषण त्यांनी केले आहे. प्रत्येक संस्कृतीत प्राक्‌कथांचे मोठे स्थान असते. परंपरेने सार्वत्रिक केलेल्या कथांच्या घाटासाठी ही संज्ञा वापरली जाते. समाजाच्या एका स्थिर, निखळ सौंदर्यपर मानवी इतिहासाच्या अवस्थेत त्यांचा जन्म झालेला असतो. प्रल्हाद, सावित्री, सीता, येशू यांच्या कथा तर्कविरोधी वाटल्या तरी मानवी प्रवृत्तींचा आविष्कार करणाऱ्या ठरतात. मात्र आधुनिक काळात विवेकशील, तर्काधिष्ठित जीवनदृष्टी वाढत गेल्याने प्राक्‌कथा निर्माण करण्याची सर्जनशक्ती कमी झाली, अशी मीमांसा ते करतात. तरीही श्याम, सिंधू, चिमणराव, गणपत वाणी ह्या नव्या प्राक्‌कथाच असून त्या पूर्वीइतक्याच काव्यात्म, रूपकीय, प्रतीकरूप पद्धतीने जनमानसात प्रस्थापित झाल्या. मात्र स्थलकालात छेदून जाणारी त्यांची विश्वात्मकता मर्यादित ठरते. कारण काव्य, धर्म आणि गूढवाद यांच्या ऱ्हासाबरोबर प्राक्‌कथेची कालातीतता, वैश्विकता व अलौकितता संकुचित होत जाते, असे विश्लेषण त्यांनी केले आहे. अमूर्त तत्त्वांवरची मानवाची समूहनिष्ठा ज्या प्रमाणात राहील, त्या प्रमाणात प्राक्‌कथांची गरजही राहील, असे ते म्हणतात.

कवितेचे रूपबंध


कवितेची भिन्न काळातील भिन्न रूपेसुद्धा (घाट) भिन्न सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणाचा परिणाम म्हणून आकाराला येतात अशी नेमाडे यांची धारणा आहे. या संदर्भात अभंग आणि ओवी या मराठीच्या जुन्या छंदांचे विश्लेषण करताना ते म्हणतात, ...अभंग, ओवी ह्या छंदांचं मूळ लक्षण म्हणजे त्यांच्यातल्या ढिलेपणामुळे प्रत्येक स्वर दीर्घ उच्चारण्यामुळे ते वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहेत. अनेक शतकं जातं ओढणाऱ्या सर्व स्तरातल्या स्त्रियांच्या कष्टातली लय ओवीच्या ह्या छंदात एकजीव झाली आहे. दिवसभर काबाडकष्ट करून संध्याकाळी देवळात तन्मयतेने गाणाऱ्या शेतकरी वर्गाची संथ, शांत, लयबद्ध ओव्या ओढत नेण्याची अभंगाची लय अशीच दैनंदिन काबाडकामाच्या स्वरूपाशी जोडलेली आहे. ह्याउलट आर्या म्हटली की भरपूर पंगत झोडणाऱ्या, शब्दांशी खेळ करणाऱ्या वर्गांशी ती जोडली आहे.'' (नेमाडे, २००९, पृ.१६).

संदर्भ ग्रंथ :

१) भालचंद्र नेमाडे, टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद,२००१.
२) भालचंद्र नेमाडे, साहित्याची भाषा,साकेत प्रकाशन, औरंगाबाद,१९९८
३) भालचंद्र नेमाडे, सोळा भाषणे, लोकवाङ्मय गृह प्रकाशन,मुंबई,२००१
४) भालचंद्र नेमाडे, निवडक मुलाखती, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, २०१०.
५) भालचंद्र नेमाडे, देखणी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८७.
६) बा.सी.मर्ढेकर, सौंदर्य आणि साहित्य, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९८७.

। डॉ. हेमंत खडके
मराठी विभाग,
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.
भ्रमणभाष ९८२२८४११९०





हिंदू संस्कृतीचा मानवी चेहेरा दाखवणारा दस्तऐवज

डॉ. केशव साठ्ये

■

जी कादंबरी पूर्ण व्हायला ३५ वर्ष लागतात ती कशी असेल ही ताणलेली उत्सुकता नुकतीच पूर्ण झाली आणि 'हिंदू' वाचकांच्या हाती आली. खंडेराव हा या कादंबरीचा निवेदक आणि हिंदू संस्कृती, इतिहास हा खरा तर या कादंबरीचा नायक. ६०३ पानाच्या कादंबरीत या नायकाचं म्हणणं मांडणारा, वर्तमानाशी इमान ठेवणारा पट आणि निवेदकाच्या गोष्टीवेल्हाळ कहाण्यांमधून समोर येणाऱ्या बहुविध व्यक्तिरेखांचे विहंगम, प्रभावी चित्रण असा दुहेरी बाज या कादंबरीला आहे. खंडेराव हा या कादंबरीचा निवेदक, पुरातत्व आणि उत्खनन क्षेत्रात संशोधन करणारा एक उत्साही आणि संवेदनशील तरुण हुशार व्यवहारी भावनाप्रधान तो या प्रदीर्घ कादंबरीमधून अत्यंत रोमहर्षक आणि वैचारिक प्रवास घडवतो.

प्रथमपुरुषी निवेदनाच्या माध्यमातून आपला इतिहास संस्कृती यांची अत्यंत बुद्धिनिष्ठ चर्चा पहिल्या काही प्रकरणातून पुढे येते. हे तत्त्वज्ञान समजून घेत पुढं जावं लागतं. नुसती भौतिक संस्कृती केवळ बौद्धिक आकलनाखाली आणून आपल्या देशाच्या प्रदीर्घ भूतकाळाचा अर्थ कसा लावायचा. जाणिवांना स्थळ, काळापलीकडं अस्तित्व असतं की नाही? यासारखे अनेक मुलभूत मुद्दे लेखकांनी इथं उपस्थित केले आहेत. आपले अनुभव मांडताना खंडेराव कुठही आक्रमक होत नाही. आपल्याला जे कळलं आहे जाणवलं आहे ते तो कोणतीही भीड न बाळगता प्रामाणिकपणे सांगतो त्यात लादलेपण नाही. हा अत्यंत सभ्य आविष्कार आपल्याला कादंबरीभर जाणवत राहतो. यातील काही पात्रांच्या तोंडी येणाऱ्या अश्लिल शिव्याही कादंबरीचा बाज बिघडवत नाहीत कारण जाणिवांच्या शोधाचा खंडेरावचा ध्यास वाचकांना अशा प्रसंगानुरूप येणाऱ्या नैसर्गिक प्रतिक्रियांमध्ये अडकून देत नाही.

''फाशीवर लटकलेला माणूस मातृभूमीसाठी बलिदान म्हणून की चोर दरोडेखोर म्हणून टांगला गेला हे प्रेतावरून कसे ठरवणार?'' गुरुवर्य साखळिया सरांचा हा प्रश्न खंडेरावसारख्या संवेदनशील संशोधकाला बौद्धिक पातळीवर सतत सतावत रहातो.

प्रत्येकवेळी ती जमीन, ती मडकी, वस्त्रं, हाडं यांचाच का केवळ आधार घ्यायचा, तेंव्हा माणसाच्या मनात का असेल? ती कोणत्या परिस्थितीत असतील याकडं पुरातत्वशास्त्रानी एवढं दुर्लक्ष का करावं? याची खंत खंडेरावला आहे. त्याचं हे शल्य त्यानी अत्यंत कळकळीनं व्यक्त केलं आहे. 'हिंदू' कादंबरीचा हा गाभा आहे. माणसं महत्त्वाची, त्यांची सुखदुःख महत्त्वाची याचा घोष संपूर्ण कादंबरीभर निनादत राहतो.

अनुक्रमणिका

रुखमा, सीता आजी, सिंधू मावशी, सुधी, चिंधी, लाळी या माजघरातल्या आतल्या व्यक्तींची राज्य कादंबरीभर आहे. महानुभावपंथ स्वीकारून पाकिस्तानात गेलेली तिरोनी आत्या खंडेरावला त्याच्या मोहोनजोदडोच्या मोहिमेच्यावेळी सतत आठवत असते. तिचा ठावठिकाणा लागवा, तिच्याबद्दल काहीतरी समजावं ही त्याच्या तगमगीची छाया कादंबरीभर पडली आहे.

आईविना वाढलेली, चिंधीनं दूध पिणारी चिंधी देशमुखाची सून होते आणि त्या गूढ गढीत आपलं आयुष्य कशी काढते आणि वेळ येताच थंडपणे आपल्या जुलमी नवऱ्याला वीष घालून मारतेही असे अनेक प्रसंग यात आहेत. या साऱ्या प्रसंगातून स्त्रियांच्या जगण्याचा चिवटपणा तर पुढे येतोच पण अनेक संकट लिलया झेलून या आज्या, मावश्या काहीच झालं नाही, असे म्हणत पुन्हा जीवनाला भिडतात त्या मानवी प्रवृत्तीचं अत्यंत हृदयस्पर्शी चित्रण इथं पहायला मिळतं.

ही कादंबरी आहे भारतीय संस्कृतीचा अधिकृत दस्तऐवज नाही. हा वैज्ञानिककसोटीवर उतरलेला प्रबंधही नाही याचे भानं वाचकांनी विशेषतः समीक्षकांनी या कादंबरीचे परिशीलन करताना ठेवायला हवे. नाहीतर मूळ कादंबरीची चिकित्सा न होता मुद्दे भरकटले जाण्याची शक्यता वाढते शिवाय कादंबरीवर अन्याय होतो तो वेगळाच अर्थात सर्वांना माहीत असलेल्या मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर, १९६० ला निर्माण झालेले महाराष्ट्र राज्य यांच्या घटनाक्रमाची गल्लत नेमाड्यांनी करायला नको होती.

कादंबरीच्या उत्तरार्धात कॉलेज शिक्षणासाठी खंडेराव शहरात येतो तो सगळा काळ १७५ पानांमध्ये चितारला आहे त्यांनी 'कोसला', 'बिढार', 'झूल' यांची आठवण येऊन स्मरणरंजन होत असल तरी पूर्वार्धाची शैली भाषेचा पोत आणि वैचारिक बैठक या सर्वपातळीवर हा भाग विसंगत आहे. एखादी शास्त्रीय गाण्याची बैठक चालू असताना गायकाने मध्येच लोकाग्रहास्तव नाट्यसंगीत म्हणण्यासारखं ते साऱ्या मैफलीची मजा घालवतं. अत्यंत तटस्थपणे आशय मांडणारा, इतिहास, संस्कृती आपल्या पद्धतीनं सादर करणारा आणि एकूणच आपल्या शोधबुद्धिची चुणूक दाखवणारा खंडेराव असा भरकटत जातो हे या कादंबरीतलं मोठ वैगुण्य आहे.


पणत्या नंतर लगेचच युनेस्को चर्चासत्राच्या निमित्ताने तो पुन्हा एकदा आपल्या मूळ रूपात भेटतो माणूस चार पायावर चालता चालता दोन पायावर लागल्यामुळे काय काय गोंधळ झाले या सूत्राचा आधार घेत त्यानं माणसाच्या पराजयाची, नामुष्कीची जी लक्तरं दाखवली आहेत ती अंतर्मूख करणारी आहेत. या महाकादंबरीतून नेमाडे ग्रामीण महाराष्ट्राची, शेतीची, व्यापारउदिमाची फार चांगली ओळख करून देतात. स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजजीवनातले सगळे प्रहर अगदी तपशीलवार मांडतात, त्यांच्या या नक्षीकामाला सलाम!


डोळ्याचे ऑपरेशन करणाऱ्या शिबिराची आठवण, भावाचा अकाली मृत्यू सहोदरांचे दुर्दैवाचे दशावतार, दलित, कुणबी समाजाची गावाबरोबरची घट्ट वीण, पेंढाऱ्याचा हल्ला त्यातून मार्ग काढणारं गावाचं समाजमन यातून नेमाडेंची प्रतिमा मनाचा अक्षरशः कबजा घेते. सुभाष अवचटांच्या मुखपृष्ठात शिल्पाचा कणखरपणा आहे. भक्कम संस्कृतीचा थिजलेला चेहरा त्यातून प्रतीत होतो. काळ्या मातकट पिवळ्या रंगाच्या ओबडधोबड पार्श्वभूमीवर विरक्तपणे चालणाऱ्या स्त्री चा ठिपका (तिरोनी आत्या?) या चित्रात त्यांनी साकारला आहे.

संस्कृतीच्या विशाल पडद्यावर मानवाचं कितीही लहान असलं तरी अस्तित्व असतं ह्याचे भान या अतिशय समर्पक पणे इथं प्रतिबिंबित झाले आहे.

इतिहासाला आणि संस्कृतीला एक मानवी चेहेरा देण्याचा अत्यंत कलात्मक वस्तुनिष्ठ प्रयत्न या कादंबरीत जाणवतोय पण जात, धर्म, पंथ आणि लिंगभेदाला समाजजीवनातून हद्दपार करण्याची आधुनिक दृष्टी यातून मिळते 'हिंदू'चे हे सर्वात मोठं योगदान आहे.

। डॉ. केशव साठ्ये
०९, सवारी सोसायटी,
हॅपी कॉलनी, कोथरुड,
पुणे - ४११ ०३८
दूरभाष ०२०-२५४५२०९४
भ्रमणभाष ९८२२१०८३१४





'हिंदू' कादंबरीतील भाषारूपे

विनायक येवले

■

मराठी कादंबरी वाङमयात आपला अमीट ठसा उमटवणारे कादंबरीकार म्हणून भालचंद्र नेमाडे यांचे नाव ज्ञानपीठ या सर्वोच्च पुरस्काराने सार्थ ठरवले आहे. हिंदू ही २०१० साली प्रकाशित झालेली त्यांची सहावी कांदबरी असून तिच्या अनुषंगाने सर्वत्र बोलून लिहून झाले आहे. तीत अध्याहृत असलेल्या आशयात्मक आणि आकृतिबंधात्क अंगाने अभ्यासक, समीक्षकांनी तिचा अन्वयर्थक शोध घेतला आहे. विशेषतः देशीवादाची नेमाड्यांनी सैद्धांतिक मांडणी केल्यानंतर लिहिलेली 'हिंदू' ही पहिलीच कादंबरी असल्याने तिचे महत्त्व अधिक आहे. नेमाडे हे भारतीय समाज, संस्कृती, भूप्रदेश व भाषा आदींचा समीक्षणात्मक व ललित साहित्यातून हिरीरीने पुस्कार करीत आले आहेत. त्यादृष्टीने त्यांनी मराठी भाषेचा सातत्याने केलेला पुरस्कार आणि 'हिंदू' या कादंबरीतील भाषारूपांचा शोध घेऊन काहीएक निरीक्षणे नोंदवण्याचा या लेखाचा हेतू असणार आहे. ही निरीक्षणे 'हिंदू' या कादंबरीला मध्यवर्ती ठेवून नोंदविली आहेत.

'हिंदू' कादंबरीच्या संरचनात्मक आणि वाङ्मयीन सौंदर्यात भर घालणारा घटक म्हणजे तिच्यातील वैविध्यपूर्ण भाषा आहे. नेमाड्यांचा भाषिक प्रयोगासंदर्भात विशेष लौकिक राहिलेला आहे. या लौकिकाला अधिक उंचीवर नेणाऱ्या अभिव्यक्तीशैलींची प्रचिती 'हिंदू' कादंबरीमध्ये विशेषत्त्वाने येते. वाचकांना सातत्याने नवीन आशय, विषय देण्यासाठी नेमाडे जसे प्रसिद्ध आहेत, तसेच भाषेच्या बाबतीतही तेवढेच गंभीर, जागरुक असलेले दिसून येतात. नेमाडे यांना भाषेचे आयातशास्त्र मान्य नाही. तशा प्रकारचा मोह वा सोस त्यांच्या कुठल्याच कादंबऱ्यातून आढळून येत नाही. आपल्याच भोवतीच्या भाषिक भांडाराचे अर्थसंपृक्त उपयोजन करून कलाकृतीची श्रीमंती वाढवण्याकडे त्यांचा कल दिसून आहे.

'हिंदू'ची भाषारूपे : घडण आणि पैस

'हिंदू'च्या महाकाव्यसादृश्य आशयाला मूर्तरूप देणारी भाषा आणि आविष्कारपद्धती यांच्या वैशिष्ट्यांचा वेध घेताना 'कोसला'च्या भाषेने मराठी कादंबरी साहित्याला जसे नवे वळण दिले, तद्वतच 'हिंदू'ची भाषाही एका आगळ्यावेगळ्या परिवेषाचा टप्पा गाठते. नेमाडे भाषेला साहित्यकृतीचे केवळ माध्यम म्हणून पहात नाही तर त्या कलाकृतीचे अभिन्न अंग मानतात. याचा पुनः प्रत्यय 'हिंदू'तील भाषेचा विचार करताना येतो. 'हिंदू'तील भाषेने कादंबरीला एका विशिष्ट उंचीवर नेऊन स्थापित केले आहे, तसेच तिने मराठी कादंबरीच्या संरचनात्मक विकसनाच्या वाटा खुल्या केल्या आहेत. प्रचलित कादंबरीच्या रूपबंधाच्या आशयाला बळकटी देण्यासाठी नेमाडे अनेक अभिव्यक्तीविशेषांचा वापर करतात. ही आविष्कारतंत्रे भाषेच्या अंगभूत गुणांनी युक्त आहेत. विशेषतः 'हिंदू'तली भाषा समूहाच्या जाणीव-नेणिवेतील संदर्भांचा

अनुक्रमणिका

समृद्ध लेखाजोखा मांडते. देशी भाषांच्या अंतर्गत संघर्षाने 'हिंदू'तील भाषासौंदर्य थोडेही डागाळत नाही. तर लोकसमूहातील बोलभाषेच्या मूळ सौंदर्याचे प्रकटीकरण करते.

कुठल्याही व्यक्तीचे, समाजसमूहाचे, दैनंदिन व्यवहार एका विशिष्ट लयीत कधीच पार पडत नसतात. व्यक्तीची, समूहाची भाषा सर्जनाची प्रक्रियाही त्या व्यक्तीच्या, समाजसमूहाच्या सामाजिक पर्यावरणाने, सांस्कृतिक मूल्यसंकेतांनी प्रभावित झालेली असते. साहित्याची भाषाही याच नैसर्गिक नियमांच्या वहिवाटेचा भाग असते. कथा, कादंबऱ्यातील भाषा कधीच एकसूरी नसते. पात्रांची भाषा त्यांच्या भूमिकेनूसार, स्थानानुसार, दर्जानुसार वेगळा बाज घेऊन येते. तथापि कथेला गतिमान करणाऱ्या निवेदनाची भाषाही स्थळ आणि काळानुसार बदलत जाते. प्रदेशविशिष्ट जशी भाषा बदलते तशीच तिच्या बदलात व निराळेपणात काळाचा संदर्भही अनिवार्यपणे कार्यरत असतो. या सर्वांचा ठाशीव संदर्भ 'हिंदू'तून पाहावयास मिळतो. हिंदूचे भाषिक व्यापकत्व, देशी भाषिक शैलीच्या सहस्रधारा कादंबरीभर दिसून येतात. कादंबरी ही कथनपर साहित्यप्रकार असल्याने तिच्यात येणारी भाषा संकेतमुक्त असण्याबरोबर अर्थवहनाच्या अनेक शक्यता बाळगून असते. याचा प्रत्यय 'हिंदू'तील भाषेचा विचार करताना येत राहतो. 'हिंदू'मध्ये लेखकाने जशा विविध जातिजमातींच्या, विविध प्रदेशातल्या बोलीभाषेचा जसा अवलंब केलेला आहे, तसाच वेगवेगळ्या काळात बोलल्या जाणाऱ्या भाषिकरूपांचा अंतर्भावही तिच्यात झाला आहे. शिवाय 'हिंदू'चा नायक खंडेरावच्या विचारंतून, मतांमधून प्रतिवादासाठी म्हणून येणाऱ्या उपरोध-उपहासाची टोकदार भाषिकरूपे, विनेदनाची सहजसुंदर प्रभावी भाषाही 'हिंदू'चा पोत घडवते. 'हिंदू'तील आशयाची संपृक्तता वाढवणाऱ्या लोकभाषांच्या विविध शैली कादंबरीचे वाङ्‌मयीन सौंदर्य वाढवतात. व्यक्तिविशिष्ट भाषिक रूपांतून ते एकाच वेळी व्यक्तिविशेष, त्याचे स्वभावगुण जसे उभे करतात, तद्वतच ते संबंध समाजाचेही सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक संदर्भ मूळागाळासह उजागर करतात. 'हिंदू'चे भाषावैभव समग्रलक्षी असून त्यांची वैशिष्ट्ये समाजाच्या बोलभाषेतून निर्माण झालेली आहेत.

'हिंदू' कादंबरीचा विचार करताना प्रामुख्याने मनाचा ताबा घेते ती जगण्याला समकक्ष असलेली भाषा. अनेक प्रकारच्या बोली मूळ खटक्यांसह तिने आपल्यात सामावून घेतल्या आहेत. ती अनेक स्थळ व काळाच्या कक्षा ओलांडून आपले तत्कालीन रूप दाखवून देते. नेमाडे यांनी या सगळ्या भाषांना 'हिंदू'त स्थान देऊन देशी जाणिवेचे दर्शन घडवून दिले आहे. भाषेच्या अंगाने 'हिंदू' आपली समृद्धता सिद्ध करते. 'हिंदू'तील भाषेला त्या त्या समाजाचे संस्कृतीविशेष चिकटलेले आहेत. कारण समाजव्यवहारातील भाषेवरूनच त्या समाजाच्या सांस्कृतिक पर्यावरणाचा, भौगोलिक गुणविशेषांचा अन्वयार्थ लावता येतो. 'हिंदू'त लोकभाषेला स्थान मिळाले आहे, तसेच तिच्यातील नायक खंडेरावच्या आत्मचिंतन, विचारप्रकटीकरण, विचारांतील प्रतिवाद, विचार-कृतीतील विसंगती-विरोधाभासाला उघडं पाडणारी उपहास-उपरोधपूर्ण भाषा कादंबरीचे सौष्ठव वाढवते. शिवाय लेखकाने भाषेच्या माध्यमातून अनेक प्रयोग केले आहेत ते प्रयोगही जीवनाकडे गांभीर्याने पाहायला भाग पाडतात.

'हिंदू' कादंबरीची निवेदनशैली

मराठी कादंबरी साहित्यात 'हिंदू' या बृहद्‌रूपातल्या कादंबरीचे एक वेगळे वैशिष्ट्य ठरावे एवढी बहुरंगी-बहुरूपी-बहुवचनी आणि चक्राकार फिरणारी निवेदनपद्धती नेमाडे यांनी योजिलेली आहे. व्यापक आशयविश्वाला एका धाग्यात व्यवस्थित गुंफण्यासाठी नेमाडे निवेदनाच्या निरनिराळ्या पद्धती व तऱ्हांचा जाणीवपूर्वक उपयोग करतात. लेखनाच्या पारंपरिक शैलीविशेषांना डावलून देशी शैलींची मेजवाणी नेमाडे यांनी दिली आहे. लोकपरंपरेतून, दैनंदिन लोकव्यवहारातून आलेल्या सांस्कृतिक संचिताला अक्षररूप मिळवून देणाऱ्या 'हिंदू'च्या भाषेने निवेदनातील चाकोरी मोडीत काढली आहे. तिचा बहुआयामित्व प्रदान करताना निवेदनाची परीणामदर्शक सळमिसळ केलेली दिसून येते. 'हिंदू' कादंबरीत भाषेच्या अनेक लकबी समाविष्ट झाल्या आहेत. किंबहुना 'हिंदू'च्या नायकात आणि निवेदकात खूप कमी अंत असल्याने या भाषिक लकबींची सांधेजोड निवेदनाशी होत राहाते. निवेदन, कथन, संवाद, स्वगतं, भाष्य, असा निवेदन लोलक सर्वत्र फिरत राहतो. ओव्या, अभंग, विचारसूत्र शाब्दीक विपर्यास, उपरोधिकपणे वास्तवाला दिलेल्या टोचण्या, कोटीबाज वक्तव्यांनी युक्त असलेले 'हिंदू'चे निवेदन फुलत राहते. तथापि जुन्या वळणाचा तोंडवळा असलेल्या पत्रव्यवहाराची तत्त्वजड संस्कृतप्रचूर भाषा, भाषिक रूपांतर, मध्ययुगीन गद्यशैलींचा समकालीन वास्तवाकडे निर्देश करणारा विपर्यासात्मक उपयोग, कादंबरी साहित्यव्यवहारात सर्वार्थाने नवीन असलेल्या वाचकसापेक्ष फलकलेखन शैलीचा उपयोग, आदी निवेदनशैल्यांचे मूळ प्रथमपुरुषी, तृतीयपुरुषी, आत्मनिष्ठ, नायक, लेखक, तटस्थ अशा पारंपरिक पद्धतींच्या उदरात अनेक लोकानुनयी उपशैल्यांचा भरीव रूपघाट

अनुक्रमणिका

स्वीकारलेली 'हिंदू' कादंबरी एका नव्या वळणाची संवाहक ठरावी इतकी लक्षवेधी ठरली आहे. खंडेरावच्या आठवणी, स्वगतं, चिंतन, आत्मटीका, स्वप्नस्थ अबोधमनोवस्थेतील स्वैरचिंतन यातून गतिमान होणारे निवेदन जसे आहे, तसेच खंडेरावच्या अनुषंगाने कादंबरीपटावर रेंगाळणाऱ्या पात्र संवादातून, चर्चांमधून कादंबरीचे निवेदन बहरत जाते. ते परिस्थितीच्या संदर्भपूर्ण आकावर फिरते, तसेच तपशिलातील वैगुण्य दर्शनासाठीही पात्रमुखातून येते. 'हिंदू'चे निवेदन अनेक पातळ्यांवरून परिभ्रमण करते.

निवेदनाच्या अनेक तऱ्हा नेमाड्यांनी परिस्थितीवर भाष्य करण्यासाठी व कथानकातील साखळी तयार करण्यासाठी अर्थपूर्ण रीतीने उपयोजिल्या आहेत. हजारो वर्णनं अनेक व्यक्तीविशेष, तपशिलांना अर्थप्राप्त करून देणारी निवेदनाची भाषा बहुविध घाट स्वीकारत पुढे पुढे सरकते. तीत तत्त्वजड भाषेतून गूढ, अस्तित्ववादी जन्म-मृत्यू, पारलौकिक चिंतन येते, तसेच शाब्दीक कोट्यांच्या माध्यमातून वास्तववैचित्र्यावर बोट ठेवते, तर दुसरीकडे विनोदनिर्मितीकडे अलगद झुकते. व्यक्तिविशेष, सामाजिक संकेतांना अलगद चिमटीत पकडणारी भाषा घटना, प्रसंगांचे अनेक पैलू उजेडात आणून परिणामकारकता साधते. 'हिंदू'तील भाषा जशी सांस्कृतिक संदर्भांना अधोरेखित करते, तशीच ती सामाजिक, भौगोलिक, आर्थिक, जातीय, शैक्षणिक संस्थांचे वास्तवही दाखवून देते. 'हिंदू'ची निवेदनशैली लोकलयींनी अर्थपूर्ण बनली आहे. ती अनेक हळव्या प्रसंगाचे, भावनिक छटांचे संदर्भ टिपताना काव्यात्मक परिवेश धारण करते. यादृष्टीने हिंदूतील अनेक प्रसंग बोलके आहेत. निळुकाकाची बहीण सुमीचा गर्भारपणात झालेल्या मृत्यूचा प्रसंग, खंडूच्या डोळ्याला विटी लागते आणि वडील त्याला दवाखान्यात घेऊन जातानाचा प्रसंग, खंडेरावच्या वडिलांचा मृत्यू, भावडूच्या मृत्यूनंतर सोनावहिणीच्या राबता राहण्याचे प्रसंग. अशा कितीतरी प्रसंगचित्रणातील हळवी भाषा हेलावून सोडते नेमाड्यांची भाषेवरची हुकुमत वादातील आहे. हे 'हिंदू'च्या संदर्भाने पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. नेमाडे यांनी आपल्या वैचारिक आणि ललित लेखनातून लोकभाषांचा केलेला गौरव नि त्यांच्या संवर्धनासाठी सातत्याने पुढे रेटलेली आग्रही भूमिका याचीच साक्ष पटवून देते.

'हिंदू' कादंबरीतील निवेदनाला अनेक पैलू आणि अनेक मिती आहेत. 'हिंदू'तील निवेदन विचार, भावना, चिंतन, भाष्य, टीका, आत्मटीका वाचकांच्या मनावर बिंबवताना जाणिवा-नेणिवांची मशागत करते. नेमाड्यांच्या कादंबऱ्यातील प्रवाही निवेदन अंगोपांगी सार पुढ्यात ठेवते. 'हिंदू' कादंबरीमध्ये खंडेराव स्वतःची कथा सांगत असला तरी त्याच्या कथनाच्या ओघात येणारे संदर्भ भोवतीच्या गोष्टींना कवेत घेतात. म्हणून 'हिंदू'चे निवेदन परिस्थितीच्या चक्रावर फिरत राहते. खंडेराच्या निवेदनातून उलगडत जाणाऱ्या कुटुंबातील, गावगाड्यातील अनेकांच्या कथा प्रथमपुरुषी निवेदनाच्या विशेषणयुक्त भाषेतून उभ्या राहतात. या कथांना सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक स्पर्श झालेला आहे. त्या कथनाला स्थळ आणि काळाचा चेहराही प्राप्त झालेला आहे. या व्यतिरिक्त तृतीयपुरुषी निवेदन तपशिलांची सांधजोड करत वातावरणाची प्रक्रिया अखंड चालू ठेवते. पत्ररूप निवेदन, फलकलेखनातून दृष्टरूपातली सूचकता, जाहीरात, बातम्या आदीच्या लक्षवेधी वाचकासापेक्ष निवेदनातून लेखकाने अपेक्षित परिणाम साधला आहे. अशा संमिश्र निवेदनामुळे कथेला कुठेच साचलेपण वा विद्रूपता प्राप्त होत नाही. कादंबरीचा विस्तृत पट लक्षात घेऊन लेखकाने निवेदनाचा पारंपारिक चौकटीबद्ध तंत्रविशेष नाकारून फिरत्या निवेदनाची योजना केली आहे. हिंदूतील निवेदनभाषा सहजसुलभ व प्रवाही आहे. हे प्रवाहित्व नेमकेपणाने दृष्टीस पडते.

'हिंदू' कादंबरीतील निवेदन समाजजीवनाच्या अंगोपांगांचा लेखाजोखा मांडते. तपशिलांना अर्थपूर्ण बनवण्याबरोबरच जीवनविषयीचे तत्त्वज्ञान, परिस्थितीचे यथावकाश चिंतन, अस्तित्वाविषयक जाणिवांचे संवेदन टिपते. ही चिन्हव्यवस्था त्या त्या समाजसमूहाचे, जीवनजाणिवांचे सांस्कृतिक संचित जगण्याच्या रीती, लोकसंस्कृतीच्या विविध श्रद्धा यांना कादंबरीच्या केंद्रस्थानी आणण्याचे प्रामुख्याने कार्य करते. समाजाचे जगणे ज्या पारंपरिक श्रद्धामूल्यांनी प्रभावित केले आहे, अशा संस्कृतीविशेषांना अधोरेखित करत पुढे सरकत राहते. 'हिंदू' कादंबरीत उमटलेला काळ हा व्यापक स्वरूपाचा आहे. या काळाला मूर्तरूप देण्यासाठी प्रचलित निवेदनपद्धती उण्या पडतात. एकरेषीय सरधोपट निवेदनाने कादंबरीला गतिशीलता प्राप्त झाली नसती यांची जाणीव नेमाडे यांना असल्याने त्यांनी वेगवेगळ्या पद्धतीने कथेला वेग मिळवून दिला आहे. अधिकतर खंडेराव हा कथानिवेदकाच्या भूमिकेत असतो, त्या व्यतिरिक्त कादंबरी साखळी निवेदनाने आपले रूप घडवत जाते. खंडेरावच्या कथानिवेदनाला अनेक पातळ्या आहेत. त्याची जाणीव-नेणिव-स्वप्न-स्वगतं-आत्मसंवाद-दिवास्वप्न कथेला परिणामकारकपणे पुढच्या टप्प्याकडे घेऊन जाते. एवढ्या जटिल आणि गुंतागुंत वाढवणाऱ्या निवेदनाच्या योजनेमागे लेखकाची बहुआयामी अशी वृत्ती एकवटल्याचे दिसून येते. आजपर्यंतच्या मराठी

अनुक्रमणिका

कादंबरी साहित्यातील निवेदनाबाबतीत आशयकेंद्री निवेदनपद्धती कुठेच आढळून येत नाही. निवेदकाच्या कथांतर्गत वावर आणि कथाबाह्य तटस्थता याची समृद्ध व्यामिश्रता आविष्काराच्या अंगाने 'हिंदू'चे वैशिष्ट्य ठरते. तथापि नेमाड्यांनी वापरलेल्या या बहुपेढी निवेदनद्धतीमुळेच 'हिंदू' कादंबरीला महाकाव्याच्या जवळ जाता आले, हे विशेष.

भाषा, सामाजिकता आणि 'हिंदू'

'हिंदू' कादंबरीतील भाषा नैसर्गिक व ओघवती असून त्या त्या स्थळकाळातील लोकव्यवहाराचे जिवंत संदर्भ त्यांच्या बोलभाषेतून व्यक्त झाले आहेत. 'हिंदू'तील भाषेला समाज, संस्कृतीचे संदर्भ चिकटलेले आहेत. साठनंतरच्या मराठी साहित्यातून मराठी बोलीभाषेला केंद्रस्थान मिळाले, त्यापूर्वीच्या साहित्यात बोली बाबतीत हीनगंड असलेला दिसून येतो. श्लील-अश्लिल, शुद्ध-अशुद्ध, प्रमाण-गावंढळ अशा कसोट्या लावल्या जात होत्या. पण, समाजाची रोजच्या व्यवहारात वापरली जाणारी एक भाषा असते. समाजाचे व्यवहार, रीतीभाती, संस्कार, संकेत व लोकमानस त्या भाषेने संस्कारित व संवर्धित केलेले असतात. समाजाच्या दैनंदिन व्यवहाराचे वास्तवचित्र साहित्याने रेखाटावे अशी सर्वसाधारणपणे अपेक्षा असते. ते रेखाटताना सभोवतीच्या समाजात बोलली जाणारी भाषिकरूपेही गृहित धरलेली असतात. या गृहितकांना डावलून निर्माण केलेले साहित्य मूल्यहीन, निष्कृष्ट, काल्पनिक तथा मनपूत होऊन जाते. त्यातून समाजाच्या सद्यस्थितीतील जीवन प्रश्नांचा उहापोह होत नाही, उणिवा किंवा सामर्थ्यस्थळंही उजागर होत नाहीत. तथापि त्या त्या व्यक्तीच्या, समाजसमूहाच्या उत्थानाच्या दिशाही सूचित होत नाहीत. त्याचे कारण लेखकाने स्वीकारलेल्या भूमिकेत शोधता येते.

साठोत्तरी कादंबरी साहित्याने भाषिक पातळीवरही पूर्वसूरीचे प्रभाव पुसून टाकले. भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' (१९६३) ही कादंबरी त्यादृष्टीने मैलाचा दगड ठरली. तथापि त्याच्या पुढची भाषिक परिमाण निश्चित करणारी कादंबरी म्हणून 'हिंदू'चे भाषिक महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. 'हिंदू'ची भाषा ही समाजाच्या अस्सल जीवनजाणिवांच्या मूळ अभिव्यक्तीची रूपे घेऊन आलेली आहे. 'हिंदू'ची भाषा आदर्शाचा खोटा फार्स निर्माण करीत नाही, ती थेट समाजवास्तवाला त्यांच्याच अंगभूत भाषेतून भिडते. 'हिंदू'तील समाजसमूहाचे दैनंदिन जगणे त्यांच्या रितीभाती, श्रद्धा, अंधश्रद्धा, संवाद, संघर्ष त्यांच्याच मूळ भाषिक खटक्यांसह वाचकांसमोर ठेवते. देशी जीवनपद्धतीतील लोक संस्कृतीविशेष, परंपरा, लोकभाषेतून आकाराला आलेल्या आहेत.

जातनिहाय, प्रदेशनिहाय बोलीविशेष

भाषा ही प्रवाही व गतिशील असते. अनेक प्रवाह, प्रभाव, दबाव आपल्यात सामावून घेण्याचे सामर्थ्य बाळगून असते. भाषा ही व्यक्ति, स्थळ, काळ, शिक्षण, दर्जा, सामाजिक, आर्थिक, परिस्थिती, तथापि वय, बदलणाऱ्या भूमिका आणि व्यवसायानुसार बदलते. ह्या भाषेच्या तऱ्हा आणि रीती निरनिराळ्या असू शकतात. तिच्यातील भेद कधी सूक्ष्म तर कधी ढोबळ स्वरूपातही असू शकतात. साहित्यात येणारे हे भेद वरील घटकांना प्रमाणभूत मानून 'हिंदू' कादंबरीचा विचार करताना तीत अनेक जातिजमाती, धर्म, पंथ, वर्गांचा समावेश झालेला आहे. शिवाय स्त्रियांची भाषा तिच्यातील प्रभाव, प्रभुत्व, संघर्ष, दबावादी संदर्भानिशी आलेली भाषिक रूपे लक्षवेधी ठरली आहेत. 'हिंदू'मध्ये ब्राह्मण, कुणबी, महार, मांग, चांभार, लमाणी, सिंधी, पारधी, गुजराती, शिगलगार, बेलदार, डोंबारी, कोल्हाटी, गारोडी, रायरंग, वैदू, अहीर, कोरकू, भिल्ल, वडार, टाकारी, धनगर, पिंजारी, कैकाडी, पिंगळे, दरवेशी, माकडवाले, अस्वलवाले, वाणी, तेली या बहुविध जातिजमातींच्या बोलीरूपांमुळे कादंबरीची भाषिक समृद्धी वाढली आहे. एकाच कादंबरीत बोलभाषांची एवढी विविधता एकवटली आहे, ही कदाचित मराठी साहित्यातली एकमेव कलाकृती म्हणावी लागेल.

भालचंद्र नेमाडे यांनी सर्व जातिजमातींच्या भाषिक वैशिष्ट्यांना तिच्यातील अंतभूत लयीबरहूकूम अधोरेखित करत कादंबरीच्या आशयात्मक सौंदर्याला उठावदार बनविले आहे. त्या त्या जातिसमूहांच्या बोलींचे उच्चारानुसारी ठोकताळे पकडण्याचे श्रेय नेमाड्यांच्या चौकस बुद्धीला आणि तटस्थ निरीक्षण क्षमतेला द्यावे लागते. ही विविधांगी बोलीरूपे आपल्या व्यवच्छेदक लक्षणांसमवेत 'हिंदू' कादंबरीच्या आशबंधाला सखोलता प्राप्त करून देतात. जातिनिहाय बोलीभाषा आपले वेगळेपण राखून असते तशीच ती प्रदेशविशिष्ट भाषिक विविधताही प्रकट करते. अठरापगड जाती-भटक्याविमुक्त, विस्थापित अशा सर्व जातिसमुदायांच्या भाषिक छटा 'हिंदू'त एकवटल्या आहेत. प्रामुख्याने कादंबरीचा कथाबिंदू खानदेशातील मोरगाव हा असल्याने तिथे बोलली जाणारी खान्देशी, अहिराणी अस्सल बाज घेऊन प्रकटली आहे. संवादात लक्षवेधी ठरणारी बोलीरूपे प्राधान्याने दृष्टीस पडतात. उदा. गांधीजी म्हंता, ओ जिना, अरे आमाक इकडे ये, तं अरे, वेगळा चुल्हा काहाले मांडतू भौ ? उगा बुडतीचा पायरो,

अनुक्रमणिका

माह्य आईक, तूच मुख्य हो संबंध हिंदुस्थानचा. पण तो जिना, काही आयकेना रे भौ. वेगळचं निंघ्याचे म्हणे. ('हिंदू'/३२९) खानदेशी बोलीतील शब्दांचा विचार केल्यास एक स्वतंत्र शब्दकोश तयार होईल. एवढ्या अर्थवाही शब्दांचा सहज वावर 'हिंदू'त आला आहे. त्यात नाम, क्रियापदं, विशेषणं आदींचा प्रामुख्याने समावेश आहे. जसं की, वागोयतील, बसोयलं, देयजो, वाटजो, कन्याले, पाजजो, येयजो, आमाक, थांबाडा, बसाडून, अढी, खरक, मुळला, शेरला, घीसन, पेपावणे, मापटं, झिकुलो, नखुसं, टाकजो, देजदावने, असे अनेक शब्द आणि इची लेहू, रांडीच्या, शिंच्या, मायझू, उलफत्तू, ग्यानमोड्या, बेउमज्या, उचाळू यासारख्या असंख्य शिव्या त्या त्या घटना, प्रसंगांना परिणामकारक बनवतात.

'हिंदू' कादंबरीत खान्देशचा भौगोलिक परीसर, तेथील बोलीभाषांचा समावेश प्रभावीपणे झाला आहे. तसाच कादंबरीचा स्थावलकाशही विस्तीर्ण प्रदेशात व्यापून राहिला आहे. या वाढत्या भौगोलिक परीघात मराठवाडा, विदर्भ, राजस्थान, बडोदा (गुजरात), मुंबई, पाकिस्तान इत्यादी वेगवेगळ्या भाषिक प्रदेशांना कादंबरीत स्थान मिळाले आहे. ओघानेच त्या त्या प्रदेशातल्या भाषा आपल्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांसह 'हिंदू'त आल्या आहेत. खंडेराव शिकण्याच्या निमित्ताने औरंगाबाद विद्यापीठात येतो. आणि इथला भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरण भाषेच्या वैशिष्टपूर्णतेने प्रकट रूप घेते. खंडेरावच्या सहवासातल्या, मित्रपरिवारातल्या भेटलेल्या व्यक्ती त्यांचे बोलिविशेष त्यांच्या व्यक्तिविशेषांसह कादंबरीच्यापटावर येतात. मराठवाड्यातली रांगडी, खडबडीत, रखरखीत, जाडीभरडी भाषा कादंबरीला बहुआयाम प्राप्त करून देते. 'हिंदू'त मराठवाडी भाषेचे अनेक दाखले तिच्या अंगभूत गुणांसह प्रकटले आहेत. मराठवाड्यात प्रचलित असलेल्या अनेक शिव्याही 'हिंदू'ने सामावून घेतल्या आहेत. उदा. आयला, गांडमनी, भडव्या, हाजळले, फोकनीचे या शिवाय मराठवाडा भूप्रदेशाची स्वतंत्र ओळख मनावर ठसविणारे शब्दही 'हिंदू'मध्ये येतात. लई, हितच न्हा मायला, कवी करत्यात, म्या, काहून, वाटीवलं, बसीवलं, इच्चार, यायलं, मह्यावाला, तुह्यावाला, मंग इत्यादी शब्द लक्षवेधक ठरतात. या शिवाय धनगरी बोली, ठेलाऱ्यांची, आदीवासींची, मुस्लिमांची, हिंदीमिश्रीत मराठी बोली, सिंधी लोकांची मारवाडी, गुजराती बोली या व्यतिरिक्त मोरगावच्या गावगाड्यातील अलुतेदार बलुतेदार जातिजमांतीच्या समोपचार, लाचारी, विद्वेष, संघर्षाने प्रभावित झालेल्या बोलभाषा आपापले सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक गुणवैशिष्ट्ये प्रकट करीत 'हिंदू'चे भाषिक भांडार समृद्ध करतात.

'हिंदू' कादंबरीचा भाषिक परीघ अतिव्याप्त असून विविध प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या भाषेला सामावून घेतले आहे. त्या त्या भाषिक समूहातल्या व्यक्तींचे, समाजाच्या चालिरीती, सांस्कृतिक वैशिष्ट उजागर करत गुणदर्शनाचे अनेक पैलू दाखवून दिले आहे. 'हिंदू'तील त्या त्या जातिसमूहाची, प्रदेशाची भाषा कादंबरीचे वाङ्मयीन सौंदर्य वाढवते.

'हिंदू' कादंबरीतील स्त्रियांची भाषा

'हिंदू' कादंबरीत मोठ्या प्रमाणात स्त्रीव्यक्तीरेखा आपल्या स्वभावविशेषांसहित अधोरखित झाल्या आहेत. विविध धर्माच्या, विविध जातिजमार्तीच्या विविध सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्तरातल्या स्त्रिया आपल्या जीवनजाणिवांसह तथापि भाषिक वैशिष्ट्यासह 'हिंदू' कादंबरीत अवतरतात. स्त्रियांच्या वेगळ्या धाटणीतल्या भाषेमुळे कादंबरीला देशी विशिष्टता प्राप्त झाली आहे. स्त्रीभावविश्वाचा ठाव घेणारी दुखरी, हळवी भाषा, नशिबाला उगाळत वेदनेची टरफलं उचकटून टाकणारी हतबलता, दुयमत्व अंगीकारलेली भाषा, कादंबरीचा पोत दृढ करते. नेमाडे यांनी स्त्रियांच्या भाषेला किती आत्मियतेने साद घातली आहे, याची प्रचिती 'हिंदू'तील स्त्रियांच्या तोंडी आलेली भाषा पाहिल्यास येते. खंडेरावच्या कुटुंबातील स्त्रिया, गावगाड्यातील विविध जातिजमार्तीच्या स्त्रिया, ओळखीच्या, नात्यातल्या, त्याला शैक्षणिक प्रवासात भेटलेल्या अशा असंख्य स्त्रियांची बोलीरूपे 'हिंदू'त दृगोचर झाली आहेत. ही भाषा खूप जिवंत आणि सैंद्रिय स्वरूपाची आहे. 'हिंदू'तील स्त्रियांची भाषा जशी कारुण्यानं ओतप्रोत भरलेली आहे, तशीच ती अस्तित्वजाणीवेनं धारदार शस्त्रासारखी टोचणारीसुद्धा आहे. कादंबरीचा पट जसा भौगोलिकदृष्ट्या विस्तारात जातो तसाच तो अनेक वेगवेगळ्या स्त्रियांच्या भाषिक वैशिष्ट्यांनाही सामावून घेतो. कादंबरीचा आरंभबिंदू खानदेशातील मोरगाव येथून आकारत गेला असला तरी कादंबरीचा परीघ पाकिस्तानपर्यंत विस्तारत जातो. प्रामुख्याने मारेगावच्या परिसरातील स्त्रियांच्या भाषेतून खानदेशी मातीतले मार्दव ठळक होत जाते. लोकसाहित्याचे दालन समृद्ध करण्यात स्त्रियांचा मोठा वाटा असून त्यांची भाषा लोकसंस्कृतीचे सत्त्व संवर्धित करण्यात अग्रेसर राहिलेली आहे. लोकगीते, सण उत्सवगीते, जात्यावरच्या ओव्या, दळणकांडण व निंदणी-खुरपणी करताना आपल्या भावविश्वातील खदखद, मनात दाबून ठेवलेल्या दुःखवेदनांचा निचरा, सुखसमृद्धीच्या स्वप्नातील आस आदी भावविष्कार स्त्रियांनी आपल्या प्रवाही

अनुक्रमणिका

भाषेतून केलेला पाहावयास मिळतो. 'हिंदू'तील स्त्रियांच्या बोलीभाषेतून त्यांची जगण्यावरची श्रद्धा जशी प्रकटते तशीच दुःखवेदनांची दुखरी छटाही प्रकर्षाने जाणवत राहते. त्यातूनच त्यांचे पुरुषीसमाजातील स्थान-दर्जा आदीचे स्वरूपही लक्षात येते. संस्कृती जशी प्रवाही असते तसेच भाषेचेही रूपही नवेनवे आयाम स्वीकारत असते. 'हिंदू'तील स्त्रियांच्या भाषेतून जगण्यातील रोजच्या दिनचर्येतील अनेक मूर्त-अमूर्त गोष्टींना उजाळा मिळत जातो. 'हिंदू'तील स्त्रियांच्या भाषेवर त्या त्या भौगोलिक परिसराचे अमीट ठसे उमटलेले आहेत. स्त्रिया ह्या मूलतःच सर्जनशील असल्याने संस्कृतीसंवर्धनाबरोबर संस्कृतीचे अभिन्न अंग असलेल्या भाषेचे सौंदर्यही त्या वाढवत असतात. यादृष्टीने 'हिंदू' कादंबरीतील स्त्रियांची बोली विशेष महत्त्वाची ठरणारी आहेत.

'हिंदू' कादंबरीत स्थान प्राप्त झालेल्या अनेक जाती-वर्गाच्या, शैक्षणिक स्तरातल्या स्त्रियांची भाषिकरूपे कादंबरीला उंचीवर घेऊन जातात. अनेक स्थळांचा जसा संदर्भ हिंदूतील स्त्रियांच्या भाषेला आहे तसाच व्यापक कालपटाचाही स्पर्श तिला झालेला आहे. १९७२ च्या दुष्काळाचे वर्णन 'हिंदू'त आले असून या दुष्काळी काळात खंडेरावच्या दारासमोर एक स्त्री पिण्याचं पाणी मागते. ती म्हणते, ''पाणी घाला माये, पुन्य व्हईल वं लेकी, एक घोटभर तरी दे बहीन, तुह्या घरात पायना हालीन पोरी... मोठ्या घरच्या बाई, नशीबवाल्या माई, वाढ वऽ बहीन'' (हिंदू/१७५) वरील उद्‌गार केवळ हतबल स्त्रियांच्याच तोंडून येऊ शकतात. कारण सोशिकपणा तिला अंगभूतपणे चिटकून आला आहे. विशेषतः तहानलेली स्त्री दुसऱ्या स्त्रीशी आदिम नात्यानं एकरूप होते. स्त्रियांच्या आयुष्यात मातृत्वाची भावना किती खोलवर रुजलेली आहे हे त्या स्त्रीच्या याचनेतील 'तुझ्या घरात पायना हालीन पोरी' या वाक्यावरून येते. ही भाषा तिच्या आंतरिक स्त्रीकोषातून अंकुरली असून नेमाडे स्त्रियांच्या मातृत्वसत्वासहित त्यांच्या स्त्रीत्वाशी भाषिक पातळीवर एकरूप होतात. स्त्रीजीवनाचं साफल्य मातृत्त्वसिद्धतेत असतं आणि मातृत्त्वाशिवाय स्त्रीच्या आयुष्याला पूर्णत्व प्राप्त होत नाही म्हणून ही हळवी बोली मनाला थेट भिडते. एकंदरीत मराठी कादंबरी साहित्यात पुरुषांनी निर्मिलेल्या कादंबऱ्यांमध्ये नेमाड्यांएवढे ताकदीने स्त्रीभावविश्व सामाजिक आणि भाषिक पातळीवर कुठल्याच लेखकाने उलघडून दाखवल्याचे दृष्टीस पडत नाही. अशा भाषेतून ग्रामीण परिसर साक्षात जिवंतरूप घेतो. स्त्रियांच्या सर्वच स्तरावरच्या मनोव्यापाराचे प्रतिबिंब त्यांच्या अस्सल भाषाद्रवातून पडलेले आहे.

परिस्थितीपरवशतेतून आलेली भाषा कादंबरीला कारुण्याचं सात्विक रूप प्राप्त करून देते. स्त्रियांची भाषा आर्जवांनी ओतपोत भरलेली आहे. ती सवर्ण जातीतील स्त्री असो व अभावग्रस्त पर्यावरणात जगण्याशी दोन हात करणारी दलित, भटकी स्त्री असो. 'हिंदू'तील बहुतांश स्त्रिया परंपराशरण, परिस्थितीशरण, नियतीशरणाच्या प्रभावाखाली जगणाऱ्या आहेत. त्यांची भाषाही याचाच परिपाक म्हणून येते. सिंधूमावशीचा नवरा क्षयाने मरतो. ती आणि सुधी खंडेरावच्या घरी राहू लागतात. दुष्काळी परिस्थितीत ती रस्त्याच्या कामावर जाते. खंडू तिची भाकर घेऊन जातो. खंडेराव सिंधूमावशीला एवढ्या उन्हाचं कामावर कशाला जातेस असा प्रश्न विचारतो त्यावर ती म्हणते, ''घरच तं मोडलं रे खंडू, तुझ्या ह्या मावशीचं, नाही तं बसले असते घरातच त्या सुन्या जागेपेक्षा हा असा शेतातला उन्हाळाच बरा वाटतो बाळा.'' (हिंदू/१८७) 'हिंदू'त हळवे करणारे असे असंख्य प्रसंग येतात. त्यांच्या भाषेत दुःखाची, वेदनेची हळवी छटा पसरलेली आहे.

'हिंदू' कादंबरीत भिन्न भिन्न परिस्थितीसंदर्भ असलेल्या, वेगवेगळ्या जातिजमातीमधून आलेल्या स्त्रियांचे बोलीविशेष कादंबरीला अनन्यसाधारण बनवतात. या भाषेमधून त्यांचे मानसिक भावनिक, कौटुंबिक, सामाजिक स्थान व दर्जाचे सूक्ष्मतर भेदाचे दर्शन घडते. स्त्रियांच्या निरनिराळ्या भाषिक लकबींना जातींचा, समूहांचा, सामाजिक, आर्थिक बाबींचा अभिन्न संदर्भ आहे. दाळवं विकायला दारोदार फिरणाऱ्या भोईनीचे सांत्वन करताना सीताआजी म्हणते, ''तुले कसं दारोदारी फिरनं परतं माय? तुही लेकरं तुही कशी वाट पाहत असतील माय घरी? कसं रांडपन कठलं माय तुनं?...असू दे बहिण, दिवस का मुक्कामी येता.'' (हिंदू/२१७) अंतरीच्या उमाळ्यातून आलेली, सांत्वनाने काठोकाठ ओसंडून वाहणारी ही भाषा स्त्रीच्या भावजीवनातील दुखऱ्या जखमांना आश्वासक मलम लावते. एवढा भावव्याकुळ संवाद केवळ एका स्त्रीचा दुसऱ्या स्त्रीशीच शक्य असतो. 'हिंदू'मध्ये स्त्रियांच्या तोंडी उपेक्षा, अवहेलना, शोषण, हतबलता, दुःखावेगाची जशी भाषा आली आहे, तद्वतच चिंधू या स्त्रीव्यक्तिरेखेच्या तोंडून परंपरा, शोषणाच्या बेड्या तोडणारी विद्रोहाची भाषाही मोठ्या ताकदीने आली आहे. पुरुषी व्यवस्था जेव्हा तिच्या अस्तित्वावर घाला घालू पाहते तेव्हा चिंधू आत्या व्यवस्थेच्या विरोधात ठामपणे उभी राहते. नवऱ्याचा दुसऱ्या लग्नाचा डाव हाणून पाडताना म्हणते, ''बायको म्हणजे भाजी वाटते तुला? मारून टाकलं तरी सोडखतावर मी अंगठा लावणार नाही.'' (हिंदू/२३४) स्वतःमधल्या आदितत्वाला आवाहन करताना

अनुक्रमणिका

ती ईश्वराला बळ मागताना म्हणते, ''देवा, पुन्हा आयुष्यात तुला दुसरं काही मागणार नाही. हे शेवटचंच. नवरा मारायचं बळ दे.'' (हिंदू/२३६) व्यवस्थेतील पुरुषी अभिनिवेषाला नामोहरम करणारी, त्याचा वरचष्मा मोडीत काढणारी टोकदार भाषा 'हिंदू'तील स्त्रियां तोंडी नेमाडेंनी घातली आहे.

इथल्या संस्कृतीचे, भूमीचे सत्त्व आणि तत्त्व स्त्रियांच्या बोलीरूपांतून दृग्गोचर झाले आहे. या बोलीत अस्सल शिवराळपणा आहे, तसेच स्त्रियांच्या भावविश्वातील दुखऱ्या जखमांचे ओरखडेही उमटले आहेत. या बोलीत काव्यात्मकता आहे. लोकलय एकवटलेली आहे. तिच्या दैनंदिन जगण्याचे सार जसे तिच्यातून प्रकटते, तसेच हिरव्या स्वप्नांचे गाणेही तिच्यातून झरत राहते. 'हिंदू'तील स्त्रियांच्या तोंडी असलेल्या आगळ्यावेगळ्या भाषारूपांमुळेच कादंबरीला देशीरूप प्राप्त झाले आहे. नेमाड्यांचे मोठेपण हिंदूतील स्त्रियांच्या भाषिकरूपांवर लक्ष वेधल्यास अधिक गहिरे व ठळक होते.

संस्कारित भाषा व भाषेचे देशीकरण

'हिंदू' कादंबरीतून एक समृद्ध शब्दकोश निर्माण होईल एवढे शब्दभांडार तिच्यात समाविष्ट झाले आहे. दैनंदिन भाषिक रूपांना वर्तमान परिस्थितीवर भाष्य करण्यासाठी संयुक्तीकपणे उपयोजिले आहे. त्यातून अनेक नव्या शैलींचा, उपशैलींचा नजराणा नेमाड्यांनी पेश केला आहे. अनेक नव्या जुन्या ध्वनी रूपांवर, भाषिक संकेतांवर वर्तमानसंदर्भात केलेल्या अर्थप्रवाही शब्दसंस्कारांनी एक आगळा-वेगळा उपहासात्मक, तिरकसपणा प्राप्त होतो. नेमाड्यांनी अनेक कालबाह्य देशी शब्दांचे पुनरुज्जीवन करून आशयभागाला कालसुसंगत परिमाण प्राप्त करून दिले आहे. 'हिंदू' कादंबरीत जुन्या नव्या शब्दांची काल, घटना, प्रसंगानुरूप रेलचेल दिसून येते. त्यात त्या त्या प्रदेशातले बोलीरूपे अवतरतात. 'हिंदू'चा बोलीभूगोल व्यापक स्वरूपाचा असून त्याचा नियोजनबद्ध वापर नेमाडेंनी मोठ्या खुबीने केला आहे. त्यातून त्या त्या भूप्रदेशाला, सांस्कृतिक वैशिष्ट्यांना, सामाजिक संकेतांना उजाळा मिळत राहतो. खान्देश, तिथला कृषिव्यवसाय, तिथली वेगवेगळ्या जातिजमातींच्या बोलींचे समूहनिष्ठ आविष्कार, अहिराणी बोली, आदिवासींची बोली, मराठवाडा भूप्रदेशातली रांगडी टोकदार बोली, धनगरी बोली, आदी अनेक बोलभाषांतील समृद्ध असा शब्दसंचय कादंबरीत एकवटला आहे. प्रमाण मराठी, संस्कृतप्रचुर तत्त्वबोजड मराठी, माणुसकीचा ओलावा धरून ठेवणारी गावरान बोली, हिंदी, उर्दू, फारशी, इंग्रजी इंग्रजीच्या शब्दांचे देशीकरण, भाषांतर, रूपांतरण, लिप्यंतर 'हिंदू'ला खुमासदार बनवते. सर्वस्तरीय, सर्वक्षेत्रीय शब्दसंग्रह 'हिंदू'त मूर्तरूपाने प्रकटला आहे. नेमाडे यांनी प्रातिभिक शक्तीने कालबाह्य ठरलेल्या, अडगळीत पडलेल्या शब्दांना नव्या संदर्भात अर्थवाही मुलामा देऊन आशयाला बहुमोल बनविले आहे. शिवाय काही नव्या शब्दांचा अंतर्भाव त्यांनी मराठी भाषाभांडारात केला आहे. हे शब्द स्थितीदर्शक, स्थानदर्शक, वृत्तीप्रवृत्तीनिदर्शक आहेत. जसे की, ढिंमनस्क, सातपुड्याचा जातपुडा, परबोधन (प्रबोधन), परतीध्वनी (प्रतिध्वनी), परवास (प्रवास), परताप (प्रताप), हेळनात्मक, काझी होणे, मनीराम, स्तोमड्यांनो, वाजपी, मृतपात्रविशारद, प्रयागजी, दिल्लीजी, मुंबईजी, टिर्र्या, कबलली, अक्का-उंटीन, मार्जारहत्या, देवजी धसाडा, विगरी, लहेंगिक (लैंगिक) नगरगंडग्रस्त, बरठला, केशवसुट, हाटाटँक, सस्पेन्डावस्थेत, मथवत, ऑर्गना, वासां, फुलुटा, ड्रामां, ट्रम्पेटां, फारमर, बारमाहू, काबाडकष्टू, कोरडवाहू, फाटकूतुटकू, शेणखतू, मरूमरू, टुकूझुकू, प्रेमविवाहू, शहरू, समशीतोष्ण मित्र, इंटरकाष्टा, बसी (बस), हाटेल, केसी (केस), विड्यानगरी (विद्यानगरी), इद्यापीट, हुरूपवादी, ऑड जात (आडजात), कुल्लपती (कुलपती), खूप सुत्र असतो (डोकं खुपसून असतो), बंदे मॅटरम (वंदे मातरम), अपेलनीय, निव्वळ पिताजी (दारू पिता), वन-डे मातरम, चहा-कपात, पी.के.साहेब, प्लेटी, पार्सली, तू वंशाचा दावा आहेस, पोझी (पोझ), कॅन्सल (कॅन्सर) आतून कसाबी चालेल इंटेरीयर, निगेटिवा (निगेटिव्ह), खरीदून, लेटून, स्त्रीफूसतज्ज्ञ, पिलोख (प्लेग), अफेडणीय, तोडाक्षरं, कंदिल क्लब, अशा कितीतरी संस्कारित शब्दांच्या माध्यमातून अपेक्षित अर्थ वाचकांपर्यंत नेमाड्यांनी समर्थपणे पोचवत आहे. कितीतरी शब्दांना त्यांनी देशी परिवेष चढवला आहे. तिरकसपणातून वास्तवावर भाष्य करणे हे नेमाडे यांचे खास वैशिष्ट्य राहिलेले आहे. ते पुन्हा एकदा 'हिंदू'तून दृढ होत जाते. भाषेचा एवढ्या समर्पकपणे वापर नेमाड्यांएवढ कुठल्याच मराठी कादंबरीकाराला साधता आलेला नाही.

'हिंदू'त येणाऱ्या क्रियापदांबाबतीतही नेमाडे यांनी प्रयोगशील दृष्टिकोन बाळगलेला दिसून येतो. उदा-करत्साता, बुळबुळत्साचा, करजो, ठेवजो, नेयजो, होत्साते, थांबाडा, घेत्साती, येत्साते, खायजो, वारजो, मारजो, आदी शाब्दीक रूपे कादंबरीला आकर्षक बनवतात. या प्रकारचे शब्द म. फुले यांच्या लेखनात (शेतकऱ्यांच्या आसूड) सापडतात, अशा अभिनव क्लृप्त्यांमुळे नेमाडे वाचक, अभ्यासकांचे लक्ष खिळवून ठेवण्यात यशस्वी झाले आहेत. हे भाषिक रसायन नेमाड्यांच्या शैलीविशेषांचे मध्यवर्ती सूत्र सगळ्याच कादंबऱ्यामधून दृष्टीस पडते.

'हिंदू' कादंबरीवरील भाषिक प्रभाव

'हिंदू' कादंबरी अनेक भाषिक प्रभावांना आपल्या उदरात घेऊन समर्थपणे वाटचाल करते. नेमाड्यांच्या यापूर्वीच्या कादंबऱ्यासंदर्भातही अशा प्रभावाचे दाखले मिळतात. नेमाडे यांनी स्वतःवरील वारकरी, महानुभाव पंथांचा प्रभाव मान्य केलेलाच आहे. हाच धागा 'हिंदू' कादंबरीतही सापडतो. मध्ययुगीन मराठी भाषेचे अनेकविध दाखले 'हिंदू'त सर्वत्र विखुरले आहेत. 'हिंदू' कादंबरीच्या रूपबंधात प्राध्यान्याने वारकरी अभंगांची, महानुभावी विचारसूत्रांचा समावेश कादंबरीचा पोत घट्ट करणारा आहे. नेमाड्यांची आपल्या पूर्वपरंपरेबद्दलची आस्था आणि समरसता यातून दृढमूल होते. जगण्याला विधायकतेची, समतेची आकांक्षा प्रदान करणाऱ्या मध्ययुगीन वाङ्मयीन चळवळीचा वारसा नेमाडे यांनी सगळ्याच कादंबऱ्यांमधून निष्ठेने जोपासला आहे. हा देशी वारसा तात्त्विक पातळीवर आणि दैनंदिन व्यवहार पातळीवर नेमाडे संवर्धित करतात. भारतीय आध्यात्माचे सारसत्त्व 'हिंदू' कादंबरीच्या निर्मितीप्रेरणेतच सामावलेले आहे. 'हिंदू'त अनेक समयोचित ठिकाणी अभंग, विचारसूत्रे व कीर्तनादी निरुपण भाषेचा अंतर्भाव नेमाड्यांनी केला आहे. उदा- मुंगी होऊन साकर खावी! निजवस्तूची भेट घ्यावी (हिंदू/२००) किंवा, बहुतांच्या आम्ही न मिळो मताशी, काय या जनाशी चाड मज (हिंदू/३८५) आदी अभंगांच्या माध्यमातून त्या त्या घटनेला सात्त्विकता आणि गांभीर्य प्राप्त होत जाते. आजच्या बदलत्या समाजाच्या बेगडी अन् यांत्रिकतेचा समाचार घेण्यासाठी मूळ अंभगांत विपर्यासात्मक फेरबदल करून वर्तमानाचा सूचक वेध घेतात. 'बरे देवा कुणबी केलो, नाहीतर बिगाराने असतो मेलो.' (हिंदू/३८७) भौतिकसुखांच्या या गदारोळात माणूस आपले सत्त्व हरवून जात असल्याची खंत व्यक्त करण्यासाठी नेमाडे अभंगाचा फॉर्म स्वीकारतात.

कादंबरीच्या आशयसूत्राला देशी परिणाम देण्यासाठी लेखकाने ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, रामदास आदी संतवचनांचा अवलंब केला आहे. किंबहुना महानुभावी गद्यवाङ्मयाच्या समावेशाने कादंबरीचा परिघ विस्तारला आहे. अभंग रचनेच्या उपयोजनातून तथापि महानुभावी साहित्यातून प्रसवणाऱ्या विचार व तत्त्वसूत्रांच्या माध्यमातून नेमाड्यांवरील एद्देशीय साहित्य परंपरेचा प्रभावही दिसून येतो. नेमाड्यांच्या नायकांवर महानुभावी तत्त्वज्ञानाचा गडद प्रभाव आहे. 'एका झाडाची सवे न होआवी' या विचारसूत्राला प्रमाणभूत माणून नेमाड्यांचे नायक भटकंतीला अग्रक्रमाने अंगीकारतात. 'हिंदू' कादंबरीत महानुभावी विचारसूत्रे मोठ्या प्रमाणात आली आहेत. उदा. स्वदेशसंबंधु त्याज्यः संबंधियांचा संबंधु तो विशेषता त्याज्य (हिंदू/५३) किंवा, बाईः हा अवघा डोंगरू पोकळ असे,(हिंदू/४३८) तुमच्याकडून मुंगी सुद्धा रांड न होआवी (हिंदू/३२८) जीवनाचे तत्त्वज्ञान सांगण्यासाठी महानुभावांनी जी व्यवहारभाषा स्वीकारली त्याला नेमाडे अनुसरतात. शिवाय समकालीन संदर्भांच्या स्पष्टीकरणासाठी खंडेरावंच्या माध्यमातून लीळाचरित्रातील निवेदनाचा घाट अवलंबताना, 'ह्या दानपत्रात बदल करेल तेयाचिए माये गाढव झविजे' (हिंदू/३७७) किंवा, 'कव्हनी एकु कुरवंडी करीत सांता कुरघोडी करी त्या वसेकरीयाचा दृष्टांत' (हिंदू/१५६) या भाषिकरूपांच्या सर्जनशील प्रयोगातून नेमाडे देशीतत्त्वप्रणाली प्रस्थापित करतात.

मध्ययुगीन प्राकृत मराठीचा अवलंब करण्याबरोबर नेमाडे शिलालेखाची भाषा, अभिजनांची संस्कृतप्रचुर अलंकरणयुक्त मराठी भाषेचा उपयोग नेमाड्यांनी मोठ्या खुबीने केला आहे. तसेच एकोणिसाव्या शतकातील पत्रव्यवहाराची भाषा, बखर वाङ्मयातील हिंदी, उर्दू, फारशीतील शब्दकळांचा लहेजा असलेली भाषा नेमाडे वापरतात. राजेरजवाड्यामधली अदबीची भाषा, सूचना व फर्मानाची भाषा निराळेपण दाखवून देते. एकोणिसाव्या शतकात बोलली जाणारी फुले, चिपळूणकर आदींच्या भाषेही साधर्म्य दाखवणारी भाषाही वाचकांचे लक्ष वेधून घेते. प्रा. बळीराम कुळकर्णी संस्थाचालकाला लिहिलेल्या तक्रारीच्या पत्रात लिहितो की, ''असे रत्युत्पादक डायलॉग इंग्रजीचे देशपांडे अननुभवी मुलामुलीकरवी प्रत्यही कृतीसह पाठ करून घेवविवतात. दिक्कत म्हणून कोणत्याही गोष्टीची नाही. जर या संस्थेत शील व नीतिमत्ता अनुक्रमे जोपासण्याचा व राखण्याचा पतकर आपण घेतला आहे तर ह्याचा फाड फाडावा व सदरहू लव्हाळे नाटक बंद पाडवावे अन्यथा काळ सोकावेल.'' (हिंदू/४१७) वरील अवतरणातील रत्युत्पादक, घेवविवतात, दिक्कत, पतकर, फाड पाडावा, सदरहू, पाडवावे, सोकावेल इत्यादील शब्द व अनन्यगहेवास, व्याभिचारसंदुषण अंगुलीभंजक, मौर्यग्राम, क्षणलब्धनिद्रः, वाम हस्तेन, खासा, मदनोत्सव, धूळफेक, सकलगुणालंकृतसुशिक्षितपटु, भ्रान्तचित्त, धाधावल्या, नखशिखांत, खुबीदार, जिकीर, हुरमत, इतःपर, धार्ष्ट्य, कारवाई, दिदृक्षु, निषेधून निंदतील, मशारनिल्हे, निखालस, अंमळ, अशा संस्कृत प्रभावातून आलेल्या, उर्दू, फारशी तत्सम शब्दांच्या वापरातून नेमाडे मोठ्या कालपटाची सैर करून आणतात. याशिवाय हिंदी, उर्दू, गाण्यांच्या शायरींच्या माध्यमातून वाचकांना गुंतवून ठेवतात. या सगळ्या भाषिक प्रयोगांमधून नेमाड्यांनी कादंबरीला समृद्धता प्राप्त करून दिली

आहे.

भाषिक संमिश्रता

'हिंदू' कादंबरीमध्ये खानदेशी अहिराणी बोलीभाषेला अग्रक्रम मिळाला असला तरी केवळ खानेदशी बोलींचा अभ्यास करण्यापुरतीच कादंबरी सीमित राहत नाही. वेगवेगळ्या भाषेचा बोलीभूगोल तिच्यात दृग्गोचर झाला आहे. विविध स्थळ-काळ-प्रदेशातील मूलभूत भाषावैशिष्ट्यांसह कादंबरीचा विकास झाला आहे. एकाच वेळी भाषेचे विविध प्रवाह आणि स्तर कार्यन्वित असलेले दिसून येतात. निरनिराळ्या भूप्रदेशांचे बोलीविशेष जसे तिच्या अंतस्तरावरून पृष्ठस्तरावर येत राहतात तसेच काळाच्या स्वैर भटकंतीमध्ये ज्या काळाचा चेहरा स्पष्ट होतो त्या काळाची अंगभूत बोलीविशेषही प्रज्वलित होत राहतात. त्यामुळेच 'हिंदू' कादंबरीत एकप्रकारची संमिश्र आणि व्यामिश्र अशी समृद्धता निर्माण झाली आहे.

स्थलांतरीत, विस्थापितांची भाषा, अलुते-बलुतेदारांची बोली, अनुकरण, प्रभाव, प्रभुत्व व न्यूनगंडातून निर्माण होणारे भाषाद्रव्ये, हिंदी, उर्दूमिश्रीत मराठी, विविध कालबाह्य भाषिक लिप्यांच्या अर्वशेषरूपांवरून नवे अर्थ व चिन्ह रुजवू पाहणारी बोली भाषा 'हिंदू'ला परिपक्व बनवते. मराठी भाषेला केंद्रस्थानी ठेवून अनेक भाषिक संक्रमणातून 'हिंदू'ला लक्षवेधी बनवते. 'हिंदू'त भौगोलिक परिसर व्यापकपणे चित्रित झाला असल्याने त्या त्या भाषिक परीसराचे सत्त्व अंगावर मिरवण्याबरोबर ती अनेक प्रभावांनाही अधोरखित करते. हिंदी, उर्दू मिश्रीत मराठी, इंग्रजीचे मराठीकरण, मराठीचे हिंदी रूपांतरण, संस्कृतप्रचुर मराठीचा कालसापेक्ष परिवेष अशा अनेकविध भाषारूपांचे अभिसरण नेमाडे यांनी घडवून आणले आहे. उच्चारण दोषामुळे निर्माण होणारे नवे अर्थवाही रूपंही 'हिंदू'तून दृष्टीस पडतात. अन्यभाषिक प्रदशातून मराठी भाषिक प्रांतात येऊन स्थायीक झालेल्या सिंधी, गुजराती, ख्रिश्चन आदी लोकांची मराठीरूपे 'हिंदू'त नवा आकृतिबंध घेऊन येतात. लेखकाने अनेक नव्या क्लृत्या योजिल्या आहेत, त्यामुळेही भाषा अपेक्षित परिणाम साधते. साध्या संभोषणाला वेगळा परिवेष चढवणे (कविता), वाक्य, शब्दांची तोडफोड करून तिरकस पण मार्मिक भाष्य करणे, व्याकरणाच्या सहेतुक तोडफोडीतून खिल्ली उडवणे, शब्दशः भाषांतर करून वाचनात रुची निर्माण केली आहे. संक्षेप, विस्तार, पुनरुक्ती, आवर्तनं अशा शब्दसंहिता निर्माण करून भाषेला टोकदार आणि रुचीसंपन्न बनविले आहे. भाषिक कोलांटउड्या मारून कादंबरीला नेमाड्यांनी समृद्धी मिळवून दिली आहे. एकाच कलाकृतीत एवढे भाषिक प्रयोग मराठी साहित्यातल्या कुठल्याच कादंबरीकाराने केलेले दिसून येत नाहीत. नेमाड्यांनी हिंदूच्या माध्यमातून बहुभाषिकत्व रुजविले आहे.

हिंदी चित्रपट गीते, शायरी आणि नादमयता

नेमाड्यांच्या प्रत्येक कादंबरीत भारतीय चित्रपट गीतांचा समावेश झाला आहे. 'हिंदू' कादंबरीसुद्धा त्याला अपवाद ठरत नाही. नेमाड्यांच्या नायकावर असलेल्या भारतीय चित्रपटसृष्टीच्या प्रभावाचा पगडा ह्या चित्रपटागीतांच्या सहभागातून लक्षात येतो. नायकाच्या मनोवस्थेची, भावावस्थेची गडप छाया या गीतांमुळे अधिक ठळक होते. 'हिंदू' कादंबरीत जुन्या हिंदी, उर्दू चित्रपटगीतांचा शायरी गजल व मुशायऱ्यांचा अंतर्भाव झाला आहे. यांच्या समावेशामुळे नायक खंडेरावची अभिरुची देखील अधोरेखित होते. त्याच्या अंतःकरणतील भावना, वेदना, विचार व चिंतनाची खोली, त्याची विचार करण्याची पद्धती लक्षात येते. नेमाड्यांच्या नायकांवर नेमाड्यांच्या अभिरुचीसंदर्भांचा जबरदस्त पगडा असलेला दिसून येतो.

या चित्रपटगीतांमुळे नायकाच्या मानसिक संघर्षाला एक आत्मिक चेहरा प्राप्त होतो. सभोवतीचे वास्तवचित्र विसंगती, विरोधाभासाने मलीन झालेले असते, तेव्हा तेव्हा खंडेरावच्या हतबल, अस्वस्थ मनस्थितीचा आतला आवाज वाचकांपर्यंत पोचवण्याचे कार्य या चित्रपटगीत, शायरी व मुशायऱ्यांनी केला आहे. उदा. मैने चाहा था के अन्दोहे वफा से छुटू वो सितमगर मेरे मरने पे भी राजी ना हुआ. (हिंदू/४६०) मीर, मिर्झा गालिब, गुलजार आदीच्या गजलांमुळे कादंबरीत एक वेगळे वातावरण निर्माण होते. जसं की, 'मुझको दयारे-गैर में मारा वतन से दूर रख ली मेरे खुदा ने मेरी बेकसी की शर्म' (हिंदू/४५८) अशा कितीतरी चित्रपटगीत, गजल, शायरी यांमुळे कादंबरीला काव्यात्मकता प्राप्त झाली आहे. ह्या रचना कधी नायकाच्या भावस्थितीमधल्या गूढत्वाला उजागर करतात, कधी त्याच्या अस्वस्थ मनद्वंद्वाचे यथार्थ दर्शन घडवतात. कादंबरीच्या आशयाला सखोलता प्राप्त करून देणाऱ्या या उर्दू, हिंदी, रचनांमुळे मूळच्या मराठी कादंबरीला कुठेही बाधा पोचत नाही. उलट तिच्या सौंदर्याला वैविध्यपूर्णता प्राप्त होते. ज्याप्रमाणे अलीकडे भारतीय शास्त्रीय संगीत आणि पाश्चात्य संगीत दोन्हींच्या मिलाफातून एक फ्यूजन युक्त संगीत निर्माण केले जाते, तद्वतच नेमाड्यांनी अशा वैविध्यपूर्ण सरमिसळीतून कादंबरीला आस्वादक बनवले आहे. 'हिंदू'तील हे भाषिक फ्यूजन कादंबरीचा सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक पट विस्तारित करते.

शब्द कोट्या, सुविचार, चिंतनसूत्रे व सुभाषितवजा भाषा

'हिंदू' कादंबरी वाचताना जी एक चित्रमयता साद घालते, ती नेमाड्यांनी उपयोजिलेल्या विविध क्लृप्त्याच्या आधारे. 'हिंदू'च्या विस्तीर्ण आशयपरिघात अनेक क्षेत्र सहजता समाविष्ट झाली आहेत. त्यात कुटुंब, समाज, शैक्षणिक क्षेत्र आदीच्या वास्तवपरिस्थितीचा लेखाजोखा वाचकांसमोर ठेवताना विशिष्ट क्लृप्तांचा सहेतूक वापर लेखकाने केला आहे. 'हिंदू'मध्ये आलेल्या शाब्दीक कोट्यांच्या माध्यमातून समाजातील विसंगती, विरोधाभास, तकलादूपणा, खोटेपणा उघड करण्याचा हेतू साध्य झाला आहे. कधी कधी शब्दकोट्यांच्या नाट्यपूर्ण योजनेतून विनोदनिर्मिती साधण्याबरोबर वाचकांना चिंतनास लेखक भाग पाडतो. जसं की, ''प्रॉपर्टी बहिणीच्या वाट्याची द्याल तेव्हा द्याल, आता प्रॉपर टी तरी द्या आम्हाला'' (हिंदू/२९८) किंवा, ''आमचा मेहुणा नोकरी नो करीऽ तो पीएचडी करी.'' (हिंदू/५८४) ''आमच्या बाप-निव्वळ पिताजी.'' (हिंदू/५५९) शिवाय, ''मराठीत कोठे कवी रूपवादी होते रे, निव्वळ हुरूपवादी होते'' (हिंदू/४८४) अशा कितीतरी कोट्यांनी एकाचवेळी विनोदनिर्मिती आणि त्याचवेळी वर्तमान विसंगतीला चव्हाट्यावर आणले आहे. या शाब्दीक कोट्या लेखकाच्या वास्तवाकडे अनेक कोनातून पाहण्याच्या दृष्टीतून आलेल्या आहे. खोटा आदर्शवाद आणि घटनेतील विसंगतीवर बोट ठेवण्यासाठी विपरीत परिस्थितीत सुविचारांची योजना करून लेखक अपेक्षित परिणाम साधतो. उदा. ''मैत्रीतून मत्सर वजा करा, यशात नम्रता मिळवा. प्रेमाचा गुणाकार करा, रागाचा भागाकार करा.'' (हिंदू/३६०) तर काही सुविचार खुद्द लेखकाने निर्माण केले आहेत. त्यात ''आईबाप हा मुलांना पडलेला प्रश्न असतो, तसा शिक्षक हाही विद्यार्थ्यांना पडलेला प्रश्न असतो, (हिंदू/३६९) शाब्दीक कोट्या सुविचारांव्यतिरिक्त कादंबरीत महानुभावी विचारसूत्रांसारखे अनेक चिंतनवाक्य आलेली आहेत. ही वाक्य जीवनावर भाष्य करण्यातून आलेली आहेत. त्यात बोध व चिंतन प्राधान्यक्रमाने आहे. ही वाक्य मनाचा तळ ढवळून काढणारी आहेत. त्यातील विचार हा चिंतनीय आहे. ही वाक्य एखाद्या घोषवाक्यासारखी आहेत. उदाहरणादाखल त्यांचा पुढीलप्रमाणे विचार करता येईल. ''विचारांची मूळं भावनेत असली की विश्वासार्ह असाततच'' (हिंदू/२७) किंवा, ''आपल्या सगळ्यांचा अस्वस्थ करणारा शेवटचा मुक्काम, मृत्यू'' (हिंदू/५७) किंवा, ''मृत्यूची जाणीव मेंदूत जबरदस्त झाल्यावरच मडक्याचा शोध लागला'' (हिंदू/७१) किंवा, ''गतकाळ आपल्याला नेहमीच हळवं करून टाकतो'' (हिंदू/९३) किंवा, ''स्मशान शेवटी मानवी भूगोलाचा अपरिहार्य भूभाग असतो'' (हिंदू/५२६) किंवा, ''मरण ही शरीराची प्रकृतीच असते'' (हिंदू/५९४) किंवा, ''काही रुखरुखींना सांत्वनाची वाट नसते'' (हिंदू/४८०) व्यक्तीजाणिवा, जन्म-मृत्यूविषयीची हळवी संवदेना, भावना विचार, जगण्याच्या परिघावर घुटमळणारा माणूस आदीविषयीची विचारतत्त्वे वरील वाक्यांमधून उद्घृत केली आहेत अस्तित्वचिंतनाबरोबर व्यक्तीचे व्यवहारपातळीवरचे भौतिक जगण्याचे ठोकताळे, आदींवरही नेमके बोट ठेवले आहे.

शाब्दीक कोट्या, सुविचार व चिंतनवाक्याबरोबरच संस्कृत भाषेतील सुभाषितांचाही अंतर्भाव केला आहे. उदा. ''सर्वनाशे समुत्पन्ने अर्ध्यं त्यज्यति पंडित'' किंवा, ''न स्त्री स्वातंत्र्यमर्हती किंवा धर्मो रक्षति रक्षतिः'' वरील तीन सुभाषितांपैकी सुरुवातीची दोन सुभाषिते स्त्रियांना केंद्रिभूत ठेवून योजिली आहेत तर तिसरे धर्माच्या अनुरोधाने आले आहे. स्त्रियांचे समाजातील स्थान, त्यांच्यावरील धर्माशास्त्रांनी घातलेली निर्बंध याविषयीचे कथन त्यात असून स्त्रीला सनातनी धर्मवाद्यांनी कसे अडगळीत टाकले आहे, याचे द्योतक म्हणून नेमाड्यांनी वरील सुभाषितांमधून सूचित केले आहे. वरील सर्व भाषिक घटकांच्या उपयोजनातून नेमाडे समाज, संस्कृतीमधील विसंगती, विरोधभास, उथळपणा, जगण्याच्या जाणिवांचे स्तर, भौतिक सुखांचा आग्रह आणि प्रभुत्वाचे निदर्शक म्हणून स्वीकारल्या आहेत. त्यांच्या समावेशामुळे कादंबरीला अनेक पातळ्यांवर गांभीर्य आणि सखोलता प्राप्त झाली आहे.

म्हणी, ओव्या, लोकगीते, आणि वाक्प्रचारांची योजना

म्हणी, ओव्या, लोकगीते, वाक्चप्रचार आदींमधून लोकधारणा, सामाजिक संकेत आणि समाजवर्तनाचे बारकावे लक्षात येतात. समाजाचे दैनंदिनव्यवहार प्रभावित करणाऱ्या लोकभाषा संचिताला जो अस्सलपणा प्राप्त होतो, त्यातून लोकभाषांचे सामर्थ्यही अधोरेखित होते. समाजाचे सर्जनशील समूहमन या लोकभाषांच्या संकेतमुक्त भाषिक वापरातून दृष्टीस पडते. नेमाडे 'हिंदू'मधून अनेक प्रकारच्या लोकोक्तींना आग्रहाने अधोरेखित करतात. मराठी समाजमनावर पिढ्यान्‌पिढ्यांचे जे संस्कार झालेले आहेत त्याचे सारतत्त्व या लोकउक्तींच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे लक्षात येतात. 'हिंदू'मधून या लोकउक्तींनी समाजाचे वर्तमान जगणे, त्यांच्या जगण्याच्या पद्धती, रीती बरोबरच व्यक्ती-समाजातील हेवेदावे, द्वेष, मत्सर, राग, आदींचे प्रकटीकरणही समर्थपणे झाले आहे. जसे की, ''घरचे साले थोडे व्याह्याने धाडले घोडे'' (हिंदू/१६८) ''मूळ राहू पण कूळ राहू नये,'' (हिंदू/२०१)

''हगवणीला बायको न गानवणीला सासरा,'' (हिंदू/४९८) ''आवरेल कुत्र्याला जोर भारी, (हिंदू/३२९) ''सवतीची फुगडी अन् फेडा एकमेकींची लुगडी,'' (हिंदू/२८०) यासारख्या असंख्य लोकम्हणी 'हिंदू'मध्ये सामावल्या आहे वरील म्हणी ह्या दैनंदिन जगण्याच्या व्यवहारातील विद्रुपता, विवंचना, हतबलता, द्वेष, मत्सर, रगेलपणा, परिस्थितिशरणता आदी चिंतनशील परिपाकातून आलेल्या आहेत. याशिवाय ''वावभर कपडा अन् तीन वारी धोतर,'' (हिंदू/२१३) ''टीच्चूभर विंचू बिल्लासभर अंतर,'' (हिंदू/२१३) अशा वाक्प्रचारामधून अतिशयोक्ती वर्तनाला सूचित करणारा भाव व्यक्त झाला आहे. मानवी स्वभावातील अतिरेकीपणाही वरील वाक्प्रचारानी सूत्ररूपाने मांडला आहे.

समाजजीवनाच्या सांस्कृतिक संचिताचे आणि समूहमनाच्या सर्जनशीलतेचे द्योतक असलेली अनेक लोकगीते 'हिंदू'मध्ये सर्वत्र विखुरले आहेत. ग्रामीण कष्टकऱ्यांच्या जीवनजाणिवांचा मौखिक आविष्कार लोकगीतांमधून समृद्धपणे झालेला आहे श्रमपरिहार, मानसिक संघर्ष, निसर्गाची आराधना, स्त्रीजीवनातील घुसमट आदींचा तळ गाठणारी लोकगीते सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ प्रकट करतात, तसेच त्यांचय पारंपरिक भाषिक सामर्थ्यांच्या अनेक बाजू उजेडात आणतात उदा. ''गाडी घुंगराची येईल ग माह्या माहेरची,'' (हिंदू/२५८) ''धोंडी धोंडी पाणी दे, बळीराजा उपकारी दाने घाली परोपरी ये व धोंडी जोरावरी,'' (हिंदू/१४४) ''अरे भाग्यवंताची बाईल मरते अन् अभाग्याचा बईल,'' (हिंदू/२१९) ''कोपी झडो कुपी झडो गायी म्हशींनी वाडा भरोSS गोचिडी झडो गोमाशा झडो सोन्या रुप्यानं वाडा भरोSS ''(हिंदू/४०२) वरील लोकगीतं ही 'हिंदू' कादंबरीला देशी संस्कृतीचे अस्सल परिमाण बहाल करते. कृषिसंस्कृतीमधील कष्टकरी, शेतकरी आणि स्त्रियांच्या जीवनजाणिवांना इथल्या मातीचा स्पर्श झालेला आहे संस्कृतीविशेषांनी ही लोकगीते प्रभावित झालेली आहे या लोकगीतांमध्ये शेतीव्यवसायाचे, त्यांच्या दैनंदिन जगण्याचे प्रतिबिंब पडलेले आहेत, एकंदरीत सर्वप्रकारच्या संकट व समस्यांना दूर ठेवण्यासाठी ही लोकगीते लोकपरंपरेने निर्माण झाली आणि रुजली. याशिवाय, ''अस्तुरीचा जल्म देवा घालून चुकता रातदिस बैल भाड्याचा जुपला,'' (हिंदू/२५२) ''बेटी का जनम तूने काहेको दिये अल्ला, भानचुले मे सदा जलता कोयल्ला.'' (हिंदू/२६२) या व अशा अनेक ओव्यानी स्त्री जीवनातील स्त्रियांच्या दुःखभोगाला, घुसमटीला 'हिंदू'तून वाचा फोडली आहे. इथल्या लोकभाषेतील प्रवाही रूपांच्या वापरातून नेमाडे आपल्या देशीवादी भूमिकेला दृग्गोचार करण्याचा प्रयत्न करतात. या मातीतल्या लोकसंचितांचे, लोकपरंपरांचे भाषासंचित नेमाडे आग्रहाने वाचकांसमोर ठेवतात.

भाषिक प्रयोग

नेमाड्यांच्या 'हिंदू'पर्वीच्या कादंबऱ्या ह्या आशय आणि रचनातंत्राच्या दृष्टीने प्रयोगशीलता जपणाऱ्या कादंबऱ्या आहेत. 'हिंदू' कादंबरीमधून नेमाडे स्वतःच्या कादंबऱ्यातील प्रयोगशीलता मोडीत काढून एक पाऊल पुढे जातात. प्रयोगाच्या दृष्टीने मराठी कादंबरी साहित्यात 'हिंदू' कादंबरी एक महत्त्वाचा टप्पा ठरते. ती रचनातंत्राच्या दृष्टीने भाषेच्या माध्यमातून अनेक नव्या बाबी स्वतःमध्ये सामावून घेते. त्यात प्राधान्यक्रमाने भाषिकप्रयोगमूल्य अधिक प्रभावी ठरले आहे. 'हिंदू' कादंबरीत भाषिक पातळीवर काहीएक चाकोरी बाहेरचे विशेष सूचविण्यासाठी लेखन क्लृप्तांचा जागोजागी वापर केला आहे. नेमाडे प्रत्येकवेळी एका वेगळ्या आशयवस्तूला घेऊन जसे साहित्यकृतीला जन्म देतात, तद्वतच एका अभिनव आणि खास भाषिक प्रयोगातून समाजवास्तवाकडे वाचकांना घेऊन जाताना रुढ चौकटींना मोडीत काढतात. भाषिक पातळीवरली ही लेखकाची प्रातिभजाणीव आणि जागरुकता कादंबरीला परिपक्व रूप प्राप्त करून देते, नेमाड्यांनी 'हिंदू'त केलेल्या भाषारूपांमधील बदलांमुळे कादंबरीला चिंतनाच्या अनेक तऱ्हा व दिशा मिळत जातात, त्यात मूळ संवादांची, शब्दांची, वाक्यांची अर्थपूर्ण मोडतोड करणे, कादंबरीत विरामचिन्हांचा कुठेही वापर केलेला नाही. फक्त अपसरण चिन्ह (डॅश) संवादाला, निवेदनाला गतिमान करण्यासाठी येत राहतात. तथापि अक्षरांना, शब्दांना, वाक्यांना जाणीवपूर्वक बोल्ड (ठळक) करून वाचकांचे लक्ष खेचून घेणे. वर्तमानपत्रीय बातम्यांच्या शीर्षकांची योजना करणे, अक्षरांच्या मूळ आकारात वाढ करणे, तिरप्या वळणांमध्ये मजकूर पुरवणे, फलक (बॅनर, होर्डींग्ज) सादृष्य चौकट. देऊन मुद्यांना आवश्यक तो उठाव मिळवून देणे, कालबाह्य बोलींचा व भाषा शैलींचा आकृतीबंध स्वीकारून वर्तमानावर भाष्य करणे, हिंदीतून मराठी, मराठीतून हिंदी, इंग्रजीतून मराठी असे भाषांतररूपे उपयोजून वाचनीयता वाढवणे, सूचना, पत्रलेखन, भावफलकसदृश्य भाषा आदी भाषिक प्रयुक्त्यांमुळे कादंबरी वाचनीय होण्याबरोबरच त्या त्या घटनाप्रसंगाचे गांभीर्य वाढवून चिंतनप्रवृत्त करते. या विविध युक्त्यांमुळे सामान्य वाचक जसा गोंधळून जातो तसाच तो अधिक लक्षपूर्वक मूलसंदर्भांचा शोध घेण्यासाठी सज्ज होतो.

टंकलेखनातील नावीन्यपूर्णता

मराठी कादंबरी साहित्यात मजकूर अथवा अक्षरांना ठळक करणे, शब्दांचा, अक्षरांचा आकार इतर मजकूराच्या तुलनेत वाढविणे ह्या प्रयुक्त्या सर्वस्वी नवीन आहेत. नेमाडे यांनी 'हिंदू' कादंबरीत असा प्रयोग केला आहे. हिंदू कादंबरीमध्ये अनेक ठिकाणी शब्द, वाक्यांना ठळक रूप देऊन विशिष्टता बहाल केली आहे, घटना, प्रसंग, संवादातील विसंगती, वैचित्र्य, विनोदनिर्मिती व विशेष अर्थ सूचविण्यासाठी अशा शब्दसंकेतांचा वापर केला आहे. तथापि अक्षरांना, वाक्यांना तिरप्या (इटालीक) वळणामध्ये टंकलेखीत करणे, वर्तमानपत्रातील घटनेतील बातम्यांच्या लक्षवेधी सुलेखन शीर्षक पद्धतीने मजकूर दाखविणे, रस्त्यावर, इमारतीच्या भिंतीवर ज्याप्रमाणे जाहिराती चिकटवलेल्या असतात वा फलक (होल्डींग्ज) असतात त्याप्रकारची लेखनपद्धती वापरून वाचकांचे लक्ष वेधण्यात लेखक यशस्वी झाला आहे. या लेखनरीतींचा वापर लेखकाने त्या घटनेतील गांभीर्य, वैचित्र्य दाखवण्यासाठी सुयोग्यपणे केला आहे. वाचकाला वेगळ्या चिंतनाची मेजवाणी नेमाडेंनी उपलब्ध करून दिली आहे.

'हिंदू' कादंबरीत प्रेक्षपित केलेल्या या प्रकारच्या टंकलेखनामुळे वाचक आकर्षित होतो. क्षणभर तिथे रेंगाळतो आणि विचारांच्या गर्भीत शक्यतांवर चिंतन करू लागतो. **'आपला देश परदेश तर परदेश देश आपला', 'झेंडीच्या प्रणयनितान्ततेचे रहस्य', 'सर्व भारतीय गणराज्याच्या नागरिकासाठी विज्ञापणा', 'लढावू लोकांची खाण', 'मुक्त कोणी कोणास केले', 'कंट्रोलचे ध्यान्य', 'प्रिंझनर्स ऑफ झेंडी', 'मोरगाव विमेन', 'मोर दॅन विमेन', 'सर्व धर्म समान आहेत', 'कोनशिला अनावरण समारंभ', 'कथालेखक', 'वृथालेखक', '३८ डेक्कन कॉलेज', 'मलिक अंबर ह्याची गोष्ट', 'डोंगर खान इब्राहिम खान', 'क कमळाचा लिहा रे', 'सातपुडा शिक्षणसंस्था', 'चटावरचं लग्न', 'कमवा आणि शिका', 'पीक संरक्षण ठेंगा सोसायटी', 'हरिजनाचे प्रेत शेतकन्याच्या मळ्यात रहस्यमय मृत्यू की खून?'** इत्यादी प्रकारचे असंख्य वाक्य, शब्द, अक्षरे 'हिंदू'च्या परीघावर ठळक होत राहतात, घटनेला, प्रसंगाला सामाजिक, सांस्कृतिक संदर्भाच्या सूक्ष्म छटा आहेत, मूळ चिन्हव्यवस्थेची, लिपीची मोडतोड करून नवे अर्थसंकेत निर्माण केले आहेत. शाळकरी खंडेरावची दगडी पाटी फुटते, तिला तडे जातात. विशेष म्हणजे त्या तडे गेलेल्या पाटीवर लिहिताना शब्द व अक्षरांमध्ये खंडितपणा, भेद निर्माण होऊन अर्थ विस्कळीत होतो. या परिस्थितीचे मोठ्या खुमासदार वर्णन केले, आहे, या अक्षरखंडाचे उदाहरणही अर्थवाही आहे. उदा. क-मळ, न-मन, व-हाण, बा-रा, ते-रा इत्यादी. लेखकाने वापरलेली लेखनप्रयुक्ती बाळबोध वाटत असली तरी त्या प्रसंगाची ती मागणी म्हणून आली आहे.

'हिंदू' कादंबरीतील काव्यात्मकता

कादंबरीतील लालित्यपूर्ण भाषा 'हिंदू'ला महाकाव्याच्या जवळ पोचविते. महाकाव्यात कथा आणि उपकथांची एक साखळी असते. तशी कथा व उपकथांची सूत्रबद्ध साखळी 'हिंदू'मध्येही समरसली आहे. अनेकांच्या जीवनकथा आणि व्यथा सूत्ररूप भाषेत नेमाड्यांनी अधोरेखित केल्या आहेत. लोकपरंपरेने चालत आलेल्या आणि पिढीदरपिढीतल्या संस्कारांच्या खूणा अंगावर मिरवत असलेल्या अनेक लोककथांनाही 'हिंदू'मध्ये स्थान प्राप्त झाले आहे. आशयात्मक अंगाने तिने आपला विस्तीर्ण असा व्यास परिघ परिपूर्ण केला आहे. 'हिंदू' कादंबरी अनेक कालावकाश व स्थलावकाशात मुक्तपेण परिभ्रमण करते. स्वाभाविकपणे तिने वैविध्यपूर्ण भाषिक परिवेष धारण केला आहे. तथापि अनेक भाषिकस्तर ती आपल्या कवेत घेऊन मार्गस्थ झाली आहे. महाकाव्यात वातावरणनिर्मितीला अनन्यसाधारण महत्त्व आहे, तसे ते कादंबरी साहित्यातही असते. 'हिंदू' कादंबरीत नेमाडे यांनी अत्यल्प शब्दबंध, आकर्षक वाक्यशृंखला, वर्ण्य घटनाप्रसंग, व्यक्तींच्या जीवनचरित्र आणि चित्रांचा परिपूर्ण पट भाषेच्या बळावर उभा केला आहे, अनेक ठिकाणी 'हिंदू'तील भाषा गद्याच्या सीमारेषा ओलांडून लालित्यपूर्ण काव्यप्रांतात चंचूप्रवेश करते, हे वाचनाच्या ओघात कळतही नाही. 'हिंदू' कादंबरीत अनेक ठिकाणी गद्य, कथनपर भाषेला काव्यरूप दिले आहे. अनेक प्रकारच्या पद्यकाव्यांचा सहज, ओघवता नादपूर्ण समावेश सहजगत्या झाला आहे. संतांचे अभंग, पंडिती काव्यातील संस्कृतप्रचुर रचना, लोकगीते, विधिगीते, फटका, विडंबन, भजन, पोवाडे, लावण्या, हेळा, गोंधळ, गजल, उर्दू मुशायरे (युग्मके), चित्रपटगीते, रेडिओवरची मराठी, हिंदी गाणी, मुक्तके अशा सर्व नव्या जुन्या काव्यबंधाला 'हिंदू'ने सामावून घेतले आहे. यातून कादंबरीत सर्वसमावेशक काव्यभाषांचे संघटनतत्त्व दृढ होत जाते. याशिवाय कादंबरीच्या निवेदनातून, संवादातून व पात्रांच्या चिंतनातून येणारी काव्यात्मकता कादंबरीचे आकर्षण ठरते.

नेमाड्यांची 'हिंदू'मधील भाषा कुठेच पाल्हाळीक, रखरखीत वा कंटाळवाणी झाली नाही. ती ताजी, टवटवीत

अनुक्रमणिका

असून एखाद्या शिल्पकाराने मूर्ती घडवणुकीत काटेकोर, कोरीव काम केलेले असते. तसेच 'हिंदू'ची भाषा घडवताना नेमाड्यांनी आटीवघोटीवपणे भाषा निर्मिली आहे, प्रथमदर्शनीच वाचक, 'हिंदू'तील भाषेच्या प्रेमात पडतो. 'हिंदू'तील काव्यभाषा उपमा, अलंकार, उत्प्रेक्षा, प्रतीमा प्रतिकांनी युक्त आहे. अनेकार्थता हा तिचा स्थायीभाव असून प्रसंगानूरुप वास्तवाचे सहेतूक विडंबन, विपर्यास करून तिला परिणामकारक बनविले आहे. खंडेराव ही कांदबरीतील प्रधान व्यक्तिरेखा असून कथनाचा भार बहुतांशवेळा त्यांच्याकडे आहे, निवेदन, चिंतन, स्वगतांमधून येणारी त्याची भाषा काव्यरूप घेते. जसं की, ''थकलेले कष्टकरी रात्री गातील तसं कोण गाऊ शकेल, हे धनवान लोकांनो दुःखी माणसं पहाटे हासतील तसं कोण हासू शकेल, हे सुखवस्तू लोकांनो'' (हिंदू/०८) किंवा, ''हक्काच्या आयुष्यातला क्षणक्षण उन्हातान्हात थंडीवाऱ्याशी भिडवून घामानं अंग भिजवून मिळवलेल्या कणकण धनाचा शेवट असा मंत्रमुग्ध करणारा खणखणीत ढळढळीत जडजडीत ऐकून स्पर्शून पाहून तो खरा समाधानी व्हायचा'' (हिंदू/७८) अशा बऱ्याच ठिकाणी 'हिंदू'तील भाषा काव्यप्रांतात जाऊन पोचते. तथापि निव्वळ काव्यात्म अनुभूती देणारी भाषाही 'हिंदू'त सापडते, जसं की, ''आता एका हातानं आपल्याच दुसऱ्या हाताचं बोट धरून चालत जावं, तुझ्यात होतच काय की तुला सोडताना डोळ्यातून माझ्या पाणी पाहावं'' (हिंदू/४१२) ''या पुढे जाऊन, एकच तारा समोर आणि पायतळी अंधार'' (हिंदू/४४८) असे काव्यबंध हिंदूत जागोजागी येत राहतात. उदा. ''पाया पडायला पायबंदी घालणारा हा कोणता देव?'' (हिंदू/४३४) किंवा, ''सर्व शक्यतांच्या जंगलावर एकाच पायाचा ठसा आहे. माणसांच्या आकांक्षांच दुसरं पाऊल कुठे आहे'' (हिंदू/४६१) अशा असंख्य काव्यओळी संवादातून, निवेदनातून पात्रांच्या स्वगतं, चिंतनातून कादंबरीभर विखुरल्या आहेत, जाणिवा, भावना, आस्तित्वविषयक कल्पना आणि व्यावहारीक जीवनातल्या प्रश्नांना स्पर्श करणाऱ्या या काव्यात्मक रचना कादंबरीला लालित्यपूर्ण आणि चिंतनशीलता प्राप्त करून देतात. कादंबरीत प्रतीकं, प्रतिमा, उपमांचा नेमाड्यांनी अन्वर्यक उपयोग केला आहे. जसं की, 'मृत्यूची हुडहुडी' (हिंदू/३८१), 'धुळीचा ढग' (हिंदू/३८४), 'ताज्या नांगरलेल्या ढेकळांसारखी काळी ढणढणीत पूर्ण नागडी पोरं,' (हिंदू/४२०) 'लढावू बुरुजासारखं' (हिंदू/४२७) अशी प्रतिमांनी युक्त असलेली काव्यभाषा 'हिंदू'चे वाङ्मयीन सौंदर्य वाढवते. नेमाडे यांनी 'हिंदू'त काव्याचे अनेक फार्म वापरून समाज, संस्कृती, व्यक्तींचे मनोव्यापार, त्यांची स्थिती यारवर प्रकाशझोत टाकला आहे. 'हिंदू' कादंबरीतील लालित्यपूर्ण भाषा कादंबरीला भावकाव्याचे रूप प्रदान करते.


'हिंदू'तील शैलीरूपे

'हिंदू' कादंबरीत अनेक शैली, उपशैलीचा सहज वावर दिसून येतो. विशेषतः नेमाडे यांची सभोवतीच्या समाज, संस्कृतीकडे पाहण्याची दृष्टी आणि दृष्टिकोन तिरकस स्वरूपाचा राहिलेला आहे. ते एकाच घटनेकडे अनेक कोनातून पाहतात. त्याचे उपयोजन कलाकृतीत जेव्हा होते, तेव्हा त्या घटनेचा अन्वयार्थ लावण्यासाठी वेगवेगळ्या शैलीचा योग्य वापर करून कलाकृतीला आस्वाद्य बनवतात. उपरोध, उपहास, विडंबन हा नेमाड्यांना लेखनाचा स्थायीभाव आहे. 'हिंदू'त नेमाडे यांनी अनेक शैली व उपशैलीचा उपयोग केला आहे. भाषेला हवे तसे वाकवून अपेक्षित परिणाम साधण्याकडे त्यांचा कल असतो. 'हिंदू'ची भाषा अनेक पातळ्यांवर आपले वेगळेपणे सिद्ध करते. जीवनातील वेगवेगळ्या क्षेत्रात वापरली जाणारी भाषा 'हिंदू'मध्ये अवतरली आहे. कधी सरळ तर कधी तिरकसपणे जीवनावर भाष्य करणारी 'हिंदू'ची भाषा अनेक मितींमधून आपला कार्यभाग तडीस नेते. अनेक नव्या जुन्या प्रचलीत कालबाह्य भाषाशैलींचा समावेश 'हिंदू'त आहे, निवेदनाची आखिवरेखीव बहुपेढी भाषा, सूचनांची जरब बसवणारी भाषा उदा. ''कोणाच्याही धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत, याची प्रत्येक ठिकाणी बोलताना काळजी घ्यावी. अन्यथा रजिस्ट्रेशन कॅन्सल होईल'' (हिंदू/४४१), बोधवाक्यांची सखोल अर्थप्रतीत करणारी भाषा, जीवनचिंतन मांडणारी आणि त्यावर भाष्य करणारी विचारपरिप्लुप्त भाषा, वर्तमानपत्रांची नेटकी माहिती पुरवणारी औपचारिक व सुगम भाषा, लक्ष वेधून घेणारी आकर्षित करणारी फलक व पोस्टरची भाषा, विचार, भावना मते व्यक्त करणारी पत्रव्यवहाराची भाषा, व्यापाऱ्यांची व्यवसायविशिष्ट भाषा, भाषणांची आवेशपूर्ण भाषा, आश्वासनांची भाषा, संशोधनाची शास्त्रीय विवेचन मांडणारी भाषा, प्रचलित शिक्षणव्यवस्थेतील उथळपणावर बोट ठेवणारी भाषा, मौखिकी व लेखी परीक्षेतील दोष व उणिवा दाखवून देणारी तिरकस भाषा, प्रचारपत्रकाची भाषा, दवंडीची हेलयुक्त भाषा, जाहीरातींची आटोपशीर ताजी भाषा, विद्वतेची फुशारकी दाखवणारी तत्त्वजड संस्कृतप्रचुर भाषा, कालबाह्य अनाकलनीय प्राचीन भाषिक लिप्यांना नवा अर्थ देणारी संकेतांची, प्रतीकांची भाषा, वास्तवातील नाटकीपणा चव्हाट्यावर आणणारी, विपर्यासातून विसंगतीवर प्रकाश टाकणारी शाब्दीक मोडतोडीची भाषा, शाब्दीक कोट्यांमधून

विनोद निर्माण करणारी भाषा उदा. 'चहा-कपात आहे', 'डोकं खूपसून असतो ऐवजी खूप सूत्र असतो' घोषणाची वीररस निर्माण करणारी भाषा, उच्चारणदोषातून अर्थच्छल करणारी भाषा, म्हणी, वाक्प्रचार, सुविचार, सुभाषितांची, लालित्यपूर्ण काव्यभाषा, भाषांतर, रूपांतर, लिप्यंतर, अनुवाद आणि स्वैरकथनाची आदी भाषाशैलींच्या वापरातून नेमाडे वास्तवातील विसंगतीवर प्रहार करतात. तथापि व्यक्ती स्वभावामध्ये दडून बसलेल्या दांभिक प्रवृत्तीवर भाषिक विपर्यासातून आघात करतात. एवढ्या बहुआयामी पद्धतीने भाषेच्या विविध संकेतशैल्याचे उपयोजन हे लेखकाची कसोटी पाहणारे आहे आणि या कसोटीवर नेमाडे खरे उतरले आहेत. याशिवाय 'हिंदू'मध्ये नेमाड्यांनी विडंबन व वाङ्‌मयीन श्रुतयोजनही बऱ्याच ठिकाणी उपयोजिले आहे. श्रुतयोजन हे पूर्वीच्या अन्य लेखकाने, कवीन लिहून ठेवलेल्या वा ऐकलेल्या वाक्यांचे, ओळींचे, विचारांचा विरोधाभास दाखवून देण्यासाठी शब्दबदल करून वापरलेल्या भागाला श्रुतयोजन म्हटले जाते. 'हिंदू'मध्ये विडंबन व श्रुतयोजनाचे अनेक दाखले मिळतात, उदा. ''हंसे मुक्ता नेली केला कलकलाट मग काकांनी । भावे संग्रहित मोडी ग्रंथ ते मोडीत काढले लोकांनी ।।'' (हिंदू/३७७) ही मूळ आर्या मोरोपंताची असून 'हिंदू'तील पुरातत्व विभागातील भावे सरांच्या घरावर गावातल्या लोकांनी हल्ला करून तोडफोड केली. घरात वेगवेगळ्या ठिकाणांहून जमा केलेले प्राचीन व दुर्मिळ साहित्य होते. त्या सामानात विविध प्राचीन लिपीतल्या पोथ्याही होत्या. त्यातील मोडी ग्रंथाचीही लोकांनी फेकाफेक केल्या, त्यावरचे हे विडंबन आहे. याशिवाय तुकारामाच्या 'बरे देवा कुणबी केलो/नाहीतरी दंभेची असतो मेलो' या अभंगाचे 'बरे देवा कुणबी केलो/ नाहीतर बिगाराने असतो शिकलो' (हिंदू/३८७) असे समकालीन शिक्षणव्यवस्थेवर प्रकाश टाकणारे चपखल विडंबन कादंबरीत आले आहे. तसेच संत रामदासांच्या मनाचे श्लोकाचे जनाचे श्लोक म्हणून विडंबन कादंबरीत आले आहे. 'मनाची नको लाज ठेवू जरी तू / जनाची तरी ठेवी पळपुट्या नागड्या थू //' (हिंदू/४५१) वरील विडंबनाबरोबर श्रुतीयोजनाचेही दाखलेही 'हिंदू'त दृष्टीस पडतात, जिवतीच्या कोपाची लोककथा आली आहे. त्या कथेत गावात एकही मूल होणार नाही असा तिने शाप दिला. पुढे त्या गावात एकही मूल झाले नाही. तिच्या शापवाणीद्वारे लेखकाने आधुनिक सुखवस्तू समाजाच्या स्वार्थी मनोवृत्तीवर भाष्य करण्यासाठी व वर्तमानातील गर्भपात, स्त्रीभ्रूणहत्या आदी समस्यांचे गांभीर्य लक्षात आणून देण्यासाठी एक परिच्छेद दिला आहे. शापवाणीत जिवती म्हणते की, ''रे निलाजऱ्यांनो, तुम्ही उघड उघड पोटं पाहता? रबराची टोपणं वापरता? गर्भ तपासता आणि मुलींना मरून उकिरड्यात फेकता? म्हणजे माझ्याच तं जिवावर उठले नं तुम्ही? हा ज्या जिवतीमुळे सगळा तुमचा पसारा टिकून आहे, त्या सर्जक अशा मलाच सर्जरी? पुरुष तर पुरुष, स्त्रियासुद्धा म्हंता मला हा गर्भ नको. नुस्ती मजा करायला सोकावल्या. तू गर्भात असतांना असंच तुझ्या आई-बापांनी केलं असतं तर? आता नीट ऐका, या गावात आजपासून लहान मूल म्हणून जन्मणार नाही.'' (हिंदू/३४९) या प्रचलित दंतकथेद्वारे वर्तमान समाजाच्या विध्वसंक मानसिकतेवर प्रहार करण्यासाठी नेमाड्यांनी मार्मिकपणे बोट ठेवले आहे. गाण्याचे श्रुतीयोजन, 'क्या बने भात जहाँ भात बनाये न बने' (हिंदू/५३७) 'हिंदू'मध्ये नेमाड्यांनी समाज, संस्कृतीमधील वैगुण्यात टोकदार बनवण्यासाठी विविध भाषिक शैल्यांचा, उपशैल्यांचा सक्षमपणे उपयोग केला आहे, उपरोध, उपहासातून चपखलपणे सामाजिक विकृतींवर आघात केला आहे. या विविध भाषिक रुपांमळे आणि शैलीविशेषांमुळे कादंबरीचा भाषिक पोत घट्ट झाला आहे.

नेमाडे यांनी 'हिंदू' कादंबरीत अनेक भाषारूपे योजिल्यामुळे कादंबरीला बहुआयामी रूप प्राप्त झाले आहे. निवेदनाच्या अनेक शैली उपशैलीमुळे कादंबरीला परिणामकारकता प्राप्त झाली आहे. नेमाडे वर्ण्य विषयाकडे नेहमीच तिरकसपणे, पाहत आले आहेत याचा प्रत्यय पुन्हा एकदा 'हिंदू'मध्ये येतो. वास्तवावर बोट ठेवण्यासाठी, वास्तवाच्या अनेक शक्यता व बाजू पडताळून पाहण्यासाठी नेमाडे उपरोध, उपहास, विडंबनादी शैलींचा वापर करतात, याशिवाय 'हिंदू'मध्ये अनेक बोली भाषांचा त्यांच्या मूळवैशिष्ट्यानिशी अंतर्भाव झाला आहे. त्या त्या जातिजमातींची, प्रदेशविशिष्ट बोलीभाषेतून त्या समाजसमूहांचे सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक व्यवहार व रितीभाती संदर्भपूर्ण रीतीने उजागर केल्या आहेत, 'हिंदू'ची भाषा कादंबरीला व्यापक रूप बहाल करण्याबरोबरच तिच्या आशयात्मक कक्षा विस्तारण्यात मोलाची भूमिका पार पाडते, देशी जाणिवांचे अगणित ठसे 'हिंदू'तील भाषेवर उमटले आहेत, भाषेच्या अंगाने नेमाडे देशीवादी तत्त्वांना आणि जाणिवांना संवर्धित करण्यात यशस्वी झाले आहेत.

। विनायक येवले
रिसर्च असोशिएट
भाषा, वाङ्‌मय व संस्कृती अभ्यास संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड.
भ्रमणभाष : ९८८१२१५८४६



युगवाणी

एप्रिल-मे-जून २०१२

।। सहभाग ।।

डॉ. रत्नाकर मंचरकर, के.सच्चिदानंदन, डॉ. कैलास सार्वेकर, विष्णू नागर, मंगलेश डबराल, कुँवर नारायण, देवीप्रसाद मिश्रा, ज्ञानेंद्रपती, अनीता वर्मा, बोधीसत्व, कुमार अनुपम, नरेश सक्सेना, सविता सिंह, राजेश जोशी, अंशू मालवीय, सुंदरचंद ठाकूर, अशोक कोतवाल, प्रकाश भातम्ब्रेकर, डॉ. बलवंत जेऊरकर, नामदेव कांबळे, डॉ. शिवाजी नागरे, डॉ. पुरुषोत्तम माळोदे, डॉ. गजानन जाधव, नरेंद्र लांजेवार, डॉ. शुभा साठे, प्रा. विजय रुद्रकार, प्राचार्य सदानंद बोरकर, श्वेता पोईनकर.

पृष्ठ ६८, किंमत ४० रुपये


युगवाणी


ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१२ जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१३

।। सहभाग ।।

डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. रमाकांत कोलते, अशोक कौतिक कोळी, डॉ. केशव तुपे, प्रा. कृष्णा चौधरी, अजय कांडर, डॉ. माधवी देसाई, डॉ. प्रकाश दुकळे, डॉ. राजेंद्र नाईकवाडे, डॉ. राजेंद्र गणेश डोळके, वसंत वाहोकार, प्रभू राजगडकर, सुरेश सावंत, पी. विठ्ठल, प्राचार्य सदानंद बोरकर, प्रा. नीताश्री.

पृष्ठ ६८, किंमत ६० रुपये





युगवाणी

एप्रिल-मे-जून २०१३

।। सहभाग ।।

डॉ. सुधीर रसाळ, प्रा. वसंत आबाजी डहाके, दासू वैद्य, डॉ. लीना रस्तोगी, डॉ. सुरेश जोशी, श्याम पेठकर, मिहीर चित्रे, संजय इंगळे तिगावकर, डॉ. प्रज्ञा आपटे, डॉ. राजेंद्र नाईकवाडे, डॉ. अण्णा वैद्य, सुदाम राठोड, विजयराज बोधनकर, प्राचार्य सदानंद बोरकर.

पृष्ठ ६८, किंमत ६० रुपये

संपर्क सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, नागपूर ४४००१२
दूरध्वनी ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

अनुक्रमणिका



युगवाणी

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०१३

।। सहभाग ।।

डॉ. उषा माधव देशमुख, प्रा. वसंत आबाजी डहाके, डॉ. अरुणा ढेरे, सचिन जलतारे, डॉ. सुखदेव ढाणके, डॉ. रुपाली शिंदे, सतीश तांबे, नामदेव कांबळे, डॉ. नंदकुमार मोरे, सुधीर देव, प्राचार्य किसन पाटील, डॉ. समिधा चव्हाण, बालाजी मदन इंगळे, मनीषा साधू, प्रशांत असनारे, मुबारक शेख, स्नेहलता पिटकर, प्राचार्य सदानंद बोरकर.

पृष्ठ ६८, किंमत ६० रुपये


युगवाणी

जुलै २०१४ ते मार्च २०१५

।। सहभाग ।।

कॉ. गोविंद पानसरे, डॉ. मा. गो. वैद्य, प्रा. माणिक कानेड, प्रा. के. ज. पुरोहित (शांताराम), डॉ. किशोर सानप, डॉ. आशा सावदेकर, डॉ. प्रमोद मुनघाटे, महावीर जोंधळे, सदानंद देशमुख, डॉ. सुखदेव ढाणके, डॉ. केशव सखाराम देशमुख, डॉ. विलास चिंतामण देशपांडे, डॉ. पुरुषोत्तम मोळोदे, ऐश्वर्य पाटेकर, कल्पना दुधाळ, योगिनी सातारकर-पांडे, डॉ. रविकिरण पंडित, प्रा. के. एम. फडणीस, डॉ. राहुल अशोक पाटील, नितीन माळी, विजयराज बोधनकर,

पृष्ठ ८४, किंमत १०० रुपये





युगवाणी

एप्रिल-मे-जून २०१५

।। सहभाग ।।

पद्मभूषण गिरीश कार्नाड, डॉ. प्रभा गणोरकर, डॉ. सुरेश देशपांडे, डॉ. वीरा राठोड, लोकनाथ यशवंत, अजीम नवाज राही, दा. गो. काळे, डॉ. विलास चिंतामण देशपांडे, शुभदा फडणवीस, अनिल चनाखेकर, शोभा रोकडे, मनीषा साधू, अशोक इंगळे, अजेय गंपावार, चंद्रगुप्त भालेराव, अनिल कुलकर्णी.

पृष्ठ ८४, किंमत १०० रुपये

संपर्क सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, नागपूर ४४००१२
दूरध्वनी ०७१२-२५२३९२९, २५५३७६७



नेमाडे यांच्या कादंबऱ्यातील महानुभावपंथाच्या साहित्याचे उपयोजन

डॉ. अण्णा वैद्य

■

मराठी भाषेचे पुरस्कर्ते, ज्येष्ठ कादंबरीकार, कवी व समीक्षक डॉ. भालचंद्र नेमाडे यांना २०१५ मध्ये ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला आहे, ही मराठी भाषिक समूहासाठी आनंदाची गोष्ट आहे. नेमाडे यांना या आधी साहित्य अकादमी व इतर सन्मान प्राप्त झाले आहेत. ते प्रकृती धर्माने कवी आहेत तसेच कादंबरीकार म्हणून त्यांची ओळख आहे त्यांची 'कोसला' ही अत्यंत गाजलेली व नंतर 'चांगदेव चतुष्ट्य' व अलीकडीची 'हिंदू' ह्या सर्व कादंबऱ्या वाचकाला अंतर्मुख करणाऱ्या व वेगळी अनुभूती देणाऱ्या मराठीतील महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत. मराठी कादंबरीचा रूपबंध नेमाडे यांनी बदलविला. त्यांनी 'टीकास्वयंवरा'मधून 'देशीवाद' ही संकल्पना मांडली आहे. तिचा पुरस्कार त्यांनी आपल्या कादंबऱ्यातून केल्याचे दिसते. नेमाडे यांची लेखनाची खास शैली आहे. तिच्यात स्पष्टता, वास्तवाचे तपशिल, अंतर्गत तत्त्वप्रवाह, घटना प्रसंगांचा विस्तार, एक भूमिका, मिस्किल पद्धतीने केलेली प्रसंगांची मांडणी असते.

कोणताही संवेदनशील लेखक हा त्याच्यावर झालेल्या चांगल्या संस्काराला आपल्या लेखनामधून पेरीत असतो, वाचक वर्गाला संस्कारित करणे हे त्याचे प्रयोजन असते. भालचंद्र नेमाडे यांच्यावर त्याच्या आईकडून महानुभाव पंथाच्या विचाराचे तत्त्वदर्शनाचे संस्कार झाले आहे, जे त्यांच्या अंतर्मनात खोलवर जाऊन रुजले आहे. त्यांच्या कादंबऱ्यातून ते सारेच संस्कार आपसूकच व्यक्त होतांना दिसतात, ''कादंबरी लेखन हे मात्र बरंचसं जागरुक राहूनच केलं जातं. कारण कादंबरीत जे येतं ते तुमच्या वैचारिकतेचाही भाग असतं''[१] असे डॉ. नेमाडे एका मुलाखतीमध्ये म्हणतात.

महानुभावीय गद्य लेखन शैलीचाही प्रभाव नेमाडे यांच्या कादंबरी लेखनावर आहे. नेमाडे हे परंपरा माणणाऱ्यापैकी आहेत. भाषेबद्दलची आपली आग्रही भूमिका सांगतांना एका मुलाखती मध्ये ते म्हणतात, ''चक्रधरांनी मोठ्याप्रमाणात सांगितलं की हे बघा, संस्कृत मला कळत नाही. मोठा पंडित असूनही त्यांने सांगितलं की, माझ्याशी मराठीतूनच बोला. असं ते मुळातलं काहीतरी ऊर्जित होतंच. ही ऊर्जित होण्याची ताकद परंपरेमध्ये असतेच.''[२] समाजाच्या पूर्वापार अध्यात्मिक धारणा, परंपरा व्यक्तीच्या व समष्टिच्या हिताच्या असतात त्या समाजाच्या सांस्कृतिक नैतिकतेवर आधारित अधिष्ठित असतात. सुखलोलुप प्रवृत्ती वाढीच्या काळात ह्या परंपरांचा समाजाला विसर पडत असतो. अशा वेळी कलावंत परंपराची घडी नीट सावरण्याची धडपडत धडपळत असतो. नेमाड्यांची मराठी संस्कृतीत रुजलेली नैतिक विधायक व मानवी आयुष्याला आकार देणारी, महानुभावीय तत्त्व आचरणाची परंपरा आपल्या लेखणीतून अधिक भक्कम केली आहे असे दिसते. आपल्याला श्रेष्ठ वाटतो असा ग्रंथ कोणता? या प्रश्नाच्या उत्तरामध्ये डॉ. नेमाडे यांनी म्हटले आहे. ''तुकाराम सर्वप्रथम मग महानुभाव ग्रंथ...''[३] लीळाचरित्रामधून

साकारलेल्या श्री चक्रधरांचे अलौकिक व्यक्तिमत्त्व, नैतिक, आचरण, त्यांचे सामाजिक कार्य, भाषाप्रेम, त्यांची दयाळू कनवाळू वृत्ती, त्यांचे तत्त्वज्ञान इ. संस्कार नेमाडे यांच्या मनावर झालेले आहेत.

श्री चक्रधरांच्या विचारांचा प्रभाव नेमाडे यांनी एका भाषणामधून मान्य केलेला आहे. ते म्हणतात, ''आजपर्यंत वाचक, शिक्षक, संशोधक, समीक्षक आणि लेखक अशा वेगवेगळ्या अंगांनी मी जगातल्या लहानमोठ्या वाङ्मयीन परंपरांशी परिचित आहे, विश्वसाहित्यातल्या मोठमोठ्या साहित्यकांचा माझ्यावर प्रभाव आहे. तरी ही आपल्या ह्या भूमिनिष्ठ परंपरेतले दोन महात्मे, श्री चक्रधर आणि तुकाराम हेच माझे उच्चतम आदर्श राहिले आहेत''[४] म्हणूनच त्यांच्या कादंबऱ्या मधून महानुभावीय साहित्यातील अनेक सूत्रे व विविध संदर्भ, व काही तपशील सहज येतात. त्यांचे नायक सभोवतीच्या जगात नैतिक मूल्यांना हृदयाशी घट्ट धरून जगतांना दिसतात. ही नेटाने जगण्याची शक्ती, मनाला विचलनापासून अलिप्त ठेवण्याचा निग्रह व संयम हा तत्त्वज्ञानातून वृद्धींगत होतो. 'जरीला'पासून पुढच्या कादंबऱ्यात हे दिसते.

डॉ. नेमाडे यांच्या १९३६ मध्ये प्रकाशित झालेल्या 'कोसला' कादंबरीने मराठी कादंबरीच्या इतिहासात स्वतःची एक वेगळी नोंद करून ठेवली आहे. ज्या नोंदीला अनेक आयाम आहेत. प्रामाणिकपणे सभोवतालचे वास्तव प्रथमपुरुषी निवेदनातून डॉ. नेमाडे यांनी पांडुरंगाच्या शब्दातून गढूळ शैक्षणिक, सामाजिक व व्यक्तिगत अनुभूतींनी व्यापलेले जग वाचकापुढे ठेवले आहे. पांडुरंगच्या मनातल्या वैचारिक आंदोलनाला शेवटी महानुभावीय संन्याशी बंबास बुआच्या रूपातून प्रतिकात्मकरित्या उत्तरे मिळतात. पांडुरंगाचा अत्यंत आवडीचा गिरधर हा गावातला मित्र त्याला महानुभावीय पोथ्या पुराणांचे वेड असते ('कोसला' पृष्ठ ३) ह्या गिरधरनेला एका महंताकडून एकतेला एक मजेशिर किस्सा पांडुरंग आपल्याला सांगतो त्यामध्ये सुद्धा ''जीवे परमेश्वराधीन होआवे'' हे सूत्र स्पष्टीकरणार्थ दिलेला दाखला जरी विनोदी असला तरी, त्यातून जीवाची लौकिक गुंतागुंत किती अतूट आहे हेच पांडुरंगला सांगायचे आहे. पृष्ठ क्र. १८५ वर पांडुरंगची दैनंदिनी आहे ज्यात ''सप्टेंबर २ सूत्रपाठः ग्रेटेस्ट, वटबाजीमध्ये साकोपसाकी पानी फळींची आवघा वट सामावला असे ग्रेटर

स्वदेशसंबंधु त्याज्यः स्वग्राम संबंधु त्याज्यः संबंधियांचा संबंधुः तो विशेषतां त्याज्यः''[५] असा संदर्भ येतो श्री चक्रधरांनी संन्यास धर्माची असतीपरी सांगताना जीवाने सर्व नातीगोती सोडून परमेश्वर चिंतनामध्ये स्वतःला समर्पित करावे असे एक सूत्र आहे त्यातून, जीवाच्या मुक्तीची महत्त्वाची अट स्वामीनी आपल्या शिष्यपरिवाराला सांगितली. पांडुरंगचे हे चिंतन, दैनंदिनी वजा विचारातून, त्याच्या मनातील संस्कारातून येते. पांडुरंग 'लीळाचरित्र' विकत घ्यावे म्हणून पुण्याची सारी दुकाने पालथी घालतो. श्री चक्रधर केळाच्या सालीचा हत्ती करून पहात बसायचे ही लीळा पांडुरंगला ग्रेट वाटते (पृ. १८९).

'कोसला'मध्ये पांडुरंगची संभ्रमित अवस्था चित्रित झाली आहे. कोसलावर भाष्य करतांना के. रं. शिरवाडकर म्हणतात, ''आयुष्याच्या सर्वांगीण अर्थशून्यतेची त्याला विषण्ण जाणीव होते. ऐहिक पातळीवर वा वैश्विक पातळीवर अर्थशून्यता हेच सत्य''[६] या निष्कर्षावर तो येतो.

कोसलाच्या सहाव्या भागात पांडुरंग गावाकडे आलेला असतो. 'आत्मा अमर आहे' हे पांडुरंग मानतो. त्याचा मित्र गिरधर दररोज देवपूजा करून मठात जाऊन महानुभावीय संन्याशांसोबत विविध आध्यात्मिक विषयावर चर्चा करतो. महंत बंबासबुवा नामस्मरणात मग्न, हातातील माळेचा एक-एक मनी सरकवत बोलयाचे, गिरधरच्या घरची परिस्थिती गरीबीची होती. दोघेही बंबासबुवा सोबत चर्चा करतात. दोघेही अस्वस्थ, 'ह्या जगात संपूर्णतः नवी वस्तु कोणती?' याविषयी त्यांच्यात प्रश्नोत्तर स्वरूपाची चर्चा होते. गिरधरला परमेश्वर हीच नित्यनूतन वस्तू वाटते जीवाचे सारे काही परमेश्वरच करतो, असे बुवा सांगतात ते गिरधरला पटते, 'परमेश्वरापेक्षा माणूस श्रेष्ठ' हा गिरधरचा युक्तीवाद ऐकूण बुवा नुसते हसतात. बुवाच्या मते नित्य नवी गोष्ट म्हणजे मरण-पुढे गिरधरला एक बैरागी यात्रेत मिळतो. शेवटी एक दिवस गिरधर गाव सोडून जातो. पांडुरंगच्या मते ''तो भट मार्गीचा महात्मा झाला'' गिरधरला श्री चक्रधरानी सांगितलेले मोक्ष प्राप्तीचे मार्ग माहीत होते. त्याने अंमलात आणले. तो मुक्तीच्या दिशेचा प्रवासी होतो. येथे लेखकाला श्री चक्रधराचा बद्धमुक्तीचा तत्त्व विचार गिरीधरच्या कथेतून सुचित करावयाचा आहे.

'कोसला' नंरत बारा वर्षांनी नेमाडे यांनी 'बिढार' (१९७५) या कादंबरीतून चांगदेव पाटील या पात्राची कथा सांगितली आहे. 'बिढार', 'हूल' 'जरीला' 'झूल' या चार कादंबऱ्यातून चांगदेव पाटील क्रमशः वाचकासमोर अभिव्यक्त होतो. तृतीयपुरुषी निवेदनातून तो साकार होतो, चांगदेव या नावाशी महानुभाव पंथीय विचारधारेचे नाते नक्कीच आहे.

श्री चक्रधरांनी वेळोवेळी आपल्या पूर्वायुष्यातील काही प्रसंग घटना आपल्या शिष्यांना सांगितल्या त्यात श्री चांगदेव

राऊळ यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय होतो. श्री चांगदेव राऊळाचा जन्म, आईवडील, तारुण्य, आईवडिलांचे निधन, श्राद्ध, श्री दत्तायेयांकडून शक्ती स्वीकार, नंतर द्वारकेला जाऊन स्वेच्छेने केलेली समाजसेवा वेगवेगळ्या शिष्यांना केलेला उपदेश शेवटी देहत्याग ह्या सर्व चरित्रात्मक नोंदी मधून श्री. चांगदेव राऊळ या विभूतीविषयी वाचकांच्या मनात आदर आहे. संसारात कधी ही न रमलेले, गंभीर, नैतिकता जोपासणारे, सेवाभावी, कृतिशील व मीतभाषी असलेले चांगदेव राऊळ नायक चांगदेव पाटीलच्या रूपाने चांगदेव चतुष्ट्य मधून भालचंद्र नेमाडे यांनी साकरण्याचा प्रयत्न केला आहे. 'बिढार'मधून मोठ्या कुटुंबाच्या गावात मनसोक्त वाढलेले परंतु हतबल झालेल्या नंतर चांगदेवची सारी धडपड सभोवतीचं जग तपासण्यात खर्च होते तो स्वतःला सान्या पसान्यात शोधत राहतो.

'बिढार'मध्ये कुणाशीही जुळवून न घेणारा तरुण उळदी या गावातून पदवीचे व पुढचे शिक्षणासाठी मुंबई मध्ये आलेला दोस्त मित्रांच्या गोतावळ्यामध्ये वाङ्मयीन चळवळीत काम करतो, चांगदेवला स्वतंत्रपणे जगावेसे वाटते. त्रयस्तपणे ह्या संपूर्ण पसाऱ्याकडे तो बघतो. वेळोवेळी त्याच्या मनातील विचार निवेदनामधून नेमाडे मांडतांना दिसतात हे विचार श्री चक्रधरांच्या तत्त्वज्ञानाशी अगदी समांतर असेच आहेत. त्याला 'स्व' अस्तित्वाविषयी पडलेले असंख्य प्रश्न या प्रश्नातून त्याचा उडालेला गोंधळ आणि गोंधळातून त्याने निवडलेली एकाकी भ्रमती. श्री चांगदेव राऊळा यांच्या चरित्राशी संबंधीत काही घटनेशी साम्य दर्शविणारी वाटते. 'जरीला'मध्ये चांगदेवची भटकंती सभोवतीच्या गढूळ वातावरणात स्वतःला सुरक्षित ठेवण्यात खर्ची होते. 'जरीला' विषयी - डॉ. द. ता. भेसले म्हणतात, ''अतिशय बेचव जीवन जगण्यासाठी माणसाला करावी लागणारी अथक धडपड आणि जीवनाचे साफल्य शोधणारी भिन्न भिन्न व्यक्तीची भिन्न भिन्न मूल्ये यांच्यामुळे जिवंत माणसांच्या जंगलात राहूनही येणारी निर्जीवता, एकलेपणा वाचकांना या प्रसंगातून दाहक रीतीने जाणवत राहतो.''[७] ह्या एकाकीपणाविषयी चक्रधरांनी आपल्या विविध सूत्रांमधून विवेचन केले आहे. 'हा अवघा डोगंरू पोकळ असे' ऐहीक जगात जीव मायेत गुंततो अविद्येच्या मळामुळे त्याला त्याचे मूळ रूप दिसत नाही. अशा जीवाच्या विद्याप्राप्तीच्या मार्गात शेकडो अडथळे आहेत. एकूणच हे सारे अडथळे पार करून ज्ञानप्राप्ती झाल्यावर ईश्वराजवळ शरणांगतवृत्तीने जीव समर्पित झाला तर, अशा जीवाला ईश्वराकडून मुक्ती मिळू शकते. ऐहीक जगामध्ये व्यक्तीचं गुंतत जाणं हे पारमार्थिक जगापासून फारकत घेण्यासारखं आहे म्हणून नेमाडे यांचे सारेच नायक ऐहिकतेमध्ये एका मर्यादेपर्यंत रमतात नंतर त्यांना या जगाचा तिटकारा येतो. हा नेमाडे यांच्यावर असलेला चक्रधरांच्या विचारतत्त्वाचा प्रभाव आहे असे म्हणता येते. सभोवताली सारे वेगडी चेहरे, असत्यामुळे नाईलाजाने काही काळा त्यांच्याशी जमवून घेणे नंतर नवीन माणसे शोधणे, गाव शोधणे असा सगळा प्रवास करणारा. 'जरीला'तील चांगदेव म्हणतो, ''आता इलाज नाही आता पळावंच, अत्यंत दूरचं, सुंदर जुनं वाटणारं गाव घेतलं पाहिजे आपलं हे अस्तित्व म्हणजे भुयार खणत खणत पुढे पुढे जात रहाण्यासारखंच झालं आहे. ते चालूच ठेवावं आणि आता ज्या कोणत्या गावात जावं तिथं मात्र पूर्ण गाडून घ्यावं आणि जमेल तसं उगवून वाढत रहावं सगळ सहन करत वर्षानुवर्ष रहावं''[८] चांगदेवला ह्या पसाऱ्यात 'स्वत्व' गवसत नाही. 'झूल'च्या सुरुवातीला नामदेव भोळे आईचा मृत्यू विधी आटोपून रेल्वेने प्रवास करीत असतो. आपल्या आईच्या अंत्यविधीनंतर तेरा दिवसांनी आपल्या नोकरीच्या गावी निघतो तेव्हा त्याच्या मनात विचार येतात. ''आता पुन्हा इकडे येणं नको. 'स्वदेश संबंधु ताज्य संबंधियांचा संबंधु तो विशेषतः त्याज्य' हे घर आता संपल''[९] असे वर्णन आहे. चक्रधरांच्या सूत्रपाठामध्ये सन्याशांची असतीपरी सांगतांना सर्वज्ञ म्हणतात ''सन्याशी जीवाने स्वतःचा परिसर गाव व नातेवाईक आणि इतर गोत्र संबंधी यांच्या संपर्कात राहू नये. असे केल्यास त्यांचे चित्त विचलित होते वा तो परमेश्वर भक्तीपासून तो दुरावतो. नामदेव भोळे कथेसाठी हे सूत्र नेमाडे योजतात अर्थात सूत्रामागील गर्भितार्थ खूप मोठा आहे. नामदेवला परत त्या प्रदेशात जाणे नव्हते एवढे मात्र नक्की.

चांगदेव 'स्त्री' मोहात गुंतत नाही. त्याच्या अवतीभोवतीच्या स्त्रियांशी तो अंतर ठेवनूच असतो. त्याच्या अंतःकरणात स्त्री विषयी प्रचंड आदर आहे. स्त्री विषयीची कुठली ही आसक्ती चांगदेवाच्या मनात नाही. आचारमालिकेत चक्रधरांनी सन्यासधर्माचे पालन करतांना पुरुष मंडळींनी स्त्री संबंधापासून कसे दूर राहावे हे सांगितले आहे. या आचार मालेतील अशा अनेक सूत्रांचा प्रभाव नेमाडेंवर आहे. 'झूल' चा शेवट हा अनेक कार्य सूचित करतो. त्याला 'स्थिती' होते. ''धनधोर सृष्टितत्त्वाचा एक भाग म्हणून आपलं अस्तित्व आहे हा अवघा डोंगर पोकळ असे. कोणी इथले रिगणे निगणे जाणे ना. मी अनादीचा अस्वस्थ गा. माते अस्वस्थाते स्वस्थ की जो ह्या संकुचित खंडित समाजजीवनामध्ये मला संपूर्ण अस्तित्व ओतता येत नाही. मी कोणाला बांधलेलो नाही. मला घर दार नाही. जातिधर्म नाही खुंटदावे नाही. आईबापाचा स्वग्रामाचा स्वसंबंधियांचा मी त्याग केला आहे. हे घनघोर उग्र सृष्टितत्त्वा

अनुक्रमणिका

मला शुद्ध जीव कर''[१०] 'झुल' विषयी भाष्य करतांना डॉ. सानप म्हणतात, ''झूलच्या शेवटी चांगदेवाच्या संवेदनांच्या यात्रेला अंतिमता प्राप्त होतांना दिसते. ...महानुभावीय गोसाव्यासारखी त्याची स्थिती होते. अस्तित्वाचे प्रयोजन त्याला कळते... समाजजीवनात स्वतःला झोकून जगतांना काहीही जीवनाचे तत्त्व त्याच्या हाती येत नाही.... तो स्वतःची नैतिकता कुठेही ढळू नये म्हणून जास्तीत जास्त निकोप जीवन जगत आला आहे... त्यात त्याच्या मनाला मृत्यू जाणिवेचा स्पर्श होऊन तो मूळ सृष्टितत्वाशी आपला संबंध जोडतो.''[११] सतीश बडवे नेमाडे यांच्या कादंबऱ्यावर भाष्य करतांना म्हणतात, ''भालचंद्र नेमाडे या चतुष्ट्यात मूल्यऱ्हासावर काठी उगारतात; पण त्यांची मूळ भूमिका ऱ्हासशीलतेवर प्रहार करून ती नष्ट करण्यावर व सज्जनांची समर्थता वाढवण्यावर आहे''[१२]

जीवाला लागलेला आदीमळ बाजूला होऊन तो शुद्ध रूपात जाणे म्हणजेच मुक्तीचा दिशेने त्याचा प्रवास सुरू होणे आहे. ह्या भूमितत्वाशी जीवाने असलेले सारे संबंध तोडून आपल्या मूळ रूपाकडे झेप घ्यावी. 'झूल'चा शेवट हा महानुभावीय तत्त्वज्ञानाशी समांतर वाटतो. नेमाडे यांच्या २०१० मध्ये प्रकाशित झालेल्या 'हिंदू' कादंबरीत महानुभावीय सूत्र व संदर्भांच्या नोंदी विपुल आहेत. खंडेरावची तिरोणी आत्या संन्यांस घेऊन फाळणीच्या काळात सारंगधर महानुभावीय संन्याशांच्या मार्गासोबत पाकिस्तानात गेलेली असते. खंडेराव तिचा शोध घेतो या तिरोणी आत्याने लहानपणी खंडेरावला चक्रधरांच्या लीळा सांगितल्या असतात. श्री चक्रधराने धानीला सांगितलेली चिऊ काऊची गोष्ट तिरोणी आत्याने खंडेरावला सांगितलेली असते. (पृ. ४२) खंडेराववर लहानपणी चक्रधराचे संस्कार करणाऱ्या आत्याच्या आठवणीने खंडेराव अस्वस्थ होतो. आत्याचा शोध घेण्यासाठी त्याला डॉ. जलील हे पेशावर मध्ये जन्मलेले व कट्टर सुफी परंपरेतले विद्वान गृहस्थ मदत करतात.

'प्रतिष्ठानी श्री चांगदेवो राऊळ सर्वज्ञांचे चरण शरणः'
'द्वापारी श्रीकृष्ण चक्रवर्ती गोसावियांचे चरणशरणः'

हे जीव उद्धरणासाठीचं स्मरणासाठी घेतल्या जाणार नामं व कडक आचार विचाराचं पालन करत तिरोणी आत्या पायी चालत पाकिस्तानातल्या पेशावर परिसरामध्ये गेलेली असते. तिला जातांना खंडेराव बघतो. श्रीचक्रधरांनी म्हटले होते. ''तुम्ही महात्मे की गाः एकी गावी जेविजेः एकी गावी आंचवीजेः'' म्हणजे एका गावी जेवण करा आणि दुसऱ्या गावी हात धुवा, चूळ भरा हे आणि अशी सूत्रे आत्मसात करीत आत्या इकडे आली आहे. शेवटी ती श्रेष्ठच. असे ते खंडेरावला वाटते. वजिराबाद, जलालपूर, रावळपिंडी, हजरा, अटक इ. मठात खंडेराव जातो. देवपूजा करतो मठातील विशेष कपाळाला लावतो. त्याचा आठ दिवस शोध सुरू असतो, भ्रमंती सुरू असते. खानदेशातल्या महंताची ओळख देतो पाकिस्तानातली धार्मिक कट्टरता व इतर बाबी मुळे मठांमध्ये पूर्वीपेक्षा दानधर्म कमी झाल्याची खंत महंत बोलून दाखवितात. सारंगधर महंताचा मार्ग शोधण्यात खंडेराव, मंडी यांना आठदिवस लागतात. मंडी, आणि खंडेराव यांची धार्मिक विषयावर दीर्घ चर्चा होते, ही चर्चा महत्त्वाची आहे. महानुभावीय मठ परंपरा ही एकूणच समाजव्यस्थेसाठी व वैयक्तिक आध्यात्मिक उन्नतीकरिता कशी हिताची आहे? असे खंडेराव मंडीला पटवून देतो. त्याच्या मते, महत्त्वाकांक्षेतील राक्षसीवृत्ती या संन्यांशामध्ये नसते, कुठलाही अभिमान गर्व न बाळगता आपण दीन लीन आहोत, आस, मोह याचा त्याग केला आहे हे तनमनधनानं जाहीर करणं यालाही केवढं धैर्य लागतं? भीक मागायला केवढं धैर्य लागत असेल? लहानपणी नवस पूर्ण करावा म्हणून खंडेरावच्या सीता आजीने, आपल्या सासूचा नवसपूर्ण करण्यासाठी एक मुलगी दत्ताला वाहीन असे म्हटले, त्यानंतर आठवर्षांनी तिला तिरोणी आत्या झाली. तिच्या जन्माच्या आठवर्षाआधीच तिचा करार ठरला होता.

'देमती दैवे करावे ते केले? पुरुषे करावे ते ठेलेः'

चौदाव्या वर्षी सारंगधर जावळे बुवाचा मार्ग रिद्धपूरवरून काबूलकडे जाणारा मोरगाव वरून जात होता. त्यांची दीक्षा घ्यायची ठरली. खंडवा, रतलाम, ग्वाल्हेर, मथुरा, जालंदर, लाहोर, पेशावर काबूल मार्गे तिरोणी हिराईसा होऊन रवाना झाली. ''स्वदेश संबंध त्याज्यः संबंधियांचा संबंधु तो विशेषता त्याज्य'' या सूत्राला अनुसरून तिरोणी आत्या निघाली, ती श्रद्धेतून या पुढच्या प्रवासाला लागली, ती बिचारी नाही तर साऱ्याच स्त्रिया बिचाऱ्या आहेत. असा खंडेरावला गुरुआई उपदेश करतात. ''अज्ञानी अत्यथाज्ञानः अन्यथाज्ञानी ज्ञानः निद्राः स्वप्न आत्मज्ञानः'' या सूत्राने या प्रसंगाचा शेवट होतो. कादंबरीत काही पात्रांच्या संवादांमधून चक्रधरांच्या विचारांचा सूत्रांचा उल्लेख होतो. 'श्री चक्रधरांना स्वतः चांभाराच्या घरी जेवत?' (पृ.१५०) तसेच पुरुषांचे काय जीऊ आणि बायकांच्या का जिऊल्या?(पृ.५१), महंत नागराज बाबाचा उल्लेख (पृ.१७८), तुमच्याकडून मुंगी रांड न हो आवी (पृ.३२८), खंडेरावला एका संन्याशाने सुंदरी लिपीतली पोथी दिली होती. ती पुरात भिजल्याने दुर्वाच्य झाली होती. ही भूर्जपत्रावर लिहिलेली होती. डॉ. चौधरी यांनी ती पुराभिलेखागारात नेऊन ठेवली. (पृ.४२५) ''बाई हा अवघा डोंगरू पोकळ असेः''- (पृ.४३८) खंडेरावचे वडील महानुभाव

मठाला देणगी द्यायचे (पृ. ५६६) वडीलाच्या अत्यविधीनंतर दुसऱ्या दिवशी महानुभाव नागदेवबाबा पारायणात समोरच्या नव्या संन्यास घेणाऱ्या पोरांना श्रीचक्रधरांची सूत्रं फोड करून सांगतात. 'द्वापारी श्रीकृष्ण चक्रवर्ती.... ''दुःखमिश्रित सुख ते सुख बोलिजेः तो आनंद नव्हे माया सृष्टि संहारू करीः विखो इंद्रियी विलया जाएः इंद्रिय अंतः करणी विलया जाएः अंतकरण देही विलया जाएः देह विदेही विलया जाएः विदेही हे नित्यः कारण अविद्येचा ठायी विलया जाएः कार्य कारणी विलया जाएः 'भेटो मज देवो होईल? (पृ.५७४) 'दिवस वंध्या जाऊ नेदिजेः एका झाडाची सवे न होआवीः एका स्थानाची सवे न होआवीः' (पृ.६०१) 'हिंदू'मध्ये महानुभावीय सूत्रांचे असे कितीतरी संदर्भ जागोजागी विखुरलेले आहेत. चक्रधरांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे जीव अज्ञानी, त्याच्या सभोवतीतचा अविद्येचा चिवट थर, परमेश्वराचा जीवाशी असलेला अनुबंध, जीवाची घुसमट, मोक्षप्राप्तीसाठी धडपडणाऱ्या जीवाची लौकिक जगाकडे बघण्याची दृष्टी हा विचार अंतर्गत प्रवाहाप्रमाणे कादंबरीतील घटनांमधून वाहत असल्याचे दिसते. मूळात माणसाच्या अस्तित्वाला अर्थ येतो तो समूहात! त्यामुळे समाजाचा इतिहास देशसीमांच्या मर्यादेत राहून तपशीलात जावून खंडेराव शोधतो. विठ्ठलरावच्या मरणानंतर 'स्वं' अस्तित्वाविषयी त्याला प्रश्न पडतात. दि. पु. चित्रे नेमाडे यांच्या कादंबऱ्यांसंदर्भात भाष्य करतांना लिहितात, ''नेमाड्यांच्या कादंबऱ्यात पात्रांचे, स्थळांचे घटनांचे सगळे अपरिहार्य तपशील ऐहिक आणि जडाच्या पातळीवरले असले तरी, त्यांचा आशय आध्यात्मिक आहे.''[११] हा आध्यात्मिक आशय प्रवाहाप्रमाणे वाहत आहे. त्याला वारकरी व महानुभावीय विचारधारेचे काठ आहेत. हा प्रवाह कधी वर येतो आणि निवेदनातून, संवादामधून तो दृग्गोचर होतो. तत्त्वीक मूल्यांना घेऊन जगण्याचे आटोकाट प्रयत्न नेमाडे यांचे सारेच नायक करतांना दिसतात. संजय भास्कर जोशी नेमाडे यांच्या कादंबरीलेखनाचे प्रयोजन सांगतांना म्हणतात, ''नैतिकतेच्या भानासह जगणे अर्थपूर्ण करता येईल काय, याचा शोध हेच नेमाड्यांच्या कादंबऱ्यांचे प्रयोजन आहे असे वाटते.''[१४] तर महेंद्र कदम यांना नेमाडे यांच्या कादंबऱ्यातील नायकांच्या आत्मशोधाचा प्रवास समांतरपणे चालत राहतो.[१५] असे जाणवते. तर 'हिंदू' कादंबरीवर भाष्य करतांना अजय देशपांडे म्हणतात, ''हिंदूमध्ये नेमाडे यांनी लोकजीवनाचे व्यापक आणि व्यामिश्र रूप दाखवत या प्रदेशातील एकूणच मानवी संस्कृतीचे दर्शन घडवले आहे''[१६] आणि अभय टिळक यांना ''नेमाडे यांच्या साहित्यात संत विचारातून सिद्ध झालेल्या मूल्यांचा अंतप्रवाह पदोपदी जाणवत राहतो''[१७] असे दिसते. एकूणच नेमाडे यांच्या कादंबरीला कोण्या एका प्रवाहात समाविष्ट करता येत नाही. तत्त्वज्ञानाची भक्कम बैठक, बहुआयामी आशय व सखोल नोंदीचा दीर्घ असा पट. वाचकांची कोंडी करणारी विस्तृत परिमिती त्यांच्या साऱ्याच कादंबऱ्यांना लाभली आहे. एकूणच नेमाडे यांच्या लेखनावर महानुभावीय तत्त्व विचारधारेचा प्रभाव आहे ही तत्त्वे संपूर्ण कादंबरीत प्रकट रूपात तर कधी अप्रकट रूपाने अविभाज्यपणे शब्दातून साकारत गेली आहेत. नेमाडे सारख्या वास्तवाशी प्रामाणिक राहणाऱ्या कादंबरीकाराला या शिवाय दुसरा पर्याय उपलब्ध नसतो. 'हिंदू'च्या पुढच्या भागातून महानुभावीय विचारतत्त्वांची गुंफन कशी असणार याची वाट बघू या.

संदर्भ :

१ डॉ. भालचंद्र नेमाडे, मुलाखत - 'फार वाचकांची गर्दी नको' निवडक मुलाखती, डॉ. नेमाडे, लोकवाङ्मयगृह-दु.आवृत्ती २०१० पृ. ५५.
२. डॉ. भालचंद्र नेमाडे, निवडक मुलाखती, पृ. १७०.
३. डॉ. भालचंद्र नेमाडे, 'मुलाखत' ''सरकार कलेच्या व्यवहाराला लायक नसतं''- 'निवडक मुलाखती' पृ. १२९.
४. डॉ. भालचंद्र नेमाडे, सोळा भाषणे, लोकवाङ्मयगृह.२००९. पृ. १६
५. डॉ. भालचंद्र नेमाडे, 'कोसला', पॉप्युलर प्रकाशन, आठवे पुनर्मुद्रण २०१३, पृ. ९.
६. के. रं. शिरवाडकर, 'संस्कृती, समाज आणि साहित्य' पद्मगंधा प्रकाशन. २०१३. पृ. १५६.
७. डॉ. द.ता. भोसले, 'चांगदेव चतुष्ट्य' या संबंधी-'जरीला' मलपृष्ठ अभिप्राय, २०१४.
८. डॉ. भालचंद्र नेमाडे, 'जरीला', पॉप्युलर प्रकाशन. ति.आ., २०१८. पृ. २३८.
९. डॉ. भालचंद्र नेमाडे, 'झूल', पॉप्युलर प्रकाशन. तिसरे पुनर्मुद्रण २०१४. पृ. ३.
१०. तत्रैव, पृ. २०१०-११.
११. डॉ. किशोर सानप, 'झूल' च्या मलपृष्ठावरील साररूप.
१२. सतीश बडवे - सामाजिक मूल्यऱ्हास आणि चांगदेव चतुष्ट्य. नेमाडे यांचे साहित्य संपादक श्रीकांत देशमुख. साक्षात प्रकाशन. २०१५. पृ. १३३
१३. दि. पु. चित्रे, रूचि, मार्च १९९८
१४. संजय भास्कर जोशी, कादंबरी परात्मतेच्या पराभूत पर्यायाची कालात्मक तपासणी- 'भालचंद्र नेमाडे यांचे साहित्य' साक्षात प्रकाशन, पृ. २०५.
१५. महेंद्र कदम, कवी नेमाडे यांची कादंबरी उनोक्ती पृ. १२९
१६. डॉ. अजय देशपांडे, 'हिंदू लोकजीवनाचे सांस्कृतिक आकलन', ललित नेमाडे विशेषांक, जून२०१५. पृ.१५९.
१७. अभय टिळक, 'नेमाडे आणि संत व संतप्रणित मूल्ये' ललित. उनि.. पृ. १२४.

। डॉ. अण्णा वैद्य
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
किरण नगर, अमरावती.
भ्रमणभाष : ९४२०१२५६८१

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त एप्रिल २०१५ ते डिसेंबर २०१५

■

१९ एप्रिल २०१५ डॉ. रवींद्र कोल्हे व डॉ. स्मिता कोल्हे ह्या सेवाभावी दांपत्याच्या जीवनाचा प्रवास व त्यांचे कार्य उलगडून दाखविणाऱ्या डॉ. मनोहर नंराजे ह्यांच्या 'बैरागड' या पुस्तकाचे प्रकाशन, विदर्भ साहित्य संघ व वेध प्रकाशन ह्यांच्या संयुक्त विद्यमाने झाले. या प्रसंगी कोल्हे दांपत्यांचा सत्कारही करण्यात आला. अध्यक्षस्थानी वामन तेलंग होते. या चरित्रात्मक कादंबरीवर डॉ. रवींद्र शोभणे ह्यांनी भाष्य केले.

१ मे २०१५ जुन्या धनवटे रंगमंदिराचे शिल्पकार कै. नाना जोग यांच्या पुण्यतिथी निमित्त विदर्भ साहित्य संघाच्या चवथ्या मजल्यावर टेरेस गार्डनमध्ये पुर्नस्थापित करण्यात आलेल्या त्यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून त्यांचे स्मरण करण्यात आले. उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी ह्यांनी यावेळी नाना जोग ह्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. या प्रसंगी कार्याध्यक्ष वामन तेलंग, चिटणीस डॉ. विलास चिंतामण देशपांडे, कोषाध्यक्ष विलास मानेकर, परीक्षा समिती संचालक शुभदा फडणवीस, सांस्कृतिक समितीचे आमंत्रक प्रकाश एदलाबादकर व संघाचे पदाधिकारी, आमंत्रित मान्यवर व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

१८ जून २०१५ : विदर्भ साहित्य संघाच्या सरचिटणीस शोभा अरुण उबगळे यांच्या निधनाबद्दल कार्याध्यक्ष वामन तेलंग ह्यांच्या अध्यक्षतेखाली श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी कै. सौ. शोभा उबगडे ह्यांच्या चाहत्यांनी त्याच्या कार्यावर प्रकाश टाकला.

२० जून २०१५ डॉ. रवींद्र शोभणे ह्यांच्या 'सत्यापासून साहित्यापर्यंत' या ग्रंथाचे प्रकाशन डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी वामन तेलंग होते. या ग्रंथात शोभणे यांच्या साहित्यावरील महत्त्वाचा पत्रव्यवहार आणि समीक्षा लेखनाचा समावेश आहे. या पुस्तकावर डॉ. मोना चिमाटे व प्रा. अजय देशपांडे ह्यांनी भाष्य केले.

१५ जुलै २०१५ : मराठीचा व्यासंगी समीक्षक प्रा. डॉ. अरुणा देशमुख ह्यांना विदर्भ साहित्य संघातर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली.

९ ऑगस्ट २०१५ विदर्भ साहित्य संघ आणि विजय प्रकाशन ह्यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. श्रीकांत मुळे ह्यांच्या 'अर्धउत्क्रांत' ह्या कादंबरीचे प्रकाशन डॉ. रवींद्र शोभणे ह्यांच्या हस्ते झाले. डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. डॉ. वसुधा वैद्य व ज्योती भगत ह्यांनी कादंबरीवरील आपली निरीक्षणे नोंदविली.

०१ नोव्हेंबर २०१५ कै. उ. रा. गिरी ह्यांच्या स्मरणार्थ कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी नवोदित साहित्यिकांकडून कविता मागविण्यात आल्या होत्या. अध्यक्षस्थानी बळवंत भोयर होते. तर सूत्रसंचालन ज्योती भगत ह्यांनी केले.

१० डिसेंबर २०१५ : विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ कादंबरीकार व पत्रमहर्षी ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर स्मृती व्याख्यानमालेत सकाळ वृत्तपत्र समूहाचे संपादक उत्तम कांबळे (पुणे) ह्यांचे 'असंघटित समाजाचे माध्यमात उमटणारे प्रतिबिंब' या विषयावर व्याख्यान झाले. तरुण-भारतचे माजी संपादक दि. भा. उपाख्य मामा घुमरे या प्रसंगी अध्यक्षस्थानी होते. वामन तेलंग व्यासपीठावर उपस्थित होते. सरचिटणीस डॉ. विलास चिंतामण देशपांडे ह्यांनी आभार मानले. सूत्र संचालन शुभदा फडणवीस ह्यांनी केले.

१७ डिसेंबर २०१५ : ना. के. बेहेरे आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा झाली. 'व्हॉटस् अप् हवे की नको' हा स्पर्धेसाठी विषय होता. स्पर्धेचे उद्‌घाटन विदर्भ साहित्य संघाचे कार्याध्यक्ष वामन तेलंग होते. या प्रसंगी प्रदीप बेहेरे व मीना बेहेरे उपस्थित होते. लोकसत्ताचे निवासी संपादक देवेंद्र गांवडे व योगेश बन्हाणकर ह्यांनी स्पर्धापरिक्षकांची जबाबदारी पार पाडली. सूत्रसंचालन शुभदा फडणवीस यांनी केले. आभार प्रदर्शन प्रकाश एदलाबादकर ह्यांनी केले.

। डॉ. विलास चिंतामण देशपांडे
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर,
ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१५



चित्र : संतुक गोलेगावकर



- **वसंत आबाजी डहाके विशेषांक** जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१२, पृष्ठे : १००
- **ग्रेस विशेषांक** जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०१२, पृष्ठे : १८०
- **लेखिका संमेलन विशेषांक** ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१३, पृष्ठे : ८४
- **नामदेव ढसाळ विशेषांक** जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०१४, पृष्ठे : ८४
- **भालचंद्र नेमाडे विशेषांक** जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर, ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१५, पृष्ठे : ८४

मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका